# हिंदुत्व

लेखक–बॅ. विनायक दामोदर सावरकर

भाषांतरकार–डॉ. नारायण दामोदर सावरकर

G-6395

**गणेश महादेव आणि कंपनी**

६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर

किंमत १ रु

मुद्रक व प्रकाशकः  गणेश महादेव वीरकर
' साहित्य-सेवक ' छापखाना, ६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर
द्वितीयावृत्ति : फेब्रुवारी १९३३

हक्क प्रकाशकाकडे आहेत ]

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

। आसिंधु-सिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका ॥
। पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरितिस्मृतः ॥ १ ॥

ज्या ' हिंदुत्व ' नांवाच्या मूळ अिंग्रजी ग्रंथाचें हें पुस्तक मराठी भाषान्तर आहे तो मूळ ग्रंथ स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर हे जन्मठेपीच्या बंदीगृहांत बंदीवान असताना त्यानीं लिहीला होता. ते सुटून येण्यापूर्वीच तो प्रकाशित करण्याचें आम्ही ठरविल्यामुळें त्यांच्या संमतिवांचून त्यांचे नांव त्यावर घालणें अशक्य होअून आम्ही ' मराठा ' ह्या टोपण नावानेंच काय तो प्रथमावृत्तींत लेखकाचा अुल्लेख केला होता. त्या अिंग्रजी ' हिंदुत्वा'च्या मराठी भाषांतराची ही द्वितीयावृत्ति प्रसिद्धिण्याचा आज योग येत आहे हे त्या ग्रंथाचे महत्व वाचक वर्गालाही पटल्याचेंच चिन्ह होय. ' हिंदुत्वा'चें हिंदी भाषान्तरही विद्वन्मान्य झाले आहे.

हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून त्यांत प्रतिपादिलेल्या ' हिंदुत्वा 'च्या व्याख्येची साधक बाधक चर्चा हिंदुस्थानभर होअून आज हिंदु शब्दाच्या प्रचलित असलेल्या कोणत्याही व्याख्येपेक्षां हीच व्याख्या अैतिहासिक सत्याच्या कसोटीस टिकणारी, प्रस्तुत परिस्थितींत अुपयुक्त आणि म्हणूनच अधिकांत अधिक समाधानकारक आहे हें मत बहुमान्य झाले आहे. वेद, पुराण; गाय, गीता; शिखा, सूत्र; अित्यादि कोणत्याही विविक्षित ग्रंथाच्या वा चिन्हांच्या पायावर अुभारलेल्या व्याख्यांनीं हिंदुराष्ट्राची—जैन, शिख, शैव, वैष्णव, लिंगायत, बौद्ध, प्रभृति पक्षोपक्षांचा ज्यांत निर्विवादपणें समावेश होतो अशी व्यापक, आणि मुसलमान, खिश्चन, यहुदी प्रभृति अहिंदूंचे ज्यांतून निर्विवादपणें व्यावर्तन होते, अशी व्यावर्तक सीमा दिग्दर्शिली ज[illegible] नाही. परंतु " सिंधुपासून, सिंधुपर्यंत-आसिंधु सिंधुपर्यंता-भारतभ[illegible] पितृभू आणि पुण्यभू आहे तो हिंदु " ह्या सत्य, सोप्या आणि [illegible] मात्र हिंदुत्वाची सीमा त्यातंल्या त्यांत अत्यधिक निर्विव[illegible] रीतीनें दिग्दर्शिली जाते. शीख, आर्य, सनातनी, जैन. लिंगायत,—हिंदु कां ? तर त्यांची पितृभू भार[illegible] त्यांच्या धर्मसंस्थापकांची जन्मभूमी ( Holy [illegible] म्हणून ! हिंदु शब्दाचा हा अर्थ निश्चित [illegible]

[illegible] que
decided to
in a special
लागली
पवित्रा चु[illegible] असें अपयश
[illegible]ालेल्या लढाईमध्यें चढाईचें धोरण
[illegible]द्धां सुटत जाऊन अखेर जातीजातींची

शिरोधार्य करूं लागतो; त्यास ती नाकारतांच येत नाहीं. अुलटपक्षीं मुसलमान, ख्रिश्चन प्रभृति अहिंदूंपैकीं जरी कित्येकांची भावना भारतभूमीस पितृभू मानण्या-अितकी व्यापक झाली तरी जोंवर तो मुसलमान, वा ख्रिश्चन, वा यहुदी आहे तोंवर त्याची पुण्यभू—त्याच्या पैगंबराची जन्मभू—अरेबीया वा पालेस्ताअीन हीच रहाणारी असल्याने तो अहिंदु कां हेही चटकन स्पष्ट होते.

ह्यायोगेंच ही व्याख्या प्रसिद्धिल्या बरोबर जे अनेक आर्यसमाजी ' स्मृति–पुराणांस' न मानणारे होते, आणि श्रुति–स्मृति–पुराणोक्तता हीच हिंदुत्वाची व्याख्या तोंवर केली जात असल्यामुळें 'हिंदु' शब्द आपणांस लावून घेण्याच्या अत्यंत विरुद्ध होते, ते आज ह्या व्याख्येच्या अर्थीं आपणांस मोठ्या आनंदानें ' हिंदु ' म्हणवूं लागले आहेत. शिखांतील अकाली प्रभृति पंथ आणि आमचा जैनादिक बंधुवर्ग वेद प्रामाण्य मानीत नाहींत. अर्थातच वेद प्रामाण्यावरच प्रतिपादिलेल्या ' हिंदु ' शब्दांत ते स्वतःचा समावेश करून घेण्यास मान्य नसत. पण त्यांची पितृभू भरतखंड आणि पुण्यभूमीहि भरतखंडच आहे, हें तेही निर्विवादपणेंच नव्हे तर सानंद–साभिमान–पूर्वक मानीत असल्याने त्या अर्थीं अुपयोजिलेली 'हिंदु' ही अभिधा अंगिकारण्यास बहुधा कचरत नाहीत. किंबहुना ह्या दोन लक्षणांस नाकारणेंच, सनातनी असो वा सुधारक असो, शीख असो वा जैन असो त्यास अशक्य आहे.

सीमा म्हटली, व्याख्या म्हटली कीं अखंडांत संकेतानें पाडलेला खंड ! दोन देशांमधील सीमारेषा कितीहि सूक्ष्मपणें आखली तरी ती रेषा पुन्हा समाअीकच राहाणार. तशा अर्थीं ह्या व्याख्येंतही प्रचलित अनिर्णीत अपवादसीमा आहेच. पण [illegible]तेतर व्याख्यांहून ते अपवाद ह्या व्याख्येमुळें कमीतकमी अुरतात आणि अितरांहून [illegible]व्याप्ति व अतिव्याप्ति या दोषापासून अनेकपटीनें अधिक अलिप्त आहे हेच

[illegible] अखिल हिंदुमहासभा, नागपुर हिंदुसभा, पुणें हिंदुसभा, [illegible] हिंदुसभा, आर्ययुवक आखिल भारतीय परिषद, अनेक [illegible]भृति संस्थांनी आणि समितींनी ही व्याख्या सम-[illegible] पंजाब, मद्रास प्रभृति प्रांतांतील अनेक हिंदु [illegible]ली आणि वृत्तपत्रांनी ब्रीदवाक्य म्हणून



अुपयोजिली आहे. मूळ अिंग्रजी ग्रंथावर ज्या अनेक विद्वानांनीं अनुकूल अभिप्राय दिले त्यांतील कांहीं येथें अुद्धृत केले असतां या पुस्तकाचें व या व्याख्येचें महत्व किती आहे हे सहजच ध्यानांत येणारे असल्यामुळे या दुसऱ्या आवृतीचे प्रसंगीं त्यांचा मराठी अनुवाद खाली देत आहोंत:—

**हुतात्मे स्वामी श्रद्धानंदः**—हे पूर्वी अितर आर्य समाजीयांप्रमाणेच आणि वर अुल्लेखिलेल्या कारणासाठींच स्वतःस ' हिंदु ' न म्हणवितां ' आर्य ' म्हणवीत. परंतु, त्यांच्या जीवनाच्या अुत्तरार्धांत ते आपणांस ' हिंदु ' म्हणवून घेण्यांतही कांही संकोच मानीनासे झाले. हिंदुत्वाची ही व्याख्या आणि त्या शब्दाची ही पूर्वपीठिका ह्या ग्रंथात वाचतांच या शब्दाविषयीं असलेले त्यांचे पूर्वग्रह अितके युक्तीसंगत व समाधानकारक रीतीने निरस्त झाले कीं, ते सहर्ष अुद्गारुन अुठले " अहो, या लेखकाला ही स्फूर्ति झाली तरी कोणत्या वेळीं ! बहुधा ती वेळ अुषःकालचीच असली पाहिजे ! ह्या अशा दिव्य सत्याची स्फूर्ती अितर कोणत्या वेळीं कसली व्हावयास ! "

**महात्मा हंसराजः**—आपले मूल्यवान पुस्तक पावले. अेखाद्या देवाच्या देणगीसारखे ते मला भासले. हिंदु संस्कृतीच्या आणि हिंदु जातीच्या अुज्वल भविष्यावर माझ्या असलेल्या अंतःश्रद्धेस आपण किती वक्तृत्वशाली भाषेंत व्यक्तविली आहांत म्हणून सांगू ! राष्ट्र शक्तीचे सर्व प्रबल घटक हिंदुराष्ट्रातही अनुस्यूत आहेत हे सत्य आपण तंतोतंत पटवीले आहांत. हिंदूंच्या ज्या प्रचंड राष्ट्रीय अुत्थानाने मोंगल साम्राज्य धुळीस मिळविलें त्याची आपण केलेली मीमांसा अगदीं तथ्य नि, परिणामकारक आहे. आमच्यातीलच कांहीं श्रेष्ठ पुरुषही ज्या ह्या दुर्दिनामध्यें हिंदूंच्यी-सत्पक्षांचीहि अवहेलना करीत आहेत, त्या समयीं आपण हिंदूतील पक्षो[illegible] [illegible]न अेकजीव आणि अेकप्राण होण्याचा जो युक्तियुक्त अुपदेश दिला [illegible] que प्रसंगोचित आहे ! हिंदु शब्दाच्या पूर्वपीठिकेची चर्चा आपण decided to केली आहांत तिची प्रशंसा केल्यावांचून मला रहावत न[illegible] in a special लागली. प्रचार होअील तितका मला हवा आहे." [illegible] पवित्रा चुके [illegible] असें अपयश

**शंकराचार्य डॉ. कुर्तकोटीः**— भा[illegible] घाललेल्या लढाईमध्यें चढाईचें धोरण देशभक्ति नि सत्वाभिमान रसरसलेला ! प्र[illegible] अुद्धां सुटत जाऊन अखेर जातीजातींची

**भाअी परमानंद** M. A., **लाहोर:**—ह्या पुस्तकाचे आकर्षणच असें होतें, कीं ते मला अत्यंत विचारपूर्वक वाचल्यावांचून राहवले नाहीं. कोण हिंदु आणि कोण नाहीं ह्या अत्यंत वादग्रस्त आणि अनुत्तरणीय प्रश्नाचे हे पुस्तक म्हणजे निःशेष नि निर्विवाद प्रत्युत्तर आहे. ' The book is the best and the last solution of the most naughty problem: who is and who is not a Hindu.' अत्यंत प्राचीन ग्रंथांतील—विषयानुकुल अुताऱ्यानीं आणि मौलिक ( original ) विचारांनीं या पुस्तकावर लेखकाच्या विद्वत्तेची छाप पडली आहे. प्रस्तुत हिंदुसमाजावर ओढवलेल्या निराशेच्या काळोखांत हें पुस्तक हिंदु तरुणांत नवीन आशेची नि नवीन स्फूर्तीची ज्योत पेटविल्यावांचून राहाणार नाहीं. मला वाटते ह्या पुस्तकाच्या लेखकांचे नांव 'मराठा' नसून 'महात्मा' असावयास पाहिजे होते ! ! "

यावांचून डॉ. ब्रजेंद्रनाथ सील, LL. D., व्हाअीस चॅन्सेलर म्हैसोर विश्वविद्यालय; सर सुब्रम्हण्यम् आयर, LL. D., चीफ जस्टीस मद्रास हायकोर्ट; बंगाल, पंजाब, महाराष्ट्र प्रभृति बाजूंची अनेक वृत्तपत्रें यांतून या पुस्तकावर वरील आशयाचेच अुत्कृष्ट अभिप्राय आलेले आहेत.

ही द्वितीयावृत्ती काढतानां प्रथमावृत्तीचे लिखाणातील अनुवादात्मक किंवा मुद्रणात्मक चुकभूल सुधारण्यास संधि सांपडली नाहीं याविषयीं प्रकाशकास वाचकवृंद क्षमा करील अशी आशा बाळगून आणि त्रितियावृत्ति काढण्याचा योग आल्यास या सुधारणा अवश्य केल्या जातील असे आश्वासन देअून आम्ही वाचकांचा रोप घेतो.

र ), मुंबअी
५४

अनुवादक,

**ना. दा. सावरकर**



## OPINIONS.

*Mahatma Hansarajaji Saheb, the Grand Old Man of the Panjab*:—I received your *valuable book*, the Hindutva...It came to me as a *God-sent gift* to confirm in the faith, to which I have stuck from the days of my youth. I have always believed in the bright future of Hindu race and Hindu civilization and it gave me most pleasure to find that you have given expression to that feeling in *ole's & eloquent* language. You have brought home to your readers the great truth that all the elemen's of various nationality are to be found amongst the Hindus...Your account of the Hindu upheaval which brought about the downfall of the Mughal Empire is very instructive. In these days, when some of our best men are apt to ignore the Hindu cause, your appeal to various sects of the Hindus to stick fast to the stem from which they sprang is very convincing......I cannot but admire the deep erudition which you have brought to bear on the genesis and use of the word Hindu. I congratulate you on the production of this book and wish it wide circulation.

*His Holiness Shri Jagatguru Shankaracharya of Karavir Peeth, Dr. Kurtakoti, Ph. D.*—...The style is superb, the logic straightforward, patriotism and selfrespect tremendous; and the book is an unique production from every point....Shri has decided to review the work in Modern Review in a special article.

*Dr. Sir Subrahmania Iyer, K... Justic of the Madras High*

necessary to say that one can not but admire the patriotism of the author....

*Sj. Bhai Paramanand, M. A. Lahor*—I got a copy of a fine book on 'Hindutva.' The book is in English and I was tempted to read it on account of its peculiar charm. I have gone through it with the greatest care and thought. The book is the best and the last solution of the most naughty problem, 'who is and who is not a Hiudu.' Although occupying a small space the book is full of really original and learned ideas. The most ancient authorities are quoted bearing on the subject. I have no doubt the small volume shall be a source of fresh inspiration and new faith to all the young readers, who now all seem to be in a moment of disappointment. I wish the author's name instead of a 'Maratha' have been a 'Mahatma'!

*Dr. Brajendra Nath Seal, L L. D., Vice Chancellor, Mysor Univercit.*—I have been deeply interested in the author's presentation of the subject............The book deserves to be widely read............

These are some of the opinions received. Many other eminent persons have expressed their admiration of the book in similar terms.

---

# प्रस्तावना

## 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः'

ज्या पुस्तकाचें भाषान्तर आम्ही महाराष्ट्रीय वाचकांस आज सादर करीत आहोंत तें पुस्तक आजच्या कालास अत्यंत आवश्यक व अनुरूप आहे, अशी आमची ठाम समजूत आहे; व म्हणून त्यांतील अत्यंत मननीय विवेचनाचा ओघ महाराष्ट्र-सरस्वतीमध्यें प्रगट करण्याचें धाडस आम्ही करीत आहोंत. आजकाल सर्व हिंदुस्थानमध्यें जो प्रश्न सर्व देशभक्तांना विषाद उत्पन्न करीत आहे, सर्व मुत्सद्दि-मंडळाला कुंठित करीत आहे व स्वराज्याकडे जाण्याचा मार्ग एखाद्या तस्कराप्रमाणें जो प्रश्न अडवून धरीत आहे तो प्रश्न म्हटला म्हणजे हिंदुमुसलमानांच्या एकमेकांशीं असलेल्या विषमसंबंधाबद्दलचा होय. विशेषतः या वर्षामध्यें जो घटना अत्यंत वेगानें घडत आहे ती म्हणजे हीच कीं, परकीय राजसत्तेशीं निकरानें सुरू झालेला झगडा आज व्यक्त करून हिंदुमुसलमान हे आपापसांमधले नसलेले झगडे शोधून काढीत आहेत व असलेले झगडे शमण्याऐवजीं वृद्धिंगत होत आहेत. ज्या वेळीं असहकारितेची चळवळ भरतीच्या परमोच्चबिंदूला पोंचली होती, त्या वेळीं देशांतील सर्व पक्षोपपक्षांचे खडक हे साफ त्या भरतीच्या लाटांखालीं बुडून गेले होते व जातीजातीच्या वैराचीं झाडेंझुडपें पार नापत्ता झालीं होतीं. सर्व पृष्ठभागावर एकाच भावनेच्या लाटा उचंबळत होत्या; व त्यामुळें पक्षभेद व जातिद्वेष हे दिसत नाहींत म्हणून समूळ नाहींसेच झाले, असेंहि कित्येक अदूरदर्शी राजकारणी लोकांना वाटूं लागलें होतें. परंतु, जशीजशी ह्या भरतीची भरभराट ओसरूं लागली तसतसे पुनः ठिकठिकाणीं ठाण धरून असलेले परंतु क्षणमात्र बुडून दृष्टिआड झालेले वैराचे व मतभेदाचे खडक हळुहळु आपलीं डोकीं वर काढूं लागले व एका काळीं अप्रतिहत संचार करणारी राष्ट्रविचारांची भावना वारंवार ह्या खडकांवर व झाडांझुडपांवर ठेंचाळूं लागली. अर्थात् युद्धामध्यें व्यूह ढांसळल्यावर व कुस्तीमध्यें पवित्रा चुकल्यावर जसें अपयश हें ठेवलेलेंच असतें, त्याचप्रमाणें सरकारशीं चाललेल्या लढाईमध्यें चढाईचें धोरण तर मागेंच पडलें; परंतु लढाईचें धोरणसुद्धां सुटत जाऊन अखेर जातीजातींची

अत्यंत आत्मघातकी हातघाई सुरू झाली. शत्रूंच्या शिबिरावर रोंखलेल्या तोफा स्वतःच्याच गोटामधील सरदारांच्या पथकांवर रोंखण्यांत येऊं लागल्या; व मग अर्थात् जो अनिवार पराजयाचा प्रसंग ओढवायचा तो लोकपक्षावर ओढवला गेला. सरकार आधींच धूर्त, त्यांत ही दुहीची संधि सांपडली—मग काय ? पूर्वींची संधीची—समेटाची भाषा मागें पडली व पुनः पुर्ववत् परकी यसत्तेचा हैदोस सरसहा सुरू झाला. याच सुमारास हिंदुमुसलमानांचें वैर विकोपाला जाऊन, मधूनमधून तें पेटहि घेऊं लागलें; तेव्हां मग सर्व विचारी लोकांचीं मनें ह्या हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाकडे अधिक तीव्रतेनें आकर्षून जाऊं लागलीं व थोड्या दिवसांपूर्वी हिंदुमुसलमानांची जी दृढ एकी दिसत होती ती आज अशी एकाएकीं नष्ट कां झाली, याचीं कारणें सर्वजण शोधूं लागले. व या आत्मसंशोधनांतच एका अत्यंत कटुसत्याचा अनुभव आला. मुसलमानलोकांना खिलाफतच्या हिताकरितां हिंदूंशीं एकी पाहिजे होती. परंतु ती हिंदुस्थानच्या हिताकरितांहि अवश्य आहे, किंबहुना प्रथम ती हिंदुस्थानच्याच हिताकरितां हवी आहे, ही कल्पनाच मुळीं मुसलमानलोकांच्या मनांत दृढमूल झाली नाहीं असें या आत्मसंशोधनांत आढळून आलें. या नियमाला कांहीं सन्माननीय व समंजस असे अपवाद आहेत, नाहीं असें नाहीं; परंतु ते अपवादात्मकच ! तेव्हां, साहजिकच मुसलमानांपुढें हा प्रश्न आला कीं, जर खिलाफतीच्या प्रकरणाची शहानिशा आतां तुर्कस्थानच्या विजयी समशेरीवर सोंपविली गेली, तर मग हिंदूंशीं एकी करण्याची काय जरूर ? हिंदुस्थानमध्येंच हिंदी-मुसलमानांचे जन्माचे पाळणे हालले जावयाचे व येथेंच त्यांचीं मरणानंतरचीं थडगीं बांधावयाचीं; तेव्हां प्रथम त्यांनीं याच भूमीला आपली भूमि मानली पाहिजे व इच्याच उन्नतीकरितां त्यांनीं आपले सर्व प्रयत्न व स्वार्थत्याग केंद्रीभूत केले पाहिजेत. परंतु, हें आद्यकर्तव्य ते विसरून गेले व त्यांचें सारें लक्ष व कारस्थानें हिंदुस्थानबाहेरच्या मुसलमानी प्रदेशांकडे वेधलीं गेलीं. शिवाय मुसलमानलोकांच्या धर्मवेडानें आजपर्यंत जगाच्या इतिहासांत असहिष्णुतेबद्दल जी दुष्कीर्ति मिळविली आहे, ती असहिष्णुता आजहि त्यांच्या रक्तांत तशीच दृष्टीस पडूं लागली. देवमंदिरांचा भंग व स्त्रियांबद्दलचा अपमान या दोन गोष्टी अशा आहेत कीं, त्यांच्यायोगानें एखाद्या शान्तिब्रह्मालादेखील कोप अनावर होईल. व असें असूनहि ठिकठिकाणीं झालेल्या दंग्यांमधून अनेक वेळां मुसलमानांच्या हातून हे घोर अपराध घडले व त्यामुळें अखिल



हिंदुमात्रांचीं मनें साहजिकच संतप्त होऊन गेलीं; या सात्त्विक संतापांतच शुद्धि व संघटन या दोन चळवळींचा जन्म झाला. हिंदुमुसलमानांची एकी पाहिजे ही गोष्ट खरी; परंतु, म्हणून मुसलमानांनीं वाटेल तो उद्दामपणा व अन्याय इतर समाजावर केला तर त्याचा प्रतिकार करावयाचा नाहीं, असा याचा मुळींच अर्थ नव्हे. शिवाय 'स्वराज्य' जसें हिंदूंना पाहिजे आहे तसेंच तें मुसलमानांनाहि पाहिजे आहे ना ? मग त्यांनाहि या एकीची तितकीच जरूरी भासावयास हवी ना ? मग त्यांनींहि हिंदूंचीं मनें न दुखविलीं जातील अशी खबरदारी घेणें अवश्य आहे ना ? हें सर्व जर खरें, तर मग एकी राखण्याची जबाबदारी सर्वस्वीं हिंदूंवर काय म्हणून ? बरें, जर मुसलमानांना स्वराज्य नको असेल असें म्हटलें तरीहि हिंदूंना तसें वाटणें शक्य नाहीं. हिंदूंना हिंदुस्थानचें राज्य पाहिजे आहे; कारण हिंदुस्थान हा हिंदुलोकांचा आहे. आज हजारों वर्षें, ते हिंदुस्थानाला आपलें सर्वस्व अर्पण करून पूजीत आले आहेत. हिंदूंचे उत्तम कवी, हिंदमातेला आपलें काव्य अर्पण करीत आले आहेत. हिंदूंचे उत्तम वीर; तिच्या रक्षणाकरितां आपलें रक्त ओतीत आलेले आहेत; हिंदूंचे उत्तम शिल्पशास्त्रज्ञ, तिला शोभिवंत बनविण्याकरितां सर्व शिल्पकला खर्ची घालीत आहेत व अशा रीतीनें ते हिंदुस्थानचे व हिंदुस्थान त्यांचा हा जिव्हाळ्याचा संबंध त्रिकालाबाधित जडलेला आहे. तेव्हां इतर कोणीहि तिच्या उद्धाराकरितां प्रयत्न न केले तरी, हिंदूंना ते प्रयत्न केलेच पाहिजेत. हिंदभूमीला स्वराज्यसंपन्न करण्याकरितां, प्रचलित राजसत्तेशीं झगडा सुरू झालेला आहे. या झगड्यामध्यें मुसलमान व हिंदी ख्रिश्चन हे हिंदूंना मदतगार झाले तर तें आवश्यकच आहे. त्यांचें तें कर्तव्यच आहे. परंतु, जर ते या झगड्यांतून कृतघ्नपणें अंग काढतील, तरीहि हिंदूंना हा झगडा चालू ठेविलाच पाहिजे; इतकेंच नव्हे तर, जर दुर्दैवानें मुसलमान व हिंदी ख्रिश्चन हे कृतघ्नपणाची पराकाष्ठा करून राजसत्तेला मिळून हिंदमातेचें पारतंत्र्य अधिक दृढ करावयास लागले, तर कटु कर्तव्य म्हणून, राजसत्तेशीं झगडा होत असतांच तिच्या बाजूला जे कोणी जातील त्यांच्याशींहि झगडा करणें अपरिहार्य होणार आहे, हें हिंदूंनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. यामुळें स्वराज्य मिळण्याचा मार्ग थोडासा दुरावेल हें खरें आहे; परंतु, अपरिहार्य गोष्टीला इलाज नाहीं, असेंच याचें समाधान काढलें पाहिजे. हिंदभूमीच्या स्वातंत्र्यरक्षणाकरतां पूर्वीच्या काळींहि एकदां असेच सर्व बाजूंनीं शत्रूंचे हल्ले होत असतां हिंदूनाच त्यांचा परामर्ष घ्यावा लागला व हिंदूंनींच तो घेतलाहि. मराठी

साम्राज्याचा हिंदुध्वज, जेव्हां नर्मदा उल्लंघून उत्तरेंत व तुंगभद्रा ओलांडून दक्षिणदिशेला ‘ हिंदवीसाम्राज्याची ’ स्थापना करीत अप्रतिहततत्त्वानें हिंदुस्थान आक्रमूं लागला, त्या वेळीं काय कमी शत्रु या हिंदमातेच्या विमोचनाला अडथळा करावयास पुढें आले ? उत्तरेंतले मुसलमानी रियासतीच्या हद्दींतले पठाण, रोहिले, मोगल, खारासानी व इतर अनेक जातींचे व नांवांचे इस्लामी लोक, मराठ्यांच्या प्रगतीला निकराचा व नेटाचा अडथळा करीत होते, तर दक्षिणेंत निजाम, हैदर, पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच हे सर्व परकी संस्कृतीचे व परकीय देशोदेशींचे, पोट भरण्यास व भाग्य काढण्यास आलेले सर्व लोक, मराठ्यांच्या विजयी हिंदुध्वजास अवरोध करण्यास भगीरथ प्रयत्न करीत होते. इतके अनेक शत्रु अनेक बाजूंनीं हिंदभूमीच्या स्वातंत्र्यास आहत करण्यास प्रयत्न करीत असतांनाहि त्या वेळच्या हिंदूलोकांनीं हा हिंदभूच्या भाग्याचा झगडा सोडून दिला काय ? मुळींच नाहीं. या अनेक शत्रूंना, अनेक दिशांनीं चेपीत-चेपीत, त्या वेळच्या हिंदू सेनानींनीं, हिंदू मुत्सद्यांनीं व हिंदू पुढाऱ्यांनीं हिंदमातेचें स्वातंत्र्यरक्षण केलें इतकेंच नाहीं, तर ‘ हिंदवी साम्राज्याची ’ ध्वजा जवळजवळ अखिल हिंदुभूमीवर फडकत ठेवली. पहिल्या बाजीरावांनीं उत्तर मोकळी केली तर चिमणाजीअप्पांनीं, प्रचंड आघातांनीं पोर्च्युगीज लोकांची रग जिरवून त्यांना नामशेष केलें. पुढें नानासाहेबांनीं तर पराकाष्ठा करून हिंदुध्वजाचा गौरव परमोच्चबिंदूला नेऊन जेथेंजेथें शत्रु उठला तेथेंतेथें त्यास गारद केला. मध्येंमध्यें यश, अपयश घेत, देत हा स्वातंत्र्यरक्षणाचा यशस्वी झगडा, अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत मराठ्यांनीं, रजपुतांनीं व शिखांनीं निरनिराळ्या ठिकाणीं झगडून, हिंदुभूमीचें स्वातंत्र्यरक्षण केलें व तिचें वैभव वाढविलें. हा भूतकालचा ताजा इतिहास आपल्या डोळ्यांपुढें आहे. तेव्हां, मुसलमानांनीं स्वराज्यप्राप्तीमध्यें जरी कदाचित् भाग न घेतला तरी हिंदूंना हा झगडा चालविलाच पाहिजे. हा झगडा पवित्र आहे, हा झगडा झगडणें प्रत्येक हिंदपुत्राचें परमकर्तव्य आहे; एवढें निश्चित झाल्यावर तो झगडण्यास प्रत्येक हिंदपुत्रानें बद्धपरिकर झालेंच पाहिजे. मग समोर एकच शत्रु असो वा अनेक असोत. शत्रु मुद्दाम उत्पन्न करावयाचे नाहींत हें जितकें खरें आहे, तितकेंच हेंहि खरें आहे कीं, तुमच्या सर्व प्रयत्नांना यश न येतांना जर कोणी निष्कारण शत्रुत्व करूं लागले, तर त्याचा प्रतिकार केला पाहिजे. आपल्या धार्मिकवृत्तीला जें पवित्र तें मंदिररक्षण व आपल्या मनुष्यवृत्तीला जें पवित्र तें अबलारक्षण हें कशाचीहि तमा न धरतां



आपण केलेंच पाहिजे—नाहीं तर आपणास मुळीं मनुष्यत्वावर हक्कच सांगतां येणार नाहीं. आपणांस जिवंत असणें हेंसुद्धां पापमूलक होणार आहे.

अशा तऱ्हेची अत्यंत बिकट व संकटमय परिस्थिति निर्माण झाल्यानें साहजिकच हिंदुसमाजामध्यें एक नवीन भावना निर्माण झाली. त्या भावनेचा परिपोष म्हणजे ही हिंदुसंघटनाची चळवळ होय. ही चळवळ आज हिंदुसमाजाला अत्यंत आवश्यक, श्वासोच्छ्वासाइतकी आवश्यक होऊन बसली आहे. ही चळवळ व शुद्धीची चळवळ, ह्या चळवळी योग्य मार्गानें देशांत फैलावल्यावांचून हिंदुसमाज पुनरपि संघटित व बलशाली होणार नाहीं; व जोंवर तो बलशाली होणार नाहीं तोंवर हिंदुमुसलमानांची एकी होणें शक्य नाहीं. हिंदुमुसलमानांच्या एकीवांचून स्वराज्य सुलभ व सुकर होणें शक्य नाहीं. म्हणून ‘ स्वराज्य सत्वर मिळण्यास हिंदुमुसलमानांची एकी करा ’ असा उपदेश जे जे देतात त्यांच्या म्हणण्याप्रमाणें करण्यासदेखील आज हिंदुसमाजाची संघटना करणें अवश्य आहे. दुसरें असें कीं, जर हिंदुस्थानला स्वराज्य पाहिजे असेल तर हिंदुस्थान बलशाली व एकीकृत असलें पाहिजे. हिंदुस्थानच्या तीस कोटी लोकांपैकीं बावीस कोटी लोक हिंदु आहेत. हे बावीस कोटी लोक जर असंघटित व असमर्थ राहिले, तर हिंदुस्थान समर्थ होईल का ? हें केव्हांहि संभवनीय होणार नाहीं. या कारणाकरितांहि आज विस्कळित असलेल्या हिंदु समाजाला संघटनेची अत्यंत आवश्यकता उत्पन्न झालेली आहे.

अशा सर्व दृष्टींनीं हल्लींच्या विवक्षित कालीं हिंदुसंघटनाची जरूरी किती आहे, हें विचारी लोकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून रहाणार नाहीं. तेव्हां या संघटनास कोणत्या मार्गानें सुरुवात झाली पाहिजे, व तें कोणत्या धोरणावर चालविलें पाहिजे, ह्या गोष्टी आधीं निश्चित होणें जरूर आहे; व ह्या गोष्टी निश्चित होण्यास प्रथम ‘ हिंदु ’ कोण, याची निश्चिति झाली पाहिजे. या दृष्टीनें ‘ हिंदुत्व ’ हें पुस्तक जणुं, परमेश्वरप्रेषितच आहे असें त्याचें मननपूर्वक वाचन केल्यावर कोणालाहि वाटणार आहे. त्यामध्यें ‘ हिंदु ’ कोण, याची जी ऐतिहासिक, धार्मिक, तात्त्विक वगैरे अनेक दृष्टींनीं छाननी केली आहे ती विचारांना उद्बोधक होणारी आहे. स्वामी श्रद्धानंदजींशीं या पुस्तकाबद्दल बोलण्याचा एकदां प्रसंग आला असतां ते उद्गारले कीं, ‘ या पुस्तकाच्या लेखकाला ही स्वर्गीय स्फूर्ति झाली तरी कोणत्या वेळीं, ती वेळ बहुधा प्रभातकालचीच असली पाहिजे. नाहीं तर ही अशी दिव्य संदेशाची स्फूर्ति इतर वेळीं होणें शक्यच नाहीं. ’

स्वामीजींनीं ज्या पुस्तकाची व त्यांतील विवेचनाची अशी स्तुति केली तें पुस्तक आपल्या मराठी भाषेंत अवश्य भाषान्तर केलें पाहिजे, असें ठरवून त्याप्रमाणें हें भाषान्तर वाचकांपुढें मांडण्याचा हा सुयोग आला आहे.

ह्या पुस्तकांतील हृद्गत कळण्यास व त्यांतील विवेचन पटण्यास इतिहासाच्या सिंहावलोकनाची थोडी आवश्यकता आहे. आज सर्वसाधारण रीतीनें लोकांच्या मनांत अशी समज पसरलेली आहे कीं, आपण हिंदू लोक हे आज हजार–दीड हजार वर्षेंपर्यंत एकसारखे परकीय लोकांच्या स्वाऱ्या सहन करीत आहोंत; त्यांचे जुलूम कोणताहि प्रतिकार न करतांना निमूटपणें सोशीत आलों आहोंत. व आमच्यांतलें तेज, वीर्य, देशाभिमान व धर्माची चाड हीं तेव्हांपासूनच नष्ट झालीं आहेत, व आतांच काय तें इंग्रजी राज्य सुरू झाल्यापासून आम्हाला कुठे या गुणांची जाणीव होऊं लागली आहे. आमच्या दीड हजार वर्षांमधल्या सर्व पूर्वजांपेक्षां आम्हीच काय ते देशाभिमानी, धर्माभिमानी पुरुषपुंगव जन्मास आलों आहोंत. व पूर्वीच्या लोकांना ह्या भावनांचा गंधहि नव्हता. या व अशाच तऱ्हेच्या इतर कल्पना अनेक सुशिक्षित लोकांमध्यें रूढ झालेल्या आहेत. ह्या सर्व समजुतीला जबाबदार म्हणजे हल्लींची तेजोवध करणारी शिक्षणपद्धति व विशेषतः आपले पूर्वीचे इतिहास युरोपियन परक्या इतिहासकारांनीं लिहिणें ही गोष्ट कारणीभूत झाली. युरोपियन इतिहासकार इतिहासाची मोजदादच मुळीं फार फार तर इसवी सनाच्या आरंभापासून सुरू करतात. परंतु ह्या कालच्या—इसवी सनाच्यापूर्वीं किती तरी हजार वर्षेंपर्यंत मानवी जग जिवंत होतें व त्या मानवी जगामध्यें हिंदुस्थानच्या उज्ज्वल वैभवानें तो गुरुस्थानीं शोभत होता, याचा जणुं पत्ताहि या इतिहासकारांना नाहीं असें दिसून येतें. येशु ख्रिस्ताच्यापूर्वीं हजारों वर्षांपासून हिंदुस्थानचा इतिहास घडत आहे व त्या हजारों हजार वर्षेंपर्यंत याला पारतंत्र्याचा गंधहि माहीत नव्हता, हें मात्र कोणी सांगत नाहीं. हिंदभूमीनें हजारों वर्षें आपलें स्वातंत्र्य अचल राखलें. इतकेंच नव्हे तर इतर जगावरहि आपलें बौद्धिक व धार्मिक साम्राज्य गाजविलें आहे. तेव्हां या युरोपियन लोकांच्या कोत्या दृष्टीप्रमाणें या इसवी सनाच्या दोन हजार वर्षांच्या काळांत हिंदुस्थान हें पराक्रमित होतें असें क्षणभर गृहीत धरलें तरी काय झालें? रामायण व महाभारतकालापासून व त्याच्याहि आधींपासून हजारों वर्षें जो हिंदुस्थान अबाधितपणें स्वतंत्र होता, तो हिंदुस्थान या हजार वर्षांत परतंत्र बनला म्हणून काय झालें? उत्क्रान्त झालेल्या राष्ट्रांना अपक्रान्ति व अपक्रान्तांना उत्क्रान्ति, हा जगाचा नियमच आहे. व या नियमाप्रमाणेंच हजारों वर्षें स्वातंत्र्योपभोग घेतल्यावर जर कांहीं काल हिंदुदेश अपक्रान्त झाला तर त्यांत अनैसर्गिक काय झालें? त्याच्या बरोबरच्या त्या वेळच्या इतर राष्ट्रांचें काय झालें? हिंदुस्थान आज परतंत्रावस्थेंत कां होईना, परंतु अजून जिवंत राष्ट्र म्हणून अस्तित्वांत आहे; त्याची संस्कृति अजूनहि जिवंत व समर्थ आहे. त्यांतील रक्त अजूनहि शुद्ध आहे व त्याची लोकसंख्या अजूनहि कोटींनीं मोजावी लागत आहे. अशा रीतीनें जिवंत राष्ट्राच्या सर्व खुणा हिंदुस्थानजवळ आजहि शाबूत आहेत. परंतु त्याच्या बरोबरीच्या त्या वेळच्या राष्ट्रसमूहांतून आज कोणकोण जिवंत आहेत? ते बाबीलोनियन्स कुठें आहेत? इजिप्तमधले मनोरे बांधणारे टॉलेमीचे वंशज आज कितीक सांपडत आहेत? कार्थेजचें अस्तित्व आज कोणत्या भूमिखंडावर दाखवितां येणार आहे? तें रोमचें अवाढव्य साम्राज्य आज त्या रोमन लोकांसह कालाच्या विशाल उदरांत कुठें पचून नामशेष झालें हें कोण सांगूं शकणार आहे? आणि तरीहि हें हिंदुस्थान आणि त्यांतील हे हिंदूलोक आजहि, त्याच वेदकालीन परंपरेसह, त्याच वेदांसह, त्याच रामायण महाभारतासह अजून वस्तुतः तसेचेतसेचे जिवंत उभे आहेत. जणुं परमेश्वराच्या सृष्टिरचनेच्या घडामोडीला आणि पुनः सृष्टिनिर्माणाच्या लीलेला हिंदुस्थान हा एक साक्षीभूत होऊन राहिलेला देश आहे, अशा हजारों वर्षांच्या उज्ज्वल इतिहासानें अन्वित झालेला हा देश, गेलीं एक हजार वर्षें अप्रतिहत रीतीनें पारतंत्र्यांत पडला आहे, असें म्हणणें जरी क्षणभर वादाकरितां मान्य केलें तरी त्यांत काय एवढें बिघडलें आहे? त्यांत काय एवढें अनैसर्गिक आहे? उलट असेंच अभिमानानें म्हणतां येणार आहे कीं, जगांतील सर्व परकी लोकांच्या झुंडीच्या वावटळी, जमिनीवरून व महासागरांतून, या देशावर सतत हजार वर्षें कोसळत गेल्या तरीहि आजसुद्धां हा देश अचल, अभीत, अनत असा उभा आहे व आजहि नवजीवनाचीं सर्व लक्षणें त्याच्यामध्यें स्फुरित होत आहेत. तेव्हां या देशाच्या धीरगंभीरतेची आणि जिवट व जिवट जीवनकलेची धन्य आहे! मुसलमानांची क्रूर व सर्वभक्षक वावटळ इकडे पूर्वेकडे व तिकडे पश्चिमेस आफ्रिकाखंडाच्या उत्तरकिनाऱ्याला चाटून थेट स्पेनमध्यें अप्रतिहतपणानें महंमदाच्या मृत्यूपासून शतका—दों शतकांच्या अवधीत दूरवर पसरली व तिच्या वाटेंत जे जे देश व ज्या ज्या संस्कृति आल्या, त्यांना त्यांना झपाट्यानें पायांखालीं तुडवीत व नष्ट करीत सर्व भूभाग तिनें

यवनमय करून टाकाला. युरोपला वळसा घेऊन व एशिया अर्धा व्यापून ही यावनी टोळधाड हिंदुस्थानच्या वायव्यदरवाजावर सारखी धडका देऊं लागली. तिच्या तडाक्यांत सिरिया सांपडला तो तिनें भस्मसात् व आत्मसात् करून टाकला. मग ही आग इराणवर व इराणभर पसरली व तिनें पारशांची पुरातन राजसत्ता मोडून, तोडून टाकून ती सर्व संस्कृतीचीसंस्कृति जाळून भस्म केली. फक्त एक जहाज वांचलें व त्यामध्यें पारशी लोकांच्या संस्कृतीचे अल्पस्वल्प अवशेष, त्यांचा पवित्र, अखंड अग्नि व त्या जहाजभरच फक्त स्त्रीपुरुष, इतकेंच काय तें, एका कालीं महाबलाढ्य असलेल्या दारयसाच्या—त्या पारसिकांच्या साम्राज्याचे अवशेष घेऊन तें एकाकी झालेलें एक जहाज, जन्मभूमीला सजल-नेत्रांनीं व नम्रमस्तकांनीं प्रणाम करून, अथांग महासागरामध्यें प्रवेश करतें झालें. तें कित्येक दिवस आणि रात्री पोरक्या पोराप्रमाणें भटकत एका सायं-समयाला याच हिंदभूमीच्या उत्संगाचा आश्रय करतें झालें, व या वत्सलभूमीनें त्या अनाथ बनलेल्या पारसिकांचा पोटच्या पोरांप्रमाणें सांभाळ केला. मागें त्यांचा इराण देश मरणाच्या किंकाळ्या फोडीत नष्ट झाला, व सर्व इराण मुसलमानमय बनून इस्लामी लाटेंत विरघळून गेला. सिरियामधीलहि मुसलमानांच्या क्रूरतेनें संत्रस्त झालेले इसाई लोक असेच पोरकेपणानें भटकत भटकत दक्षिणहिंदु-स्थानच्या किनाऱ्यावर उतरले व त्यांनाहि श्रीमच्छंकराचार्यांना जन्म देणाऱ्या पवित्र भूमीनें आश्रय दिला. त्यानंतर अफगाणिस्थान यवनमय झाला व ही प्रचंड वावटळ हिंदुस्थानच्या द्वारावर असह्य धडका देऊं लागली. ज्या वावटळीनें हा एवढा भूभाग हालवून सोडला व इतके देश बेचिराख केले, त्या वावटळीनें हिंदुस्थानची कांहीं काळपर्यंत दुरवस्था केली असली तर त्यांत नवल काय? नवल जर असेल तर हेंच आहे कीं, अशा या दुर्जय, असह्य झंझावाताला धैर्यानें थोपवून धरून, क्षणोक्षणीं पडत असतां, क्षणोक्षणीं उठून, अखेर त्याचा प्रचंड वेग याच देशांत क्षीणतेला जाऊं लागला. जो वृक्षचेवृक्ष उन्मळून पाडी तो झंझावात झाडेंझुडपेंहि हालविण्यास असमर्थ झाला, व अखेर याच हिंदभूमींत तो हताश होऊन वितळून गेला. व त्यामुळें ब्रह्मदेश, चीन, जपान हे देश व त्यांची बुद्धसंस्कृति अजिबात बचावली गेली. चीनचें संरक्षण जितकें त्याच्या प्रचंड भिंतीनें केलें नाहीं, तितकें या हिंदभूमीच्या वीरांच्या निधड्या छातीनें केलें आहे.

म्हणून, हिंदभूमीचीं गेलीं हजार वर्षें पारतंत्र्यांत गेलीं कशीं, याचें आश्चर्य



नाहीं, तर जगाला जाळीत सुटलेलें हलाहल प्राशन करून हिनें तें पचविलें कसें, व तें पचवून आजहि ती जिवंतची जिवंत उभी राहूं शकली कशी, याचेंच आश्चर्य वाटतें.

या वरील उल्लेखाला सिद्ध करण्यास ऐतिहासिक आधार भरपूर आहेत. परंतु ते सर्व परकीय व सहानुभूतिशून्य इतिहासलेखनाच्या बाडांतून, या दृष्टीनें हुडकून काढले पाहिजेत. हें काम इतकें महत्त्वाचें, अगत्याचें व विस्ताराचें आहे कीं, तें करण्यास एखादे राजवाडेच सज्ज झाले पाहिजेत. तरी पण या पुस्तकाचें महत्त्व व विषयाचें विवेचन ध्यानांत येण्याला अवश्य असणारें ऐति-हासिक पुराव्याचें विहंगावलोकन करणें क्रमप्राप्त झाल्यानें त्याचाहि थोडासा प्रपंच करणें इष्ट आहे.

इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या अखेरीस मुसलमानी धर्माची स्थापना अरबस्थानांतील वाळवंटाच्या मुलुखांत प्रथम झाली. व त्या वाळवंटांतील कणागणिक असंख्य अरब लोक त्या वाळवंटांतून बाहेर पडून प्रथम आसपासचे व नंतर दूरदूरचे देश व्याप्त करूं लागले. हिंदुस्थानमध्यें या अरब लोकांचा प्रवेश प्रथम सातव्या शतकांत झाला, व तेव्हांपासून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य रक्षण करण्यास्तव समरास सुरुवात झाली. प्रथम सिंधदेशांत अरबांनीं आपले पाय रोंवले, परंतु तेथील पराक्रमी लोकांनीं अल्पकालांतच त्यांचें उच्चाटण करून सिंधला मुक्त केलें. सातव्या शतकापासून तों अकराव्या शतकापर्यंत, वारंवार मुसलमानांच्या निरनिराळ्या टोळ्यांनीं व सेनापतींनीं पंजाबपासून सिंधपर्यंत हल्ले चढविण्याची परंपरा कायम ठेविली होती, व तितक्याहि वेळेला त्या त्या प्रान्तांच्या शूर लोकांनीं ते सर्व हल्ले मागें परतवून पुनः हिंददेश मुक्त करण्याचें व्रत अखंड चालविलें होतें. अशा प्रकारें जवळजवळ तीन शतकें-पर्यंत हिंदुस्थानांतील शूर लोकांनीं मुसलमानांच्या अतिक्रमणाला थोपवून धरलें, व तें यशस्वितेनें थोपवून धरलें. या अवधींत पश्चिमदिशेला मुसलमान लोकांचा अर्धचंद्र थेट स्पेनमध्यें रोंवला जाऊन सर्व स्पेन मूरलोकांच्या पदतलीं विनम्र होऊन लोटांगणें घालीत होता. परंतु इकडे मात्र हिंदुस्थानच्या सर-हद्दीवरच झगडा करीत, संधि साधतांच आंत घुसण्याचा मुसलमानलोक प्रयत्न करीत होते. अखेर दहाव्या शतकाच्या अखेरीस व अकराव्या शतकाच्या आरंभीं गझनीचा महंमद हा बंधारा मोडून आंतमध्यें शिरला व त्यानें कान्य-

कुब्ज पूर्वेकडे व गुजराथ दक्षिणेकडे, असे प्रदेश गांठले. त्यानें एकंदर बारा स्वाऱ्या हिंदुस्थानवर केल्या; व हिंदुस्थानच्या सरहद्दीवरचा, पंजाबच्या शूर रजपुतांचा पहारा तोडून टाकून हिंदभूमीवरच्या आक्रमणाचीं वायव्यसरहद्दीवरच्या दरवाजाचीं दारें सताड उघडीं पाडलीं. तरीहि या प्रत्येक स्वारींत कुठल्याना कुठल्या तरी हिंदू राजानें त्याच्याशीं समर करण्याचा आणि हिंदुस्थान व हिंदूधर्म यांच्या रक्षणाकरितां प्राणार्पण करण्याचा प्रयत्न केला. पंजाबच्या शूर व देशाभिमानी अनंगपाळानें तर वारंवार पराजय येत असतांहि महंमदाशीं दोन हात करण्याचें व्रत अखंड चालविलें. १००५ मध्यें अनंगपाळ पराभव पावून काश्मीरकडे गेला, परंतु महंमदाची पाठ फिरतांच पुनः तो पंजाबमध्यें घुसला व सर्व रजपूत लोकांशीं एकी करून 'ह्या धर्माच्या शत्रूशीं, देवालयें व मूर्ति यांच्या भंजका'शीं प्रचंड सामना करण्याची त्यानें तयारी केली. हिंदूधर्माच्या रक्षकांनीं प्राणावर उदार होऊन जी ही समराची प्रचंड तयारी केली ती पाहून महंमदहि चमकून गेला. या वेळीं दूरदूरच्या हिंदू लोकांच्या स्त्रियांनीं आपलें जवाहीर व दागिने विकून ह्या धर्मयुद्धाकरितां सामुग्री पाठविली. डोंगराळ प्रदेशांतील गकर लोक व दुसरे लढाऊ लोक हिंदूंनीं आपल्या पक्षास मिळवून घेतले. अशा रीतीनें ह्या १००६ सालच्या धर्मसमराला अखिल हिंदूंनीं निकरानें सुरुवात केली. आरंभीं हिंदूंची सरशी झाली; परंतु ऐन वेळीं अनंगळपाल पदाती होऊन लढत असतां त्याचा हत्ती मागें फिरला व सर्व हिंदूसैन्याची घडी विसकटली. पराजय झाला, परंतु प्रत्येक हिंदूवीर धर्मरक्षणाकरितां व देशरक्षणाकरितां समर करून मेला. नवव्या स्वारींत महंमुदानें थेट कनोजपर्यंत मजल मारली. तेथला राजा कुवरराय हा युद्ध न करतांच यवनाला शरण गेला, म्हणून इतर रजपुतांनीं त्यास बहिष्कृत केलें. बुंदेलखंडाच्या कलिंजरच्या राजानें ह्या भ्याड राजावर स्वारी केली; तेव्हां त्याच्या सहाय्यार्थ महंमुद धावून आला, परंतु तो येण्याच्या आधींच प्रतापी कलिंजरच्या नंदराजानें त्या देशद्रोही राजास ठार मारलें व कनोज पुनरपि अकलंकित अशा हिंदुध्वजाखालीं नांदूं लागलें. महंमुदाचा सर्व पराक्रम या वेळीं हतप्रभ झाला व त्याला निमूटपणें स्वदेशीं परत फिरावें लागलें. यानंतर महंमुदाची सोरटीसोमनाथावरची प्रसिद्ध बारावी स्वारी झाली. या स्वारींतदेखील हिंदूंनीं महंमुदाचा प्रतिकार केला नाहीं असें नाहीं. सोरटीसोमनाथासमोर तीन दिवसपर्यंत घनघोर युद्ध झालें. आंतून किल्ल्यांतले लोक निकरानें लढत होते, व त्याच वेळीं बाहेरून आसपासचे रजपूत राजे व अनहिलवाड्याचा चालुक्य-



राजा देवालयाच्या संरक्षणाकरितां धावून आले. परंतु, येथेंहि अखेर विजयश्रीनें महंमुदासच माळ घातली. अशा रीतीनें इ. स. १०२४ सालीं पारतंत्र्याच्या घणाचा भूमातेवर होणारा प्रचंड घाव आपल्या वक्षःस्थलावर तोलून धरण्यास अनेक हिंदूयोद्धे धांवून गेले, व समरदेवीस बळी पडून त्यांनीं आपलें नांव अजरामर केलें. सोरटीसोमनाथाच्या भंगानें त्या वेळीं अखिल हिंदूमात्र खवळून गेला होता; व त्याचा वचपा काढण्याची सूडबुद्धि, सामान्य वाटाड्याचा धंदा करणाऱ्यांच्यादेखील मनांत आली. आणि त्यांनीं महंमुदाला परत जातांना अनेक वेळां चकवून, भलत्याच मार्गानें नेऊन, त्याचा व त्याच्या सैन्याचा शक्य तो सूड घेतला. रजपूत राजेहि, राजा भीमदेवाच्या आधिपत्याखालीं अजमीरची वाट अडवून बसले होते. अखेर सिंधच्या वाळवंटांतून अनेक हालअपेष्टा सोशीत महंमुद एकदांचा परत गेला. ह्या सर्व गोष्टींवरून हें उघड होतें कीं, परकीयांचे प्रचंड घाव जरी अनवरत पडत होते, तरी हिंदूवीर, हिंदूमुत्सद्दी, हिंदूराजे पुनःपुनः प्राणार्पण करूनहि ह्या परकीय आक्रमणाचा प्रतिकार करीत होते.

ह्या घनघोर समरानंतर पंजाबप्रान्त जरी अर्धवट मुसलमानांच्या ताब्यांत गेल्यासारखा झाला, तरी पुनः एक शतक–दीड शतकपर्यंत मुसलमानांना अधिक आक्रमण करतां आलें नाहीं; व सर्व हिंदुस्थान हें परकीय स्वाऱ्यांचा हा प्रचंड आवेग सहन करून हिंदूचेहिंदू राहिले. नंतर इ. स. ११९१मध्यें महंमदघोरीची स्वारी झाली. परंतु, त्यामध्यें पृथ्वीराज चव्हाणच्या तेजस्वी खड्गानें महंमदघोरीला समरांगणीं लोळवून त्यास कैद केलें. अखेर प्राणयाचना करून ह्या कृतघ्न राजानें आपली सुटका करून घेतली व ११९३ मध्यें वचनभंग करून पुनः हिंदुस्थानवर स्वारी केली. या वेळींहि हिंदूंचें खड्ग लढलें. परंतु, तें या समरांत मोडलें गेलें. गजनीच्या महंमुदानें ज्याप्रमाणें वायव्यसरहद्दीचें दार सताड उघडें केलें, त्याचप्रमाणें महंमदघोरीनें दिल्लीच्या तक्ताला हात घालून भारतीचें सिंहासन भ्रष्ट केलें. अशा रीतीनें सातव्या शतकापासून तों बाराव्या शतकाच्या अंतापर्यंत, म्हणजे जवळजवळ पांचसहा शतकें स्वातंत्र्यरक्षणाकरितां अव्याहत झगडा करून मग अखेर हिंदभू परतंत्र झाली. स्वातंत्र्यरक्षणाकरितां हा असा प्राणघातक व अनवरत झगडा जगांतल्या इतर कोणत्या देशानें केला आहे ? कोणत्या देशाचे वीर पिढीमागून पिढी, सतत सहा शतकें स्वातंत्र्यरक्षणाकरितां समरदेवीला बळी देऊं शकले आहेत ? जर्मनीच्या आक्रमणाविरुद्ध प्रयत्न करतां करतां फ्रान्स, व फ्रान्सच्या आक्रमणाविरुद्ध स्वसंरक्षणाची तयारी करतां करतां जर्मनी हीं एका शतका-

त्याच अवधींत किती निःसत्त्व झालीं आहेत, व त्यांच्या अस्तित्वाचें तारूं कालाच्या महासागरावर किती अनिश्चित हेलकावे खात आहे हें आज आपण प्रत्यक्षच पहात आहोंत. मग ज्या हिंदुजातीनें एक नव्हे, दोन नव्हे तर सतत सहाशें वर्षें हें आत्मरक्षणाचें युद्ध, आपापसांत वैरें असूनहि, असंघटित राजसंस्था असूनहि, चालू ठेवलें त्या हिंदुजातीची धन्य नाहीं असें कोण म्हणेल ? व अशा ह्या शक्तिपात करणाऱ्या युद्धानंतर पराजित होऊन, परतंत्र झाल्यावरहि व राज्यसत्ता सर्वस्वीं परकीयांच्या हातीं गेल्यावरहि, असहाय स्थितींत, असमान स्थितींत, धर्मरक्षणाकरितां व जातिगौरवाकरितां, व्यक्तिव्यक्तीनें, कुटुंबा-कुटुंबानें समाजासमाजानें जे आत्मत्याग केले ते पाहून प्रत्यक्ष वैऱ्यांच्या तोंडून-देखील आश्चर्याचे उद्गार निघतील.

अशा रीतीनें उत्तर हिंदुस्थानांत स्वातंत्र्यसमराचा झगडा सुरू होऊन त्या-मध्यें हिंदूंचा पराभव कसा झाला व केव्हां झाला हें आपण विहंगमदृष्टया पाहिलें. आतां दक्षिणहिंदुस्थानच्या पारतंत्र्याचा इतिहास तशाच विहंगम दृष्टीनें आपण अवलोकन करूं.

पृथ्वीराजाचा ११९३ मध्यें पराभव झाल्यावर, बरोबर शंभर वर्षांनीं म्हणजे १२९३ मध्यें अल्लाउद्दीनानें प्रथम दक्षिणेमध्यें प्रवेश केला. अनंतकालपर्यंत अविच्छिन्न व अनवरत स्वातंत्र्य, वैभव व सुख हें उपभोगीत असल्यामुळें उत्तर-हिंदुस्थानप्रमाणेंच दक्षिणहिंदुस्थानदेखील असंघटित, सुखलोलुप, मृदुल-वृत्तीचें व बढाईखोर स्वभावाचें बनलें होतें. म्हणून अल्लाउद्दीनाच्या पहिल्याच स्वारीच्या फटकाऱ्याबरोबर यादवांचें प्रबल म्हणून गणलें जाणारें साम्राज्य ह्याद-रून गेलें. परंतु, ह्या अंजनानें ज्या वेळीं त्यांचे डोळे उघडले तेव्हांपासून मात्र दक्षिणेंतल्या हिंदू लोकांनींहि या यवनी परक्या सत्तेला अखंड विरोध सुरू ठेविला व प्राणसमर्पण करूनहि आपल्या जातीचा गौरव वाढविला. हें ऐति-हासिकदृष्टया सिद्ध करावयास आम्ही वाचकांपुढें फक्त कांहीं सन ठेवितों. म्हणजे त्यापासून होणारा बोध उघड होईल.

वर सांगितलेंच आहे कीं इ. स. १२९३ मध्यें अल्लाउद्दीनानें रामदेवराव जाधवाचा पराभव केला व त्याच्याकडून मांडलिकत्व कबूल करविलें. परंतु, त्या मानधनराजास हें यवनांच्या आधीनतेचें शल्य जिव्हारीं लागून लवकरच त्याचा अंत झाला. त्याचा मुलगा शंकरपाळदेव हा तेजस्वीवृत्तीचा होता. त्यानें यव-



नांचें आधिपत्य झुगारून दिलें. अल्लाउद्दीनाचा सेनापति गुलाम काफूर यानें दक्षिणेमध्यें स्वारी केली, तेव्हां त्या स्वारीचा प्रतिरोध करीत असतां शंकरपाळदेव स्वातंत्र्यसमरांत पतन पावला. देवगिरीचें देवत्व लयाला जाऊन महाराष्ट्र परतंत्र बनला. शरीरानें जिंकला गेला तरी महाराष्ट्र मनानें जिंकला गेला नाहीं. १३१३ मध्यें शंकरपाळदेव मारला गेला व देवगडचें राज्य यावनी अंमलाखालीं किंचित् कालपर्यंत गेलें. परंतु, लगेच हरपालदेव—रामदेवरावाचा जांवई—यानें देवगड काबीज करून पुनः कांहीं काल स्वातंत्र्य अनुभवलें. परंतु, इ. स. १३१८ मध्यें यवनांशीं स्वातंत्र्यसमर करीत असतां तो पकडला गेला व धर्माच्या नांवानें तो हुतात्मा झाला. त्याच्या अंगाचीं सालडीं काढून त्यास हालहाल करून जिवें मारलें. महाराष्ट्राचा हा हरपालदेव संभाजीप्रमाणें पहिला बळी परसत्तेला पडला. अशा रीतीनें १२९३ मध्यें पारतंत्र्याची जी प्रखर सुरी दक्षिणहिंदु-स्थानच्या उरांत घुसली, ती ओढून काढण्याचे प्रयत्न १३१८ पर्यंत होऊन त्यामध्यें हरपालदेव हुतात्मा झाला. यानंतर उणींपुरीं पंधरा वर्षें लोटलीं नाहींत तोंच हिंदूवीरांनीं, हिंदूतत्त्ववेत्त्यांनीं, हिंदूधर्मगुरूंनीं हिंदुत्वाच्या रक्षणा-करितां व देशाच्या स्वातंत्र्याकरितां एक प्रचंड बनाव तुंगभद्रेच्या कांठीं अनागोंदीच्या निबिड जंगलांत सुरू केला. याचे उपदेष्टे व द्रष्टे प्रत्यक्ष माधवा-चार्य जे पुढें विद्यारण्यस्वामी म्हणून प्रसिद्ध शंकराचार्य झाले ते—झाले. वीर-वर हक्क व बुक्क ह्या राज्यक्रान्तीचे अध्वर्यु बनले व दक्षिणहिंदुस्थानचा अखिल हिंदूमात्र या क्रान्तीच्या झेंड्याखालीं जमा होऊं लागला. पुरी एक पिढीहि पर-तंत्र होऊन झाली नाहीं तोंच इ. स. १३३५ सालीं त्या जगत्‌विख्यात विजया-नगरची प्राणप्रतिष्ठा झाली आणि हक्कराय व बुक्कराय यांच्या तिखट तरवारींनीं व माधवाचार्य, सायणाचार्य यांच्या तीव्र बुद्धिबलांनीं विजयानगरला सर्व हिंदू-संस्कृतीचें आगर बनलेलें एक प्रचंड, प्रबल साम्राज्य जन्माला आलें व त्यानें एका पिढीतच यावनी सत्तेला प्रतिबंध केला. या प्रबल साम्राज्यानें जवळजवळ अडीच शतकेंपर्यंत दक्षिणेमध्यें कैक वेळीं मुसलमानांना थरकांप पावावयास लावून किंवा हिंदूध्वज, हिंदूसंस्कृति व हिंदूधर्म यांचा गौरव रक्षण व वर्धन केला. अखेर १५६४ मध्यें सर्व मुसलमानांनीं एक होऊन विजयानगरचे राम-देवराय यांचा तालिकोटच्या लढाईत पराजय केला व अडीच शतकें सर्व मुसलमानी सुलतानांच्या छातीवर पाय देऊन हिंदुधर्माचा गौरव व स्वातंत्र्य राखणाऱ्या या साम्राज्याचा, स्वातंत्र्ययुद्धांत स्वाहाकार झाला !

पुढें पन्नास वर्षें मात्र हिंदुस्थानच्या नितान्त निरयगतीचीं गेलीं. सर्व हिंदुस्थान-भर मुसलमानांचा अव्याहत अंमल सुरू झाला, व आतां हिंदुधर्म कसचा वांचतो, असें निष्क्रिय लोक म्हणूं लागले; व आतां हिंदुधर्म कसा वांचतो, याची विवंचना धर्माभिमानी व देशाभिमानी लोक करूं लागले. परंतु अर्धशतकाच्याच नंतर पुनः रामदास-शिवाजी युग १६२७ सालापासून सुरू झालें व या सुवर्णयुगानें पुनः एकदां, ११९३ मध्यें यवनांच्या हातीं गेलेली दिल्ली, इ. स. १७६० सालीं, जवळजवळ सहा शतकांनंतर, परत घेतलेली पाहिली; व पृथ्वीराजाच्या समशेरीचे तुकडे झाल्यानें दिल्लीला उभारलेलें यवनी सत्तेचें सिंहासन महाराष्ट्रपुत्र, हिंदनरकेसरी जो भाऊसाहेब, त्याच्या घणांच्या प्रचंड घावांनीं शतचूर्ण होऊन गेलें.

अशा रीतीनें यावनीलोकांच्या आक्रमणांतून विमुक्त होत आहे नाहीं, तोंच समुद्रांतून युरोपियनसंस्कृति हिंदमातेवर चढाई करून आली; व अविंधाशीं प्राणघातकी झगडा उणापुरा एक हजार वर्षें करून त्यांत तुर्त्तेच कुठें यश मिळतें न मिळतें तोंच, या नूतन टोळधाडीशीं हिंदमातेला व हिंदूजातीला नवा भीषण संग्राम सुरू करावा लागला. आणि तरीहि, हेंहि आव्हान तिनें धीरगंभीरपणानें स्वीकारून संरक्षणसमराचा पुनश्च 'हरिः ॐ' केला! व त्या झगड्यांत कधीं वडगांवच्या लढाईंत तर कधीं दिल्लीच्या कार-स्थानाच्या चढाईंत, कधीं नानांच्या मुत्सद्दीगिरीच्या डावपेंचांत तर कधीं पाटीलबावांच्या समशेरीच्या सलामींत, अनेक वेळां या नूतनागत युरोपियन-संस्कृतीला हतप्रभ केलें गेलें. कधीं भरतपूरच्या जाटानें, तर कधीं शिखांच्या रणजितसिंगानें व त्याच्या पराक्रमी 'खालसा'नें हिंदूंच्या शौर्याची ज्योति अजून सतेज व दाहक आहे, याचा प्रत्यय आणून दिला. अखेर पुनः एकदां दुर्दैवानें ११९३ साल, इ. स. १८१८ सालीं उजाडलें व पुनः एकदां, मह-त्प्रयासानें स्वतंत्र केलेलें सिंहासन परकीयसत्तेच्या आघातानें आहत झालें.

एक हजार किंवा दीड हजार वर्षांचा इतिहास हा असा स्वातंत्र्यसमरानें व स्वरक्षणाच्या निश्चययुक्त प्रयत्नांनीं व्यापिलेला आहे. त्यानंतर ब्रिटिश अमला-खालच्या ह्या शंभर वर्षांतदेखील, प्रत्यक्ष समरांत पराजय झाला असला तरी, इतर सर्व गोष्टींत, बुद्धिमत्तेंत, चिवटपणांत, विद्वत्तेंत, वैयक्तिक पराक्रमांत वगैरे कोणत्याहि बाबतींत हिंदसंतान हिणकस ठरत नाहीं. फक्त त्यांच्यांत नाहीं संघटना, नाहीं संभूयसमुत्थान, नाहीं सामुदाइक एकात्मकता, नाहीं एकनिष्ठेची शिस्त, व म्हणूनच आज ही दीन अवस्था आपणांस प्राप्त झाली आहे.



आतांपर्यंत हें जें पूर्वीच्या इतिहासाचें अल्पसें आलोचन केलें तें कांहीं पूर्वजांचे केवळ गुण गाण्याकरितां बढाईखोरवृत्तीनें केलें असें नव्हे, तर आज जी निराशा पसरलेली दिसत आहे, तिचें आवरण ह्या आत्मप्रत्ययाच्या भाषेनें व इतिहासानें नष्ट व्हावें म्हणून होय. व यामध्येंहि अतिशयोक्तीचा यत्किंचितहि भाग नसून ही सर्व सार्थोक्ति व सत्योक्ति आहे. अशा रीतीनें आपल्या पूर्वजांचा यथावत् परिचय झाला म्हणजे कोणत्याहि जातीला व राष्ट्राला भविष्यकाळची आशा व उमेद येते आणि ती आशा व उमेद सफल करावयास मनुष्य उत्सुक होतो.

इथपर्यंत जर वाचकांची मजल आली तर त्यांना आपण हिंदूंनीं कोणत्या उदार बुद्धीनें व कशा प्रयत्नसातत्यानें आपला उद्धाराचा मार्ग मोकळा होईल, त्याची रूपरेषा ह्या हिंदुत्वाच्या वाचनानें कळून येईल, असा खूप भरंवसा आहे. व त्याचबरोबर असाहि खूप भरंवसा आहे—नव्हे निष्ठा आहे कीं, पुनरपि एकदां ही पुराणपवित्र व पुराणप्रसिद्ध हिंदुजाति, हल्लींचे आत्मघातकी कांहीं दोष नष्ट करून बलशालि होईल. अशा ह्या बावीस कोटि संतानांनीं बलिष्ठ, संघटनानें संघटित व शुद्धीकरणानें समृद्ध झालेल्या हिंदुजातीशीं हिंदुदेशांत वास्तव्य करणाऱ्या मुसलमानादि सर्व जाति औत्सुक्यानें एकी करतील, व ह्या हिंदभूमीच्या हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन अशा सर्व संतानांच्या ऐक्यानें स्वराज्याच्या प्राप्ती-करितां भगीरथ प्रयत्न होतील, व मग त्या संघटित तेहेतीस कोटींच्या प्रयत्नांना थोपवून धरण्याचें सामर्थ्य ह्या जगांतील कोणत्या पाशवी शक्तींत राहील?

या पुस्तकाच्या भाषान्तरामध्यें जे दोष असतील ते सर्व माझे व बाकीचे सर्व गुण मूळ ग्रंथकर्त्याचे, एवढें सुचवून ठेऊन, हिंदुत्वाच्या मनोरम उद्यानांत शिरण्याचा मार्ग इतका वेळ मीं रोंखून धरला व त्या उद्यानांतल्या आमोदयुक्त कल्पनापुष्पांचा सुवास घेण्यास आणि त्यांतील उद्बोधक व तत्त्वबोधक विवेच-नांच्या फळांचा मधुर आस्वाद घेण्यास वाचकांस उशीर केला याबद्दल क्षमा मागण्याच्या भानगडींत पडून, अधिक उशीर न करतां मी एकदम येथेंच अंत-र्हित होतों.

मुंबई, गिरगांव,<br>
किर्लोस्करभुवन,<br>
चैत्र वद्य पंचमी,<br>
शके १८४७.

ना. दा. सावरकर<br>
भाषान्तरकर्ता

शाळांतून संमेलनप्रसंगीं करण्यास योग्य असें
पौराणिक संगीत नाटक !

**गु रु द क्षि णा**

( अंक १ ते ३ )

लेखक—श्री. **प्र. के. अत्रे,** बी. ए., बी. टी., टी. डी. ( लंडन )

पृष्ठसंख्या ११४; किंमत १० आणे

**गणेश महादेव आणि कंपनी, पुणें शहर**

कोणाहि क्लबला अगर नाट्यसमाजास
करण्यास योग्य !

**संगीत-श्रीमुखांत**

( अंक १ ते ३ )
लेखक—श्री. **यशवन्त गोपाळ जोशी**
पृष्ठसंख्या १४०; सात सुंदर चित्रें
किंमत १२ आणे

**गणेश महादेव आणि कंपनी, पुणें शहर**

# हिंदुत्व

## हिंदुत्वाचीं मूलभूत तत्त्वें

१

“नांवामध्यें काय आहे ? नांव म्हणजे कांहीं हात नव्हे, पाय नव्हे, बाहु नव्हे, मुख नव्हे किंवा शरीरांतील कोणताहि दुसरा एखादा भाग नव्हे.” असें म्हणून व्हेरोनाच्या सुकुमार कुमारिकेनें आपल्या प्रियकराला नांव बदलण्याबद्दल अत्यंत प्रेमाची गळ घातली होती. तथापि ‘आम्ही हिंदु आहोंत, आणि हिंदु रहाण्याचीच आम्हांला आसक्ति वाटते !’ असें जर आम्हीं अभिमानानें म्हटलें तर ती व्हेरोनाची कुमारिका आम्हांला क्षमा करील, अशी आम्ही आशा करतों. त्या सदय साधूच्या परिस्थितीप्रमाणेंच जर आमची परिस्थिती असती, तर आम्हीहि तिच्या तरुण प्रियकराला असाच उपदेश केला असता कीं, “ बाबा, नांवामध्यें काय आहे ? ज्या पुष्पाला आपण ‘गुलाब’ म्हणतों त्याच पुष्पाला उद्यां दुसरें कोणतेंहि जरी नांव ठेवलें तरी त्याचा मोहक वास तसाच येणार ! म्हणून तूं इतक्या नाजूक रीतीनें गळ घालणाऱ्या तर्कशास्त्राच्या गोड आग्रहाला मान वांकीव. कारण, नुसत्या नांवापेक्षां वस्तूंचीच किंमत अधिक आहे, आणि विशेषत: जेव्हां दोन वस्तूंपैकीं एकच पसंत करावयाची आहे, किंवा जेव्हां त्या दोहोंमधील संबंध नवीन अथवा साधा आहे, तेव्हां तर वरील विधान अधिकच यथार्थ आहे; शब्दांच्या ध्वनीमध्यें आणि त्यांच्या अर्थामध्यें अभेद्य असा संबंध असतो हें म्हणणें, एकाच वस्तूला अनेक भाषांमध्यें अनेक नांवें असतात ह्या एकाच गोष्टीनें निरर्थक ठरतें. तरीहि पण वस्तूच्या नांवाचा व प्रत्यक्ष वस्तूचा संबंध जसजसा अधिकाधिक चिरस्थायी होईल तसतशी त्या दोन कल्पनांचा बोध करून देणारी ही सांखळी सहज रीतीनें विचारांचा प्रवाह

एकापासून दुसरीकडे नेऊं शकते. आणि शेवटीं त्या दोहींना निराळें करणें अशक्य होऊन जातें. आणि त्यांतहि जेव्हां त्या वस्तूंशीं दुय्यम प्रतीचे कित्येक विचार किंवा विकार गूढ रीतीनें संबद्ध झालेले असतात, त्या वेळीं तर प्रत्यक्ष वस्तूइतकेंच तिच्या नांवाचें महत्त्व असतें. ' नांवामध्यें काय आहे ? ' असा प्रश्न कळवळून विचारणाऱ्या त्या सुकुमार कुमारिकेला तरी तिच्या पूजेच्या दैवताला ' रोमिओ ' ऐवजीं ' पारीस ' म्हटलें असतें तर तें आवडलें असतें काय ? किंवा तिचा प्रियकर तरी फलान्वित वृक्षांच्या मस्तकांना आपल्या चंदेरी चांदण्यानें रंगविणाऱ्या चंद्राची शपथ वाहून असें सांगेल काय कीं त्यांच्या ' ज्यूलियट ' ला दुसऱ्या कोणत्याहि नांवानें–उदाहरणार्थ ' रोझेलिन ' या नांवानें–संबोधलें तरी त्याच्या हृदयांत तसल्याच मधुर आणि मंजुल लहरी उठतील ? असे कांहीं शब्द आहेत कीं, ते एखाद्या अत्यंत दुर्गम कल्पनेला किंवा ध्येयाला सुगम करतात. त्याचप्रमाणें एखादे वेळीं एखाद्या अमर्याद व केवळ मनोगम्य अशा सर्वसामान्य तत्त्वाला–कीं जें एखाद्या स्वतंत्र जीवजाताप्रमाणें स्वतःसिद्ध राहतें आणि विस्तार पावतें–हें नांव सहजगम्य बनवतें. अशीं नावें एखाद्या व्यक्तीचे ' हातपाय किंवा इतर कोणताहि अवयव ' होऊं शकत नाहींत; याचें कारणच हें कीं, तीं नांवें मनुष्याचा केवळ आत्माच असतात. हीं नांवें प्रत्यक्ष कल्पनाच होऊन बसतात व मनुष्यांच्या पिढ्यांपेक्षांहि अधिक जगतात. ' जीजस ' अस्तंगत झाला, परंतु ' ख्रिस्त ' मात्र रोमन बादशहा व त्याचें रोमन साम्राज्य गेलें तरी अमर राहिला. ' मॅडोना ' च्या सुंदर चित्रांपैकीं एखाद्या चित्राच्या खालीं ' फतिमा ' असें नांव लिहा; आणि मग एखादा स्पॅनिश गृहस्थ त्याच्याकडे कौशल्यानें काढलेल्या इतर चित्रांप्रमाणेंच चिकित्सा-बुद्धीनें निरीक्षण करूं लागेल; परंतु तुम्ही ' फतीमा ' हें नांव काढून ' मॅडोना ' हें नांव त्याच्याऐवजीं लिहा म्हणजे बघा काय चमत्कार होतो तो ! त्याच्या पायांतला ताठपणा जाईल व त्याचे गुडघे जमिनीला टेंकतील. त्याच्या डोळ्यांतील चिकित्साबुद्धि नष्ट होईल व त्या ठिकाणीं भक्तिभावानें अंतर्गत झालेली दृष्टि प्रादुर्भूत होईल; आणि त्याचें सर्व शरीर, आपल्यासमोर प्रत्यक्ष प्रेमस्वरूप जगन्माता उभी आहे, अशा जाणिवेनें रोमांचित होईल ! नांवांत काय आहे ? होय ना ? तर मग अयोध्येला होनोलुलु म्हणा, किंवा राजकुमाराला गोमाजी म्हणा, किंवा अमेरिकन लोकांना वॉशिंगटनचें नांव चेंगिझखान ठेवावयास सांगा; किंवा एखाद्या मुसलमानाचें ज्यू म्हणवून घ्यावयास मन वळवा म्हणजे तुम्हांला आढळून येईल कीं, (अरेबियन नाइटसमधील) "तिळा उघड !" हा मंत्र आपल्या जातीचा अनन्य शब्द नाहीं.



ज्याच्यायोगानें मनुष्यजातीला नवीन जीवन व स्फूर्ति मिळते अशा तऱ्हेच्या नांवांपकींच ' हिंदुत्व ' हें एक नांव आहे, व त्याचें मुख्य लक्षण आणि वैशिष्ट्य काय आहे याबद्दल येथें चर्चा करण्याचा मानस आहे. या नांवाभोंवतीं ज्या कल्पना आणि जीं ध्येयें, ज्या पद्धति आणि ज्या संस्कृति, जे विचार आणि जे विकार केंद्रीभूत झाले आहेत ते इतके अनेकविध आणि विपुल, इतके प्रभावशाली आणि इतके सूक्ष्म इतके चकविणारे तरी इतके स्पष्ट आहेत कीं, त्यामुळें 'हिंदुत्व' या शब्दाची व्याख्या करण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होतात. जास्त जरी नसला तरी, चाळीस शतकांचा काळ, ह्या शब्दाला आज तो जसा आहे तशा तऱ्हेचा घडवावयास लागलेला आहे. कवि आणि तत्त्ववेत्ते, स्मृतिकार आणि स्मार्त, वीर आणि इतिहासलेखक ह्या सर्वांनीं हा शब्द आहे तसाच तो अबाधित रहावा म्हणून याच्यावर विचार केला आहे; याच्याकरितां ते लढाया लढले आणि याच्याकरितां मेलेसुद्धां आहेत. आणि हें नांवं, कधीं परस्पर–विरोधी, कधीं एकनिष्ठ कधीं सहकारी अशा आपल्या अखिल जातीच्या अनेक कृत्यांचा निष्कर्षच नाहीं काय ? ' हिंदुत्व ' हा कांहीं शब्द नाहीं, हा तर इतिहास आहे. आणि हा इतिहासहि, कांहीं वेळेला कांहीं लोक हिंदुत्व या शब्दाचा ' हिंदुधर्म ' या सापेक्ष नांवाशीं घोंटाळा करून केवळ धार्मिक किंवा आत्मिक इतिहास समजतात तसा नाहीं. तर हा इतिहास सर्वांगीण आहे. ' हिंदुधर्म ' हा शब्द फक्त ' हिंदुत्व ' यापासून उत्पन्न झालेला अंशात्मक व एक देश दाखविणारा शब्द आहे. ' हिंदुत्व ' या शब्दाचा अर्थ स्पष्ट केल्यावांचून ' हिंदुधर्म ' याचा अर्थ अबोध्य व अनिश्चित रहातो. या दोन शब्दांमधील अंतर न समजल्यामुळें ह्या आपल्या हिंदु संस्कृतीचा अमूल्य ठेवा ज्यांच्या मालकीचा आहे अशा सजातीय निरनिराळ्या जातीजातींमध्यें पुष्कळ गैरसमज व परस्पर अविश्वास उत्पन्न झालेला आहे. या दोन शब्दांमधील अर्थामध्यें तत्त्वतः काय फरक आहे हें जसजसें आमचें विवेचन विस्तृत होईल, तसतसें अधिक स्पष्ट होईल. आतां येथें फक्त इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, ' हिंदुत्व ' याचा अर्थ कांहीं ' हिंदुधर्म ' या शब्दार्थाशीं पुष्कळ लोक समजतात तसा समानः नाहीं. ' धर्म ' या शब्दानें सामान्यतः कोणत्या तरी अध्यात्मिक वा धार्मिक पंथाच्या वा मताच्या नियमांचा अथवा सिद्धान्ताचा संग्रह असा अर्थ घेतला जातो. भाषेची पद्धति

जर आमच्या वाटेंत आली नसती तर, ‘ हिंदुपणा ’ हाच शब्द ‘ हिंदुधर्म ’ या शब्दापेक्षां हिंदुत्वाशीं अधिक जवळ म्हणून आम्हीं योजिला असता. ‘ हिंदुत्व ’ या शब्दामध्यें आमच्या हिंदुजातीच्या अस्तित्वाची प्रत्येक क्रिया व प्रत्येक विचार यांच्या सर्व शाखा समाविष्ट होतात. आणि म्हणून ‘ हिंदुत्व ’ या शब्दाचें यथार्थ आकलन करतां यावें म्हणून आपल्याला प्रथम ‘ हिंदु ’ या शब्दाचा अर्थ समजून घेतला पाहिजे; आणि मनुष्यजातीमधल्या लक्षावधि लोकांच्या अंतःकरणावर ह्या शब्दानें आपली एवढी छाप कशी पाडली, आणि त्यांच्यांतले शूरांतले शूर व उत्तमांतले उत्तम आपला जीव याच्यावरुन ओवाळून कस टाकण्यास तयार झाले याचें रहस्य जाणलें पाहिजे. परंतु असें करण्यापूर्वी एव गोष्ट स्पष्टपणें सांगणें अवश्य आहे कीं, जो शब्द मुख्यत्वेंकरून एका पंथाचा द्योतव आहे व जो ‘ हिंदुत्व ’ या शब्दापेक्षां अधिक संकुचित व कमी अर्थवाहक आ अशा ‘ हिंदुधर्म ’ या शब्दाची व्याख्या करण्याचा आम्हीं मुळींच प्रयत्न करी नाहीं. यामध्यें आम्हांला किती यश येतें किंवा असा प्रयत्न करणें हें योग्य आ कीं नाहीं हें, विवेचन जसें विस्तार पावेल तसतसें कळून येईल.

## २

धाडसी आर्य लोकांची अगदीं पहिली वसाहत सिंधुनदीच्या तीरावर होऊ त्यांनीं आपल्या होमाचा पहिला अग्नि केव्हां जागृत केला, याचा नव कालनिर्णय करणें हें जरी हल्लींच्या पौर्वात्य संशोधनाच्या अवस्थेमध्यें धोक्या असलें, तरी हें मात्र निश्चित आहे कीं, ईजिप्त आणि बाबिलोन येथील लोकां त्यांची भव्य संस्कृति उभारण्याच्या आधींच, सिंधुनदीच्या पवित्र जलवीचींवरु सुगंधित यज्ञधुम वर्तुलाकार मंडळें घेत घेत वातावरणांत विलीन होत होता, दऱ्याखोरीं अंतःस्फूर्तीनें निघालेल्या वेदांच्या ऋचांनीं निनादित होत होत अचाट साहसें करण्यास प्रवृत्त करणारें त्यांचें अलोट शौर्य, व ब्रह्माचें गूढ उ लन काढण्यापर्यंत भरारी मारणारी त्यांची विचारशक्ति या सर्वांच्या योगानें ए उदात्त आणि सनातन संस्कृतीचा पाया घालण्याचें महत्कार्य त्यांच्या हातून घ णार आहे, हें तेव्हांच स्पष्ट झालें होतें. ज्या वेळेला आर्य लोकांनीं, त्यांच शेजारच्या भाईबंदांशीं–विशेषतः पारसिकांशीं असलेला–आपला संबंध तोडल त्या वेळीं आर्य लोकांची वसाहत सप्तसिंधूंच्या शेवटच्या सीमेपर्यंत पसरली हो



आणि त्या वेळींच त्यांची एकराष्ट्रीयत्वाची कल्पना प्रगल्भतेला पावली होती इतकेंच नव्हे, तर त्यांनीं तिचें अधिष्ठान व नामकरणसंस्कारहि करून टाकले होते. सर्व भूभागावरुन एखाद्या ज्ञानतंतूच्या जाळ्याप्रमाणें विखरून ज्या रुचिकर आणि अखंड सरितांनीं आर्यांचें जीवन जणूं संघटित केलें, त्या पूत आणि पावन सरित्श्रेष्ठांबद्दलच्या कृतज्ञताबुद्धीनें प्रेरित होऊन आर्यांनीं साहजिकच स्वतःला सप्तसिंधु हें नाम धारण केलें–आणि याच नामाभिधानानें जगांतील अगदीं पुराण-तम व प्रथमचा ग्रंथ जो ऋग्वेद, त्यामध्यें सर्व वेदकालीन भारताला संबोधित केलें आहे. प्रामुख्यानें शेतकरी असलेल्या आर्य लोकांना ह्या सप्तसिंधूंबद्दल किती अलौकिक प्रेम आणि आदर वाटत असला पाहिजे याची आपल्यास योग्य ती कल्पना सहज करतां येईल. आणि या सातहि नद्यांमध्यें जी अधिराणीप्रमाणें शोभणारी ‘ सिंधु ’ ती तर त्यांना एकराष्ट्रीयत्व व एकसंस्कृति यांचें प्रत्यक्ष दिसणारें एक मूर्त स्वरूपच भासत असेः—“ **इमा आपः शिवतमा इमा राष्ट्रस्य भेषजीः । इमा राष्ट्रस्य वर्धनीरिमा राष्ट्रभृतोपमाः ॥** ”

आर्यलोकांच्या पुढील दिग्विजयांत त्यांना अशाच सुजला आणि सुफला सरि-च्छ्रेष्ठा लाभावयाच्या होत्या; परंतु ह्या ‘ सप्तसिंधू ’ बद्दल त्यांना जें अनिवार्य प्रेम व जो आदर वाटत असे, तो ते कधींहि विसरूं शकले नाहींत. कारण, याच ‘ सप्तसिंधू ’ नीं त्यांना एकराष्ट्रीत्वाच्या धाग्यानें बांधून टाकून त्यांच्या पूर्वजांना राष्ट्रीयत्वाची व संस्कृतीची नौबत वाजावावयास समर्थ केलें होतें. अगदीं आजच्या दिवसापर्यंतसुद्धां प्रत्येक ‘ सिंधु ’–‘ हिंदु ’ तो कुठेंहि असला तरी,–कृतज्ञतापूर्ण अंतःकरणानें, यांचें स्मरण करील, व आपल्या अंतःकरणाला त्यांनीं नवीन उत्साह व नवीन पावनता द्यावी अशी करुणा भाकील. “ **इमं मे गंगे यमुने सरस्वति । शुतुद्रिस्तोमं सचता परुष्ण्या । असिक्न्यामरुद्वृधे वितस्तयार्जीकीये शृणुह्या सुषोमया ॥ गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ॥ नर्मदे सिंधु कावेरी जलेस्मिन् सन्निधिं कुरु ॥** ”

हे लोक कांहीं केवळ स्वतःलाच हिंदु म्हणून संबोधित होते असें नाहीं, तर आमच्याजवळ असा निर्णायक पुरावा आहे कीं, शेजारीं असलेल्या देशचे लोक-सुद्धां–निदान एका देशचे लोक तरी त्यांना ‘ सप्तसिंधु ’ याच नांवानें ओळखीत होते. संस्कृतामधील ‘ स ’ हें अक्षर कधींकधीं हिंदी अथवा हिंदीव्यतिरिक्तहि इतर प्राकृत भाषांतून ‘ ह ’ मध्यें बदलें जातें. उदाहरणार्थ ‘ सप्त ’ हा शब्द,

केवळ हिंदी प्राकृत भाषांमध्येंच नव्हे तर यूरोपियन भाषांमधूनसुद्धां ‘ हप्त ’ या शब्दांत रूपान्तर पावला आहे. आपल्याकडे सप्ताहाला आपण ‘ हप्ता ’ असें म्हणतों ह्याच सप्तचा हेप्टाकीं ह्या शब्दांत हप्त असा बदल झालाच आहे. संस्कृतांमधला ‘ केसरी ’ हा शब्द जुन्या हिंदीमध्यें ‘केहरी’ असा होतो. त्याचप्रमाणें ‘सरस्वति’ चें रूपान्तर पर्शियनमध्यें ‘ हरह्वती ’, व ‘ असुर ’ याचें ‘ अहुर ’ असें होतें. आणि ‘ अव्हेस्ता ’, मध्यें पुरातन पर्शियन लोकांनीं आपलें वेदकालीन ‘सप्तसिंधु’ ह्या नांवाचें रूपांतर ‘ हप्तहिंदु ’ असें केलेलें प्रत्यक्ष आढळून येतें. याप्रमाणें ऐतिहासिक कालाच्या अगदीं अंधुक प्रभातकालीन प्रकाशांतसुद्धां आपण ‘ सिंधू ’ च्या अथवा ‘ हिंदू ’ च्या राष्ट्राचें रहिवाशी होतों असें आढळून येतें. आणि ही गोष्ट आपल्या इकडील पुराणकालीन विद्वान् लोकांनाहि माहित होती. भविष्य-पुराणामध्यें सर्व म्लेंच्छभाषा संस्कृत भाषेपासून उत्पन्न झाल्या आहेत याबद्दल विवरण करीत असतां हें वरील सत्य नमूद करून ठेवून पुढें म्हटलें आहे कीं, ‘ संस्कृतस्यैव वाणी तु भारतं वर्षमुह्यताम् । अन्यखंडे गता सैव म्लेंच्छाह्या-नंदिनोऽभवन् । पितृ पैतर भ्राताच बादरः पतिरेव च । सेति सा यावनी भाषा ह्यश्वश्चास्यस्तथा पुनः । जानुस्थाने जैतुशब्दः **सप्तसिंधुस्तथैव** च **हप्तहिंदूर्यावनी** च पुनर्ज्ञेया गुरुंडिका । ’ ( प्रतिसर्गपर्व अ. ५ )

याप्रमाणें पर्शियन लोक आपल्या वेदकालीन आर्यांना ‘ हिंदु ’ म्हणूनच संबोधित असत हें आपल्याला कळलें. त्याचप्रमाणें त्या वेळचीं भरभराटीला आलेलीं सर्व लांबलांबचीं राष्ट्रेंहि आपल्याला ‘ हिंदु ’ म्हणूनच ओळखीत असलीं पाहिजेत कारण, हें आपणांस माहित आहे कीं, सामान्यतः एखाद्या परकीय राष्ट्राशीं आपला परिचय झाला, म्हणजे आपण ज्या राष्ट्रांच्या अथवा लोकांच्या मार्फत त्या राष्ट्राला ओळखूं लागलों, तीं राष्ट्रें त्याला ज्या नांवानें संबोधित असता त्याच नांवानें आपणहि त्याला संबोधितों. इतकेंच नव्हे तर, प्रत्यक्ष सप्तसिंधूंच्या टापूंतील इतस्ततः पसरलेल्या मूळच्या रहिवाशांच्या जातीहि आर्यलोकांना भाषाशास्त्रांतील नियमांप्रमाणें, त्यांच्या स्थानिक भाषेंत ‘ हिंदु ’ म्हणूनच संबोधित असल्या पाहिजेत. यापुढें जसजशा संस्कृत भाषेपासून प्राकृतभाषा उत्पन्न होऊं लागल्या तसतसें या सप्तसिंधूंच्या वंशजांपैकीं बहुतेकजण व आर्यांमध्यें मिसळून गेलेले अथवा एकमेकांत शरीरसंबंध होऊन उत्पन्न झालेले जे लोक त्या सर्वांनीं, बाहेरील देशांतील लोकांच्या संसर्गाशिवायहि स्वत:ला ‘ हिंदु ’ म्हणवू



घेतलें असेल. कारण, संस्कृतामधील ‘ स ’ हा ज्याप्रमाणें परकीय भाषेंत, त्याचप्रमाणें हिंदी प्राकृत भाषांमध्येंहि ‘ ह ’ मध्यें रूपान्तरित होतो. म्हणून, निःसंदेह असलेल्या लेखी पुराव्यावरून असें स्पष्ट होतें कीं, आपल्या मूळपुरुषांनीं आपल्या राष्ट्राला व आपल्या जातीला अगदीं पाळण्यांतलें नांव म्हणून ‘ सप्तसिंधु ’ अथवा ‘ हप्तहिंदु ’ हेंच नांव पसंत करून धारण केलें आणि त्या वेळीं ज्ञात असलेल्या सर्व जगालाहि आपण ‘ सिंधु ’ अथवा ‘ हिंदु ’ याच नांवानें माहित होतों.

आतांपर्यंत आपण फक्त लेखी पुराव्यांच्या आधारेंच विवेचन करीत होतों. परंतु, आतां मधूनमधून तर्काच्या प्रदेशांत पाऊल टाकल्यावांचून आम्हांला रहावत नाहीं. आतांपर्यंत आम्हीं आर्यांच्या मूळ वसतिस्थानाबद्दलच्या कोणत्याच सिद्धान्तावर आमची मदार ठेवली नाहीं. परंतु जर पुष्कळांनीं मान्य केलेल्या आर्यांनीं हिंदुस्थानाबाहेरून हिंदुस्थानांत प्रवेश केला या सिद्धान्तावर विश्वास ठेवला, तर अशी एक जिज्ञासा उत्पन्न होते कीं, आर्य लोकांनीं त्यांच्या ह्या नूतन आपल्या म्हटलेल्या घराला जीं नांवें दिलीं तीं त्यांना कोठून सुचलीं असलीं पाहिजेत ? ज्या वेळेला आपण एखादा नवीन देखावा पहातों किंवा नवीन प्रदेश आक्रमण करतों त्या वेळीं त्यांना आपण तेथील लोक ज्या नांवांनीं संबोधित असतील त्याच नांवांनीं बहुतक अंशीं संबोधूं लागतों, हें सामान्यतः खरें नाहीं काय ? आतां पुष्कळ वेळेला नवीन देखाव्यांना आपण आपल्या जुन्या नांवांच्या स्निग्ध स्मरणानें जुन्या स्थलांचींच नांवें देतों, हें खरें आहे; आणि विशेषतः जो प्रदेश अजून कसला गेला नाहीं व ज्यामध्यें लोकवस्ती अल्प आहे अशा अभिनव प्रदेशांत हें अधिक रीतीनें घडतें. परंतु, जेव्हां नवीन प्रदेशाला दिलेलीं नांवें जुन्या प्रदेशांत होतीं असें निःसंदेह रीतीनें कोणी सिद्ध करून देईल तेव्हांच वरील कारण समाधानकारक ठरेल. व इतकें झालें तरीहि हें कोणाला नाकबूल करतां येणार नाहीं कीं, नवीन प्रदेशाला पूर्वीच्याच त्यांच्या नांवांनीं संबोधावयाचें ह्याच पद्धतीचें अधिक अवलंबन केलें जातें. आपण आतां हें निश्चयानें सांगूं शकतों कीं, ‘ सप्तसिंधू ’ च्या प्रदेशांत, तुरळक कां होईना, परंतु, इतस्ततः पसरलेल्या जातींची वस्ती होती. त्यांपैकीं कांहींजण या नवीन आलेल्या पाहुण्यांशीं स्नेहभावानें वागत; आणि त्यांपैकीं कांहीं कांहीं व्यक्ति तर आर्यलोकांना मार्गदर्शक झाल्या व ज्या प्रदेशांबद्दल आर्यलोकांना परकीय म्हणून कांहीं माहिती नव्हती, त्यांचीं नांवें व त्यांचे विशेष त्यांनीं आर्यलोकांना

निवेदन केले. ' विद्याधराप्सरोयक्षरक्षोगंधर्वकिन्नराः ' यांपैकीं कांहीं सर्वच सर्वस्वीं आर्यलोकांशीं शत्रुत्व करीत नव्हते. कारण, पुष्कळ वेळेला त्यांच्या परोपकारीपणाचें व सद्वृत्तीचें वर्णन केलेलें आढळतें. यावरून हें शक्य दिसतें कीं, ह्या महानद्यांना जीं नांवें पूर्वी होती त्यांपैकीं बहुतेक नांवें आर्य लोकांनीं संस्कृत रूपें देऊन अंगीकृत केलीं असावींत. या प्रकारचीं अनेक उदाहरणें पुढें जसजसे आर्य लोक या जातींना व त्यांच्या भाषांना आपल्यांत मिसळून घेऊं लागले तसतशीं दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, पुढील शब्द पहा:–शलकंटकटा, मलय, मिलिंद, अलसंदा ( Alexandria ), सुलुव ( Selucus ) इत्यादि. हें जर सर्व खरें आहे असें मानलें, तर महानदी सिंधु ही आपल्या देशाच्या मूळच्या रहिवाशांना ' हिंदु ' या नांवानें माहित होती व कांहीं ठिकाणीं संस्कृत भाषेंत ' ह ' च्या ऐवजीं ' स ' घालतात, या नियमाप्रमाणें आर्य लोकांनीं आपल्या उच्चारविशेषान्वयें त्याला ' सिंधु ' नामाभिधान दिलें. याप्रमाणें ' हिंदु ' हें नांव या भूमीला व तिच्या रहिवाशांना इतक्या अगणित कालापासून प्राप्त झालें असलें पाहिजे कीं, वैदिक कालांतलें ' सिंधु ' हें नांव देखील त्या मानानें मागूनचें व त्यापासून उत्पन्न झालेलें ठरतें. जर ' सिंधु ' या नांवाचा उगम ऐतिहासिक कालाच्या अंधुक संधिप्रकाशांत सांपडतो असें धरलें, तर ' हिंदु ' या शब्दाचा उगम ह्या अधुक संधिप्रकाशाच्याहि मागें इतक्या पुरातन कालापर्यंत जातो कीं, तेथें दंतकथेचेंहि तीव्र टोंक बोंथट होतें व तो कालनिर्णय करणें अशक्य होऊन जातें.

' सिंधु ' अथवा ' हिंदु ' सारख्या धाडसी लोकांचे पराक्रम मग पुढें फक्त ' पंचनद ' किंवा ' ' पंजाब ' या प्रांतांपुरतेच मर्यादित राहणें शक्य नव्हतें. पंजाबपुढील मोठमोठालीं सुपीक मैदानें कोणातरी अचाट उद्योग व सामर्थ्य असलेल्या लोकांना जणुं काय आह्वान करीतच उभीं होतीं. एका पाठीमागून एक, अशा अनेक हिंदूंच्या टोळ्या आपल्या पंजाबच्या जन्मभूमीपासून निघाल्या व लवकरच त्यांनीं जणूं काय परमेश्वरानेंच आपल्याला एक महत्कार्य नेमून दिलें आहे, अशा भावनेनें, त्या महत्कार्याचें पवित्र दर्शक म्हणून आपला यज्ञाग्नि घेऊन पुढें पसरलेला अगदीं तुरळक वस्तीचा अफाट प्रदेश वसाहती करून त्यांनीं व्यापून टाकला. त्यांनीं अरण्यें कापलीं, शेती जिकडे तिकडे भरभराटीला आणलीं, शहरें वसविलीं, राज्यें उदयास आणलीं, आणि याप्रमाणें निसर्गनिर्मित



तुमुल माजलेल्या रानांस मानवी हस्ताचा स्पर्श करून त्यांचें स्वरूपच सगळें पालटून टाकलें. परंतु, ज्या वेळीं हीं वर वर्णन केलेलीं अचाट कृत्यें आर्य लोक करीत होते, त्याच वेळीं त्यांच्या स्वभावधर्माला जुळेल व बदललेल्या परिस्थितीला अनुरूप होईल अशी एक लवचिक राज्यव्यवस्था ते निर्माण करीत होते. जसजसा काळ लोटत गेला, तसतसें त्यांच्या नवीन वसाहतींमधलें अंतर वाढत गेलें, आणि निरनिराळ्या उत्क्रान्त जातीचे नवीन लोक त्यांच्या संस्कृतीमध्यें मिसळत चालले; व निरनिराळ्या वसाहती, आपल्या स्वतःच्याच राजकीय हितसंबंधाच्या दृष्टीनें जीवनव्यापार करूं लागल्या. नवीननवीन संबंध जडूं लागले व त्यामुळें जरी पूर्व ऋणानुबंध नष्ट झाले नाहींत तरी नवीन संबंध अधिकाधिक प्रबळ व चिरस्थायी होऊं लागून त्यामुळें जुन्या संस्कृतीचीं व जुन्या परंपरेचीं नांवें मागें पडत गेलीं. कांहींनीं आपणांस ' कुरु ' हें नांव धारण केलें तर कांहींनीं ' काशी, ' ' विदेह, ' ' मगध, ' अशीं नांवें धारण केलीं आणि त्यामुळें पूर्वीचें जुनें ' सिंधु ' अथवा ' हिंदु ' हें नांव प्रथम दुय्यम बनून अखेर विस्मृत होऊन गेलें. याचा अर्थ असा नाहीं कीं, एकराष्ट्रीयत्वाची व एकसंस्कृतीची भावना नष्ट झाली. परंतु त्या भावनेला दुसरीं नांवें व दुसरीं स्वरूपें प्राप्त झालीं. व त्यांपैकीं राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची निर्मिति म्हणजे ' चक्रवर्ति ' पदाची होय. शेवटीं एकराष्ट्र व एकदेश निर्माण करण्याचें जें महत्कार्य ' सिंधू 'नीं आपल्यापुढें ठेविलें होतें तें ज्या वेळीं, अयोध्येच्या वीर्यशाली राजपुत्रानें–श्रीरामचंद्रानें–प्रत्यक्ष लंकेमध्यें विजयभरानें प्रवेश केला व वस्तुतः हिमालयापासून तों दक्षिण समुद्राच्या सीमान्तापर्यंत सर्व भूमि एकछत्री सत्तेखालीं आणली, त्या वेळीं आपल्या भौगोलिक विस्ताराच्या दृष्टीनें पूर्णतेला गेलें. ज्या दिवशीं प्रभु रामचंद्रानें सोडलेला अश्वमेधांतला विजयाश्व हा दशदिशांना फिरून अजेय आणि अजिंक्य असा ठरून पुनरपि अयोध्येला परत आला व पराक्रमी पुरुषावतंस प्रभु रामचंद्राच्या साम्राज्यसिंहासनावर ज्या वेळीं तें दिग्विजयी श्वेत साम्राज्यछत्र उभारले गेलें, त्याचप्रमाणें केवळ आर्यांच्या वंशांतील भूपतींनींच नव्हे, तर दक्षिणेतील देशांचे नृपति हनुमान, सुग्रीव, बिभीषण यांनींहि जेव्हां प्रेमनिर्भरतेनें प्रभु रामचंद्रानें साम्राज्यपद मान्य केलें, तोच दिवस आपल्या हिंदुजातीचा खरा जन्मदिन होय. हाच आपला खरा राष्ट्रीय दिन होय. कारण, आर्य व अनार्य हे दोघेहि एकत्र होऊन एका संघटित राष्ट्राचा त्या दिवशीं जन्म झाला. या दिवशीं रामचंद्रांच्या आधींच्या अनेक पिढ्यांच्या प्रयत्नांस

सफलता येऊन त्यांच्यावर यशाचा कळस चढला व त्यानें पुढील पिढ्यांना एक नवीन आणि संयुक्त ध्येय, एक संयुक्त निशाण, एक संयुक्त कार्य आंखून दिलें; आणि याच्यामागून झालेल्या सर्व पिढ्यांनीं तत्प्रीत्यर्थ समजून अथवा न समजून, अखंड झगडा चालविला व प्रसंगीं प्राणसमर्पणहि केलें.

संयुक्त–एकजीव–होण्याच्या कल्पनेला जर तिच्यांतील सर्व अर्थ चटकन् कळविणारें एखादें व्यापक नांव प्राप्त झालें तर त्या कल्पनेचा जोम वाढतो. 'आर्यावर्त' अथवा 'ब्रह्मवर्त' हे शब्द, जी संयुक्त बनण्याची क्रिया, थेट सिंधुनदापासून आसमुद्र भूभागावर सुरू झाली होती, आणि जिचा उद्देश एकराष्ट्र निर्माण करणे हा होता, त्याचें यथार्थ स्वरूप दर्शविण्याला अपुरे पडूं लागतात. आर्यावर्त याची व्याख्या त्या वेळच्या पुराणलेखकांनीं 'हिमालयापासून विंध्यपर्वतापर्यंत पसरलेला प्रदेश' अशीच केली आहे. ॥ 'आर्यावर्तः पुण्यभूमिर्मध्यं विन्ध्यहिमालयोः'। ही व्याख्या व हें नांव जरी त्या वेळच्या अस्तित्वांत असलेल्या परिस्थितीला सर्वस्वीं युक्त होतें, तरी व त्या वेळेच्या परिस्थितीला तें लागू होतें. एवढ्याच करितां, ज्या वेळीं आर्य आणि अनार्य लोक यांच्या संमिश्रणानें बनलेल्या, आणि विंध्यपर्वताच्या निमुळत्या शिखरांच्या पलीकडे दूरवर प्रदेशांत ज्यांनीं आपली संस्कृति–आपलें साम्राज्य प्रस्थापित केलें होतें, त्या संयुक्त जातीला तें नांव पूर्णार्थ दर्शक होण्यास अपुरें पडलें. याप्रमाणें विस्तार पावलेल्या राष्ट्राला तत्सदृश नामाभिधान शोधून काढण्याचें आवश्यक कार्य, ज्या वेळीं भरतवंश सर्व जगावर राजसत्ता चालवूं लागला त्या वेळीं अंशतः तडीला गेलें.

हा भरत कोण होता–तो वेदकालीन होता कीं दौष्यन्ती भरत होता–याविषयीं कोणत्याहि तऱ्हेनें तर्कवितर्क करीत न बसतां, अथवा त्यानें कोणत्या वेळीं राज्य केलें यावद्दलहि कालनिर्णयाच्या खटपटींत न पडतां, तूर्त आपण फक्त इतकें ध्यानांत ठेवलें तर पुरें आहे कीं, आर्यावर्तांत आणि दक्षिणापथ या प्रदेशांत रहाणाऱ्या सर्व लोकांनीं त्याचें नांव स्वीकृत केलें इतकेंच नव्हे, तर आपल्या मातृभूमीला व आपल्या संस्कृतीप्रमाणें बनलेल्या साम्राज्याला त्याचेंच नांव देण्यांत त्यांना धन्यता वाटली. याप्रमाणें दक्षिणेच्या बाजूला जसजसें क्षितिज वाढूं लागलें तसतसा साहजिकच या संस्कृतीचा केंद्रबिंदु सप्तसिंधूंतून बदलून गंगानदीच्या खोऱ्यामध्यें येऊन बसला, व 'सप्तसिंधु,' 'आर्यावर्त,' किंवा 'दक्षिणापथ' हीं नांवें बदलून जाऊन त्याच्या जागीं अधिक भव्य असें 'भरतखंड' हें नांव प्राप्त



झालें; व या नांवांत एकदम हिमाचलापासून तों थेट समुद्रापर्यंतचा प्रदेश समाविष्ट होऊं लागला. हेंच सत्य, त्या वेळच्या मोठमोठ्या विचारी लोकांच्या मनामध्यें ही सर्वव्यापक कल्पना जेव्हां प्रथम उद्भवूं लागली, त्या वेळीं त्यांनीं केलेल्या आपल्या राष्ट्राच्या व्याख्येवरूनहि अगदीं स्पष्ट होतें. विष्णुपुराणामध्यें केलेल्या खालीं दिलेल्या संक्षिप्त व्याख्येहून अधिक सुंदर व्याख्या आपल्याला कुठेंहि मिळणार नाहीं. ती व्याख्या अशी:–'उत्तरयत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम्। वर्षं तद्-भारतं नाम **भारती यत्र संतति**'॥

तरी पण, हें नवें 'भारतवर्ष' हें नांव, आपल्या मूळच्या 'सिंधु' अथवा 'हिंदु' या नांवाला कांहीं अजिबात नष्ट करूं शकलें नाहीं; किंवा त्याच्या योगानें, ज्या सरिच्छ्रेष्ठा सिंधुनदीच्या वक्षःस्थलावर आपल्या मूळ पूर्वजांनीं आणि आपल्या अखिल जातींनीं जीवनदुग्धाचें यथेच्छ पान केलें, तिच्यावरचें आनिवार प्रेमहि आपण विसरूं शकलों नाहीं. सिंधुनदीच्या तीरातीरानें पसरलेल्या सरहद्दीवरचा आपला प्रदेश अजूनहि 'सिंधुराष्ट्र' याच पुराण नांवाला चिकटून आहे आणि आपल्या सर्व संस्कृत वाङ्मयामध्यें 'सिंधुसौवीर' हे आपल्या राजकीय संघटनेचे मूलभूत आणि महत्त्वाचे घटक याच दृष्टीनें उल्लेखिले जातात. भारतीय महायुद्धांत 'सिंधुसौवीरा'चा राजा हा प्रामुख्यानें दिसून येतो, व तो भरतांचा निकटवर्ती संबंधी होता असा उल्लेख आढळतो. 'सिंधुराष्ट्रा'च्या सीमा जरी वेळोवेळीं बदलत गेल्या, तरी ते बोलत असलेली भाषा मात्र त्यांना त्याहि वेळेला व हल्लींहि ती एक स्वतंत्र जाति आहे हें सिद्ध करते. मुलतानपासून तों थेट खालीं समुद्रापर्यंत जी 'सिंधी' या नांवाची भाषा बोलली जाते, त्यापासून हें निश्चितपणानें सिद्ध होतें कीं, ते लोक भौगोलिक आणि राजकीय दृष्ट्या आपल्या हिंदी लोकांचेच एक अंशभूत घटक आहेत. खुद्द हिंदुस्थानामध्यें जरी आपलें मूळचें राष्ट्रीय नांव 'भरतखंड' या नांवानें [illegible] केलें, तरी परदेशांतील लोकांनीं या बदललेल्या नांवाकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं, आणि त्यांताहि आपल्या सरहद्दीवरच्या प्रांताचें जुनें नांवच कायम राहिल्यानें, शेजारच्या पारशी, ज्यू, ग्रीक व इतर लोकांनीं आपल्याला आपल्या जुन्या 'सिंधु' अथवा 'हिंदु' या नांवानेंच संबोधण्याचें कायम ठेविलें. त्यांनीं 'सिंधु' अथवा 'हिंदु' हें नांव फक्त पूर्वीप्रमाणें सिंधुनदीच्या आसमंतात् भागा-[illegible] कांहीं मर्यादित करून ठेवलें नाहीं, तर ज्या ज्या ठिकाणीं पूर्वीच्या 'सिंधु'नीं जाऊन वसाहती केल्या व वाढविल्या त्या सर्व राष्ट्राला त्यांनीं तें पूर्वीचेंच नांव

कायम केलें. ' अव्हेस्ता ' कालीन पारशी लोक आपल्याला ' हिंदु ' म्हणूनच ओळखतात. ग्रीक लोकहि उच्चारांतील कठोर शब्द गाळून ' इंडोज ' असें संबोधूं लागले. याच ग्रीक लोकांचें अनुकरण करून जवळजवळ सर्व यूरोप व तदनंतर अमेरिका हीहि 'हिंदु' किंवा ' इंडियन् ' याच नांवानें आपल्याला उल्लेखूं लागली. प्रत्यक्ष आपल्यामध्यें येऊन इतके दिवस राहिलेला ' ह्युएनत्सिंग ' हि आपणाला ' शिंतु ' अथवा ' हिंतु ' असेंच नेहमीं म्हणतो. पार्थियन लोक मात्र अफगाणिस्थानाला ' श्वेतभारत ' असें म्हणत असत; परंतु असलीं थोडींशीं उदाहरणें जर वगळलीं तर, बहुतेक कोणतेहि परकीय लोक आपलें मूळचें नांव विसरले नव्हते व ' भारत ' हें नूतन नांवहि त्यांनीं ग्रहण केलें नव्हतें. थेट आजतागायत सर्व जग आपल्याला ' हिंदु ' याच नांवानें ओळखतें, व आपल्या देशाला ' हिंदुस्थान' असेंच म्हणतें. जणूं काय, ज्यांनीं प्रथम या नांवाची स्वतःकरितां पसंती केली त्या आपल्या वेदकालीन पूर्वजांच्या इच्छेला मान देण्याकरितांच अखिल जगत् आपणाला त्याच नांवानें संबोधित आलें आहे !

परंतु, कोणाचेंहि नामाभिधान हें स्वतःच्या आवडीवर इतकेंसें अवलंबून रहात नाहीं; तर तें सामान्यतः इतर लोकांना काय म्हणावेंसें वाटतें, यावरच अवलंबून असतें. वास्तविक पहातां नांव हें केवळ याचकरितां अस्तित्वांत येतें. स्वात्मता ही आपल्याला अवाकूरीतीनें व कोणत्याहि नांवावांचून, इतकेंच नव्हे तर कोणत्याहि आकारावांचून ज्ञात होत असते. परंतु, स्वात्मतेचा ज्या वेळीं परकीयत्वाशीं संबंध किंवा विरोध येतो, त्याच वेळीं फक्त, जर हिला इतर वस्तूंबरोबर व्यवहार करण्याची जरूर असेल अथवा इतर इच्याशीं व्यवहार करण्याचा आग्रह धरतील, तर नामनिर्देशाची आवश्यकता उत्पन्न होते. दोघांनींच खेळतां येण्यासारख्या खेळाप्रमाणेंच ही गोष्ट आहे. सर्व जगाचीच जर अशी इच्छा असेल कीं, एखाद्या विवक्षित शिक्षकाला अथवा विवक्षित विनोदी गृहस्थाला ' अष्टावक्र ' अथवा ' मुल्ला दोप्याजा ' असें म्हणावयाचें तर मग त्याच्या आवडीनावडीचा प्रश्न शिल्लक न रहातां तो बहुतेक त्याच नांवानें संबोधिला जातो. जगानें पसंत केलेलें नांव जर आपल्या आवडीच्या अगदींच विरुद्ध नसेल तर आपण पसंत केलेल्या सर्व नांवांना तें मागें टाकण्याचाच अधिक संभव असतो. उदाहरणार्थ ' पागे ', ' मुजुमदार, ' ' पेशवे ' हे शब्द पहावे. परंतु, सर्व जगानें जर असें एखादें नांव शोधून काढलें कीं, जें आपल्या पूर्ववैभवाचें किंवा प्रेमाचें



निदर्शक आहे, तर मग असें नांव इतर नांवांपेक्षां जास्त प्रचारांत येतें इतकेंच नव्हे तर, तेंच इतर नांवांपेक्षां अधिक चिरंतन होतें. ह्या नियमानें, व ज्या परिस्थितीनें प्रथम जगाशीं आपला संबंध आणला व मग त्याच्याशीं भयंकर झगडा सुरू झाला, त्या परिस्थितीनें आपलें ' हिंदु ' हें नामाभिधान पुनः एकदा इतक्या प्रामुख्यानें प्रस्थापित केलें कीं, त्यायोगानें आपलें अत्यंत प्रिय असलेलें ' भरतखंड ' हें नांवसुद्धां मागें पडलें.

३

जरी हिंदु लोक बौद्धधर्माच्या उदयापूर्वीं, बाह्य जगाच्या व्यवहारापासून अलिप्त नव्हते, आणि जरी आपले बाह्य जगाशीं असलेले संबंध इतक्या विस्तृत प्रमाणावर स्थापन झालेले होते कीं, आपल्या देशाभिमानी धर्मशास्त्रप्रणेत्यांना अधिकारानें असें म्हणतां येत होतें कीं, ' एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः । स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः । ' (मनु), तरी प्रस्तुतच्या विवेचनाला अनुसरून, बुद्धधर्माच्या अभ्युदयानंतर बाह्य जगाशीं हिंदुस्थानचे काय काय संबंध आले याचेंच विवेचन मुख्यतः करणें जरूर आहे. कारण ह्याच वेळेला आपल्या स्वतःच्या देशामध्यें वाढ होण्यास जेवढा वाव होता आणि जेवढी शक्यता होती, ती सर्व व्यापून व संपून जाऊन आपल्या लोकांतील राष्ट्रिय आकांक्षा साहजिकच स्वतःच्या देशाचे सीमान्त ओलांडून बाहेरील जगाला आक्रमूं लागल्या व पूर्वीच्या काळीं बाह्य जगाशीं जे संबंध आले होते त्यांच्यापेक्षां अधिक जोमानें व व्यापक रीतीनें ते आतां प्रसरण पावूं लागले. इतकेंच नव्हे, तर बाहेरील जगहि आपल्या दरवाजावर पूर्वीं त्यांनीं कधींहि न दाखविलेल्या औद्धत्यानें व बेमुवनपणानें ठोठावूं लागलें. या राजकीय घडामोडींत भर टाकण्याकरितां सत्यत्वाच्या तत्त्वाच्या पायावर पायावर उभारलेलें आणखीहि एक महनीय व स्वर्गीय धर्मकार्य निर्माण होऊन त्याच्यायोगानें हिंदुस्थान त्या वेळच्या सर्व ज्ञात जगाचें केवळ हृदयच-आत्माच-होऊन बसलें. मिसर देशापासून तों मेक्सिकोच्या किनाऱ्या किनाऱ्यांपर्यंत, लाखों—असंख्य—लोकांना ही ' सिंधुभूमि ' म्हणजे एक संतांच्या व देवांच्या वसतीची भूमि होऊन बसली. दूरदूरच्या देशांच्या किनाऱ्यांपासून हजारों श्रद्धाळु यात्रेकरू या भूमीमध्यें संतत येऊं लागले; व येथून हजारों

विद्वान्, हजारों उपदेशक, संत, महंत हे त्या वेळच्या ज्ञात जगावर अप्रतिहत संचार करूं लागले. परंतु, बाह्य देशांतील लोकांनीं आपणांस ‘ सिंधु ’ अथवा ‘ हिंदु ’ म्हणूनच संबोधण्याचें कायम ठेवल्यानें, आंत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या ह्या दोनहि प्रवाहांनीं आपलें ‘ सिंधु ’ अथवा ‘ हिंदु ’ हेंच आपलें राष्ट्रीय नामाभिधान दृढमूल करण्यांत कल्पनातीत मदत केली. राजकीय आणि इतर घडामोडीबद्दलच्या संबंधांत, निरनिराळ्या राज्यांशीं जो पत्रव्यवहार घडत असे त्यामध्यें, ते त्यांना माहित असलेल्या ‘ हिंदु ’ किंवा ‘ इंडस ’ ( सिंधु ) याच नांवाचा उल्लेख करीत असले पाहिजेत व त्याच उल्लेखाला आपल्याहि लोकांना मान द्यावा लागत असला पाहिजे. त्यामुळें प्रथमप्रथम ‘ भरतखंड ’ या नांवाबरोबर व मग पुढें केवळ एकाकीच या वरील अभिधानाचा उपयोग प्रसृत झाला असला पाहिजे.

परंतु, हें एक आश्चर्यच आहे कीं, जरी सर्व जगामध्यें आपलें हें नामाभिधान प्रमुखत्वानें प्रस्थापित करण्यास बुद्धधर्माचा अभ्युदय कारण झाला, आणि आपणा स्वत:लां ‘ हिंदु ’ याच नांवाची जाणीव अधिक उत्पन्न झाली, तरी बुद्धधर्माचा ऱ्हास झाल्यावर देखील हीच परंपरा अधिक जोरानें पुढेंहि सुरु राहिली.

आम्हांला असें भय वाटतें कीं, बुद्धधर्माच्या ऱ्हासाला जीं कारणें घडून आलीं, त्यांमध्यें सर्वांपेक्षां अधिक परिणाम घडविणारें जें एक कारण घडून आलें, त्यानें यावें तितकें महत्त्व विद्वान् लोकांच्या चिकित्सक बुद्धीनें आकलन केलें नाहीं. परंतु, प्रस्तुत विवेचनाच्या प्रांतांत हा विषय दूरान्वयानेंच येत असल्यानें, त्याचें सांगोपांग विवेचन आम्हाला येथें करतां येत नाहीं. या ठिकाणीं आम्ही फक्त सर्वसाधारण अशींच कांहीं विधानें करून त्यांचें विस्तारशः विवेचन करण्याचें काम दुसऱ्या एखाद्या अनुरूप प्रसंगावर सोंपवून देणार आहोंत. तत्पूर्वीं जर अधिक अधिकारयुक्त व्यक्तींनीं तें काम उरकलें तर उत्तमच झालें. केवळ तत्त्वज्ञानविषयक मतभेदानेंच आपलें राष्ट्र बुद्धधर्माच्या विरुद्ध उठलें हें शक्य असेल काय ? सर्वस्वीं नाहीं; कारण, असले हे मतभेद आधींच अस्तित्वांत होते. तरींहि गुण्यागोविंदानें शेजारीं शेजारीं राहून ते भरभराटीलाहि येत होते. बौद्ध मठांतून सरसहा वाढत चाललेली क्षीणता व अनाचार हीं त्याच्या अधःपाताचीं कारणें होऊं शकतील काय ? सर्वथा नाहीं; कारण कांहीं कांहीं भिक्षूंच्या विहारांमधून स्वैरवृत्ति, आळशी, नीतिभ्रष्ट व भेदाभेदविचारशून्य अशा स्त्रीपुरुषांचा



समूह जरी दुसऱ्यांच्या जिवावर आपला योगक्षेम चालवीत होता व जे स्वतःचे नव्हे अशा द्रव्याचा व्यय दुर्लौकिकाच्या व्यवहारामध्यें करीत होता, तरी कांहीं कांहीं ठिकाणीं पूर्वींच्या त्या महाबुद्धिमान् अशा ‘ अर्हत् ’ व ‘ भिक्षु ’ संन्याशांची परंपरा कांहीं अगदींच नि:शेष झाली नव्हती. किंवा असल्या तऱ्हेचें दुराचारी लोकांचें अस्तित्व कांहीं फक्त बुद्धविहारांमध्येंच नव्हतें. ह्या व अशा इतर दोषांनींच केवळ बुद्धधर्माच्या सत्तेविरुद्ध इतका तीव्र विरोध उत्पन्न झाला नसता व तो बुद्धधर्माच्या अस्तित्वाला इतका प्राणघातक ठरला नसता. परंतु, बुद्धधर्माच्या प्रसारानें राजकीय परिस्थितींत इतका हानिकर परिणाम घडून आला कीं, त्यायोगानें आपल्या राष्ट्राच्या पौरुषावर व प्रत्यक्ष राष्ट्राच्या अस्तित्वावरच गदा आली, व त्याचमुळें पुढें मग बौद्धधर्मावर प्राणघातक संकट ओढवलें. ज्या वेळीं शाक्यसिंह बौद्धधर्ममंदिराच्या पायाचा दगड बसवीत होता, त्याच वेळीं शाक्यांचें लहानसें प्रजासत्ताक राज्य नष्ट झाल्याची बातमी, त्या राज्याच्या पूर्वींच्या युवराजाला कळावी या गोष्टीपेक्षां दुसरी कोणतीहि गोष्ट, पुढें जो अनर्थापात होणार होता त्या प्रचंड दुःखपर्यवसायी नाटकाची अधिक आश्चर्यकारक नांदी होऊं शकणार नाहीं. बुद्धानें आधींच आपल्या घराण्यांतील सर्वोत्तम माणसें आपल्या भिक्षुसंघांत सामील करून घेतलीं होतीं, आणि याप्रमाणें त्या प्रजासत्ताक राज्यांतील बलवान् आणि शूर पहिल्या प्रतीचीं माणसें नाहींशीं झाल्यानें अधिक समर्थ व अधिक लढवय्या शत्रूपुढें, प्रत्यक्ष शाक्यसिंहाच्या हयातीतच तें प्रजासत्ताक राज्य सहजासहजीं बळीं पडलें. ज्या वेळेला ही बातमी शाक्यसिंहाला कळली, त्या वेळीं, असें सांगतात कीं, तो प्राप्तप्रकाश–तो सुज्ञ–अगदीं अविचलित राहिला. त्यानंतर शतकांपाठीमागून शतकें निघून गेलीं; शाक्यांचा राजा, पुढें राजाचा राजा–लोकजित्–झाला, सर्व जगाचा जेता ठरला. त्याच्या लहानशा शाक्यराज्याच्या सरहद्दी विस्तार पावूं लागल्या व सर्व हिंदुस्थानच्या सरहद्दींना जाऊन भिडल्या; आणि जणुं काय, काव्यमय साम्य, काव्यमय न्याय मिळण्याकरितांच, कपिलवस्तूच्या प्रजासत्ताक राज्यावर, जो नियतीचा दुःखमय फेरा आला तोच फेरा सबंध भारतवर्षावर ओढवला, व तें सिथीज आणि हूण यांच्यासारख्या परक्या–शाक्यांसारख्या स्वकीय नव्हे–लोकांच्या भक्ष्यस्थानीं पडलें ! आतां हें खरें आहे कीं, तो प्राप्तप्रकाश–तो सुज्ञ,–जर त्याला ही बातमी, पहिल्या बातमीप्रमाणेंच कळती तर कदाचित् पूर्वींप्रमाणेंच अगदीं अविचलित राहिला असता. परंतु त्या वेळच्या इतर हिंदूंना हा विषाचा

घोट आणि राजकीय गुलामगिरी मनाची समता कायम ठेवून निमूटपणें सहन करवली नाहीं. कारण ह्या जेत्यांचें रानटी क्रौर्य, दिनवदनाच्या अहिंसेच्या पाठां-तरानें आणि विश्वबंधुत्वाच्या भावनेनें शमूं शकणारें नव्हतें. आणि त्यांच्या तर-वारीची तिखट धार, मृदुल ताडपत्रानें किंवा मंत्राच्या आवर्तनांनीं बोथट होऊं शकणारी नव्हती. याचा असा अर्थ नाहीं कीं, त्या महनीय विश्वबंधुत्वाच्या संघाचें व त्याच्या दिव्य कार्याचें महत्त्व आम्ही कमी करीत आहोंत, मग त्याच्यावर आरोप करण्याचें तर दूरच राहिलें. आम्हाला इतिहासाच्या कोणत्याहि अभ्यासकाच्या लक्ष्यांतून न सुटण्यासारख्या ज्या ढळढळीत एकसमयावच्छेदें-करून घडलेल्या गोष्टी आहेत त्या दाखवावयाच्या आहेत. आम्हाला हें माहित आहे कीं, या आमच्या विधानाविरुद्ध म्हणून ही गोष्ट दाखविण्यांत येईल कीं, आजपर्यंत जेवढे जेवढे म्हणून महत्तम आणि बलिष्ठ असे हिंदुराजे व सम्राट ज्ञात आहेत ते सर्व बौद्धकालीनच होते. होय—परंतु तें ज्ञात कुणाला ? तर यूरोपियन लोकांना व आपल्यापैकीं ज्यांनीं न कळत त्यांचे विचारच नव्हे तर त्यांचे दुराग्रहसुद्धां अंगांत मुरवून घेतले आहेत त्यांना. असा एक काळ होता कीं, जेव्हां प्रत्येक शाळेंतला इतिहास मुसलमानांच्या विजयापासून सुरु होत असे; कारण, सामान्य प्रतीच्या त्या वेळच्या इंग्लिश लेखकाला, तत्पूर्वींच्या आमच्या इतिहासाचें जवळजवळ अज्ञानच होतें. थोड्याच कालापासून यूरोपचें सर्वसाधा-रण ज्ञान बौद्धधर्माच्या अभ्युदयापर्यंत जाऊन पोंचलें आहे, व त्यामुळें आपणहि आपल्या इतिहासाचा तोच आरंभकाल व वैभवकाल म्हणून मानूं लागलों आहों. परंतु, खरी वस्तुस्थिति म्हणजे ह्या दोन्ही गोष्टी खऱ्या नाहींत. त्या बुद्धाबद्दलच्या, त्या धर्माबद्दलच्या, त्या संघाबद्दलच्या आदराच्या, कौतुकाच्या, प्रेमाच्या बाबतींत आम्ही कोणालाहि हार जाणार नाहीं. ते सर्व आमचेच आहेत. त्यांचे दिग्विजय हे आमचेच आहेत व त्यांचे पराभवहि आमचेच आहेत. तो देवप्रिय अशोक हा महान् होता व बौद्धभिक्षूंनीं जे दिग्विजय केले ते महत्तर होते परंतु याच्यापेक्षां अधिक जरी कदाचित् नसले तरी याच्याइतकेच महनीय विजयी व अशोकाप्रमाणेंच परमपावन आणि अधिक राजकार्यकुशल, अधिक मुत्सद्दी असे राजे तत्पूर्वीं होऊन गेले होते व वास्तविक त्याचमुळें त्यांना एवढें मोठें होतां आलें. म्हणून आम्हाला असें वाटत नाहीं कीं, आमचें राजकीय साहस किंवा आमच्या जातीचें धैर्यगांभीर्य हें फक्त मौर्यांबरोबरच उत्पन्न झालें व त्यांच्याचबरोबर विलयास पावलें. किंवा असेंहि वाटत नाहीं कीं, त्यांनीं बौद्धधर्माचा अंगिकार केल्यामुळें



त्यांच्या अंगीं हे गुण बाणले. बुद्धधर्मानें विजय मिळविले आहेत, परंतु, ते आमच्या ह्या प्रत्यक्ष साक्षीभूत असलेल्या भौतिक जगांत नाहींत–कीं, जिथें मातीच्या पायांवर दीर्घकाळ उभें राहातां येत नाहीं, जिथें तरवारीला धार सहज पाजतां येते, जिथें तीव्र तृष्णा, स्वर्गामध्यें संतत वाहणाऱ्या स्रोतसांच्या केवळ वर्णनानें तृप्त होत नाही. **ज्या वेळीं शक आणि हूण लोक, ज्वालामुखींतून उसळणाऱ्या लाव्हारसाप्रमाणें आमच्या देशांत उतरले व जें जें विकासित होतें तें तें जाळून भस्म करते झाले त्या वेळीं ह्याच तऱ्हेच्या विचार-सरणीनें त्या वेळच्या देशभक्तांची व विचारवंतांची चित्तवृत्ति हल-वून सोडली असली पाहिजे.**

आपल्या जातीचीं हृदयाशीं बाळगलेलीं ध्येयें–त्यांचीं सिंहासनें, त्यांचीं कुटुंबें, आणि ज्यांची पूजा केली ते प्रत्यक्ष त्यांचे देवहि–पायांखालीं तुडविले गेलेले त्यांनीं पाहिले; त्यांच्या प्रेमाची मूर्ति त्यांची पवित्रभूमि, त्यांच्यापेक्षां भाषा, धर्म, तत्त्व-ज्ञान, दया व इतर सर्व मानवी आणि ईश्वरी मृदुल संवेदनांच्या बाबतींत सर्वस्वीं हीन परंतु केवळ बलानें अधिक असलेल्या रानटी लोकांच्या टोळ्यांनीं बेचिराख आणि उध्वस्त केलेली त्यांनीं पाहिली ! ‘ अग्नि आणि खड्ग ’ या दोन शब्दां-मध्येच त्या बलाची सर्व मीमांसा सांठविली होती ! या सर्व गोष्टींवरुन निघालेला बोध स्पष्ट होता. त्याचप्रमाणें हेंहि स्पष्ट होतें कीं, बौद्धधर्माच्या तत्त्वज्ञानांत, ह्या नव्या व भीषण ‘ अग्नि आणि खड्गा’च्या तत्त्वज्ञानांतील द्वैताला समर्पक उत्तर देण्याचें सामर्थ्य नव्हतें. आणि म्हणून आपल्या जातीच्या विचारवंत पुढाऱ्यांना ह्या विध्वंसक पापी अग्नीचा विध्वंस करण्याकरितां आपल्या यज्ञवेदींतील पावन अग्नीचें पुनरुत्थान करावें लागलें. खड्ग धरण्याकरितां वैदिक कालच्या क्षेत्रांतील [illegible] खुल्या कराव्या लागल्या, त्यांना भयानक ‘ काली’च्या यज्ञवेदीवर धार पाजावी लागली, कारण ‘ महाकाला’चें सांत्वन व्हावयाचें होतें. व हा त्यांचा तर्कहि कांहीं चुकीचा ठरला नाहीं. कारण, पुनः म्यानांतून निष्कोषित झालेल्या पुनर्दीप्त हिंदु शस्त्रांचा विजय हा संपूर्ण व संशयातीत असाच झाला. ज्यानें परकीय लोकांना हिंदभूमीमधून पिटाळून बाहेर हांकून दिलें तो विक्रमादित्य, आणि ज्यानें तार्तरी व मांगोलियामध्यें जाऊन त्यांच्या गुहांमध्यें पकडून त्यांना [illegible] दिलें तो ललितादित्य हे दोघेहि एकमेकांचे पूरक होते. नुसत्या नीति–[illegible] जें साध्य करतां आलें नाहीं तें शौर्यानें घडवून आणलें. पुनः एकदा

ही आर्यजाति वैभवाच्या शिखरावर आरूढ झाली व आपल्या प्रभावानें राष्ट्र
जीविताच्या प्रत्येक शाखेंत चैतन्य उत्पन्न केलें गेलें. काव्य आणि तत्त्वज्ञान, कल
आणि कौशल्य, शेती आणि व्यापार, विचारपरंपरा आणि कार्यपरंपरा ह्या सर्व
अंगांना स्वतंत्रता, सामर्थ्य व यश यांच्या जाणिवेनें जी स्फूर्ति मिळते ती मिळून
राष्ट्राची सर्वांगीण उन्नति झाली. नेहेमींच्या नियमाप्रमाणेंच ही प्रतिक्रियासुद्धा
सदोषतेपर्यंत पूर्ण झाली. 'वैदिकधर्माचा उद्धार करा!' 'पुनश्च वेदांकडे चला!
अशी घोषणा सुरू झाली. ही राष्ट्रीय घोषणा दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट व
अधिकाधिक अधिकारयुक्त होत चालली. कारण, त्याची राजकीय दृष्टीनें अत्यंत
आवश्यकता होती.

सर्व जगद्व्यापी धर्म प्रस्थापित करण्याचा अगदीं प्रथमचा, आणि तरीहि
अत्यंत प्रचंड असा प्रयत्न प्रथम बुद्धधर्मानें केला. "हे भिक्षूंनों, जगांतील दश
दिशांना तुम्ही संचार करा आणि सत्यतत्त्वाचा धर्म सर्वांना उपदेशित करा.'
होय; खरोखरीच हा धर्म सत्यतत्त्वाचाच होता. त्यामध्यें कोणताहि प्रच्छन्न हे
नव्हता. किंवा कोणत्याहि भूमीची अथवा प्राप्तीची अभिलाषा, त्याच्या संचारा
कारणीभूत झाली नव्हती. परंतु, जरी बौद्धधर्मानें एवढें यश संपादन केलें तर
त्याला पाशवी मनोवृत्तींची बीजें, किंवा राजकीय आकांक्षा, अथवा वैयक्ति
अभ्युदयाची लालसा, हीं कांहीं जगांतील सर्व लोकांच्या अंतःकरणांतून इतक्य
प्रमाणांत नष्ट करतां आलीं नाहींत कीं, ज्यामुळें हिंदुस्थानाला बिनधोकपणें त
वारीच्या ऐवजीं जपमाळ हातीं धरतां यावी. आणि तरीहि जगाला उदाहर
घालून देण्याकरितां, हिंदुस्थानानें आपली अशी इच्छा जाहीर केली कीं, 'शस्त्रा
विजय मिळविण्यापेक्षां, सत्यानें व शांतीनेंच विजय मिळविणें' अधि
इष्ट आहे. व याप्रमाणें हिंदभूनें महनीय प्रयत्न केला. आणि हा प्रयत्न
तिनें इतक्या उदात्तपणानें केला कीं, त्यामुळेंच ती लोभाविष्ट व स्वा
सर्वस्व मानणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें हास्यास्पद ठरली. पाण्यामध्यें अणुरे
मात्र असणाऱ्या सूक्ष्मजीवांना मृत्युमुखांतून वांचवितां यावें म्हणून घो
आणि हत्ती यांना पाणी प्यावयास देतांना तें गाळून द्यावें अशा तऱ्हेचीं आ
राजांचीं आज्ञापत्रें या आर्यभूमीनें काढलीं नाहींत काय? समुद्राच्या मध्यभा
माशांना खाद्य मिळून ते जिवंत रहावे म्हणून त्यांना धान्यकण खाऊं घालण्या
करितां अनेक ठिकाणीं सोय केली नव्हती काय? आणि त्याच वेळीं इतर समु



न मात्र राजरोस रीतीनें स्वतःच्या पुष्टीसाठीं माशांचा संहार करण्याचा क्रम
अव्याहत चालू होता, इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष मासेच स्वतःचा जीव रक्षण
करण्याकरितां एकमेकांना राजरोस रीतीनें भक्षण करीत होते! स्वतः मारलें
जाऊन वधाचाच वध करण्याचा महनीय प्रयत्न तिनें केला. आणि शेवटीं तिला
आढळून आलें कीं, प्रसंगीं तरवारीपुढें ताडपत्रें हीं क्षणभंगुर आहेत! जोंपर्यंत
सर्व जग रक्तरंजित नखदंतांनीं (शस्त्रास्त्रांनीं) सज्ज आहे, आणि राष्ट्रीय व
जातीय भेदभाव मनुष्याला पशु बनविण्याइतके तीव्रतेनें प्रबल आहेत, तोंपर्यंत
हिंदुस्थानानें–जर त्याला त्याच्या आत्मिक प्रकाशाप्रमाणें, आधिभौतिक अथवा
पारमार्थिक जीवन स्थापित करावयाचें असेल तर–राष्ट्रीय व जातीय संबंधां-
पासून उत्पन्न होणारें सामर्थ्य गमावून भागावयाचें नाहीं. येवढ्याकरितां त्या
वेळच्या विचारवान् व क्रियावान् लोकांना विश्वबंधुत्वाच्या शांतिपाठाचे मंत्र
शिकण्याची किळस आली आणि त्यांनीं विषण्ण मनानें अशी तक्रार केली कीं—

"ये त्वया देव निहिता असुराश्चैव विष्णुना। ते जाता म्लेंच्छ-
रूपेण पुनरद्य महीतले ॥ व्यापादयन्ति ते विप्रान् घ्नंति यज्ञादिकाः
क्रिया। हरन्ति मुनिकन्याश्च पापाः किं किं न कुर्वते ॥ म्लेंच्छा-
क्रांते च भूलोके निर्वषट्कारमंगले। यज्ञयागादि विच्छेदाद्देव-
लोकोऽवसीदति ॥ (गुणाढ्य)"

ज्या भूमीनें विश्वस्त अंत करणानें, स्वतः भिक्षूचीं वस्त्रें परिधान केलीं होतीं
आणि तरवार त्यक्त करून जपमाळ धारण करून अहिंसेचें व अनत्याचाराचें व्रत
स्वीकारलें होतें, त्या निसर्गसुंदर भूमीला ज्यांनीं लुटून उध्वस्त केली त्या शक
व हूण लोकांच्या जंगली टोळ्या जेव्हां सिंधूच्या पार व त्याच्याहि पलीकडे पिटा-
ळून लावल्या गेल्या आणि ज्यावेळीं एक सबल राष्ट्रसत्ता प्रस्थापित केली गेली,
त्यावेळी तत्कालीन राष्ट्रधुरीणांच्या हें लक्ष्यांत आलें असलें पाहिजे कीं, जर ह्या
नूतन निर्माण केलेल्या राष्ट्रसत्तेला फक्त नितान्त राष्ट्रीय धर्माचा पाठिंबा दिला
तर त्यापासून केवढें तरी सामर्थ्य प्राप्त होईल.

शिवाय शत्रूशीं साधर्म्य व संबंध वाढविणारी प्रत्येक गोष्ट आपली प्रतिकाराची
शक्ति कमी करते. ज्याप्रमाणें आपल्या एखाद्या स्नेह्याच्या अंगांत आपण ज्या
सद्गुणांना फार चहातों व आदर करतों ते बहुतेक सद्गुण असले म्हणजे तो
आपला अत्यंत जिवलग स्नेही होतो, त्याचप्रमाणें ज्या शत्रूमध्यें व आपल्यामध्यें

कांहींच संबंध वा साधर्म्य नसतें त्याचा आपण कसून प्रतिकार करतों. ज्या हिंदी राष्ट्राच्या अंगची, जुलुम, जबरी, पापकर्म हीं करणारांना शासन करण्याची शक्तिहिसुद्धां, अनत्याचार व विश्वबंधुत्व या तत्त्वांची भूल पडल्यामुळें नष्ट झाली त्या हिन्दी राष्ट्राच्या अंगीं अन्यायाबद्दलची तीव्र चीड उत्पन्न करण्याच्या व कधींहि न मरणाऱ्या प्रतिकाराची ज्योत पेटविण्याच्या अवश्यकतेची पूर्ति करण्यासाठीं ज्या हातानें आर्यभूमीचा गळा दाबला त्याच हाताशीं समानधर्मीय म्हणून हस्तांदोलन करण्याचा प्रसंग येईल असे एका धर्मपंथाचे वा एका धर्मतत्त्वाचे धागे तोडून टाकणें, त्याच एका मार्गानें होणें शक्य होतें. ज्या विश्वबंधुत्वाच्या कल्पनेनें, इतर राष्ट्रांच्या अंगचा पाशवी स्वार्थसाधुपणा आणि हिंसात्मकवृत्ति हीं नष्ट करण्याच्या ऐवजीं, हिंदुस्थानाला स्वसंरक्षणरहित व विश्वस्त पाहून त्यांच्या अंगची अभिलाषाच अधिक जागृत होते त्या विश्वबंधुत्वाच्या कल्पनेचा उपयोग तरी काय ? छे; भविष्यकाळीं संरक्षणाचा केवळ एकच मार्ग म्हणजे शौर्य आणि बल हाच होय, व हा केवळ राष्ट्रीय जाणिवेनेंच उत्पन्न होतो. आजपर्यंत ह्या भारतभूनें सत्याभासाकरितां आपल्या अंगांतील रक्त सांडलें आहे व या सर्वांचा विपरीत परिणामच तिच्या अनुभवाला आला.

बौद्धधर्माची सत्ता हिंदुस्थानांत पुनरपि बळानें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न जसजसा अधिकाधिक भीषण होत गेला तसतशी त्यांतील विश्वबंधुत्वाच्या कल्पनेविरुद्ध अधिकाधिक तीव्र प्रतिक्रिया सुरू झाली. राष्ट्रीय भावना असलेल्या लोकांनीं राष्ट्रस्वातंत्र्याचा सवदा करून परकीय जेत्यांची सार्वभौमसत्ता मानण्याचें साफ नाकारलें. परंतु, जर का परकीय जेता बुद्धधर्माकडे कल असलेला असला तर त्याच्याबद्दलची प्रच्छन्न सहानुभूति हिंदुस्थानामधील सर्व बुद्धसांप्रदायिकांकडून त्याला मिळण्याची खात्री होती. ज्याप्रमाणें कॅथोलिक पंथाचा राजा पुनरपि इंग्लंडच्या गादीवर बसविण्याच्या कॅथोलिक मताच्या स्पेनदेशामधील प्रयत्नांत, इंग्लंडमध्यें कांहींतरी वजनदार लोक सांपडतच असत, त्याचप्रमाणें हेंहि घडलें. इतकेंच नव्हे तर, आपल्या पूर्वीच्या ग्रंथांमधून अंधुक असे सूचक उल्लेख विपुल आढळतात कीं, कांहीं वेळेला, कांहीं परकीय बौद्ध लोकांनीं केवळ आपापले राष्ट्रीय व धार्मिक हेतु साधण्याकरितांच हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या होत्या. या वेळच्या सर्व ऐतिहासिक भागावरचें विशद विवेचन आम्हाला येथे करतां येत नाहीं. परंतु, याचें फक्त एकच प्रत्यंतर आम्ही देतों. आपल्या एका पुराणांत आर्यलोकांवर ' न्यूनपती 'नीं ( हूण लोकांच्या राजानें ) आणि त्याच्या



बुद्ध साहाय्यकानीं केलेल्या स्वारीचें कांहीं लाक्षणिक, कांहीं प्रत्यक्ष असें वर्णन केलें आहे. ही लढाई ' हुहा ' या नदीच्या कांठीं कशी झाली, चीन देशामध्यें आपलें मुख्य ठाणें ठेवून बौद्धलोकांची सेना कशी लढली, ( " चीनदेशमुपागम्य युद्धभूमिरकायत् " ), निरनिराळ्या बौद्धराष्ट्रांकडून त्यांना कशी सैन्याची मदत मिळत गेली, ( ' श्यामदेशोद्भवा लक्षास्तथा लक्षाश्च जापकाः । दशलक्ष्याश्चीनदेश्या युद्धाय समुपस्थिताः ' ), त्याचप्रमाणें शेवटीं या लढाईमध्यें बुद्धलोकांचा कसा पराभव झाला व त्याबद्दल त्यांना किती जबर किंमत द्यावी लागली हें सर्व वर्णन त्यांत केलें आहे. अखेर बौद्धलोकांना हिंदुस्थानाविरुद्ध त्यांच्या मनांत असलेले सर्व अंतस्थ राष्ट्रीय हेतु सोडून द्यावे लागले व पुनः राजकारणाची ढवळाढवळ करण्याकरितां हिंदुस्थानामध्यें येणार नाहीं असा करार करून द्यावा लागला. बौद्धलोकांना वैय्यक्तिक रीतीनें या हिंदभूमीमध्यें–सहिष्णुतेच्या भूमीमध्यें–भय मानण्याचें कारण नव्हतें. परंतु त्यांनीं हिंदुस्थानच्या राजकीय जीविताला व स्वातंत्र्याला संकट उत्पन्न होईल, अशी कोणतीहि गोष्ट करतां कामाची नाहीं. ' सर्वैश्च बौद्धवृंदैश्च तत्रैव शपथं कृतम् । आर्यदेशं न यास्यामः कदाचिद्राष्ट्रहेतवे ॥' ( भविष्यपुराण–प्रतिसर्ग पर्व ).

आणि अशा रीतीनें आपल्या राष्ट्रीय वैशिष्ट्यानें बनलेल्या संस्था पुनः प्रस्थापित झाल्या. वर्णाश्रमव्यवस्था ही संस्था, बौद्धधर्माचा अंमल जारीनें चालू होता तेव्हांहि कांहीं नामशेष झाली नव्हती; व ती आतां तर पुनः इतकी भरभराटीला आली कीं, राजे आणि महाराजे यांना ' वर्णव्यवस्थापनपरः ' ( सोनपतताम्रलेख )– ' वर्णाश्रमव्यवस्थापनप्रवृत्तचक्रः ' मधवत ताम्रपट ) असल्या पदव्या घेण्यामध्यें अभिमान वाटूं लागला. या वर्णाश्रमधर्मसंस्थेला इतकें अनुकूल लोकमत बनत चाललें होतें कीं, आपलें राष्ट्रीय वैशिष्ट्यच मुळीं त्यावरून ओळखलें जात होतें. उदाहरणार्थ, परकीयांमध्यें आणि आपल्यांमध्यें जो भेद आहे त्याचें वर्णन खालीलप्रमाणें केलें आहे. ' चातुर्वर्ण्यव्यवस्थान यस्मिन् देशे न विद्यते । तं म्लेंच्छदेशं जानीयादार्यावर्तस्ततः परं ।। ' यावरून साहजिकच असा निर्बंध झाला कीं, ज्या देशांतले लोक, आपल्यांतील वर्णव्यवस्थेसारख्या संस्थांशीं असहिष्णुतेच्या भावनेनें वागणारे व पुष्कळ वेळां तर प्रखर शत्रुत्व करणारे असे आहेत, व जेथें आपल्या धर्माप्रमाणें अक्षरशः वागण्याइतकें संरक्षण मिळणें शक्य नाहीं अशा देशांच्या किनाऱ्यालाहि जाऊं नये. ही प्रतिक्रिया जरी परमावधीची होती, तरी राजकीय

दृष्टीनें समजण्यासारखी होती. कारण, अगदीं थेट आजच्या कालांतहि आपणांस असे देशभक्त विचारी लोक भेटत नाहींत काय कीं, जे ज्या देशांत आपल्या लोकांना गुलामांप्रमाणें व अपमानकारकरीतीनें वागविण्यांत येतें अशा देशांमध्यें मनुष्यें न पाठविण्याचे कायदे करण्याच्या मताचे आहेत ?

याप्रमाणें, हिंदुस्थानमध्यें बुद्धधर्माचा जो ऱ्हास झाला त्याचें कारण व त्याचप्रमाणें त्याचें पर्यवसान हीं केवळ राजकीय व राष्ट्रीय दृष्टीनें अवश्यक होतीं. बुद्धधर्माचें भौगोलिक केंद्रस्थान कुठेंच नव्हतें. आणि म्हणून, बुद्धधर्माशीं तादात्म्य पावण्याच्या प्रयत्नांमध्यें हिंदुस्थानचा जो राष्ट्रीय गुरुत्वमध्य नष्ट झाला होता तो पुनरपि स्थापित करणें हें अत्यंत आवश्यक होतें. ज्या वेळीं एखाद्या सचेतन-वस्तूप्रमाणें आपलें राष्ट्र तीव्र जाणिवेनें स्वसंवेद्य बनलें आणि परकीयांशीं प्रत्यक्ष विरोध सुरू झाला, त्या वेळीं नैसर्गिक रीतीनेंच तें आपल्यामध्यें व परकीयांमध्ये असलेले भेद स्पष्ट करूं लागलें, आणि आपल्या निवासस्थानाच्या मर्यादा आंखून घेऊं लागलें. त्यायोगानें त्यांना स्वतःला ते कुठें होते हें स्पष्टपणें कळलें व जगाला त्यांना दाखवितां आलें कीं, केवळ एकजातीय व एकराष्ट्रीय दृष्टीनेंच नव्हे तर भौगोलिक व राजकीय दृष्टीनेंहि ते एक स्वतंत्र लोक आहेत. आपल्या देशाची दक्षिणसीमा हीं आधींच निश्चित झाली होती, आणि ती सर्वमान्य व सर्वसंमत अशी ठरली होती. अपार आणि अनंत समुद्रांच्या चौकटीमध्यें ज्या रीतीनें आपलें दक्षिण द्वीपकल्प वसविलें आहे, ती रीति तिच्या निरतिशय सौंदर्यानें आणि पूर्णत्वानें केवळ काव्यमय आहे. ही ' समुद्ररशना ' पाहून आपल्या प्रत्येक पिढींतील कवि आणि देशभक्त आनंदानें फुलून गेले आहेत. परंतु आपल्या वायव्य सरहद्दीवर मात्र भिन्नभिन्न जातींचे परस्पर-संबंध अनिष्ट रीतीनें घडून आले व त्यामुळें आपली तिकडची सरहद्द नेहमी बदलत जाऊन असुरक्षित राहिली. आणि म्हणून उज्जयनीच्या महाकालाच्या आधिपत्याखालीं उत्तेजन मिळालेल्या स्वत्वस्थापनेच्या लाटेंतहि आपल्या देशभक्तांनीं उत्तर दिशेची सरहद्द, दक्षिणसरहद्दीइतकीच निश्चित आणि संरक्षित केली नसती, तर ती एक मोठी आश्चर्याचीच गोष्ट झाली असती. आणि अशी सरहद्द म्हणजे प्रसन्नसलिला आणि अपार असलेल्या सिंधुनदीशिवाय दुसरी कोणती असं शकेल ? ज्या दिवशीं आपल्या पूर्वजांनीं ही नदी ओलांडली त्याच दिवशीं त्यांनी आपला पूर्वीच्या लोकांशीं असलेला संबंध कायमचा तोडून टाकला आणि एका



नवीन राष्ट्राचा पाया घातला. त्यांचा जणूं काय पुनर्जन्म झाला. आणि नवीन आशा नवीन ध्येय यांच्या अनुरोधानें या लोकांची एक नवीन जाति आणि नवीन राज्यसंस्था निर्माण होणार अशी भवितव्यताच जणुं ठरली होती. आणि त्याच नूतन जन्म पावलेल्या जातीला ' सिंधु ' अथवा ' हिंदु ' अशी अन्वर्थक व भावनोद्दीपक संज्ञा प्राप्त झाली.

आपल्या सरहद्दीला सिंधुनदीशीं संगत करण्याचा प्रयत्न म्हणजे उगीच कांहीं-तरी फिरवाफिरव होती असें नाहीं. ' पुनश्च वैदिक काल ' ही जी राष्ट्रोद्धारकांची घोषगर्जना होती तिचाच हा वास्तविक परिणाम होता. वैदिककालाच्या आधार-स्तंभावर उभारलेल्या आणि वैदिकधर्मानें आशीर्वाद दिलेल्या राष्ट्राला वैदिक नांवच पाहिजे. आणि म्हणून त्या काळीं शक्य असलेल्या रीतींनीं तें वैदिक पद्ध-तीनें ठेवलें गेलें, आणि त्या वेळेच्या एकंदर इतिहासाच्या रोंखावरून सूचित आखलेली ही कार्यमालिका प्रत्यक्ष रीतीनें व्यवहारांत आणली गेली. कारण, देश-[illegible] लिहिल्या गेलेल्या पुराणांपैकीं एका पुराणांत असें .निश्चयानें लिहिलें आहे कीं, प्रख्यात विक्रमादित्याचा नातू शालिवाहन यानें, परकीय लोकांचा हिंदुस्थान जिंकण्याचा दुसरा प्रयत्न निष्फळ करून त्यांना सिंधूनदीच्या पार हांकून लाव-ल्यावर, एक राजाज्ञापत्र काढलें व असें जाहीर केलें कीं, त्या वेळेपासून सिंधु-नदी हीच हिंदुस्थान व परकीय देश यांच्यामधील सरहद्द समजली जावी. " एतस्मिन्नंतरे तत्र शालिवाहनभूपतिः । विक्रमादित्यपौत्रश्च पितृराज्यं प्रपेदिरे ॥ जित्वा शकान् दुराधर्षान् चीनतैत्तिरिदेशजान् । बाल्हिकान् कामरूपांश्च रोमजान् खुरजान् शठान् ॥ तेषां कोशान् गृहित्वाच दंडयोग्यानकारयत् । स्थापिता तेन मर्यादा म्लेंच्छार्याणां पृथक् पृथक् । सिंधुस्थानमितिज्ञेयं राष्ट्रमार्यस्य चोत्तमम् । म्लेंच्छस्थानं परं सिंधोः कृतं तेन महात्मना ॥ " ( भविष्यपुराण, प्रतिसर्ग पर्व अ. २ ).

ज्याबद्दल आपल्याजवळ ऐतिहासिक पुरावा आहे असें आपल्या देशाचें जुन्यां-तील जुनें नांव म्हणजे ' सप्तसिंधु ' अथवा ' सिंधुः ' खुद्द ' भारतवर्ष ' हें नांव-सुद्धां यानंतरचें आहे व त्यांत एक प्रकारचा वैयक्तिक अर्थ गर्भित आहे. एखाद्या व्यक्तीचा लौकिक-मग ती व्यक्ति कितीहि लोकोत्तर असो-काल जसजसा व्यतीत होतो, तसतसा मंदप्रभ होत जातो. जें नामाभिधान एखाद्या व्यक्तीच्या विजयमालिकांवरून वा यशःसंपादनावरून ठेवलें जातें तें नामाभिधान, ज्या

नांवामध्यें असल्या राष्ट्रीय विजयाचें व वैयक्तिक पराक्रमाचें निदर्शन असूनहि शिवाय एखाद्या महान् उपकारी व चिरंतन नैसर्गिक चमत्काराचें द्योतन केलें जातें असल्या नामाभिधानापेक्षां, अधिक परिणामकारक आणि अखंड वृद्धिंगत होणाऱ्या राष्ट्राभिमानाची व कृतज्ञतेची जाणीव ह्यांची स्फूर्ति देण्यास समर्थ होणें शक्य नाहीं. आणि त्यांतच जर त्या नांवामध्यें आपल्या राष्ट्रीय यशःसंपादनाचें आणि पूज्य व्यक्तींच्या स्मृतीचें मीलन झालें असेल तर मग असल्या नांवाची थोरवी तर अधिकच होते. तो सम्राट भरत अस्तंगत झाला आणि त्याच्याचसारखे अन्य पराक्रमी सम्राट्हि त्याच मार्गाला लागले. परंतु सिंधुनदी मात्र अखंड वहात आहे; आपल्या कृतज्ञताबुद्धीला विकासित करीत, उत्स्फूर्त करीत, आपल्या स्वाभिमानाळा सचेतन करीत, पूर्वजांची स्मृति जागृत करीत, ती अखंड वहात आहे. आपल्या लोकांच्या भाग्यावभाग्यावर पहारा करणारा हा एक पहारेकरीच आहे. अत्यंत पुराणभूतकालापासून तों दूरवरच्या भविष्यकालापर्यंत संबंध जोडणारा हा एक पाठीचा कणाच आहे. अशा तऱ्हेच्या महानदीच्या नांवाशीं आमच्या राष्ट्राचें नामाभिधान संलग्न झाल्यानें प्रत्यक्ष निसर्ग आमच्या बाजूचा झाला व त्यामुळें आमचें राष्ट्रीय जीवन अशा एका सक्षम पायावर रचलें गेलें कीं, तो पाया मानवी तर्कशक्तीला जोंवर धांव घेतां येते अशा चिरंतन कालापर्यंत अविकृत राहील. असल्याच तऱ्हेच्या विचार-परंपरेनें आपल्या त्या वेळच्या राष्ट्रीय नेत्यांना, आपल्या राष्ट्राला त्याचें वैदिक नांव जें ' सिंधुस्थान ' ' राष्ट्रमार्यस्य चोत्तमम् '-तेंच पुनरपि प्रसृत करण्याची कल्पना सूचित झाली असावी.

' सिंधुस्थान ' हें नामाभिधान वैदिक तर आहेच, परंतु आणखीहि त्यामध्यें एक मार्मिक वैशिष्टय आहे व त्याकडे दुर्लक्ष्य करून चालण्यासारखें नाहीं. 'सिंधु' या शब्दाचा संस्कृत भाषेमधला अर्थ कांहीं फक्त ' सिंधुनदी ' एवढाच नाहीं, परंतु, ' समुद्र ' असाहि त्याचा एक अर्थ आहे. ' समुद्ररस्ना ' दक्षिण द्वीपकल्पाला कमरपट्टयाप्रमाणें वेष्टिणारा हा जो ' सिंधु ' तोहि सिंधुस्थान ह्या नांवांत अभिप्रेत असल्यानें आपल्या देशाच्या जवळजवळ सर्व मर्यादा केवळ एका शब्दामध्यें ग्रथित केल्या जातात. ' ब्रह्मपुत्रा ' ही एक सिंधुनदीचीच शाखा आहे. व ' सिंधु-नदी ' हीच हिमालयाच्या पूर्व व पश्चिम पठारांवरून वहात जाऊन दोन प्रवाह-रूपानें पूर्व व पश्चिम दिशांची सरहद्द बनते; ही कल्पना जरी आपण यथार्थ न



मानली तरी सुद्धां ही गोष्ट सिद्धच आहे कीं, सिंधुनदी ही आपल्या प्रवाहांनीं उत्तर व पश्चिम दिग्प्रांताला वेष्टून टाकते व म्हणून ' सिंधुस्थान ' हें नांव, आपल्या मातृभूमीची सर्व प्रतिमा एकदम डोळ्यांपुढें उभी करते. व त्यावरून एकदम अर्थबोध होतो कीं, ' सिंधु ' नदीपासून ' सिंधू ' ( समुद्रा ) पर्यंत जी भूमि विस्तारली आहे, तीच आमची मातृभूमि होय.

यावरून अशी कल्पना मात्र करतां कामा नये कीं, ' सिंधु ' हें नांव आमच्या पूर्वजांना केवळ या भौगोलिक वैशिष्टयावरूनच पसंत पडलें. कारण, असें निक्षून प्रतिपादन केलेलें आढळतें कीं, या नांवापासून उत्पन्न होणारा अर्थ कांहीं केवळ भौगोलिक नाहीं तर राष्ट्रीयहि आहे. ' सिंधुस्थान ' म्हणजे कांहीं फक्त जमिनीचा तुकडाच नाहीं तर तें एक ' राष्ट्र ' आहे, कीं, जें राष्ट्र सर्वदा वस्तुतः जरी नसलें तरी, ध्येयरूपानें एकराष्ट्रपद पावलें होतें. ( राज्ञः राष्ट्रम् ) त्याचप्रमाणें याच्या-बरोबर हेंहि अगदीं स्पष्ट होतें कीं, संस्कृति या ' सिंधुस्थाना ' मध्यें उत्कर्ष पावली आणि जे लोक त्या संस्कृतीमध्यें वाढले ते वैदिक कालामध्यें असलेल्या ' सिंधु ' प्रमाणेंच होते. ' सिंधुस्थान ' हें ' राष्ट्रमार्यस्य चोत्तमम् ' होतें व तद्-भिन्न जी परकीयांची भूमि ती ' म्लेंच्छस्थान ' या नांवानें संबोधिली जात होती. तरी पण हें येथें स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं, ही व्याख्या कांहीं पारमार्थिक संबंधा-वरून अथवा धार्मिक वृथाभिमानापासून उत्पन्न झाली नाहीं. ' आर्य ' हा शब्द व्याख्येंत मुद्दाम घालण्यांत आला आहे; व त्यामध्यें ' सिंधुनदी ' च्या अलीकडील तीरापासूनच्या भागांत, राष्ट्रीय घटनेमध्यें जे जे लोक प्रामुख्यानें गोंवले गेले, ते ते सर्व लोक निर्देशित झाले. मग ते ' वैदिक ' असोत किंवा ' अवैदिक ' असोत, ' ब्राह्मण ' किंवा ' चांडाल ' असोत; त्याचप्रमाणें ज्यांनीं ज्यांनीं एकसंस्कृति, एकरक्तसंबंध, एकदेश व एकराज्यव्यवस्था यांचा अंगिकार केला असे सर्व लोक या व्याख्येंत अंतर्भूत झाले. यानंतर ' म्लेंच्छ ' ह्या शब्दामध्यें, तो ' सिंधु-स्थान ' याच्या उलट योजिल्या कारणानेंच, जे जे कोणी राष्ट्रीय आणि जातीय संबंधांत परके होते अशांचाच समावेश होऊं लागला. परंतु, असे हे परकी लोक धर्मानेंहि भिन्न असलेच पाहिजेत असा मात्र कांहीं नियम नव्हता.

ही राजाज्ञा ' सिंधुस्थाना ' मधील इतर राजाज्ञेप्रमाणेंच सामान्यतः एका नामदार व लोकप्रिय अशा चळवळीचा फक्त परिणाम होता. कारण, आपल्या राष्ट्रीय आकांक्षांना स्फूर्ति देण्याचें सामर्थ्य जर तिच्यामध्यें नसतें तर ' अटक ' म्हणजे

G. 6394

आपल्या देशाची अंतिम सीमा मानण्याची चाल इतकी सर्वव्यापि झाली नसती व इतकी दीर्घकाल टिकलीहि नसती. ही जी चाल इतक्या भक्तीनें व चिकाटीनें राजापासून रंकापर्यंत आपल्या लाखों लोकांनीं पाळली यावरूनच असें सबळ पुराव्यानें सिद्ध होतें कीं, पुराण सिंधुनदीच्या प्रवाहाच्या अनुरोधानें आपल्या देशाची मर्यादा ठरविण्याची, व त्याच नांवाशीं संगत असलेलें 'सिंधुस्थान' हें नांव मान्य करण्याची आज्ञा अशा एका बादशाही फर्मानावरून निघाली होती; आणि ह्या बादशाही संमतीला व लोकांच्या इच्छेला अत्यंत पवित्र असें धार्मिक अनुमोदन मिळाल्यानेंच आपलें पूर्वीचें नांव अखेर यशस्वी रीतीनें पुनः प्रस्थापित झालें. आतां हें खरें आहे कीं, तरीहि हे ' सिंधु ' व ' सिंधुस्थान ' हे शब्द पूर्णपणें यथार्थत्वानें पूर्वस्वरूपांत स्थिर होण्यास अनेक शतकें उलटावीं लागलीं व अनेक महत्त्वाचीं स्थित्यंतरें घडून आलीं. आणि मग आपल्या सर्व राष्ट्राच्या मनामध्यें बिंबून जाण्याला आणि आपल्या जातीचा तो अमोल ठेवा आहे असें वाटविण्याला तीं नांवें समर्थ झालीं. परंतु, अखेर हीं वैदिककाळचीं नांवें पुनः प्रस्थापित केलीं गेलीं व आज आपल्या हजारों लोकांना जरी ' आर्यावर्त ' किंवा ' भारतवर्ष ' म्हणजे काय हें माहित नसलें तरी एखादा रस्त्यांतील मनुष्यहि ' हिंदु ' आणि ' हिंदुस्थान ' हीं नांवें स्वतःच्या नांवाप्रमाणेंच ओळखूं शकेल. *

* वर उद्धृत केलेले भविष्य पुराणांतील श्लोक, त्यांच्या मुख्य मथितार्थाच्या बाबतींत अगदीं विश्वासार्ह आहेत; कारण कीं, कोणत्याहि तारखा अथवा वैयक्तिक वंशावली यांच्यापेक्षां सहज अधिक कालपर्यंत स्मरणांत राहणाऱ्या गोष्टीच त्यांमध्यें ग्रथन केल्या आहेत. दुसरें असें कीं, तें सोडूनहि जरी आपण वर्णन केलेल्या इतिहासाच्या ओघांकडे पाहिलें तरी असें दिसून येतें कीं, अशी कांहीं तरी परिस्थिति त्या वेळीं होती. तिसरें, आमच्या प्रस्तुतच्या विवेचनाला अमक्या एखाद्या बादशाही फर्मानाची नक्की तारीख किंवा तें फर्मान काढणाऱ्या राजाचेंहि नांव बिनचूक कळण्याची जरूरी नाहीं. चवथें, या पुराणाचा कर्ता सर्व जें लिहितों आहे तें कांहीं अर्धवटपणानें अथवा जें त्याला अगदींच अपरिचित आहे अशा रीतीनें लिहित नाहीं. कारण, विक्रमादित्याच्या घराण्याची वंशावळ जी त्यानें एका ठिकाणीं दिली आहे, तीच पुनः दुसऱ्या ठिकाणीं देतांना अगदीं तशीच दिली आहे. ज्या लेखकाला एखाद्या घराण्याची वंशावळ पूर्णपणें माहित आहे, त्याच लेखकाला त्या घराण्यांतील प्रख्यात राजांच्या निदान प्रमुख गोष्टी तरी माहित असण्याचाहि संभव आहे.



परंतु, या नामाभिधानाच्या इतिहासामध्यें यापुढें कोणकोणतीं स्थित्यंतरें घडून आलीं त्याचें विवेचन करण्याच्या आधीं, आमच्या मनाच्या सांत्वनार्थ आम्हाला एका क्षमेची याचना कर्तव्य आहे. विवेचनाचा हा भाग लिहित असतांना आम्हीं आमच्याच मनोवृत्ति दुखविल्या आहेत. आणि म्हणून आम्ही क्षणाचाहि विलंब न करतां हें सांगून टाकतों कीं, हिंदुस्थानामध्यें बुद्धधर्माचा जो ऱ्हास झाला त्याची राजकीय आवश्यकतेची मीमांसा करतांना आमच्या लेखणींतून जे थोडेसे कठोर शब्द निघाले, त्यांवरून कोणीहि असें लवमात्र मानूं नये कीं, आमच्या मनांत बौद्धधर्माबद्दल कांहीं मोठासा आदर नाहीं ! छे, छे ! खुद्द बौद्धधर्माची दीक्षा घेणाऱ्या भक्ताच्या मनांत, अखिल जगांत जो पवित्रतम संघ आहे त्या बौद्धसंघाबद्दल जो आदर आणि जें प्रेम असेल तेंच प्रेम आणि तोच आदर बाळगणारा बौद्धधर्माचा मी एक नम्र चाहता आहें. बौद्धधर्माची दीक्षा मीं घेतली नाहीं याचें कारण, हा संघ माझ्या योग्यतेचा नाहीं

एकंदरींत ज्या राष्ट्रीय दंतकथा आपल्या लोकांच्या स्मरणांत होत्या किंवा पूर्वकालीन पुराण, काव्य आणि वाङ्मय यांमध्यें ग्रथित करून ठेवल्या होत्या, त्याच आपल्या इतिहासाचीं प्रमुख साधनें होत्या व तशा त्या असल्याहि पाहिजेत. त्याच्यामधील पृथक् गोष्टीबद्दल शंका असूं शकतील; त्यांतील तारखा सिद्ध करून चुकीच्या ठरल्यास अविश्वसनीय होतील; परंतु केवळ इथें कांहीं असंबद्ध वर्णन आहे, किंवा तेथें कांहीं अद्भुत अतिशयोक्ति आहे, एवढ्याच कारणानें कांहीं त्या सर्वस्वीं त्याज्य ठरणार नाहींत; कारण, हे असे अतिशयोक्तीचे आणि असंबद्धतेचे प्रकार आपणाला मनुष्यजातीनें लिहिलेल्या प्रत्येक लिखितांत आढळून येतील. आणि त्यांतहि, जेव्हां वर्णन केलेल्या गोष्टींमध्यें कांहीं अशक्यता किंवा निसर्गविरुद्ध प्रकार नसेल तेव्हां, किंवा जेव्हां इतर पुराव्यावरून निःसंदेहानें ज्या गोष्टींची सत्यता सिद्ध झाली असेल अशा कोणत्याहि गोष्टींशीं विसंगत नसलेल्या ह्या कथा असतील, तेव्हां तर त्या मुळीच त्याज्य मानतां येणार नाहींत. कोणत्या तरी परकीय ग्रंथकाराच्या पुराव्यानें सिद्ध झाली नाहीं तोंपर्यंत कोणतीहि पुराणांतील गोष्ट खरीच मानावयाची नाहीं ही प्रवृत्ति अत्यंत विवेकशून्यतेचें लक्षण आहे. यापेक्षां अधिक शहाणपणाची पद्धति म्हणजे आपल्या ग्रंथांवर विश्वास ठेवावयाचा-विशेषतः जेथें सर्वसाधारण कथा आणि गोष्टी सांगितल्या असतील-व जर त्याच्याविरुद्ध अधिक विश्वसनीय व कमी संशयास्पद असा एखादा पुरावा आढळला असेल तर-आणि आपलें कोणाला तरी हें कल्पनातरंगांत ' अशक्य ' असें वाटलें म्हणून नव्हे-मग त्या त्याज्य समजाव्या. या भविष्यपुराणाचीच

असें नव्हे, तर मी त्या संघाच्या पवित्र मंदिरांत पदार्पण करण्याला पात्र नाहीं हें होय-आणि हें मंदिर आज जें अनंत कालपर्यंत टिकलें आहे तें त्याचा पाया-खडकाच्या पायावर उभारलेल्या अचिरस्थायी मोठमोठ्या राजवाड्यांच्या पाया-प्रमाणें घातला नसून तत्त्वांच्या भक्कम पायावर तें रचलें गेलें आहे म्हणून होय. मनुष्याला त्याच्या पाशवी प्रवृत्तींपासून परावृत्त करण्याचा प्रथमचा आणि अत्यंत यशस्वी असा प्रयत्न, प्रथम संकल्पित करून त्यास मूर्तस्वरूप देऊन, शतकेंच्या शतकें तो अव्याहत ज्यांनीं चालू ठेवला अशा तेजस्वी धर्मोपदेशकांची मालिका-अर्हत् भिक्षु यांची परंपरा-याच हिंदुस्थानामध्यें जन्माला आली होती. येथेंच त्यांनीं जीवनदुग्ध प्राशन केलें आणि याच भूमीला मातृभूमि म्हणून वंदन केलें. या सर्व गोष्टींची जाणीव आमच्या अंतःकरणांत उत्पन्न होऊन शब्दांनीं वर्णन न करतां येण्यासारख्या भावना दाटून येतात, आणि या संघाबद्दल जर आमच्या अशा मनोवृत्ति आहेत, तर मग तो संघ ज्यांनीं प्रस्थापित केला त्या संस्थापकांबद्दल-त्या बुद्धाबद्दल-त्या ज्ञानदीप्ताबद्दल आम्ही कोणत्या भाषेंत आमच्या मनोवृत्ति दिग्दर्शित करूं ? हे तथागत ! सर्व मनुष्यजातींतला मी हीन दीन, केवळ माझी नितान्त रिक्तता व माझें नितान्त अज्ञान यांचाच अहेर -

---

गोष्ट घ्या. याच्यामध्यें कांहीं असंबद्ध व अविश्वसनीयहि गोष्टी आहेत म्हणूनच तें सर्व अविश्वसनीय मानावयाचें काय ? आणि प्ल्यूटार्क तरी यापासून अलिप्त आहे का ? शिकंदराच्या जन्माबद्दल कांहीं अद्भुत वर्णनें केलीं आहेत म्हणून प्रत्यक्ष शिकंदराचें अस्तित्वच आपण नाकबूल करावयाचें का ? उदाहरणार्थ खालील कविता संशयित आहे असें मानणें योग्य होईल का ?-' चंद्रगुप्तस्तस्य सुतः पौरस्याधिपतेः सुताम् । सुलवस्य तथोद्वाह्य यावनीं बौद्धतत्परः ॥ ' उलट पक्षीं ह्या पुराणांचें व महाकाव्यांचें आपण एक मोठें ऋण लागतों आहों. कारण, ज्या क्रांतीनें पृथ्वीच्या इतर भागांमध्यें सबंध राष्ट्रेंच्याराष्ट्रें व अनेक संस्कृति ही पार समूळ खणून काढलीं, त्या क्रांतीमध्यें त्यांनीं आपला पुरातन काळचा वंश इतिहास जतन करून ठेवला. कारण, आपलीं हीं जुनीं व देशभक्तिपूर्ण पुराणें व इतिहास हे, अगदीं नवीन व अगदीं आजपर्यंतची माहिती लिहून ठेवलेल्या कांहीं पाश्चात्य पुराणांपेक्षां खात्रीनें अधिक विश्वसनीय आहेत. कारण, अशा कांहीं पाश्चात्य पुराणांपैकीं एका पुराणांत अशी विश्वसनीय माहिती दिली आहे कीं, रामायणामध्यें विजयानगरच्या स्थापनेचें वर्णन आहे ! व दुसऱ्या एका पुराणा मध्यें असें कथन केलें आहे कीं, गौतम-बुद्ध-म्हणजे केवळ एक सूर्य अथवा प्रभात यांच्यावरचें रूपक आहे ! !



चालून तुझ्याकडे येतों. जरी आपल्या बोधाचा सारांश मला आकलन करतां येत नाहीं असें मला वाटतें, तरी मला ही पूर्ण खात्री आहे कीं, तें तसें होणेंच स्वाभाविक आहे. कारण आपला उपदेश हा देवलोकींच्या वाणींतून निसृत झाला आहे; परंतु माझीं श्रवणेंद्रियें आणि माझी आकलनशक्ति ही ह्या ऐहिक प्रत्यक्ष प्रमाणमय जगाचा शब्दघोष ऐकण्यास शिकली आहे. भगवन्, कदाचित्, असेंहि असेल कीं, आपलें पदार्पण या जगामध्यें फार लवकर झालें आणि ज्या वेळीं हें सर्व जग अगदीं बाल्यावस्थेंत होतें व प्रकाश नुकताच कुठें फांकूं लागला होता, तेव्हां आपण आपलें निशाण फडकाविलें ! म्हणून, ह्या जगाला आपल्या भरारी-बरोबर चालतां येत नाहीं व आपल्या दैदीप्यमान निशाणाकडे दृष्टि लावतां लावतांच ती अंधुक होऊन दिपून जाते ! जोंपर्यंत उत्क्रान्तितत्त्वानें घालून दिलेला कायदा 'चलानामचला भक्ष्या दंष्ट्रणामप्यदंष्ट्रणः । अहस्तानां सहस्ताश्च शूराणां चैव भीरवः ॥ ( मनु )-हा अतीत अप्रतिहार्यतेनें व भयंकर प्रामुख्यानें जगांत वावरत आहे व याचा इनकार सत्याच्या कायद्यानें-कीं जे सत्याचे कायदे अत्यंत तेजस्वीपणानें व मोहकतेनें चकासित झाले आहेत-पण केवळ आकाशांत ज्याप्रमाणें चांदण्या चमकाव्या त्याप्रमाणें अत्यंत अंतरावरूनच चमकत आहेत-अशा कायद्यानें होऊं शकत नाहीं-तोंपर्यंत राष्ट्रीयत्वाच्या भावना विश्वबंधुत्वाचें निशाण फडकविण्याचें नाकारीतच रहातील. आणि तरीहि आमचे देव आणि देवता यांच्या पूजनांनीं सन्मानित झालेलें हेंच राष्ट्रीय निशाण, जर तो शाक्य-सिंह त्याखालीं नसता तर, जरा हतप्रभच दिसलें असतें. ज्याप्रमाणें श्रीराम किंवा श्रीकृष्ण अथवा महावीर हे आमचे आहेत, त्याचप्रमाणें, भगवन्, आपणहि आमचेच आहांत; आणि ज्याप्रमाणें आपले शब्द हे आमच्या राष्ट्रीय आत्म्याचेच बोल होत, त्याचप्रमाणें आपल्याला दिसणारीं दृश्यें हीं आमच्या जातीचीं सुखस्वप्नें आहेत. आणि जर कधीं सत्याच्या तत्त्वाचा विजय होऊन सर्व मानवी जात तें शिरोधार्य करूं लागली तर, हे भगवन्, आपणाला असें आढळून येईल कीं, ज्या भूमीनें आपल्याला पाळण्यांत खेळविलें, ज्या जातीनें आपलें लालनपालन केलें, तीच भूमि आणि तीच जाति, ह्या तत्त्वाचा जगभर पुरस्कार होण्यास प्रामुख्यानें कारण झालेली आहे. प्रत्यक्ष आपल्याला जन्म देणें या गोष्टीनेंच केवळ हें सिद्ध होत नसलेंच तर त्या गोष्टीनें तें सिद्ध होईल.

## ४

आतांपर्यंत आपण 'सिंधु' हा शब्द कसा बनत गेला हें मुख्यतः
संस्कृतग्रंथांच्या आधारें पाहिलें. आणि जेथें वर्धमान् होणाऱ्या हिंदी
राष्ट्राच्या कल्पनेला 'सिंधुस्थान' हेंच नांव इतर प्रचारांत आलेल्या सर्व शब्दांपैकी
अधिक सार्थ असें वाटलें, तेथें आपण आपल्या विवेचनाचा धागा अर्धाच
सोडला होता. कोणत्याहि तऱ्हेच्या विशिष्ट एकांगी आणि कोत्या दृष्टीचा
अर्थबोध-जसा अर्थबोध 'आर्यावर्त' या शब्दांतून निघूं शकतो-या 'सिंधुस्थान'
या शब्दामधून निघूं नये म्हणून या शब्दाच्या व्याख्येंत कोणत्याहि तऱ्हेच्या
विवाक्षित संस्थेचा अथवा पक्षाचा संबंध न येईल अशाच रीतीनें खबरदारी
घेतली आहे. उदाहरणार्थ, आर्यावर्ताची एका ग्रंथांतील व्याख्या अशी आहे
'चातुर्वर्ण्यव्यवस्थानं यस्मिन्देशे न विद्यते । तं म्लेंछदेशं जानीयादार्यावर्तस्तत
परम् ॥' ही व्याख्या जरी युक्त असली तरी चिरस्थायी नाहीं. कोणती
संस्था ही समाजाकरितां असते, समाज किंवा त्यांचें ध्येय हीं कांहीं संस्थेकरित
नसतात. 'चातुर्वर्ण्यसंस्था' हिचें जें इच्छितकार्य तें कार्य संपल्यावर किंवा
कार्य तिच्या हातून पुढें न होऊं लागल्यावर बंद पडेल; परंतु, तेवढ्यानें आपल
देश 'म्लेंच्छदेश'-परकीयांचा देश-होईल काय ?-संन्यासी, आर्यसमाजी
शिख आणि इतरहि पुष्कळ पंथ चातुर्वर्ण्यव्यवस्था मान्य करीत नाहींत, म्हण
काय ते परकीय झाले ? छे, छे ! ते रक्ताच्या, वंशाच्या, देशाच्या व देवाच
बंधनांनीं आमचे आहेत. 'तं वर्षं भारतं नाम भारती यंत्र संततिः' ही व्याख्
शंभर पटीनें अधिक चांगली. आपण सर्व हिंदु एकच आहोंत, एकराष्ट्र आहोंत
कारण आपलें एकच रक्त आहे-'भारती संततिः'

बुद्धधर्माच्या या उदयास्ताच्या आपल्या ऐतिहासिक कालांत, एकसमयावच्छे
करून हिंदुस्थानामधील देशी भाषांचा विलक्षण प्रसार व विस्तार झाला;
संस्कृत भाषा ही फक्त विद्वान् लोकांच्या परंपरेंतच किल्लेकोटाप्रमाणें बंद झा
ती इतक्या दुर्बलतेनें कीं, कोणताहि नवा विचार किंवा नवें नामाभिधान
सर्वमान्य होण्याच्या आधीं त्याचें संस्कृतमध्यें भाषांतर करावें लागत असे. त्याम
साहाजिकच नेहमींचा व्यवहार व राष्ट्रीय आणि सामाजिक घडामोडी
हळूहळू प्राकृत भाषेंतच आविष्करण होऊं लागलें; त्यामुळें प्राकृत भाष



लोकांच्या सजीव आणि उसळणाऱ्या विचारांना, नित्य नवीन तऱ्हेनें, जोमदार-
पणानें व अचूक रीतीनें मूर्तस्वरूप देण्याला अधिकाधिक समर्थ बनली. याचा
परिणाम असा झाला कीं, 'सिंधु' आणि 'सिंधुस्थान' हे शब्द जरी कांहीं
वेळां संस्कृत ग्रंथांत सांपडतात, तरी संस्कृतमध्यें लिहिणारे विद्वान लोक, त्या
वेळच्या भाषागांभीर्याच्या कल्पनेप्रमाणें आपल्या देशाला 'भारत' हेंच नांव
प्रामुख्यानें देऊं लागले. इकडे सर्व प्राकृत भाषांमधून बहुधा एकमेवाद्वितीय
रीतीनें अधिक लोकप्रिय व सजीव अशा 'हिंदुस्थान' याच नांवाला लोक
पूर्वीच्या अत्यंत प्रिय असलेल्या 'भारत' किंवा 'आर्यावर्त' या नांवापेक्षां
अधिक चिकटून राहिले. संस्कृत मधला 'स' हा हिंदी प्राकृत भाषांमधून
अथवा परकीय भाषांमधून 'ह' कसा होतो याच्याबद्दलचें पुनर्विवेचन कर-
ण्याची येथें जरूरी नाहीं. त्यामुळें प्रचारांत असलेल्या सर्व देशी भाषांमधून
'हिंदुस्थान' व 'हिंदु' या नांवांचे भरपूर उल्लेख सांपडतात. संस्कृत भाषा ही
चिरकालपर्यंत आमच्या जातीचा एक अमूल्य ठेवा म्हणून कायम राहील. कारण
आमच्या लोकांचें मूलभूत ऐक्य, तिच्यायोगें भक्कम पायावर उभारलें गेलें;
आमचें आयुष्य तिनें संपन्न केलें, आमच्या आकांक्षा तिनें उदात्त बनाविल्या
आणि आमच्या जीवनाचा झरा पुण्यमय ठेविला. हें जरी सर्व खरें आहे,
तरी पण आपल्या लोकांच्या जिवंत आणि व्यवहारामध्यें बोलल्या जाणाऱ्या
भाषेचें स्थान मात्र प्राकृत भाषेनेंच पटकाविलें. ही प्राकृत भाषा म्हणजे संस्कृत-
भाषेची सर्वांत वडील मुलगी, जिला अत्यंत अन्वर्थक रीतीनें 'हिंदी' अथवा
'हिंदुस्थानी' असें नांव प्राप्त झालें, ती होय. ही 'हिंदी' म्हणजे पूर्वींचे 'सिंधु'
अथवा 'हिंदु' यांच्या वाङ्मयाचे व राष्ट्रीयपणाचे जे वंशज त्यांची भाषा होय.
हिंदी ही सर्वस्वीं 'हिंदुस्थान' अथवा 'सिंधुस्थान' ची भाषा होय. 'हिंदु-
स्थानी'ला राष्ट्रीय भाषेच्या दर्जावर बसविण्याचा प्रयत्न कांहीं नवा अथवा
[illegible]कून केलेला आहे असें नाहीं. हिंदुस्थानामध्यें ब्रिटीश लोकांचें राज्य
स्थापन होण्याच्याहि पूर्वीं कित्येक शतकें ह्याच भाषेच्याद्वारें संबंध हिंदुस्थान-
भर व्यवहार चालत होता. रामेश्वराहून निघणारा व हरिद्वारपर्यंत जाणारा
एखादा साधु किंवा व्यापारी याच भाषेनें आपलें मनोगत सर्व हिंदुस्थानमध्यें
[illegible] करून देत असे. संस्कृताच्या द्वारें पंडितांच्या व राजेलोकांच्या सभांमध्यें
[illegible] होत असेल; परंतु हिंदुस्थानीच्याद्वारें मात्र राजसभेपासून तों बाजारापर्यंत
सर्व ठिकाणी अप्रतिहत संचार चालत असे. एखादा नानक, एखादा चैतन्य,

एखादा रामदास यांना या भाषेच्या योगानें सर्व देशभर आपल्या प्रांताप्रमाणेंच मोकळेपणानें शिक्षण देत आणि उपदेश करीत संचार करतां येत होता व त्यांनीं त्याप्रमाणें तो केलाहि. ह्या आपल्या स्वाभाविकरीत्याच असलेल्या राष्ट्रीय भाषेची वाढ आणि विस्तार हीं आपलीं पुरातन जीं ' सिंधुस्थान ' अथवा ' सिंधु ' आणि ' हिंदुस्थान ' अथवा ' हिंदु ' हीं नांवें यांच्या पुनरुद्धाराशीं समकालीन झालीं. व त्याचा क्रमप्राप्त परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानची ही राष्ट्रीय भाषा सर्वांच्याच मालकीची असल्यामुळें तिचेंहि नांव ' हिंदुस्थानी ' अथवा ' हिंदी ' असें पडलें.

' हूण ' आणि ' शक ' लोकांना आपल्या पराक्रमानें हुसकून दिल्यावर ' सिंधुस्थाना 'ला पुनः एकदा अनेक शतकेंपर्यंत अविचलित स्वातंत्र्य प्राप्त झालें व त्यायोगानें ही भूमि पुनः एकदां शांतता आणि समृद्धि यांचें निवासस्थान बनली. स्वातंत्र्याचीं सर्व सुखें राजापासून रंकांपर्यंत सर्वांना मुक्तपणानें मिळूं लागलीं. या स्वातंत्र्याच्या जवळजवळ एक हजार वर्षांच्या चिरकालामध्यें जें वैभव व जो गौरव एकसारखा होत होता, त्याबद्दल त्या वेळच्या देशभक्त लेखकांनीं हर्षनिर्भरतेने अनेक वर्णनें केलीं आहेत. ' ग्रामे ग्रामे स्थितो देवः देशे देशे स्थितो मखः । गेहे गेहे स्थितं द्रव्यं धर्मश्चैव जने जने ॥ ' ( भविष्यपुराण, प्रतिसर्ग पर्व ). सिंहल देशापासून तों काश्मीरपर्यंत एका रजपूतांचींच घराणीं राज्य करीत होतीं; व पुष्कळ वेळां लग्नसंबंधानें त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध जमत व त्याच्याहिपेक्षां शौर्याच्या व एकाच संस्कृतीच्या पूर्वपरंपरेनें ते एकमेकांशीं अधिक संबद्ध होत. सर्व राष्ट्राचें जीवनयापन हें उदार आणि उदात्त अशा एकतानेंरीतीनें होत होतें; आणि ही राष्ट्रीय भाषेची वाढ, त्याच अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय जीवनैक्याचें बाह्य निदर्शन होतें.

परंतु, वारंवार इतिहासामध्यें दिसून येतें त्याप्रमाणें हीच अबाधित शांति आणि समृद्धि, आपल्या ' सिंधुस्थाना 'ला खोट्या सुरक्षितपणाच्या खात्रीनें आणि केवळ स्वप्नसृष्टीमध्यें विहार करण्याच्या संवयीनें गाफील करून ठेवती झाली. अखेर ज्या दिवशीं गझनीच्या महंमुदानें सिंधुस्थानची सरहद्द जी सिंधुनदी ती ओलांडून, सिंधुस्थानवर स्वारी केली त्यादिवशीं ही मूढ झोंप मोडली जाऊन सिंधुस्थान खडबडून जागा झाला. त्या दिवसापासून भीषण असा जीवन-संग्राम सुरू झाला. परकीयांशीं जमलेल्या झगड्यावांचून दुसरी कोणतीहि गो



आत्मीयतेची जाणीव इतकी तीव्र करूं शकत नाहीं. अनेक प्रकारच्या लोकांमध्यें ऐक्य घडवून त्यांची एका राष्ट्रांत व अनेक राष्ट्रांचीं एकाच शासनसंस्थेंत संक्रांति करण्याचें काम, समान शत्रूच्या चढाईइतकें दुसरें कशानेंहि होत नाहीं. द्वेष हा ज्याप्रमाणें फूट पाडतो त्याचप्रमाणें संधिहि घडवून आणतो. त्या भयंकर दिवशीं तो प्रसिद्ध मूर्तिभंजक सिंधुनदी उरून अलीकडे आला, त्या वेळेइतकी हिंदुस्थानाला एकजीव होण्याला दुसरी कोणतीहि अधिक परिणामकारी व बलवत्तर संधि प्राप्त झाली नाहीं. मुसलमानलोक याच्याहि आधीं कासीमच्या आधिपत्याखालीं सिंधुनद उतरले होते; परंतु तो घाव केवळ वरचा व ओझरता लागला होता. कारण हिंदुस्थानच्या हृदयावर कांहीं घाव बसला नव्हता व घावाचा रोखहि कांहीं हृदयावर नव्हता. खरा झगडा महंमदापासून हटातानें सुरू झाला व तो अखेर–असें म्हणावयास कांहीं हरकत आहे का? कीं–अबदालीबरोबर संपला. वर्षापाठीमागून वर्षें, तपापाठीमागून तपें, शतकांपाठीमागून शतकें हा लढा चालू होता. अरबस्थानांतला पूर्वीचा अरबस्थानपणा सर्व निघून गेला. इराण उध्वस्त झाला. इजिप्त, सिरिया, अफगाणिस्थान, बलुचिस्थान, तार्तरी,–थेट ग्रानडापासून तों गझनीपर्यंत राष्ट्रेंच्या राष्ट्रें व अनेक तऱ्हेच्या संस्कृति इस्लामच्या–शांततेच्या!!–तरवारीपुढें चक्काचूर होऊन गेल्या! परंतु हिंदुस्थानांत मात्र प्रथमच हा चमत्कार घडला, कीं इस्लामच्या तरवारीला आघात करण्यांतच फक्त यश आलें–परंतु तो आघात सर्वनाश मात्र करूं शकला नाहीं. प्रत्येक आघाताबरोबर ही समशेर अधिकाधिक बोथट होऊं लागली. प्रत्येक वेळेला हिचा घाव खोल गेला, परंतु प्रत्येक वेळेला घावांतून बाहेर येऊन पुनरपि घाव करण्याकरितां ही उचलली जातांच पूर्वीची जखम भरून आलेली आढळली. जित झालेल्यांचा चिवटपणा जेत्यांच्या चिवटपणापेक्षां अधिक चिवट ठरला. या उभयपक्षांमधील हें अंतर केवळ उग्र होतें इतकेंच नाहीं, परंतु तें भीषणतेनें असम होतें. ज्यांच्याशीं हिंदुस्थानाला झगडा करावा लागला तें कांहीं एक जाति, एक राष्ट्र, एक लोकसंघ असे नव्हते. तर जवळ जवळ सर्व आशिया खंडाशीं व नंतर मग लगेच सर्व युरोपखंडाशीं हिंदुस्थानाला झगडा करावा लागला. अरब लोक सिंध प्रांतांत शिरले, व त्यांना एकट्यांनाच यापेक्षां कांहीं अधिक करतां आलें नाहीं. लवकरच त्यांना स्वतःचें स्वातंत्र्यहि स्वतःच्या देशांत सुरक्षित ठेवतां आलें नाहीं, आणि पुढें तर एक जाति या दृष्टीनें त्यांचें नांवहि ऐकूं येईनासें झालें. परंतु,

इकडे हिंदुस्थानाला मात्र एकट्याला अरब, परशियन, पठाण, बलुची, तारतर, तुर्क, मोगल वगैरे जातींच्या, जगाला व्यापणाऱ्या प्रचंड झंझावातानें व्याप्त झालेल्या मानवी सहारा वाळवंटाशीं सारखा झगडा करावा लागला. धर्म ही एक प्रचंड प्रचोदक शक्ति आहे. त्याचप्रमाणें लूट करण्याची चटक हीहि एक अशीच शक्ति आहे. परंतु जेव्हां धर्मबुद्धि ही लुटीच्या लालसेनें चेतविली जाते, आणि लुटीची इच्छा ही धार्मिक बुद्धीला सखीप्रमाणें होते, त्या वेळीं या दोहोंच्या संमेलनानें जी एक प्रचोदकशक्ति उत्पन्न होते, तिला साम्य म्हणजे यांच्या मार्गांत जो मानवी संहार आणि उध्वस्तता पसरते तीच केवळ होय. ज्या दिवशीं महंमदानें प्रथम सिंधुनदी ओलांडली आणि हिंद भूमीवर स्वारी केली, त्या वेळीं ह्या अशा शक्ति एकत्रित होऊन जणुं स्वर्ग आणि नरक यांचा मिलाफ होऊन, त्यांच्या दुर्दमनीय प्रक्षुब्धतेपुढें निस्तब्ध हिंदभूमि चमकून गेली. दिवसांमागून दिवस, तपांमागून तपें, शतकांमागून शतकें, हें भीषणयुद्ध चाललें होतें, आणि हिंदुस्थाननें अगदीं एकाकी असतांहि नैतिक दृष्टीनें आणि लष्करी बाण्यानें हें युद्ध लढत ठेविलें होतें. ज्या वेळीं अकबर सिंहासनावर बसला, आणि दारासुकोहाचा जन्म झाला, त्या वेळीं या लढाईतला नैतिक विजय मिळाला. औरंगजेबानें नैतिक क्षेत्रांत झालेली ही पिछेहाट भरून काढण्याचा विश्वप्रयत्न केला, परंतु, त्यायोगें समरांगणांतसुद्धां त्याचा पराभव होण्यास मदत मात्र झाली. शेवटीं, भाऊनें मोंगलांच्या साम्राज्यसिंहासनावरच घणाचा घाव घातला व तें शतदीर्ण केलें. पानिपताचा दिवस उगवला. हिंदूंनीं ती लढाई गमावली—परंतु, तें मोठें युद्ध जिंकलें. यापुढें कोणाहि अफगाणाची दिल्लीमध्यें घुसण्याची छाती झाली नाहीं. उलट जें विजयी हिंदूंचें निशाण, आपल्या मराठ्यांनीं अटकपर्यंत नेलें होतें, तें शीख लोकांनीं स्वीकृत केलें व सिंधुनदीच्या पार नेऊन काबुल नदीच्या तीरास भिडविलें.

ह्या सतत चाललेल्या भीषण झगड्यामध्यें आपल्या लोकांना आपण हिंदु आहोंत याची प्रखर जाणीव झाली, आणि ते सर्व आपल्या इतिहासांत पूर्वी कधींहि झाले नव्हते इतके एकराष्ट्रीयत्त्वाच्या बंधनानें बद्ध झाले. हें आपण नेहमी ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, आतांपर्यंतचें सर्व विवेचन आम्ही सामान्यतः हिंदु संचालनाच्या सार्वत्रिक स्वरूपाबद्दल केलें, त्यांतील कोणत्याहि एका विवक्षित तत्त्वाबद्दल किंवा धार्मिक पंथाबद्दल नव्हे. सनातनी, सत्नामी, शिख, आर्य,



अनार्य, मराठे, मद्रासी, ब्राह्मण, पंचम या सर्वांनीं हिंदु म्हणूनच आपत्ति भोगल्या व हिंदु म्हणूनच विजयाचा वांटा घेतला. येथील शत्रु आणि मित्र दोघांनींहि आपल्या भूमीला व आपल्या लोकांना ‘ हिंदुस्थान ’ व ‘ हिंदु ’ हींच अभिधानें इतर सर्व वर्ज्य करून, कायम करण्याकरितां बरोबरीनें यत्न केले. ‘ आर्यावर्त ’ आणि ‘ दक्षिणापथ, ’ ‘ जंबुद्वीप ’ आणि ‘ भारतवर्ष ’ या नांवांपैकीं कोणतेंहि नांव, ‘ हिंदुस्थान ’ या नांवांत जो राजकीय आणि संस्कृतिनिदर्शक अर्थ भरलेला आहे, तो समावूं शकला नाहीं. सिंधुनदीच्या या बाजूला रहाणारे जे जे लोक, या सिंधूपासून त्या सिंधूपर्यंत—सिंधुनदापासून तों समुद्रापर्यंत पसरलेली जी भूमि तिला आपली जन्मभूमि मानीत होते, ते ते लोक—‘ हिंदुस्थान ’ या एकाच शब्दानें आपला प्रत्यक्ष उल्लेख होतो असें समजत होते. आमच्या शत्रूंनीं आमचा ‘ हिंदु ’ म्हणूनच द्वेष केला आणि त्यासरशीं निरनिराळ्या जनसमूहांचा व जातींचा, निरनिराळ्या मतांचा आणि पंथांचा मानवसमूह—जो अटकपासून कटकपर्यंत पसरला होता—एकदम जणूं काय एकच देहधाऱ्याप्रमाणें निवडून पडला. इ. स. १३०० पासून तों १८०० पर्यंत थेट काश्मीरपासून तों सीलोनपर्यंत व सिंधुपासून तों बंगालपर्यंत जे अनेक—कधीं सारखे तर कधीं परस्परसंबद्ध असे—निरनिराळे प्रसंग घडून आले, त्यांचें सविस्तर व यथातथ्य विवेचन करून, त्यांतून या सर्व अनेकत्त्वांतहि मूलभूत एकत्वाचा धागा कसा अनुस्यूत झाला होता या दृष्टीनें हिंदूंच्या चळवळींचा इतिहास आजपर्यंत कोणीहि लिहिला नाहीं. असो, जातां जातां, उल्लेख केल्यावांचून आम्हांस रहावत नाहीं. कारण, या सर्व चळवळींचा हेतु, हिंदुस्थानची धर्म आणि स्वातंत्र्य यांचें रक्षण करणें, आणि हिंदुत्त्वाच्या—केवळ ‘ हिंदुइझमचें ’च नव्हे—तर संस्कृतीचें ऐक्य आणि सार्वजनिक जीवित अखंड कायम ठेवणें हाच होता. आणि हें रक्षण करण्याकरितां रणांगणांवर शेंकडों लढाया लढाव्या लागल्या व अनेक राजकारणाचें डांवपेंच करावे लागले. हा एक ‘ हिंदुत्व ’ शब्द आपल्या सबंध राजकारणाच्या शरीराचा, जणुंकाय पाठीचा कणाच झाला होता. काश्मीरांतील ब्राह्मणांचें दुःख पाहून मलबारामधल्या नायर लोकांचें हृदय दुःखित होई. आपल्या भाटांनीं हिंदूंच्या पराभवांचीं शोकगीतें गाइलीं, आपल्यांतल्या कवींनी हिंदूंच्या पराक्रमांना स्फूर्त केलें, आपल्यांतील योद्धे हिंदूंच्या लढाया लढले, आपल्यांतील संतांनीं हिंदूंच्या प्रयत्नांना आशीर्वाद दिले, आपल्यांतील

मुत्सद्यांनीं हिंदूंचा भविष्यकाळ घडविला, आणि आपल्या मातांनीं हिंदूंच्या घावांवर अश्रु गाळले आणि त्यांच्या विजयाबद्दल हर्ष मानला.

या सर्व गोष्टींना आपल्या पूर्वजांच्या ग्रंथांतून आधार दाखवून त्या सिद्ध करावयास एक मोठा ग्रंथ लिहावा लागेल. परंतु, तूर्त हातामध्यें ज्या विषयाचें निरूपण घेतलें आहे त्यामध्यें हा प्रांत येत नसल्यानें, हें काम जरी अत्यंत मोहक असलें तरी तें येथें करतां येत नाहीं. आणि म्हणून आपल्या हिंदुजातीच्या अत्यंत प्रमुख अशा अधिकारी पुरुषांच्या लेखणींतून वा वाणींतून अत्यंत स्फूर्तिदायक असे कांहीं थोडेच निवडक उतारे देण्यावर समाधान मानावें लागत आहे.

हिंदी भाषेमध्यें आजपर्यंत जे ग्रंथ लिहिले गेले आहेत त्या जुन्या आणि नव्या ग्रंथांपैकीं चंदबरदाई या प्रसिद्ध भाट कवीनें केलेला 'पृथ्वीराज रासो' हा ग्रंथ, आतांपर्यंतच्या संशोधनाप्रमाणें, अत्यंत जुना व अधिकारयुक्त असा मानला गेला आहे. याच्या आधीं झालीं अशी फक्त एकच कविता प्रसिद्ध आहे. परंतु सुदैवाची व आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्या आपल्या उत्तर हिंदुस्थानी भाषेमधील अगदी पहिल्या रचल्या गेलेल्या कवितेमध्यें हिंदुस्थान हा शब्द देशभक्तीच्या ऊर्मीनें आणि स्वाभिमानी वृत्तीनें उपयोगांत आणलेला आहे. चंदबरदाईचा पिता जो वेन कवि तो पृथ्वीराजाच्या पित्याला-अजमीरच्या राजाला—उद्देशून पुढीलप्रमाणें म्हणतो:—

> अटल ठाट महिपाट, अटल तारागढथानं
> अटल नग्र अजमेर; अटल हिंदव अस्थानं
> अटल तेज परताप, अटल लंकागढ डंडिय
> अटल आप चहुवान, अटल भूमिजस मंडिय
> संभरी भूप सोमेसनृप, अटल छत्र ओपै सुसर
> कविराव वेन आसीस दे, अटल जगां रजेसकर.

चंदबरदाई हा हिंदी वाङ्मयांतील आदिकवि होय. ज्या वेळीं मुसलमान लोकांचा पाय पंजाबमध्येंसुद्धां रुजला नव्हता, तेव्हां अत्यंत मानधनवृत्तीच्या रजपूत लोकांना, आपल्या शत्रूंनीं शोधून काढलेलें, हीनपणाचें टोपण नांव खालीं मान घालून स्वीकृत करण्याचें, व तेंच आपलें राष्ट्रीय अभिमानाचें निदर्शक मानण्याचें कांहींच कारण नव्हतें. शहाबुद्दीनचा गर्व दलित करून



ज्या वेळीं त्याला हिंदूंनीं कसें कैद केलें व 'पुनः मी हिंदूभूमीकडे डोळा वर करून बघणार नाहीं' अशी शरणचिठी त्यानें दिल्यावर, उदारहृदयी पृथ्वीराजानें त्याला मुक्त करून कसें परत जाऊं दिलें याचें वर्णन करतांना चंदभाट म्हणतो:—

> "राखि पंचदिन साहि अदब आदर बहु किन्नौ.
> सुज हुसेन गाजी सुपूत हथ्थै ग्रहि दिन्नौ
> किय सलाम नितबार जाहु अपन्ने सुथानह
> मति हिंदुपर साहि सज्जि आऔ स्वस्थानह"

(पृ. रासो स. ९)

परंतु शहाबुद्दीन हा कांहीं हिंदूंचें हें औदार्य स्मरणारा इसम नव्हता. पुनः पुनः त्यानें मागचे उपकार विसरून जाऊन एखाद्या सर्पासारखा आपला फणा उभारावा व पुनः पुनः भयंकर समरकंदन सुरू व्हावें व त्यामुळें त्या स्वर्गीय विघ्नसंतोषाच्या-नारदाच्या-आनंदास पारावार उरूं नये.

> "जब हिंदुदल जोर हुअ छुट्टि मीरधर भ्रम
> असमय अरबस्तान चला करने उब्दसाक्रम"
> "जुरे हिंदु मीर, बंहे खग्ग तारं,
> मुखे मारमारं बहे सूरसारं
> हिंदु म्लेच्छ अधाइ धाइन.
> नंचि नारद युद्ध चायन!!"

परंतु, हिंदूंना नेस्त नाबूद करण्याचे शहाबुद्दीनानें जरी भगीरथ प्रयत्न केले, तरी शहाबुद्दीनाचा अखेर पराजय झाला व शहाबुद्दीनाला पज्जूनरायनें पुनरपि कैदी केलें ही विजयानंदाची वार्ता ऐकून दिल्लीनगर आनंदानें बेहोष होऊन गेलें, दिल्लीच्या नागरिकांनीं दिल्लीश्वर पृथ्वीराज यांचें अभिनंदन केलें—

> "आज भाग चहुआन घर।
> आज भाग हिंदवान॥
> इन जीवित दिल्लीश्वर।
> गंज न सक्कै आन॥"

आजपर्यंत ज्यानें अनेक वचनभंग केले होते त्याच शहाबुद्दीनानें पुनः एकदां गंभीरपणानें वचनें दिलीं व पुनः आपली सुटका करून घेतली, आणि पुनः एकदा व या वेळीं शेवटच्याच वेळेला, त्यानें हिंदुस्थानावर स्वारी केली–आणि एका दुष्ट धडकीसरशीं थेट दिल्लीच्या वेशीपर्यंत तो येऊन धडकला. 'हिंदपती' पृथ्वीराजानें घाईघाईनें आपलें लढाईचें सल्लागार मंडळ बोलाविलें. शहाबुद्दीनानें उन्मत्तपणानें लढाईचें आव्हान केलें; तें ऐकून सर्व सबळ व सामंत हे क्रुद्ध होऊन गेले. त्या वेळीं चामुंडराय यानें मुसलमान दूताला निरोप सांगितला कीं, तुझ्या शहाला त्यानें मागें येथील जी पदधूलि चाटली होती तिची आठवण दे व सांग कीं:—

'निर्लज्ज म्लेच्छ लजै नही। हम हिंदु लजवान्' ॥

शेवटचा तो घोर दिवस जवळ येऊन ठेपला व दोन्हीहि पक्षाला हें कळून चुकलें कीं, आतांचा प्रसंग निकराचा आहे. चंदबरदाईनें, ज्या वेळीं हम्मीर फितुर झाला, त्याच दिवशीं कुलस्वामिनी दुर्गादेवीला खालीलप्रमाणें अत्यंत सद्गद अंतः-करणानें व देशभक्तीच्या ऊर्मीनें करुण प्रार्थना केलीः—

" दुग्गे हिंदुराजान बंदीन आयं
जपै जाप जालधरं तूं सहायं
नमस्ते नमस्ते इ जालंधरानी
सुरं आसुरं नागपूजा प्रमानी. "

या महासमराचें भयंकर वृत्त निवेदन करून, अखेर पृथ्वीराजानें कशा चातुर्याच्या कटानें शहाबुद्दीनाला ठार केलें याचें रसभरित वर्णन देऊन, स्वातंत्र्य-रक्षणार्थ पतन पावलेल्या, हिंदूंच्या या सम्राटाला शेवटचें खालील करुणामय वंदन करून कवीनें आपलें काव्य पूर्ण केलें आहेः—

" धनि हिंदु प्रथिराज, जिने रजवट्ट उजारिय
धनि हिंदु प्रथिराज, बोल कालिमझ्झ उगारिय
धनि हिंदु प्रथिराज, जेन सुविहान ह संध्यो
बारबारह ग्रहिमुक्कि, अंतकाल सर बंध्यो "

रासो या सर्व ग्रंथामध्यें हें एक ध्यानांत ठेवण्यासारखें आहे, कीं जरी 'भारत' या शब्दाचा उपयोग 'महाभारत' या अर्थी केला, तरी 'भारतवर्ष'



या अर्थी क्वचितच केला आहे. जी ही गोष्ट आपल्या उत्तर हिंदुस्थानांतील प्राचीनतम हिंदी ग्रंथांत सांपडते, तीच गोष्ट अगदीं थेट हिंदुलोकांच्या पुनरुत्था-नाच्या कालांत व हिंदूंच्या मुक्ततेच्या समरयुद्धांतहि दिसून येते. या पुनरुत्था-नाच्या कालांचा मुख्य आचार्य, उपदेशक व तत्त्ववेत्ता जो रामदास यानें, आपल्या एका भविष्यदर्शी व गूढ काव्यवचनामध्यें त्यांना पडलेल्या एका स्वप्नासंबंधीं उल्लेख केला आहे व विजयभरानें, परंतु, कृतज्ञताबुद्धीनें हें पडलेलें स्वप्न बहु-तांशीं प्रचीतीला आल्याचें नमूद करून ठेवलेलें आहे.

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं, तें तें तैसेंचि होतसे
हिंडतां फिरतां गेलों, आनंदवनभूवनीं ॥ १ ॥
बुडाले सर्वही पापी, हिंदस्थान बळावलें
अभक्तांचा क्षयो झाला, आनंदवनभूवनीं ॥ २ ॥
कल्पांत मांडिला मोठा, म्लेच्छ दैत्य बुडावया
कैपक्ष घेतला देवीं, आनंदवनभूवनीं ॥ ३ ॥
येथून वाढला धर्म, राजधर्मासमागमें
संतोष मांडिला मोठा, आनंदवनभूवनीं ॥ ४ ॥
बुडाला औरंग्या पापी, म्लेन्छसंहार जाहला
मोडिलीं मांडिलीं छत्रें, आनंदवनभूवनीं ॥ ५ ॥
बोलणें वाउगें होतें, चालणें पाहिजे बरें
पुढें घडेल तें खरें, आनंदवनभूवनीं ॥ ६ ॥
उदंड जाहलें पाणी, स्नानसंध्या करावया
जपतप अनुष्ठानें, आनंदवनभूवनीं ॥ ७ ॥
स्मरलें लिहिलें आहे, बोलता चालता हरी
राम कर्ता राम भोक्ता, आनंदवनभूवनीं ॥ ८ ॥

भूषण या नांवाचा सर्व राष्ट्रीय भाटांमध्यें अग्रेसर असलेला असा एक भाट होता. ज्या वेळीं हिंदूंच्या पुनरुत्थानाप्रीत्यर्थ जिकडे तिकडे समर चाललें होतें, त्या वेळीं हा भाट सर्व देशभर, जेथें जेथें हिंदुत्वाकरितां झगडा चाललेला होता, तेथें तेथें जाऊन प्रत्येक 'हिंदवाना'ला या झगड्याकरितां उद्युक्त व उत्थित करीत होता. त्यानें औरंगजेबाला खालीलप्रमाणें आव्हान केलें:—

" लाज धरौ शिवजीसे लरौ सब सैयद सेख पठान पठायके ।
भूषन ह्यां गढकोटन हारे उहां तुग क्यों मठ तोरे रिसायके ॥
हिंदुनके पति सौंन विसात सतावन हिंदु गरीबन पायके ।
लींजै कलंक न दिल्लीके बालम आलम आलमगीर कहायके ॥

* * * * *

पुनः दुसऱ्या एका ठिकाणीं भूषण म्हणतोः—

" जगतमे जीते महावीर महाराजन ते
महाराज बावन हूं पातसाह लेवाने ।
पातसाह बावनौ दिल्लीके पातशाह दिल्लीपति
पातसाह जीसो हिंदुपति सेवाने "
" दाढीके रखैयन की दाढीसी[1] रहति छाति
बाढी जस मर्याद हद्द हिंदुवानेकी
कढि गयि रयतिके मनकी कसक मिट गयी
ठसक तमाम तुरकानेकी
भूषन भनत दिल्लीपति दिल धकधका सुनिसुनि
धाक सिवराज मरदानेकी
मोठी भयि चंडी बिन चोटीके चबाय सीस
खोटी भयि संपत्ति चकताके[2] घरानेकी ॥ "

शिवाजीनें जीं जीं महत्कृत्यें केलीं, त्याबद्दल भूषण कवि म्हणतोः—

राखी हिंदुवानी, हिंदुवानके तिलक राख्यो,
स्मृति और पुराण राख्यो, वेद विधी सुनि मैं
राखी रजपूती राजधानी राखी राजनकी,
धरामें धरम राख्यो राख्यो गुण गुणीमे
भूषण सुकविजीति हद्द मरहट्टनकी, देसदेस
करिति बखानि तव सुनि मैं
साहिके सुपूत सिवराज समसेर तेरी, दिल्लीदल
दाबिके, दिवाल[3] राखि दुनिमैं॥

१ जलींसी २ बाबरके घराणेकी. ३ देवालय.



शिवाजी व त्याच्या वेळच्या देशवीरांनीं जी अचाट कामगिरी केली ती अशा दृष्टीनें अखिल हिंदुस्थानामध्यें सर्व लोक पहात होते. भूषण हा जरी स्वतः मराठा नव्हता, तरीहि शिवाजीमहाराजांपासून तों बाजीरावापर्यंत प्रत्येक विजयी-वीराची स्वारी जणूं काय आपली स्वतःचीच स्वारी आहे अशा भावनेनें सर्वांना त्याबद्दल अभिमान वाटत असे. भूषण हा हिंदूंतला हिंदु होता व त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत हिंदु जातीच्या पुनरुत्थानाच्या चळवळीला तो आपल्या हृदयोद्दीपक काव्यांनीं सारखें प्रोत्साहन देत होता व आपल्यांतील अग्रेसर नेत्यांच्या मनावर ह्या चळवळींचें महत्त्व बिंबवीत होता. बुंदेलखंडचा प्रतापी छत्रसाल हा भूषण कवीचा दुसरा एक आवडता काव्यनायक होताः—

" हैवर[1] हरट्ट[2] साजि, गैवर,[3] गरट्ट[4] समपैदर थट्ट
फौज तुरकानकी
भूषण भनत रायचंपतिको छत्रसाल रोप्यो रनख्याल
व्हैके **ढाल हिंदवानेकी** "

आणि छत्रसालची केलेली ही स्तुति अन्यथा नव्हती. छत्रसाल हा खरोखरीच शिवाजी, राजसिंह, गुरुगोविंदसिंह यांच्याप्रमाणेंच ' ढाल हिंदवानेकी ' होता. भूषण कवि छत्रसालाकडे तो हिंदुत्त्वाचा एक पाठीराखा होता याच दृष्टीनें पाहत होता.

हिंदु तुरक दीन द्वै गाये । तिनसों बैर सदा चलि आये ॥
लेख्यो सुर असुरनको जैसो । केहरि करिन बखानो तैसो ॥
जबते शहा तखतपर बैठे । तब तै हिंदुन सौं उर डाठे ॥
सहगेकर तीरथनि लगाये । वेद देवाल निदर ढहाये ॥
सब रजपूत सीर नित नावै । ऐड करे नित पैदल धावे ॥
ऐड एक शिवराज निबाही । करै आपके चित्तकि चाही ॥
आठ पातसाही झुक झोरै । सूबनि बांधि डांड लै छोरै ॥

छत्रसालाची व शिवाजी महाराजांची जी ऐतिहासिक भेट झाली, त्या योगें छत्रसालाचा उत्साह शतगुणित झाला. ' तुम छत्री सिरताज । जीत आपनी भूमिकौ करौ देशको राज ॥ ' यानंतर त्यानें सुजानसिंह या बुंदेलखंडांतील

१ अश्व २ धष्टपुष्ट ३ गजवर ४ संघ.

प्रबल रजपूत सरदाराची गांठ घेतली. त्यांच्या संभाषणामध्यें सुजानसिंह यानें त्या वेळच्या राजकीय परिस्थितीचें मोठें हृदयवेधक वर्णन केलें आहे.

" पातसाह लागे करन, हिंदुधर्म कौनासु
सुधि करि चंपतरायकी, लइ बुंदेला सासू
जब तै चंपति करयौ पयानौ, तबतै परयौ हीन हिंदवानो.
लख्यो होग तुरकजको जोरा, को राखे हिंदुनको तोरा
अब जो तुम कटि कसौ कृपानी, तौ फिरि चढे हिंदुमुख पानी "

याप्रमाणें वर्णन करून त्या वृद्धराजा सुजानसिंहानें आपली तरवार व आपलें हृदय छत्रसालाला अर्पण केलें आणि त्याला व त्याच्या महत्कार्याला अंतःकरण-पूर्वक आशीर्वाद दिले.

यह कहि प्रीति हिये उमगाई । दिये पान किरवान बधाई
होऊ हाथ माथपर राखे । पू न करौ काज अभिलाखे ।
हिंदुधरम जग जाइ चलावौ । दौरि दिलीदल हलनि हलावो

( छत्रप्रकाश )

शीख लोकांचा महान् गुरु तेगबहादूर यांनीं पंजाबमध्यें केवळ या हिंदुमोच-नाच्या आंदोलनाला उत्तेजित केलें एवढेंच नव्हे तर त्याकरितां आपले प्राणहि अर्पण केले आणि असेंहि सांगतात कीं, ज्या वेळीं काश्मीरमधील ब्राह्मण लोकांवर जुलूम होऊं लागला आणि त्यांच्यावर 'मुसलमान व्हा, नाहीं तर मरा,' असा प्रसंग आला, त्या वेळीं त्यांनीं तेगबहादुराजवळ याचना केली तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं:—

तुम सुनो दिजेसु ढिग तुर्केसु अबैसु अबैसु इमगावो
इक पीर हमारा हिंदु भारा भाईचारा लख पावो
है तेगबहादुर जगत उजागर ता आगर तुर्क करो
तिसपाछे तबही हम फिर सबही बन है तुरक भरो

( पंथप्रकाश )

आणि ज्या वेळीं त्याला आपल्या जातीच्या व धर्माच्या शत्रूंनीं आव्हान केलें, त्या वेळीं त्यानें धीटपणें सांगितलें कीं,



" तिन ते सुन श्री तेगबहादुर । धर्म निवाहन विषे बहादुर
उत्तर भनयो धर्म हम हिंदु । अति प्रियको किमकरे निकंदु "

( सूर्यप्रकाश )

याचा त्रिभुवनविख्यात पुत्र गुरु गोविंदसिंग हा एकसमयावच्छेदेंकरून कवि, तत्त्ववेत्ता व आपल्या हिंदुजातीचा व हिंदुसंस्कृतीचा संरक्षक योद्धा होता. एकाच अंतःस्फूर्तीच्या क्षणांत तो गर्जून उठला कीं,

" सकल जगतमे खालसा पंथ गाजे
जगे धर्म हिंदु सकल भंड भाजे ॥

( गुरु गोविंदसिंहकृत विचित्र नाटक )

'शिवछत्रपतींचें चरित्र' या जुन्या पुस्तकांत शिवचरित्रकार म्हणतात—" शिवाजीच्या मनांत आलें जे आपण हिंदु सर्व दक्षिण देश यवनांनीं पादाक्रांत केला. क्षेत्रास पीडा केली. हिंदुधर्म बुडविला. प्राणही देऊन धर्म रक्षूं. आपले पराक्रमें नवीन दौलत संपादूं. तें अन्न भक्षूं. "

परंतु, धोरणी आणि विश्वासपात्र दादाजीनें त्यास सल्ला दिला—

" आपण म्हणतां तें कार्य चांगलें खरें, पण याचा शेवट लागणें परम दुष्कर. यास मातबर स्थलें असावीं. हिंदु राजे व हिंदु फौजा जागजागीं साह्यकर्त्या असाव्या. ईश्वराचें आनुकूल्य व सिद्ध पुरुषांचा आशिर्वाद असतां अशा गोष्टी घडतात. "

( चिटणीस बखर )

आणि तरीहि दादाजीनें ह्या सर्व आंदोलनाची सूत्रचालना केली. इ. सन १६४६ त आपल्या एका तरुण सहकारी देशभक्ताला तरुण शिवाजी लिहितोः—" शहास तुम्ही आपली बेमानगिरी करीत नाहीं. आदि कुलदेव स्वयंभू. त्यांनीं आम्हास यश दिलें व पुढें तो मनोरथ **हिन्दवी** स्वराज्य करून पुरविणार आहे. हें राज्य व्हावें हें श्रींचे मनांत फार आहे."

श्री. राजवाडे यांच्याजवळ या पत्राची मूळ प्रत आहे व त्यावरून जणुं कांय सतराव्या व अठराव्या शतकांतील हिंदूंच्या पुनरुज्जीवनाच्या आंदोलनाचें सर्व सारच कळून येतें. हें आंदोलन कांहीं उपाध्यायांनींच केलेलें नव्हतें हें आंदो-

लन ' हिंदवी स्वराज्य-हिंदूंचें साम्राज्य '-यांचें होतें. याच ध्येयानें, शिवाजी ज्या वेळीं केवळ बालवयाचा होता त्या वेळींच त्याच्या कल्पनेला चेतविलें व त्याच्या हातून महत्कृत्यें करविलीं. प्रत्यक्ष शिवाजीच्या तोंडूनच हें आपणांस कळतें.

परंतु, जेव्हां एक रजपूत सरदार जयसिंगच शिवाजीला जिंकण्याचा विडा उचलून आला, त्यावेळीं साहजिकच शिवाजीची प्रतिरोधक शक्ति पराङ्मुख बनली. पूर्वीची हिंदुत्वाची संरक्षक ढाल असलेले रजपूतच, ज्या वेळेला त्यांच्या सधर्मीय बंधूंचें रक्त आपल्या रक्ताबरोबरच सांडण्यास तयार झाले तेव्हां,-व हें सर्व कशाकरितां ? तर मुसलमानांनीं सुखानें राज्य करावें !-हा देखावा नितांत निरुत्साह करणारा होता. शिवाजी जयसिंगाला म्हणतोः—" तुम्हास जे किल्ले पाहिजेत ते मी देतों. निशाण चढवितों. पण मुसलमानांस यश न देणें. मी हिंदू. आपण रजपूत तेव्हां हिंदूच. राज्य मूळचें हिंदूंचें. हिंदुधर्मरक्षकापुढें मी डोकें शतदां नमवीन. पण हिंदुधर्माची मानहानी होईल असें कधींही घडणार नाहीं !!"

जयसिंगाचें हृदय, शिवाजीचे हे शब्द ऐकून निःसंशय हललें व त्यानें उत्तर केलें—" औरंगजेब बादशहा पृथ्वीपति. त्याशीं तुम्ही सख्य करावें. शत्रुत्वानें राहून या कालीं परिणाम लागणार नाहीं. आम्ही हिंदू जयपूरचे राजे. तुम्ही हिंदूच. तुम्ही हिंदुधर्म स्थापन करतां यास्तव आम्ही तुम्हास अनुकूल आहों."

शिवाजीच्या आधिपत्त्याखालीं हिंदुसत्तेचा उदय झाला हें पाहून सर्व हिंदुस्थानांतील प्रत्येक हिंदुहृदयास जणुं काय विजेचे धक्के बसले. शतकोशतकींच्या जुलमानें त्रस्त झालेल्यांना तो प्रत्यक्ष अवतारच-उद्धारकच-वाटला. सावनूर जिल्ह्यांतील मुसलमानांच्या जोखडाखालीं वांकून गेलेले लोक शिवाजीची खालील प्रमाणें करुणा भाकतातः—" हा युसुफ फार स्वस्त आहे. बायकापोरास उपद्रव देणें. जुलूम गोवधादि निंद्य कर्में आह्मी त्याचे हाताखालीं वागण्यास कंटाळलों. तुम्ही हिंदुधर्माचे संस्थापक. म्लेंच्छाचे नाशक. म्हणून तुम्हाकडे आलों. तुम्हाकडे आम्ही आलों म्हणून आमचे द्वारा चौकी बसली आहे. अन्नपाण्यावांचून जीव घेण्यास उद्युक्त झाले आहेत. तरी रात्रीचा दिवस करून येणें."

आपला भाऊ व्यंकोजी याला तंजावरची जहागीर परत देतांना शिवाजीनीं जी अट घातली ती अशी होती कीं, मुसलमानी सत्तेचें स्वामित्त्व त्यांनीं मानूं नये. शिवाजीनें त्याला लिहिलें ' दुष्ट हिंदुविद्वेषी यांस आपले राज्यांत ठेवूं नये.'



स्वातंत्र्याच्या युद्धामध्यें संताजी घोरपडे व त्याचे बंधु यांनीं जी राष्ट्रीय कामगिरी केली त्याच्याबद्दल त्यांचा गौरव करण्याकरितां राजाराम महाराजांनीं बहिरजी याला अत्यंत उच्च दर्जाची व अभिमानास्पद असलेली ' हिंदुराव ' अशी पदवी समर्पण केली. जेव्हां जिंजीच्या वेढ्यामध्यें मराठे सैन्य रेटलें जाऊं लागलें, त्या वेळीं त्या वेढ्यांतून निसटून जाण्याकरितां मोंगल सेनापतीच्या आधिपत्त्याखालीं असलेल्या मराठे सैनिकांचीं मनें वळविण्याचा एक प्रयत्न करण्यांत आला. "नागोजी राजे यांजकडे संधान केलें, तुम्ही आम्ही एक झाल्यास ही फौज मोडून हिंदुधर्म जतन करूं. त्यापक्षीं तुम्ही फुटून आम्हाकडे यावें." तेव्हां नागोजीराजे मुसलमानी नोकरी सोडून, मोर्चे उठवून, शहरांत ५००० फौजेनिशीं गेले......शिर्के हे मोगलांचे ताबेदार बनले ( कारण त्यांचें संभाजीनें शिरकाण केलें. ) तेव्हां खंडोबल्लाळ म्हणाले " तुमचें शिरकाण केलें तसेंच आमचेही तीन पुरुष हत्तीपायीं मारविले. परंतु **हिंदूंच्या दौलती**करितां आम्ही झटत आहोंत. तुम्ही तों भागी-आहां." तेव्हां शिर्के पण कारस्थानांत आले. व मराठ्यांस मिळून जिंजीहून राजाराम शत्रूच्या वेढ्यास तोडून सुटून गेले.

शाहुमहाराज हे एकदां सवाई जयसिंगाबरोबर ' हिंदुधर्माचे रक्षणासाठीं मी काय केलें व तूं काय केलेंस ?' अशा तऱ्हेचा वादविवाद करीत होते. बाजीराव व नानासाहेबांच्या वेळींहि ह्याच स्फूर्तीनें त्या वेळच्या पिढ्या उद्युक्त झाल्या होत्या एक इतिहासकार म्हणतोः—

" पुष्कळांनीं बाजीरावाच्याच उद्योगाचें अनुकरण व परिपोष केलेला दिसतो... ब्रह्मेंद्रस्वामी, गोविंद दीक्षित वगैरे वगैरे देशभर यात्रा करून अनुभव घेतलेल्या साधुपुरुषांच्या ठिकाणीं वरील ' **हिंदुपदपादशाहीची** ' भावना स्फुरण पावत होती व ते आपल्या सर्व शिष्यवर्गास याच भावनेनें उपदेशित होते." (सरदेसाई) बाजीराव स्वतः म्हणतातः—" अरे बघतां काय ? **चला जोरानें चाल करून. हिन्दुपदपादशाहीस आतां उशीर काय ?** " ( बाजीराव ).

त्या वेळच्या बुद्धिमान लोकांमध्यें ब्रह्मेंद्रस्वामी हे केंद्रस्थानीं होते. " परंतु हिंदुधर्माचा उच्छेद ज्या राज्यांत होतो त्यास भेटणें स्वामींस योग्य वाटलें नाहीं !......हिंदूंच्या साम्राज्यांत देवाब्राह्मणांचा छळ होणें ही गोष्ट लज्जास्पद आहे ही गोष्ट त्यानें शाहूच्या मनांत भरवून दिली." ( सरदेसाई )

मथुराबाई स्वामीस लिहितेः—" शंकराजी मोहिते, गणोजी शिंदे, खंडोजी नाळकर, रामाजी खराडे, कृष्णाजी मोड इत्यादि मातबर सरदारांनीं राज्य रक्षण करून शामलाचा मोड केला व कोकणांत हिंदुधर्म राखला ! "

मथुराबाई आंग्रे या शूर बाईनें त्यावेळीं लिहिलेलीं पत्रें हीं सर्व स्वदेशाभिमानाच्या उत्कटतेनें व जोमानें ओतप्रोत भरलेलीं आहेत. आणि ज्यांना ज्यांना म्हणून ह्या हिंदूंच्या पुनरुत्थानाच्या चळवळीचें मर्म जाणण्याची इच्छा आहे, त्यांनीं त्यांनीं हीं सर्व पत्रें एकदां अवश्य वाचावीं.

युरोपमध्यें जीं धार्मिक चौकशीचीं कोर्टें उघडलीं होतीं, त्याची हिंदुस्थानमधील नक्कल म्हणजे पोर्तुगीज लोकांनीं गोमांतकामध्यें दाखविलेलें धर्मवेड होय. एकदा त्यांनीं हिंदूंना सर्व धार्मिक नित्यनैमित्तिक आचार आचरण्याची बंदी केली. तेव्हां लोकहितदक्ष अंताजी रघुनाथ यानें हा हुकूम धाब्यावर बसविला व इतर हिंदूंनाहि तसें करण्यास प्रोत्साहन दिलें. परंतु, त्याला हें पक्कें माहीत होतें कीं, नेभळ्या शांततेचा प्रतिकार म्हणजे नेभळेपणाचेंच दुःख सोसणें होय. त्या वेळीं जी परिस्थिति होती, त्या परिस्थितीमध्यें यशस्वी व्हावयास, एखाद्या बाजीरावाच्या अथवा एखाद्या चिमणाजीच्या प्रखर तरवारीच्या सहाय्याची अवश्यकता होती. पोर्तुगीजांच्या हिंदी वसाहतीमध्यें क्रान्ति घडवून आणणारा हाच अंताजी होय. त्यानें बाजीरावाच्या बाजूला सर्व पुढाऱ्यांची सहानुभूति मिळविली, व त्यानेंच मुख्यतः ज्या मराठ्याच्या मोहिमेनें बहुतेक मराठा मुलुख पोर्तुगीजांच्या सत्तेंतून सोडवला, ती चिमणाजी आप्पाची मोहीम घडवून आणली.

परंतु, याच अवकाशांत व वसई पडण्याच्या पूर्वी, नादीरशहानें हिंदुस्थानवर स्वारी केली व दिल्ली त्याच्या हातांत पडली. मराठ्यांचे दूत बाजीरावास लिहितातः—" तहमास्पकुलीखान कांहीं देव नाहीं जो पृथ्वी कापून काढील. जबरदस्ताशीं मुलुख करील. म्हणून मातबर फौजेनिशीं यावें. **आधीं जबरदस्ती व मग मुलुख. आतां सारे रजपूत व स्वामी (बाजीराव) एकजागा झालिया निकाल पडेल.** समस्तास [ हिंदूंस ] बुंदेले वगैरे एक जागा करून मोठा भाव दाखविला पाहिजे. नादिरशहा माघारा जात नाहीं. **हिन्दुराज्यावरी निघेल**......रायांचे [ सवाई जयसिंग ] मनीं राणाजीस तख्तावर बसवावें असें आहे. **हिन्दुराजे सवाई आदिकरून**



**स्वामीचे स्वारीची मार्गप्रतीक्षा करतात.** स्वामीचें पुष्टिबल होतांच जाट वगैरे फौज दिल्लीवरी पाठवून सवाईजी आपण दिल्लीस जाणार. "

परंतु, वसई अजून पडली नव्हती व म्हणून बाजीरावाला वेळेवर तिकडे जातां आलें नाहीं. त्याच्या ह्या अडचणीमुळें तो अगदीं चिडून गेला होता. तो लिहितो—" हिंदुलोकांस संकट थोर प्राप्त झालें आहे. अद्याप वसई आली नाहीं...ऐशास तमाम मराठी फौजा एक होऊन चमेलीपार व्हावें. त्यास [ नादिरास ] अलीकडे येऊं देऊं नये असा विचार आहे. "

परंतु, त्याचें दुर्दान्त धैर्य ह्या सर्व अडचणींना पायांखालीं तुडवून अखेर अढळ राहिलें. लगेच तो लिहितोः—" आपलीं घरगुतीं भांडणें [ रघुजीचें पारिपत्य वगैरे ] बाजूला ठेवलीं पाहिजेत. **आतां सर्व हिंदुस्थानास एक शत्रु उत्पन्न झाला आहे.** मी तर सर्व नर्मदा उतरून सर्व मराठी सैन्य चंबळेपर्यंत पसरून देणार. मग पाहूं या नादिरशहा कसा खालीं येतो तो !" [बाजीरावाची पत्रें]

हिंदूंच्या पुनरुत्थानाच्या आंदोलनाचे जे जे पुढारी झाले, त्यांत सवाई जयसिंग हा इतर पुढाऱ्यांप्रमाणेंच हिंदुत्त्वाचा एक कट्टा अभिमानी पुढारी होता. शिवाजीच्या सर्व अनुयायांच्या अनेक पिढ्यांचें जें मुख्य ध्येय–हिंदुपदपादशाही–तीं सर्व हिंदुस्थानभर करण्याच्या कार्याला बाजीरावाची माळव्यावरची स्वारी, ही एक पुढची पायरी होती; व ही स्वारी हिंदूंच्या मोचनाकरितां माळव्यांत करावी अशी विनंति बाजीरावाला करण्यास तेथल्या पददलित झालेल्या हिंदूंस सवाई जयसिंगानेंच प्रेरणा केली. आपल्या एका पत्रांत हा सुविद्य व देशभक्त रजपूत राजा लिहितो· सिधिश्री............नंदलालजी प्रधान व भाइजी ठाकूर संस्थान इंदोर अमरगढसु महाराजाधिराज श्री सवाई जयसिंगजी कृत प्रमाण बंचजो......सो आपको लिखते है कि बादशहानें चढाई की है, तो कुछ चिंता नहीं. श्री परमात्मा पार लगावेगा. बाजीराव पेशवेसे हमने आपके निसबत कोलवचन करलिया. है. " " हजार शाबाश है आप सब मालवे सरदार एक रहके हिंदुधर्मका कल्याण होना और मालवेमें हिंदुधर्मकी वृद्धि होना. इस बात विचार कर मालवेमेसे मुसलमानोंको नौमेद किये. और हिंदुधर्म कायम रखा. " [ जयसिंगाचीं पत्रें, २६-१०-१७२१ इ. स. ]

हिंदूंच्या मोचनाची व हिंदुपदपादशाहीच्या स्थापनेची 'ही जी प्रचंड चळवळ झाली तिनें मनुष्यांचा एक मोठा नेता निर्माण केला. तो म्हणजे बाजीरावाचा

विख्यात पुत्र नानासाहेब होय. नानासाहेब जेथें जेथें दृष्टीस पडतात तेथें तेथें ते हिंदुत्वाचे रक्षक म्हणूनच दृष्टीस पडतात. ताराबाईला ते लिहितात:-- मोगल केवळ हिंदु राज्याचे शत्रु त्यांस देखील अनुसंधानें होत असतां सेवकच वांकडे वर्ततात हा दोष ! "

पानिपतच्या समरभूमीवर जरी पुष्कळ नाश झाला, तरी सर्वनाश कांहीं झाला नाहीं. कारण, त्या युद्धातून दोन माणसें जगलीं व त्यांनीं हिंदुवताचा पडता ध्वज सावरून धरला. नाना फडनीस व महादजी शिंदे-हिंदुसत्तेची बुद्धि, तिची तरवार, तिची ढाल--यांनीं जवळ जवळ ५० वर्षें चिंतन केलें, संचालनाचें काम केलें, युद्धें केलीं-आणि हें सर्व पानिपतचा घोर पराभव झाला असतांहि, किंवा झाला म्हणूनच; कारण, जे यांना आजपर्यंत झालेल्या सर्व आघातांपेक्षां हा आघात प्रचंड होता-आणि हें सर्व सोसूनहि अखेर हिंदुस्थानचें खरें राजेपद संपादन करण्यांत त्यांनीं यश मिळविलें. त्या वेळीं घडून येणाऱ्या प्रत्येक गोष्टी-मध्यें हिंदूंच्या यशश्चंद्राची कला उत्तरोत्तर अखंड वर्धमान होत आहे, याची जाणीव प्रत्येक राष्ट्रीयप्रवृत्तीच्या हिंदु मनाला किती पूर्णपणें झाली होती, व आपल्या हिंदुत्वाबद्दल व जें आतां निःसंदेह प्रस्थापित झालें होतें त्या हिंदु साम्राज्याबद्दल ते किती उत्कटत्वानें अभिमान बाळगीत होते हें त्या वेळच्या कुशाग्र व मुत्सद्दी लोकांच्या लेखनावरून उत्तम रीतीनें ध्यानीं येईल. गोविंदराव काळे हे प्रख्यात वकील पेशव्यांचे तर्फें निजामच्या दरबारीं होते. महाराष्ट्राच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत ज्या बातमीनें सर्वांचीं हृदयें आनंदानें उचंबळून गेलीं होतीं ती नाना आणि महादजी यांच्या समेटाची बातमी ऐकून गोविंदराव काळे यांनीं खालील पत्र नाना फडणवीसांस लिहिलें:--

" पत्र पाहतांच रोमांच उभे राहिले. अति संतोष झाला. विस्तार पत्रीं किती लिहूं ? ग्रंथचे ग्रंथचे मनांत आले **अटक नदीचे अलिकडे दक्षिण समुद्रापावेतों हिन्दूंचें स्थान-तुरकस्थान नव्हे हे आपली सीमा पांडवांपासून विक्रमाजितपावेतों.** त्यांनीं राखून उपभोग घेतला. त्यांमागें राज्यकर्ते नादान निघाले. यवनांचें प्राबल्य झालें. चकत्यांनीं (बाबरच्या वंशजांनीं) हस्तनापुरचें राज्य घेतलें. शेवटीं अलमगिराचे कारकीर्दीत यज्ञोपवीतास साडेतीन रुपये जेजया बसून ओलें अन्न विकत घ्यावें अशी नौबत गुजरली.



" त्या दिवसांत कैलासवासी शिवाजी महाराज शककर्ते व धर्मराखते निघाले. त्यांनीं किंचित् कोन्यांत धर्मरक्षण केलें. पुढें **कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब प्रचंड प्रतापसूर्य असे झाले कीं, असे कधीं झाले नाहींत.** हल्लीं श्रीमंतांचे पुण्यप्रतापें करून व राजेश्री पाटील बुवांच्या बुद्धीच्या व तरवारीच्या पराक्रमेंकरून सर्व घरास आले. परंतु झालें कसें ? **प्राप्त झालें तेणेंकरून सुलभता वाटली.** अगर मुसलमान कोणी असते तरी मोठे मोठे तवारिखनामे झाले असते. यवनांच्या जातींत इतकी गोष्ट चांगली झाल्यास गगनाबरोबर शोभवावी. आमचे हिंदूंत गगनाइतकी झाली असतां उच्चार न करावा हे चाल आहे. अलभ्य गोष्टी घडल्या. यवनांच्या मनांत कीं, काफरशाही झाली असे बोलतात.

" लेकिन ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें उचललीं त्यांचीं पाटीलबावांनीं फोडलीं. न लाभल्या त्या गोष्टी लाभल्या, त्यांचा बंदोबस्त शककर्त्याप्रमाणें होऊन उपभोग घ्यावें पुढेंच आहे. कोठें पुण्याईत उणें पडेल आणि काय दृष्ट लागेल नकळे. **झाल्या गोष्टी यांत केवळ मुल्रुख, राज्य प्राप्ति इतकेंच नाहीं तरी वेदशास्त्ररक्षण, गोब्राम्हणप्रतिपालन, सार्वभौमत्व हातीं लागणें, कीर्तीयश यांचे नगारे वाजणें इतक्या गोष्टी आहेत.** हे किमया संभाळणें हक्क आपला व पाटील बाबांचा. त्यांत वेत्यास पडला कीं, दोस्त दुष्मन् मजबूत. संशय दूर झाला. अति चांगलें. दुष्मन् उशापायथ्याशी लागून आहेत. चैन नव्हतें. आपण लिहिल्यावरून मन स्वस्थ झालें. " [ इ. स. १७९३ ]

हें एकच पत्र--इतक्या सहज आणि इतक्या सौलभ्यानें लिहिलेलें हें एकच पत्र--आपल्या सर्व इतिहासाचें इंगित इतक्या स्पष्टपणानें देत आहे कीं, थिल्लर-पणानें लिहिलेले ग्रंथचे ग्रंथ यापेक्षां अधिक समज करून देऊं शकणार नाहींत. ' हिंदु ' आणि ' हिंदुस्थान ' यांच्या उत्पत्तीबद्दल स्वयंस्फूर्तीनें त्यामध्यें अचूक उल्लेख केला आहे. आपल्या अगदीं शेवटल्या पिढीपर्यंत, आपले पूर्वज किती पूर्णपणानें ह्या संज्ञांना सादर मान देत होते व तद्रूप झाले होते, याचें इतकें वक्तृत्त्वपूर्ण निदर्शन या पत्रांत झालें आहे कीं, यापुढें अधिक उतारे देणें हें अगदीं अनवश्यक आहे.

## ५

याप्रमाणें ' हिंदु ' व ' हिंदुस्थान ' या शब्दांच्या इतिहासाचा माग थेट अत्यंत प्राचीन अशा वैदिक काळापासून तों अगदीं अर्वाचीन हिंदु-साम्राज्याचें पतन इ. स. १८१८ सालीं झालें तेथपर्यंत काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर आतां आम्हीं हिंदुत्वाचीं मूलतत्त्वें काय आहेत याचें विवरण वाचकांपुढें मांडण्याच्या मुख्य उद्देशाकडे वळण्याच्या परिस्थितींत आलों आहोंत. आपल्या या एकंदर परिशीलनांतून पहिली फलप्राप्ति झाली ती ही कीं, ' हिंदु ' व ' हिंदुस्थान ' हे शब्दद्वय मुसलमानांनीं मत्सरबुद्धीनें आपल्याला लावले आहेत अशा तऱ्हेचा जो एक निराधार संशय आपल्यापैकीं सदिच्छेच्या परंतु उतावीळ अशा कांहीं लोकांच्या मनामध्यें उत्पन्न झाला होता, तो अगदीं निर्मूल आहे हें सिद्ध झालें. आतांपर्यंत जें विवेचन झालें त्यानंतर, हा संशय इतका खुळ्यासारखा वाटतो कीं, त्याचें उच्चारण करणें म्हणजेच त्याचा निषेध करणें होय. महंमदाचा जन्म होण्याच्या पूर्वी–नव्हे प्रत्यक्ष अरब ही एक मानवीजाति हेंहा जगाला कळण्याच्या आधींपासून ह्या पुरातन राष्ट्राची ओळख स्वतःमध्यें व परकीयांमध्यें ' सिंधु ' अथवा ' हिंदु ' या नांवानें साभिमानतेनें केली जात असे आणि अरब लोकांना ज्याप्रमाणें प्रत्यक्ष ' सिंधु ' ही नदी शोधून काढणें शक्य नव्हतें, तितकेंच ' सिंधु ' अथवा ' हिंदु ' हें नांव शोधून काढणें शक्य नव्हतें. हें नांव त्यांना त्यांच्या पूर्वीच्या इराणी, ज्यू आणि इतर लोकांकडून कळलें होतें. परंतु हे एवढे भक्कम ऐतिहासिक पुरावेच कशाला ? जर हें अभिधान खरोखरच निंदाव्यंजक असतें, तर आपल्या जातींतील जे शूरांतले शूर आणि उत्तमांतले उत्तम असे पुरुष आहेत त्यांनींहि तें निंदाव्यंजक अभिधान मान्य केलें असतें का ? खरोखरीच आपले पूर्वज अरबी व फारशी भाषेबद्दल अगदीं एवढे कांहीं अनभिज्ञ नव्हते ! मुसलमान लोक आपल्याला ' काफीर ' असेंहि म्हणत असत. मग हें नांव आपल्या पूर्वजांनीं धारण केलें असावें व तें नांव आपलें वैशिष्ट्यदर्शक समजून त्यासच ते चिकटून राहिले आहेत काय ? मग ' हिंदु ' अथवा ' हिंदुस्थान ' ह्या शब्दांच्या बाबतींतच त्यांनीं काय म्हणून आपखुषीनें हा राष्ट्रीय अपमान गिळून घ्यावा ? याचें कारण अगदीं साधें आहे व तें हें कीं, त्यांना आपल्या राष्ट्रीय परंपरेचें अधिक ज्ञान होतें, आणि राष्ट्रीय जीवनापासून आपणांपैकीं कांहींची जी कल्पना आहे त्यापेक्षां ते कमी तुट



झाले होते. आपणांपैकीं कांहीं लोक जे आज सतत ' हिंदु ' हा शब्द संस्कृतमध्यें सांपडत नाहीं असें प्रतिपादित आहेत त्याचें कारण हेंच आहे. याच शब्दाचें तें मोठें काय ? संस्कृत वाङ्मयामध्यें, किशन, बनारस, मराठा, शिख, गुजराथ, पाटणा, सिया, जमना आणि ज्यांचा आपण व्यवहारांत रोज उपयोग करतों असे दुसरेहि हजारों शब्द आहेत कीं, ज्यांचा उल्लेख आलेला नाहीं. मग काय एवढ्याचकरितां कां ते परकीय उत्पत्तीचे आहेत म्हणून समजावयाचे ? बनारस हा शब्द जरी संस्कृतांत नाहीं तरी आपलाच आहे. कारण, वाराणसी ह्या संस्कृत शब्दाचें तें प्राकृत स्वरूप आहे. वास्तविक एखादा प्राकृत शब्द शुद्ध संस्कृतामध्यें असावा अशी अपेक्षा करणें हेंच मुळीं हास्यास्पद आहे. तरीहि पण एवढ्यावरच संपलें नाहीं. ' हिंदु ' हा शब्द एका संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप आहे आणि म्हणून तो शब्द संस्कृत वाङ्मयामध्यें आढळूं नये हें जरी साहजिक आहे, तरीसुद्धां हें प्राकृत रूप देखील कांहीं कांहीं वेळेला संस्कृत वाङ्मयामध्यें आढळून येतें ही गोष्ट तर या शब्दाचें महत्व सिद्ध करणारें एक सबल प्रत्यंतर आहे. उदाहरणार्थ, मेरुतंत्रामध्यें ' हिंदु ' हा शब्द उपयोगांत आणलेला आहे. महाराष्ट्रांतील प्रख्यात संस्कृत कोशकार आपटे आणि बंगालमधील तारानाथ तर्कवाचस्पति यांनींहि आपल्या कोशांत त्याचा उल्लेख केला आहे, आणि ' शिवशिव न हिंदुर्न यवनः ' हें वाक्य तर इतकें प्रचारांत आहे कीं, त्याचा उल्लेख करण्याचीच जरुरी नाहीं.

आतां हें शक्य आहे कीं, आधुनिक मुसलमानी फारशी भाषेमध्यें या शब्दामध्यें थोडासा तिरस्कारदर्शक भाव आला असेल; परंतु एवढ्यानें हें कसें सिद्ध होईल कीं, म्हणून तो मूलतःच तुच्छतादर्शक होता व त्याचा अर्थ ' काळा ' असा होता ? फारशी भाषेमध्यें ' हिंदी ' अथवा ' हिंद ' या शब्दांचा उपयोग केला आहे, परंतु त्याचा अर्थ ' काळा ' असा नाहीं आणि त्याचबरोबर हेंही सर्वांना माहित आहे कीं, ' हिंदु ' याबरोबरच त्यांची उत्पत्ति ' सिंधु ' अथवा ' सिंध ' यांपासूनच झाली आहे. ' हिंदु ' याचा अर्थ ' काळा ' असा आहे व म्हणून तो आपणांस लाभला आहे असें जर म्हणावयाचें तर मग ' हिंद ' आणि ' हिंदी ' हे शब्द जरी या शब्दांचा अर्थ ' काळा माणूस ' असा होत नाहीं तरीहि ते आपणांस लाभले असें म्हणावयाचें का ? वास्तविक सत्य असें आहे कीं, ' हिंदु ' हा शब्द इराणच्या आंत पुराण ' झेंड ' या भाषेपासून उत्पन्न झाला आहे; तो कांहीं

मुसलमानी इराणच्या फारशी भाषेपासून उत्पन्न झाला नाहीं; आणि त्या वेळेला 'सप्तहिंदु' याचा अर्थ फक्त 'सप्तसिंधु' एवढाच होता. हा शब्द आपण त्या वेळीं काळे होतों म्हणून शब्दशः लावतां येणें शक्यच नव्हतें. कारण अवेस्ता-कालचे जे 'हिंदु' ते प्राचीन काळचे सप्तसिंधु हे इराणी लोकांप्रमाणेंच सुंदर होते आणि वस्तुतः ते एकमेकांशेजारीच व कधीं कधीं एकमेक एकत्रच रहात होते. अगदीं अलीकडे म्हणजे खिस्ती शकाच्या प्रभात काळीं पारथिअनलोक आपल्या सरहद्दीवरच्या प्रांतांना 'श्वेतभारत' म्हणून संबोधित असत. एवढ्याकरितां 'हिंदु' याचा अर्थ शाब्दिक रीत्या 'काळा मनुष्य' असा होणें शक्य नाहीं.

आतांपर्यंतच्या विवेचनांत, 'हिंदु' व 'हिंदुस्थान' हीं अभिधानें आपली भूमि व आपलें राष्ट्र यांचा देशभक्तियुक्त साभिमान उल्लेख करण्याकरितांच, मुसलमानी इराण अथवा मुसलमान लोक ह्यांचा नामनिर्देशहि नव्हता तेव्हां पासून, उपयोगांत आणीत असत, हें भरभक्कम पुराव्यानें सिद्ध केल्यानंतर, 'हिंदु' या नांवाचा मोठेपणा व त्याचा असलेला आपल्या हृदयांतील प्रेमावरचा अधिकार, याच्याचबद्दल विचार केला असतां, कांहीं कांहीं डोकें फिरलेल्या धर्म-वेड्या लोकांनीं 'हिंदु' या शब्दाला गौरवयुक्त अर्थानें अथवा तिरस्कारयुक्त अर्थानें संबोधिलें आहे हें पहाणें हा प्रश्न अगदीं गौण स्वरूपाचा राहतो. खुद्द इंग्लंडमध्यें असा एक काळ होता कीं, 'इंग्लंड' हा शब्द त्याचे विजेते जे नार्मन लोक यांच्या दृष्टीनें इतका तुच्छतादर्शक गणला जात होता कीं, एकमेकांविरुद्ध शिव्यागाळी करण्याचे वेळीं तो उपयोगांत आणीत असत! 'मी काय इंग्लिश मनुष्य होऊं?' असें विचारणें म्हणजे स्वतःची विटंबना करण्याची पराकाष्ठा समजत असत व एखाद्या नार्मन मनुष्यास 'तूं इंग्लिश आहेस' हें म्हणणें म्हणजे त्याचा अक्षम्य अपराध केल्यासारखें होतें! परंतु एवढ्याकरितां इंग्लिश लोकांनीं आपल्या जन्मभूमीचें व राष्ट्राचें नांव बदलण्याची कोशीस केली काय? किंवा त्याला इंग्लंडचे ऐवजीं 'नॉर्मंडी' हें नांव दिलें का? किंवा 'इंग्लिश' हें नांव अव्हेरण्यांत त्यांना मोठेपणा प्राप्त झाला असता काय? नाहीं. इतकेंच नव्हे तर, त्यांनीं आपलें प्राचीन नांव वा वंश हें अव्हेरिलें नाहीं. एवढ्याचकरितां आज आपण असें पहात आहोंत कीं, 'नॉर्मन' हा शब्द ऐतिहासिक क्षेत्रांतून खणून काढलेल्या चिजेप्रमाणें होऊन राहिला आहे व 'नॉर्मंडी' या प्रांताला पृथ्वीच्या नकाशावर कुठेंहि स्थिति नाहीं—आणि त्या वेळचे ते तिरस्करणीय इंग्लिश लोक



व त्यांची इंग्लिशभाषा यांच्या ताब्यांत आजपर्यंतच्या जगांतील अत्यंत विस्तृत साम्राज्य समाविष्ट झालें आहे! आणि जरी इंग्लिश साम्राज्याचें वैभव हें महनीय आहे, तरी हिंदुसाम्राज्याच्या वैभवाशीं तुलना करण्यासारखें एकंदरीत त्याजजवळ काय आहे!

ज्या वेळीं झगड्याचा काळ असतो, त्या वेळीं राष्ट्राराष्ट्रांच्या मनाची समता ढळते. आणि जर फारशी किंवा इतर कोणी लोक 'हिंदु' या शब्दानें फक्त 'चोर' अथवा 'काळा माणूस' इतकाच अर्थ एकाकाळीं जाणत असले, तर त्यांनींहि हें ध्यानांत ठेवावें कीं, 'मुसलमान' हा शब्दसुद्धां हिंदूनीं कांहीं नेहमीं कोणा एका अभिलषणीय चारित्र्याच्या मानवजातीचा दर्शक म्हणून वापरलेला नाहीं. एखाद्याला 'मुसलमान' अथवा त्याहूनहि वाईट म्हणजे 'मुसंडा' म्हणणें हें त्याला पशू म्हणून म्हणण्यापेक्षांहि अधिक निंद्य समजत असत. अशा तऱ्हेची कठोर शिवीगाळ व आपसांतील दोषारोप, हें जरी, ज्या वेळीं प्राणांतिक झगडे सुरू असतात, जोंपर्यंत पाशवी क्रोधानलाच्या ज्वाला भडकत असतात, तोंपर्यंत अनिवार्य असलें, तरी जेव्हां माणसें ह्या झटक्यांतून शुद्धीवर येतात, आणि स्वतःला सुसंस्कृत म्हणवूं पहातात तेव्हां तरी त्यांनीं तें विसरावयास पाहिजे आहे. त्यांतहि आपणाला हें विसरून चालावयाचें नाहीं कीं, प्राचीन 'ज्यू' लोक 'हिंदु' हा शब्द सामर्थ्य व उत्साह दर्शवण्यासाठीं योजीत असत, कारण आपलें राष्ट्र व आपली भूमि या गुणांनीं अन्वित झालेली होती. 'सो हाब मो अल्लक' या नांवाच्या एका अरबी महाकाव्यांत असें म्हटलें आहे कीं, आपल्याच सग्या-सोयऱ्यांचे जुलूम हे हिंदूंच्या तरवारीच्या आघातापेक्षांहि अधिक प्रखर व भीषण असतात. खुद्द इराणी लोकांतच शिवाय अशी एक म्हण आहे कीं, 'हिंदूच उत्तर देणें' व याचा अर्थ असा कीं, 'हिंदूच्या तरवारीनें शूरपणानें खोल जखम करणें.' बाबिलोन देशांतील लोक उत्तम कापडाला 'सिंधु' असें म्हणत असत. कारण बहुशः ते 'सप्तसिंधु' मधूनच येत असे. आणि याच गोष्टीवरून हेंहि सिद्ध होतें कीं, आपल्या देशाला ते आपल्या प्राचीन 'सिंधु' याच नांवानें ओळखीत असत. त्याचप्रमाणें प्राचीन बाबिलोनियन भाषेमध्येंहि या शब्दाचा राष्ट्रीयवाचक अर्थाशिवाय, दुसरा अर्थ अजूनपर्यंत आपणांस उपलब्ध नाहीं.

आपल्या शेजारच्या अत्यंत प्राचीन आणि अत्यंत सुसंस्कृत अशा चिनी राष्ट्रां-तील सुप्रसिद्ध प्रवासी जो युआनचंग, त्यानें 'हिंदु' ह्या अभिधानाचा काय अर्थ

केला आहे तें पाहून कोणत्याहि हिंदूला स्वतःबद्दल धन्यता वाटल्यावांचून रहाणार नाहीं. त्यानें ' हिंदु ' या शब्दाचें साम्य ' इंदु ' या शब्दाशीं केलें व याच्या प्रतिपादनार्थ तो पुढें असें म्हणतो कीं, जगानें ह्या राष्ट्राला योग्य रीतीनेंच ' इंदु ' हें नांव दिलें. कारण तें आणि त्यांची संस्कृति हीं जगतावरील मनुष्यांच्या उदास आणि संत्रस्त आत्म्याला शीतल चंद्रप्रकाशाप्रमाणें सदैव आनंद आणि उत्साह यांचा झराच भासला. या सर्व गोष्टींवरून हें सिद्ध होत नाहीं काय कीं, आपल्या नांवाबद्दल लोकांच्या मनांत आदर उत्पन्न करण्याचा मार्ग म्हटला म्हणजे तें नांव सोडून देणें, किंवा त्याचा इनकार करणें हा नव्हे, तर आपल्या शस्त्रांच्या प्रभावानें, ध्येयाच्या शुद्धतेनें, आणि आत्म्याच्या उदात्ततेनें त्या नांवाला मान्यता मिळविणें व त्याच्या पुढें सर्व जगास सन्मानानें मान लववावयास लावणें हाच तो मार्ग होय. आपण जरी कांहीं आपल्यांतीलच बांधवांना, त्यांच्या स्वेच्छेच्या वारूवर यथेच्छ आरोहण करण्याची परवानगी दिली व त्यांनीं खानेसुमारीच्या वेळीं स्वतःस ' हिंदूंच्या ऐवजीं आर्य ' म्हणून नोंदवून घेतलें तरी त्यापासून अधिक तें काय लाभणार ? फक्त ' आर्य ' ह्या पवित्र नांवास मात्र ते स्वतःच्या हीन दर्जाला ओढतील आणि कोशामध्यें ' गुलाम ' ' दास ' या अर्थाच्या शब्दांमध्यें आणखी एक शब्द भरीला घालतील. आणि हें तोंपर्यंत, कीं जोंपर्यंत आपलें राष्ट्र त्याचें पूर्वीचें बल आणि मोठेपणा संपादित करीत नाहीं.

परंतु, हिंदु व हिंदुस्थान या अभिधानांचा आपण इनकार करावा ह्या खुळ्या सूचनेच्या विरुद्ध गंभीर वादविवाद करावयाचें जरी आपण क्षणभर सोडून दिलें, आणि परक्यांनीं द्वेषबुद्धीनें हीं नांवें आपणांस दिलीं अशी मूर्खपणाची विचारसरणीहि क्षणभर मान्य केली, तरीहि आम्ही इतकेंच सरळ विचारतों कीं, या नांवांचा अव्हेर करणें व दुसरें एखादें राष्ट्रीय नांव धारण करणें हें शक्य आहे काय ? हल्लीं जी परिस्थिति आहे ती अशी आहे कीं, ' हिंदु ' हा शब्द आपल्या जातीचें जणुं एक निशाणच होऊन बसला आहे, आणि ज्या गोष्टींनीं आपली जातीय एकी ही केप कामोरिनपासून तों काश्मीरपर्यंत व अटकेपासून कटकपर्यंत बलवत्तर केली जाते व अखंड टिकवितां येते अशा गोष्टींपैकीं एक प्रमुख गोष्ट होऊन बसली आहे. आपल्याला असें वाटतें काय कीं, एखाद्या टोपीप्रमाणें ते आपल्याला सहज बदलतां येईल ? एकदा असें झालें कीं, एका सज्जन व देश-



भक्त गृहस्थानें खानेसुमारीच्या वेळीं स्वतःला हिंदु ऐवजीं ' आर्य ' म्हणून नोंदवून घेण्याचें ठरविलें, व याचें कारण हेंच होतें कीं, प्रथम इराणी लोकांनीं आपणांस तुच्छतादर्शक ' हिंदु ' या नांवानें संबोधलें होतें व या शब्दाचा अर्थ ' काळा माणूस ' असा होतो, अशा प्रकारचें जें असत्य सर्वत्र पसरविलें होतें त्यालाच हे गृहस्थ बळी पडले. या गृहस्थांशीं वेळेच्या अभावीं मला कांहीं साग्र वादविवाद करतां आला नाहीं व म्हणून मीं त्यांस फक्त त्यांचें नांव काय एवढाच प्रश्न केला. त्यानें सांगितलें कीं, ' माझें नांव तक्तसिंग. ' मी पुढें म्हणालों ' माझ्या सज्जन मित्रा ' ' हिंदु ' या नांवाच्या उत्पत्तीसंबंधीं अजून द्विधा मत तरी आहे, परंतु, तुझें नांव मात्र निर्विवादपणें धेडगुजरी आहे. व म्हणून नोंदणी करतांना प्रथम तेंच ' मौद्गलायन ' किंवा ' सिंहासनसिंह ' अशा तऱ्हेच्या शुद्ध आर्यभाषेमध्यें बदलून लिहिलें पाहिजे. ' हें ऐकून क्षणभर त्यानें हा मुद्दा टाळण्याचा प्रयत्न केला व मग मला दाखवूं लागला कीं, ' पहा, हें असें करणें किती कठीण आहे. त्यामुळें माझ्या उद्योगधंद्याची सगळीच घडी विसकटून जाईल, व सर्वांत मोठी अडचण म्हणजे सगळ्या लोकांना मी कसें या माझ्या नवीन बनविलेल्या नांवानें ओळखण्यास लावूं ? किंवा जोंपर्यंत इतर सर्वजण मला ' तक्तसिंह'च म्हणण्याचा हट्ट धरीत आहेत, तोंपर्यंत मी कितीहि स्वतःला ' सिंहासन सिंह ' म्हणण्याचा अट्टाहास केला तरी त्याचा काय उपयोग होणार आहे ? ' मी लगेच त्याला म्हणालों, ' परंतु, जर तुझें स्वतःचें जें नांव निर्विवादपणें परकीय आहे तें बदलण्यास तुला इतकें कठीण, इतकेंच नव्हे तर हानिकारक वाटतें, तर मग, तक्तसिंह, संबंध जातीचें जें नांव तें बदलणें हें कितीतरी अधिक कठीण आणि अधिक हानिकारक असलें पाहिजे ? आणि तेंहि नांव मुळींच परकी नाहीं, तर वेद जितके आपले तितकेंच तें नांवहि आपलें आहे !– आणि कितीतरी निरर्थक ! अमितकालापासून दृढीभूत झालेलें नांव बदलणें हें किती व्यर्थ आहे, याची सत्यता या वैयक्तिक उदाहरणापेक्षांहि पंजाबमधील आपल्या शिखबंधूंच्या पंथामध्यें चांगल्या रीतीनें निर्दिष्ट केली आहे. आपल्या हिंदु जातींतील अवतंस व शूरांतले शूर अशा नरश्रेष्ठांची जी जमात व जिला आपल्या महान गुरूनें पसंत केली व त्या वेळीं विजयानंदानें गर्जना केली कीं, ' नीलवस्त्रके कपडे फाडे तुरकपठाणी अंमल गया ! ' आणि जी जमात घडण्याचें आद्य कारण म्हणजेः--' धर्म चलावन संत उबारण, दुष्ट दैत्यके मूल उपाटण, यहि काज धरा मै जनमम् । समझ लेहु साधुसम

मननम् । ( परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥" ).

अशा या जमातीचेंच नांव 'खालसा'! ज्या साधुवृत्तीच्या नानकाला आज प्रत्यहीं 'वाह गुरुजीके फत्ते, वाह गुरुजीके खालसा' अशा अभिनंदनांनीं वदन होत आहे तो गुरुनानक दुःखानें म्हणत असे कीं, क्षत्रियांहि धर्म छोडिया म्लेंछ भाषा गहि। सृष्टि सब इकवर्ण हुई, धर्मकी गति रही!' 'दरबार,' 'दिवाण,' 'बहादुर' इत्यादि शब्द चोरासारखे थेट आपल्या हरिमंदिराच्या अंतर्भागापर्यंत प्रविष्ट झाले आहेत! आपल्याला पुरातनकाळीं ज्या जखमा झाल्या होत्या त्यांचे हे वण आहेत. त्या जखमा भरून निघाल्या परंतु त्यांचे वण मात्र अजूनहि दृश्य आहेत व आपल्या शरीरांपैकींच एक होऊन बसले आहेत. जोंपर्यंत त्यांना खरवडून काढण्याचा प्रयत्न करणें हें नफ्यापेक्षां तोटाच अधिक करण्याचा संभव आहे, तोंपर्यंत आपल्याला जें काय करतां येण्यासारखें आहे तें म्हणजे इतकेंच कीं, त्या तशाच सहन करणें; कारण त्या जखमा तरी ज्या लढाया आपण रक्ताचे पाट वाहवून जिंकल्या व अखेर जेते झालों अशा लढायामध्येंच झालेल्या आहेत.

आणि जर कोणते शब्द, मग ते कितीहि पवित्र वस्तूंशीं संबद्ध झालेले असोत, बदलणें आणि त्यक्त करणें अवश्य असेल तर ते शब्द हे होत; कारण ते सर्व निर्विवादरीतीनें परकीय व त्यांच्या वर्चस्वाचे अवशिष्ट भाग असे आहेत.

मग जे आपण या नांवांना अपरिहार्य म्हणून राहूं देतों, इतकेंच नव्हे तर त्यांच्याविषयीं आसक्ति धरतों त्या आपणाला, जीं आपल्या जातीचीं व देशाचीं पाळण्यांतलीं नांवें, आपल्या मूळपुरुषांनीं पसंत ठरविलेलीं सगळ्या जगांतल्या अत्यंत प्राचीन आणि अत्यंत वंद्य अशा ग्रंथांमध्यें वेदांमध्यें–जीं ग्रथित केलेलीं अशीं 'हिंदु' आणि 'हिंदुस्थान" हीं नांवें नाकारणें, निव्वळ दांभिकपणाचेंच ठरत नाहीं काय? सिंधुनदीच्या उभय तीरावरील आपल्या लक्षावधि देशबांधवांनीं कमींत कमीं गेलीं चाळीस शतकेंपर्यंत जें अभिधान मोठ्या अभिमानानें धारण केलें; ज्यानें काश्मीरपासून केप कामोरिनपर्यंत व अटकपासून कटकपर्यंत आपल्या सर्व देशाला कवटाळलें; जें एका शब्दांत आपली जन्मभूमि आणि ज्ञात जी 'सिंधु' अथवा 'हिंदु' हिच्या भूगोलाची सर्व स्थितिस्थापकता दर्शवितें; जें 'राष्ट्रमार्यस्यचोत्तमम्' अशा रीतीनें इतर देशांपासून निवडून काढण्याची खूण



म्हणून समजलें गेलें, तें हें अभिधान होय. याच अभिधानाकरितां शत्रूंनीं आमचा द्वेष केला, आणि याच्याचकरितां शालिवाहनापासून शिवाजीपर्यंतचे आपले योद्धे शतकांपाठीमागून शतकें झगडा कायम ठेवण्यांत हजारोंनीं खर्ची पडले. पद्मिनी आणि चितोड यांच्या जळून खाक झालेल्या राखेवर हाच 'हिंदु' शब्द छापला गेलेला आढळेल. तुलसीदास व तुकाराम, आणि रामदास व रामकृष्ण यांनीं हिंदु हेंच नांव धारण केलें होतें. 'हिंदुपदपादशाही' हेंच रामदासांचें स्वप्न होतें, शिवाजीचें कार्य होतें, बाजीराव आणि बंदाबहादुर, छत्रसाल आणि नानासाहेब, प्रताप आणि प्रतापादित्य यांच्या महत्वाकांक्षेचा ध्रुवतारा होतें. ज्या निशाणाचें रक्षण करतां करतां पानिपतच्या समरभूमीवर एक लक्ष वीर शत्रूनां प्राणहारक जखमा करीत फक्त एकाच दिवसांत धारातीर्थीं पतन पावले, आणि तो भाऊहि ज्याच्या अग्रभागीं हातांत समशेर असतां गारद झाला, त्या निशाणावरहि हाच शब्द कोरून काढला होता आणि या सर्व बलिदानानंतरहि याच 'हिंदुपदपादशाही' करितां, नाना आणि महादजी यांनीं राष्ट्रनौका तुफान दर्यांतून, त्यांतील सर्व खडकांना व संकटांना टाळून चिरपेक्षित किनाऱ्याच्या अगदीं समीप आणली होती. आणि आजहि हेंच 'हिंदु' आणि 'हिंदुस्थान' हें अभिधान, नेपाळच्या सिंहासनापासून तों रस्त्यांतील एखाद्या कटोऱ्यापर्यंत, लक्षावधि लोकांवर स्वामित्त्व गाजवीत आहे. या शब्दांचा अव्हेर करणें म्हणजे आपल्या लोकांचें प्रत्यक्ष हृदयच कापून फेंकून देणें होय. तें करण्यापूर्वींच तुम्ही मरून जाल. हें करणें कांहीं फक्त भयंकरच आहे, असें नाहीं, तर तें व्यर्थहि आहे. 'हिंदु' व 'हिंदुस्थान' हे शब्द त्यांच्या जागेवरून हलवूं म्हणणें, म्हणजे प्रत्यक्ष हिमालयालाच त्याच्या जागेपासून हलविण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. भयंकर उत्पत्ति व कल्पनेला स्तिमित करणाऱ्या घटना जो घडवितो असा एखादा धरणीकंपच हें कार्य करूं शकेल!

'हिंदु' व 'हिंदुस्थान' या अभिधानांविरुद्ध जो आक्षेप, कीं हे शब्द परकीय लोकांनीं आपल्याला लावले आहेत त्यांचाच तेवढा विचार केला तर फक्त निर्विवाद सिद्ध झालेले ऐतिहासिक आधार निवेदन केले कीं, त्याचा एकदम निरास होईल. परंतु, वस्तुस्थिति अशी आहे कीं, हा आक्षेप कांहीं वेळेला एका अंतर्गत भीतीनें संमिश्र झालेला असतो ती भीति म्हणजे अशी कीं, जर हें अभिधान आपण आदरानें धारण केलें तर जे जे असें करतील ते ते 'हिंदुइझम' या नांवा-

मध्यें समाविष्ट होणारे सर्व विचार आणि आचार यांच्यावर विश्वास ठेवणारे आहेत असें जग मानील. ‘ हिंदु ’ मनुष्य म्हटला कीं, तो अचुक रीतीनें ज्याला ‘ हिंदुइझम ’ असें समजतात त्या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवणारा असलाच पाहिजे अशा तऱ्हेची एक भावना लक्ष्यांत घेऊन, बाह्यतः नसलें तरी अंतःकरणातून जें एक भय वाटत असतें, त्याच भयाच्या योगानें पुष्कळ लोक हीं आपलीं अभिधानें परकीय लोकांनीं शोधून काढलीं नाहींत यावर विश्वास ठेवीत नाहींत. आणि त्यांचें हें भयहि कांहीं सर्वस्वीं अनाठायीं नसतें. परंतु, ज्यांना असें भय वाटतें, त्यांनीं तें तसें स्पष्टपणें बोलून दाखविणें व एवढ्याकरितां आम्ही हिंदु म्हणवून घेण्यास तयार नाहीं असें म्हणणें हें अधिक सरळपणाचें होईल; परंतु, मिथ्या व अप्रतिपादक अशा आक्षेपाखालीं लपूं पहाणें हें केवळ वक्र वृत्तीचें द्योतक होईल. ‘ हिंदुत्व ’ व ‘ हिंदुइझम् ’ यामध्यें दिसणाऱ्या वरवरच्या साम्याच्या योगानें कांहीं वेळेला आपल्या हिंदु बांधवांमधील कांहीं सदिच्छेच्या लोकांचा मतिभ्रम केला जातो. या दोन शब्दांमधील अंतर लवकरच स्पष्टपणानें दाखविलें जाईल. येथें फक्त इतकें सांगितलें म्हणजे पुरें होणार आहे कीं, जर कोणता एखादा शब्द परकीय लोकांकडून आला असेल तर तो हा ‘ हिंदुइझम् ’ होय; आणि म्हणून आपण अशी खबरदारी घेतली पाहिजे कीं, आपले विचार या नवीन बनवलेल्या शब्दानें घोंटाळून जाणार नाहींत. वेदांवरसुद्धां ते स्वतंत्र धर्मग्रंथ आहेत असा विश्वास न ठेवणारे लोकहि, इतर कोणत्याहि हिंदूंप्रमाणेंच सर्वस्वी हिंदु असूं शकतात, ही गोष्ट इतरांबद्दल न बोलतां फक्त जैनांबद्दलच बोललें तरी, आपले हजारों जैनबांधव पिढ्यानुपिढ्या स्वतःला ‘ हिंदु ’ म्हणून घेत आहेत व जर कोणी त्यांना तसें न म्हटलें तर त्यामध्यें त्यांना त्यांचा अपमान झाल्याप्रमाणें वाटतें यावरूनच सिद्ध होत आहे. आम्ही याचा निर्देश येथें केवळ हें एक प्रत्यक्ष सत्यच आहे या दृष्टीनें केला—त्याचें सविस्तर विवरण व विवेचन आतांच येथें करण्याचा आमचा मानस नाहीं. तें लवकरच पुढें येणार आहे. तोंपर्यंत आम्हीं अशी आशा करतों कीं, आम्ही कोणता निर्णय काढूं, याबद्दल आमचे वाचक कसलाहि संदेह बाळगणार नाहींत व त्या योगानें आमच्या निर्णयाच्या महत्वाबद्दल आपलें मत पूर्वग्रहदूषित करून ठेवणार नाहींत. त्याचप्रमाणें हेंहि त्यांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, आम्ही आतांपर्यंत जें विवेचन केलें तें कोणत्याहि ‘ इझम ’ वरचें नाहीं तर केवळ ‘ हिंदुत्व ’ याचें राष्ट्रीय, जातीय संस्कृतिविषयक जें स्वरुप, त्याचेंच दिग्दर्शन केलें आहे.



इतक्या विवेचनानंतर, आपल्याला आतां आजपर्यंत मानवी भाषेला माहित असलेल्या अत्यंत विस्तृत व बुद्धीला भांबावून सोडणाऱ्या अशा एकीकरण कल्पनेच्या घटकांचें विवरण करण्यास कांहीं हरकत नाहीं. ‘ हिंदुत्व ’ हा शब्द मूळ ‘ हिंदु ’ यापासून निघाला आहे. आपल्या जातीच्या अत्यंत प्राचीन व अत्यंत पवित्र अशा ग्रंथांमध्यें, ‘ सप्तसिंधु ’ अथवा ‘ हप्तहिंदु ’ हा शब्द ज्या भूभागामध्यें वैदिक राष्ट्र भरभराटीला आलें त्याला लाविला आहे हें आपण पाहिलेंच आहे. ही भौगोलिक कल्पना मूळ ध्यानांत घेऊन कधीं आकुंचन पावत तर कधीं विस्तार पावत, परंतु अखंडसातत्यानें ‘ हिंदु ’ व ‘ हिंदुस्थान ’ या शब्दांशी संयुक्त झाली आहे; व अखेर कमींत कमी ५००० वर्षें उलटल्यानंतर ‘ हिंदुस्थान ’ या शब्दामध्यें सिंधुनदीपासून तों सिंधु ( समुद्रा ) पर्यंत सर्व द्वीपकल्प समाविष्ट झालें आहे. कोणत्याहि एखाद्या लोकसमूहाला एकीभूत करण्यास, बलशाली बनविण्यास, व ऐक्याची भावना उत्पन्न करण्यास जें अत्यंत महत्त्वाचें कारण असतें तें हें कीं, त्याला अंतरंगांतून एकीभूत झालेली व बाहेरून सुस्पष्ट मर्यादेनें आंखलेली भूमि ही ‘ निवासस्थाना’करितां; व ज्या नामोच्चारानें आपल्या चिरवंदित मातृभूमीची मूर्ति व तिच्या गतकालीन इतिहासाबद्दल नितांत भक्ति हृदयांत उत्थित होईल असें ‘ नामाभिधान, ’ ह्या दोन गोष्टी आवश्यक असतात. सुदैवानें ह्या दोन्हीहि महत्त्वाच्या गोष्टी आपल्यास लाभल्या आहेत. आपला देश हा इतका विस्तृत आणि तरीहि इतका सुस्पष्टरेखांकित आहे, तो इतर देशांपासून इतका असंदिग्ध रीतीनें विभक्त केला आहे व तरीहि इतका सुसंरक्षित आहे कीं, जगांतील इतर कोणताहि देश निसर्गानें आपल्या करांगुलीनें निरपवाद असा निराळा एक भौगोलिक विभाग म्हणून आंखून दिलेला नाहीं. आणि ‘ हिंदुस्थान ’ अथवा ‘ हिंदु ’ हें नांवहि तसेंच आहे. हें नांव ऐकतांच आपल्या हृदयामध्यें अगदीं अचुक रीतीनें आपल्या जन्मभूमीची मूर्ति उभी राहते व तिच्या भौगोलिक स्थूल स्वरूपाची उत्कट कल्पना केल्यानंतर, जणुं काय ती एक सजीव मूर्तिच होऊन उभी राहते. हिंदुस्थान म्हणजे हिंदूंची भूमि, त्या अर्थी ‘ हिंदुत्वा ’ च्या मूलभूत गोष्टीपैकीं ही भौगोलिक गोष्ट अवश्य असली पाहिजे. हिंदु हा एकतर स्वतः, अथवा आनुवंशिकरीतीनें, मुख्यतः हिंदुस्थानचा रहिवाशी असला पाहिजे आणि ही भूमि त्याची मातृभूमि असली पाहिजे. अमेरिका व त्याचप्रमाणें फ्रान्समध्यें ‘ हिंदु ’ या शब्दाचा अर्थ सामान्यतः, याच रीतीनें कोणत्याहि धर्माचा अथवा संस्कृतीचा संबंध लक्ष्यांत न आणतांच समजला जातो, आणि जर

' हिंदु ' या शब्दाचा हा मूळ अर्थच प्रामुख्यानें दाखविण्याचा प्रघात असता, आणि ' सिंधु ' या शब्दापासून उत्पन्न झालेल्या प्रत्येक शब्दाप्रमाणें याचाहि जर तोच अर्थ असता, तर याचा अर्थ फक्त ' हिंदुस्थान'चा रहिवाशी इतकाच—' हिंदी ' या शब्दाचा हल्लीं जो अर्थ आहे तोच अर्थ कायम राहिला असता.

परंतु, आतांपर्यंतच्या सर्व विवेचनांत आपण :फक्त ' काय प्रत्यक्ष आहे ' याचाच अधिक विचार केला आहे, ' काय असतें ' किंवा ' काय असावें ' याबद्दल इतका विचार केला नाहीं. आतां याचें कारण कांहीं ' काय असावें ' याबद्दल उहापोह करणें हें योग्य नव्हे असें नव्हे. उलट तें आवश्यक, व कांहीं वेळेला तर अधिक उत्साहदायकच असतें. परंतु, हें सुद्धां, ' काय आहे ' याबद्दल निश्चित ज्ञान प्राप्त झालें, म्हणजेच अधिक चांगल्या रीतीनें करतां येईल. याकरितां, ' हिंदुत्वा'च्या आदितत्वांना निश्चित करण्याच्या प्रयत्नांत आपण अगदीं सावध असलें पाहिजे व सांप्रतच्या या शब्दाच्या घटकावयांवरूनच आपण त्याचा अर्थ करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एवढ्याकरितां, जरी ' हिंदु ' या शब्दाचा त्याच व्युत्पत्तीवरुन निघालेल्या ' हिंदी ' या शब्दाप्रमाणें फक्त ' हिंदुस्थानचा रहिवासी ' असा अर्थ झाला तरी तेवढ्यावरून एखाद्या मुसलमानाला, तो हिंदुस्थानचा रहिवाशी आहे एवढ्याचवरून ' हिंदु ' म्हणणें म्हणजे शब्दाच्या व्यावहारिक अर्थाचा अनर्थ करणें होईल अशी आम्हाला भीति वाटते. आतां हें शक्य आहे कीं, पुढें भविष्यकाळीं कधीं तरी ' हिंदु ' या शब्दाचा अर्थ फक्त हिंदुस्थानचा रहिवासी इतका आणि इतकाच होईल. तो दिवस तेव्हांच येईल कीं, ज्या दिवशीं सर्व संस्कृति व धर्म यांबद्दलचा दुरभिमान दुसऱ्यांना दुखवूनहि आपली स्वतःचीच प्रौढी मिरविण्याचें सोडून देईल, आणि सर्व धर्म ज्या वेळीं स्वतःचा अभिमान त्यक्त करून, ज्या पायावर ही सर्व मानवी जात डौलानें व चिरस्थायित्वानें सुस्थित झाली आहे अशा मूलभूत चिरतन तत्त्वांचा ते एक संग्रह बनतील. परंतु जोंपर्यंत ह्या अत्यंत वांछित एकीकरणाच्या पहिल्या किरणांचाहि क्षितिजाचलावर कुठें मागमूसहि दिसत नाहीं, तोंपर्यंत अस्तित्वांत असणाऱ्या कठोर सत्याकडे काणाडोळा करणें हें केवळ मूर्खपण होईल. जोंपर्यंत इतर प्रत्येक धर्म हा ज्या योगानें वारंवार लढाईपर्यंत प्रसंग येतात असली आपापलीं विशिष्ट मतें सोडण्यास तयार नाहीं, तोंपर्यंत कोणत्याहि एका संस्कृतीनें व राष्ट्रीय घटकानें आपलीं बंधनें शिथिल करणें—व विशेषतः संघांतील दृढता व सामर्थ्य वाढविणारीं बंधनें शिथिल करणें, हें केव्हांहि इष्ट होणार नाहीं. एखादा अमेरिकन हिंदुस्थानचा रहिवासी होऊं शकेल. तो जर खरोखरीच असा नागरिक होईल तर त्याला ' भारतीय ' किंवा ' हिंदी ' या नात्यानें वागविणें हें न्याय्य होईल. परंतु, जोंपर्यंत तो संस्कृतीनें व इतिहासानें एक झाला नाहीं, जोंपर्यंत त्याच्या अंगांत आपलें रक्त खेळलें नाहीं, व जोंपर्यंत तो आपल्या देशाला केवळ आवडीचा म्हणून नव्हे, तर पूजास्थान म्हणून गणूं लागला नाहीं, तोंपर्यंत त्याला आपल्या हिंदूंच्या संघांत सामील करून घेतां येणार नाहीं. कारण, जरी ' हिंदुत्वा ' चें पहिलें लक्षण म्हणजे स्वतः किंवा वाडवडिलांच्या योगानें हिंदुस्थानचें नागरिक असणें हें आहे तरी तें कांहीं 'हिंदुत्वा'चें एकच एक लक्षण आहे असें नाहीं. कारण, ' हिंदु ' हा शब्दाचा अर्थ केवळ भौगोलिक वैशिष्ट्यापेक्षां पुष्कळ अधिक आहे.



' हिंदु ' हा शब्द ' भारतीय ' अथवा ' हिंदी ' यांच्याशीं समानार्थक नाहीं, व त्याचा केवळ हिंदुस्थानचा रहिवाशी एवढाच अर्थ नाहीं, हें ठरल्यावर साहजिकपणें त्याच्या दुसऱ्या लक्षणाबद्दल विचार करणें ओघानेंच प्राप्त होतें. हिंदु भारतीय शासनाचे केवळ नागरिकच नाहींत, कारण ते कांहीं फक्त एका जन्मभूमीवर असलेल्या प्रेमानेंच बद्ध झालेले नाहींत, तर एकाच रक्ताच्या बंधनांनींहि ते बद्ध झाले आहेत. ते कांहीं फक्त एकराष्ट्रीयच नाहींत तर एकजातीयहि आहेत. ' जाति ' हा शब्द ' जा ' उत्पन्न करणें या धातूपासून निघाला आहे व त्याचा अर्थ बंधुता, ज्यांची उत्पत्ति एकच आहे, ज्यांचें रक्त एकच आहे असा लोकसमूह, असा होतो. ज्यांना ' सिंधु ' असें म्हणत, अशा वेदकालीन पितृऋषींपासून आमचा वंशोद्भव आहे व त्या समर्थ पूर्वजांचेंच रक्त सतत परंपरेनें आमच्या अंगांत खेळत आहे असें हिंदुलोक साभिमानानें मानतात. अनेकवार छद्मीपणानें जो एक प्रश्न विचारला जातो, तोहि आम्हाला चांगला माहित आहे कीं, ' परंतु, तुम्ही खरोखरच कां एकजाति आहांत ? तुमच्या अंगांत एकच रक्त खेळत आहे असें खरेंच का म्हणतां येईल ? ' याचें उत्तर आम्ही फक्त प्रतिप्रश्नांतच देऊं कीं, ' इंग्लिश लोक हे खरोखरीच का एकजाति आहेत ? जगामध्यें इंग्रज रक्त, फ्रेंच रक्त, जर्मन रक्त, किंवा चिनी रक्त, अशा तऱ्हेची कांहीं वस्तु आहे काय ? जे आपआपसांमध्यें भिन्न जाति असूनहि लग्नें करतात

आणि अशा रीतीनें परकीयांचें रक्त मुक्तपणानें आपल्यांत मिसळूं देतात, ते काय एका रक्ताचे म्हणावयाचे? स्वतःसिद्ध अशा एकाच जातीचे मानावयाचे? जर त्यांना तसें करण्यास हरकत नसेल तर हिंदूंना तर नाहींच नाहीं. कारण, ज्या जातिभेदाच्या यथार्थ स्वरूपाबद्दल तुम्हाला गाढ अज्ञान आहे व ज्याचा खरा अर्थ तुम्ही मुळींच उमगूं शकलां नाहीं त्या जातिभेदसंस्थेनें आमच्यामधील रक्ताची सरमिसळ होऊन तें एक होऊं शकलें नाहीं असें तुमचें म्हणणें आहे; परंतु, हें तुमच्या ध्यानांत येत नाहीं कीं, त्याच जातिभेदानें स्वकीय रक्तापेक्षां परकीय रक्ताचीच भेसळ आमच्यामध्यें न होऊं देण्याला अधिक मदत केली. इतकेंच नव्हे तर, हल्लीं जी जातिसंस्था अस्तित्वांत आहे तीच, ब्राह्मणापासून तों चांडाळापर्यंत एकच रक्त प्रत्येकाच्या धमन्यांमधून वहात आहे याचा भक्कम पुरावा नाहीं काय? आमच्या कोणत्याहि स्मृतीकडे नुसती ओझरती जरी दृष्टि वळविली तरी अनुलोम व प्रतिलोम विवाह हे त्या काळीं सर्रास होत होते आणि त्याच्याच योगानें आज अस्तित्वांत असलेल्या अनेक उपजाति निर्माण झाल्या आहेत, असें निःसंदेह रीतीनें दिसून येईल. एखाद्या क्षत्रियाला जर शूद्रस्त्रीपासून पुत्र झाला, तर त्या संततीच्या योगानें 'उग्र' या नांवाची जाति निर्माण होते. त्याचप्रमाणें जर एखादा क्षत्रिय या 'उग्र' जातींतील स्त्रीच्या पोटीं संतति निर्माण करील तर त्या योगानें 'श्वपच' जाति निर्माण होते. त्याचप्रमाणें एखाद्या ब्राह्मण स्त्रीला जर एखाद्या शूद्रापासून मुलगा झाला तर त्या योगानें 'चांडाल' जाति उत्पन्न होते. वेदकालीन सत्यकामजाबालीपासून तों थेट महादजी शिंद्यांपर्यंत आपल्या इतिहासाच्या प्रत्येक पानावरून असें दिसून येईल कीं, आपल्या जातीच्या रक्ताची ही प्राचीन गंगा, वेदकालाच्या उत्तुंग शिखरांपासून उद्भुत होऊन आधुनिक इतिहासाच्या भूप्रदेशावर अव्याहत रीतीनें अवतीर्ण झाली आहे व अशा रीतीनें अवतीर्ण होतांना ती पुष्कळ संपन्न झाली आहे, पुष्कळ प्रवाहांनां तिनें आपल्यांत मिसळवून घेतलें आहे, कित्येक पतित आत्म्यांना तिनें पावन केलें आहे, विस्तृतता, गंभीरता, संपन्नता यांनीं प्रतिदिनि वाढत वाढत, कुठें तरी आडरानांत व वाळवंटांत शुष्क होऊन जाण्याची आपत्ति तिनें निरस्त केली आहे व अशारीतीनें पूर्वीपेक्षां अधिक शुद्धतेनें व अधिक वेगवान् होऊन ती आज अखंड वहात आहे. आपल्यामध्यें जें जें कांहीं नापीक व दरिद्री होतें, तें तें सुपीक व समृद्ध करण्याकरितां व आपल्यामध्यें जें कांहीं उन्नत आणि वर्धिष्णु होतें त्याच्या वाढीच्या आडहि न येण्याकरितां जी जी



साधनें अत्यंत आवश्यक म्हणून आपल्या उदात्तचरित व देशभक्त पूर्वजांना वाटलीं, त्या त्या साधनांच्या द्वारें ह्या पावन प्रवाहाला व्यवस्थितपणानें मार्ग आक्रमण करतां यावा अशी व्यवस्था करणें हेंच कार्य या जातिभेद संस्थेनें केलें आहे.

हें विधान, ज्याप्रमाणें चार मुख्य जातींच्या संमिश्र विवाहापासून उत्पन्न झालेल्या उपजातींबद्दल आणि चार मुख्य जाति व ह्या उपजाति यांच्यापासून उत्पन्न झालेल्या संततीबद्दल खरें आहे, त्याचप्रमाणें ज्या इतर जाति व वंश, कुठें तरी पुराण भूतकालाच्या अंधुक प्रकाशांत स्वतंत्रपणें, आपापल्या ठिकाणीं वसत होत्या, त्यांच्याहिसंबंधानें हें विधान तितकेंच लागू आहे. याचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास मलबार किंवा नेपाळमध्यें पहा. तेथें हिंदूंतील उच्च जातीच्या पुरुषाला ज्या जाति परकीय मानल्या गेल्या आहेत अशा जातीच्या स्त्रीशीं लग्न करण्याची परवानगी आहे. व ह्या जाति परकीय आहेत ही कल्पना जरी खरी मानली, तरी त्यांनीं हिंदूंच्या संस्कृतींचें संरक्षण करण्यांत जें प्रेम आणि शौर्य दाखविलें त्यामुळें त्यांना आपल्या जातींत समाविष्ट करण्यांत आलं, इतकेंच नव्हे तर सर्व बंधनांपेक्षांहि अत्यंत नाजूक असें जें विवाहबंधन त्यानें त्यांस कायमचें बद्ध करून टाकलें. नागवंश हा द्रविड जातीपैकींच आहे काय? मग जेव्हां अग्निवंशांतील तरुणांना नागकन्या अर्पण केल्या व या दोन्हीहि वंशांमध्यें जेव्हां चंद्रवंश आणि सूर्यवंश यांच्यांतील क्षत्रियांनीं आपल्या कुमारिकांचीं लग्नें लाविलीं, तेव्हां मग हे आणि ते असें भिन्नत्व कुठें राहिलें? अगदीं हर्षाच्या कारकीर्दीपर्यंत–मग बुद्धकालीन जातिभेदाची घडी जेव्हां विस्खलित झाली होती तेव्हांची गोष्ट सोडून दिली तरी–जातिजातीमधील विवाह ही एक रोजची गोष्ट होऊन बसली होती. उदाहरणार्थ, पांडवांच्याच एका कुलाची गोष्ट घ्या. पराशर ऋषि हे ब्राह्मण होते. त्यांचें प्रेम एका कोळ्याच्या सुंदर कुमारिकेवर बसलें व त्या दोघांचें अपत्य म्हणजे जगद्विख्यात व्यासमुनि झाले. या व्यासांनीं क्षत्रियकुलांतील राजकन्या अंबा व अंबालिका यांच्या ठिकाणीं दोन पुत्रांची उत्पत्ति केली. या दोन पुत्रांपैकीं पांडु यानें 'नियोग' पद्धतीचा अवलंब करून आपल्या बायकांना संतति उत्पन्न करण्याची परवानगी दिली. आणि त्या बायकांनीं अज्ञात जातींच्या पुरुषांच्या प्रेमाची याचना करून, आपल्या महाकाव्याच्या नायकांना जन्म दिला. याचप्रमाणें त्या कालच्या कर्ण, बभ्रुवाहन, घटोत्कच, विदुर आणि अन्य व्यक्तींच्या इतिहासाबद्दल

उल्लेख न करतां, त्या कालाच्या मानानें आधुनिक अशा चंद्रगुप्ताचें उदाहरण पहाण्याविषयीं आम्ही वाचकांना विनंति करतों. चंद्रगुप्तानें एका ब्राह्मण कन्यकेशीं विवाह लावला व त्यांच्यापासून अशोकाच्या पित्याची उत्पत्ति झाली; आणि या अशोकानें, युवराज असतांना एका वैश्य तरुणीशीं विवाह लावला. हर्ष, जातीचा वैश्य असून, त्यानें आपली मुलगी एका क्षत्रिय राजपुत्राला दिली. व्याधकर्मा हा एका व्याधाचा मुलगा होता, व त्याची आई, त्या व्याधावर प्रेम जडलेली एक ब्राह्मणकन्या होती; व हा व्याधकर्मा विक्रमादित्याचा यज्ञाचार्य झाला होता; सुरदास, कृष्णंभट हा जातीनें ब्राम्हण असूनहि एका चांडालकन्येवर इतका आसक्त झाला कीं, त्यानें उघड रीतीनें तिच्याशीं विवाह लावून संसार थाटला, आणि 'मातंगी पंथ' ह्या नांवाच्या एका धार्मिक पंथाचा तो आद्यप्रवर्तक बनला; आणि हे सर्व लोक स्वतःला 'हिंदु' च ह्मणवितात व तसें ह्मणविण्याचा त्यांना अधिकारहि पोंचतो. एवढ्यावरच हा पुरावा संपला नाहीं. एखादा पुरुष अथवा एखादी स्त्री आपल्या कृतींनीं आपल्या जातीपासून च्युत होईल व दुसऱ्या जातींत ढकलली जाईल. "शूद्रो ब्राम्हणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम्।" "नकुलं कुलमित्याहुराचारं कुलमुच्यते। आचारकुशलो राजन् इह चामुत्र नंदते ॥ उपासते येन पूर्वां द्विजा संध्यां न पश्चितां। सर्वांस्तान् धार्मिको राजा शूद्रकर्मणि योजयेत्॥" ही आज्ञा कांहीं नेहेमीं पोकळ धमकी नव्हती. कित्येक क्षत्रियलोक शेती अथवा दुसरे हलके धंदे पत्करून क्षत्रियाला मिळणाऱ्या मानाला आंचवत असत, आणि दुसऱ्या कोणत्या तरी जातींत गणले जात असत. उलटपक्षीं कित्येक शूर लोक व कांहीं वेळेला सबंद जातीची जाति आपल्या शूर कृत्यांनीं क्षत्रियांचे हक्क व क्षत्रियांच्या पदव्या पावून क्षत्रिय म्हणून गणले जात असत. एका जातींतून बहिष्कृत होणें ही एक रोजचीच गोष्ट होती व असें झालें म्हणजे त्यांचा दुसऱ्या कोणत्या तरी जातींत समावेश होत असे.

हें परिवर्तन फक्त वैदिक आज्ञेप्रमाणें प्रस्थापित झालेल्या जातिसंस्थेवर विश्वास असणाऱ्या हिंदूंमध्येंच घडत असे असें नाहीं तर, अवैदिक असे जे हिंदूंचे पंथ आहेत त्यांमध्येंहि घडत असे. बुद्धकालामध्यें ज्याप्रमाणें एकाच कुटुंबामध्यें बाप बौद्ध, आई वैदिक धर्माची व पुत्र जैनपंथाचा, असा देखावा एकाच कुटुंबात दिसत असे, त्याचप्रमाणें आजहि आपल्याला आढळून येईल. जैन आणि वैष्णव



यांच्यामध्यें गुजराथेंत लग्नें होतात त्याचप्रमाणें शीख व सनातनी यांच्यामध्यें पंजाबांत लग्नें होतात. शिवाय आजचा जो मानभाव किंवा लिंगायत शीख किंवा सत्नामी हा कालचा हिंदु होय. आणि आजचा हिंदु कदाचित् उद्यां लिंगायत, ब्रह्मी अथवा शीख होईल.

आणि 'हिंदु' हें अभिधान जसें आपल्या लोकांच्या एकजातीयत्वाचें पूर्ण दिग्दर्शन करूं शकतें तसें इतर नांव करूं शकत नाहीं. आपल्यापैकीं कांहीं आर्य होते, कांहीं अनार्य होते; परंतु आयर किंवा नायर आपण सर्व हिंदु होतों व एकच रक्त आपल्या धमन्यांतून वहात होतें. आपल्यापैकीं कांहीं ब्राह्मण आहेत आणि कांहीं नामशूद्र अथवा पंचम आहेत. परंतु ब्राह्मण किंवा चांडाल आपण सर्व हिंदु आहोंत, व एकाच रक्तामांसाचे आहात. आपणांपैकीं कांहीं राक्षस होते व कांहीं यक्ष होते. परंतु, राक्षस अथवा यक्ष, आपण सर्व हिंदूच आहोंत व एकच रक्त आपल्या अंगांत खेळत आहे. आपल्यापैकीं कांहीं वानर होते व कांहीं किन्नर होते; परंतु वानर किंवा नर, आपण सर्व हिंदु आहोंत व एकाच रक्ताचे आहोंत. आपल्यापैकीं कांहीं जैन व कांहीं जंगम आहेत; जैन अथवा जंगम आपण सर्व हिंदूच आहोंत व एकाच रक्ताचे आहोंत. आपल्यापैकीं कांहीं एकेश्वरवादी, कांहीं जगदीश्वरवादी; कांहीं आस्तिक, कांहीं नास्तिक; परंतु एकेश्वरवादी अथवा निरीश्वरवादी, आपण सर्व हिंदूच आहोंत व आपल्यामध्यें एकच रक्त खेळत आहे. आपण कांहीं फक्त एकराष्ट्रीयच नाहीं, तर एकजातीय आहोंत; जन्मतःच आपलें बंधुत्व जडलेलें आहे. दुसरा कसलाहि प्रश्न नाहीं. हा फक्त अंतःकरणाचा प्रश्न आहे. आपल्याला असें वाटतें कीं, राम आणि कृष्ण, बुद्ध आणि महावीर, नानक आणि चैतन्य, बसव आणि माधव, रोहिदास आणि तिरुवेल्लवर यांच्या अंगांत जें रक्त खेळत होतें तेंच रक्त सर्व हिंदु जातीमध्यें धमन्याधमन्यांतून खेळत आहे, हृदयाहृदयांतून स्पंदन पावत आहे. आपल्याला असें वाटतें कीं, आपण एका जातीचे आहोंत, एका रक्ताच्या अत्यंत नाजूक बंधनांनीं बांधले गेलेलों आहोंत आणि हें असें वाटतें म्हणून हें असें असलेंच पाहिजे.

एकंदरींत जर पाहिलें तर सर्व जगामध्यें मनुष्य म्हटला कीं, त्याची एकच जाति असली पाहिजे-व ती मानव जाति होय; आपण एकाच रक्ताच्या संचरण्यानें जिवंत राहिलों आहोंत-व तें रक्त म्हणजे मानवी रक्त या व्यतिरिक्त जी

अन्य भावना ती केवळ तात्पुरती, सोईपुरती, आणि फक्त सापेक्षतः सत्य आहे. तुम्ही ज्या ज्या कृत्रिम भिंती जातीजातीमध्यें निर्माण करतां, त्या जमीनदोस्त करण्याकरितां निसर्गाचा सतत प्रयत्न चालू आहे. रक्तारक्ताचें संमिश्रण रोखून धरणें म्हणजे वाळूच्या पायावर इमारत उठविणें होय. सर्व धर्मसंस्थापकांच्या सर्व आज्ञांपेक्षांहि स्त्रीपुरुषांमधलें प्रमाकर्षण हें अधिक बलवान् ठरलें आहे. इतकेंच काय, परंतु अंदमानमधील मूळ रहिवाशांमध्येंसुद्धां आर्यरक्ताचे तुषार परस्परांत मिसळले आहेत. खरोखरीच जर बोलावयाचें तर आपल्याला फक्त इतकेंच म्हणतां येईल कीं, व इतिहासावरूनहि आपल्याला इतकेंच विधान करतां येईल कीं, माझ्या धमन्यांमधून सर्व मानवी जातीचें रक्त खेळत आहे. मनुष्याची या ध्रुवापासून त्या ध्रुवापर्यंतची एकी हेंच सत्य आहे. इतर सर्व फक्त सापेक्षतः आंशिकतः तसें आहे.

आणि याच दृष्टीनें जर पाहिलें तर सर्व जगामध्यें फक्त हिंदूंना व कदाचित् ज्यू लोकांनाच फक्त यथार्थत्वानें आम्ही एकजाति आहोंत असें हक्कानें म्हणतां येईल. एका हिंदूनें दुसऱ्या हिंदूशीं लग्न केल्यानें फार तर त्याची जात जाईल, परंतु त्याचें 'हिंदुत्व' जाणार नाहीं. एखाद्या हिंदूचा कोणत्याहि श्रद्धावान् अथवा पाखंडी, अनुमानसिद्ध तात्त्विक अथवा सामाजिक पद्धतीवर विश्वास बसला तर फार तर त्याचा पंथ त्याला अंतरेल, परंतु, त्याचें हिंदुत्व मात्र अबाधित राहील. कारण, हिंदुत्वाच्या अत्यंत महत्त्वाच्या लक्षणांमध्यें हिंदूंच्या रक्ताचा वारसा असणें हें अत्यंत महत्त्वाचें लक्षण आहे. म्हणून जे जे, सिंधुनदीपासून तों सिंधूपर्यंत (समुद्रापर्यंत) पसरलेल्या भूमीवर पितृभूमि म्हणून प्रेम करतात, त्यांना ज्या जातीनें आपल्यांत मिसळवून व आपलें करून घेऊन, स्वतःची उत्क्रांति करून घेतली, त्या पुरातन 'सप्तसिंधु' जातीचें रक्त जे आपल्या अंगांत संचरत आहे असें हक्कानें म्हणतात त्यांच्याजवळ हिंदुत्वाचीं दोन लक्षणें उपलब्ध झालीं असें म्हणतां येईल.

परंतु, हीं फक्त दोनच लक्षणें होतात. कारण थोड्या विचाराअंतीं हें ध्यानांत येईल कीं, एक राष्ट्र व एक जाति हीं दोनच लक्षण म्हणजे हिंदुत्वाचीं कांहीं सर्व लक्षणें होऊं शकत नाहींत. मुसलमानांपैकीं पुष्कळ लोक, त्यांच्या अज्ञानजन्य दुराग्रहापासून मुक्त होऊन आपल्या देशावर त्यांची पितृभूमि म्हणून प्रेम करूं शकतील, व त्यांच्यापैकीं जे देशभक्त व उदारमनस्क आहेत ते असें सदैव



मानीत आलेच आहेत. त्यांच्या धर्मांतराचा इतिहास, जें धर्मांतर लाखों लोकांच्या बाबतींत जबरीनें केलें गेलें आहे, त्यांच्या मनांत आलें तरी ते विसरूं शकणार नाहींत व तो इतिहास त्यांना असेंच सांगेल कीं, त्यांच्यामध्यें हिंदुरक्तच खेळत आहे. परंतु, आपण जें सत्य जसें आहे तसेंच विचारांत घेण्याचा निश्चय करून—तें कसें असावें अशाबद्दलचा विचार पुढें ठेऊन नव्हे—आज जो या विषयाचा उहापोह करीत आहोंत, तो करीत असतां या मुसलमानांना हिंदु म्हणूं शकूं काय ? काश्मीरमधील व इतर प्रांतांतील कितीतरी मुसलमान, त्याचप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानामधील ख्रिश्चन लोक आपल्यांतील जातिबंधनें इतक्या कडक रीतीनें पाळतात कीं, ते बहुधा लग्नसंबंध आपल्या जातीमध्येंच घडवून आणतात. अशा रीतीनें त्यांच्या रक्तांत परक्यांची भेसळ जवळ जवळ झाली नाहीं. आणि तरीहि त्यांना आपण ज्या अर्थानें हिंदु हा शब्द वापरतों, त्या अर्थानें तो लावतां येणार नाहीं हें उघड आहे. कारण आपण हिंदु लोक, एकाच जन्मभूमीवर असणाऱ्या प्रेमानें आणि एकच रक्त आपल्या हृदयांतील स्पंदन व त्याबरोबर उसळणारी प्रेमाची ऊर्मि यांना जन्म देत असल्यानेंच कांहीं बद्ध झालों नाहीं, तर आपण सर्वजण आपल्या थोर संस्कृतीला, आपल्या हिंदूंच्या संचित ज्ञानाला, जें वंद्य मानतों, त्या योगानेंहि आपण बद्ध झालों आहों. 'संस्कृति' हा शब्द अत्यंत योग्य आणि सार्थ आहे. कारण, त्यामध्यें संस्कृत भाषाहि सूचित होते; व ह्याच संस्कृत भाषेमध्यें आपल्या हिंदुवंशाच्या इतिहासामध्यें जें कांहीं संग्राह्य व उत्तम होतें त्या ज्ञानाचा उच्चार झाला व त्याचा संचयहि ह्याच भाषेमध्यें करून ठेवला. आपण एकराष्ट्र आहोंत, आपण एकजाति आहोंत, व आपली संस्कृति एक आहे, म्हणून आपण एक आहोंत.

परंतु, संस्कृति म्हणजे तरी काय ? संस्कृति म्हणजे मानवी मनाचें आविष्करण होय. संस्कृति म्हणजे मनुष्यानें स्थूलसृष्टीचें काय रूपांतर केलें आहे, याचा इतिहास होय. जर स्थूलसृष्टि ही परमेश्वराची निर्मिति असेल तर, संस्कृति ही अल्पप्रमाणावर दुसऱ्या दर्जाची मानवी निर्मिति आहे हिचें सर्वोत्तम स्वरूप म्हणजे मानवी आत्म्याचा स्थूलसृष्टीवर व मनुष्यावर सारखाच विजय होणें होय. जिथें जिथें मनुष्याला आपल्या आत्म्याचें समाधान होईल अशी जड वस्तूंची घटना करतां येईल तेथें तेथें तितक्या प्रमाणानें संस्कृतीचा जन्म होतो. व जेव्हां-सामर्थ्य, सौंदर्य, आणि प्रेम यांच्याबद्दलच्या मानवी स्वर्गीय आकांक्षा परिपूर्ण

करून, परम आनंदाचे सर्व मार्ग शोधून काढून आयुष्याचा पूर्ण विकास क त्याचें ऐश्वर्य यांचा मनुष्याला पूर्ण उपभोग घडतो तेव्हां संस्कृतीचा पूर्ण विजय होतो.

एखाद्या राष्ट्राच्या संस्कृतीचा इतिहास म्हणजे त्या राष्ट्राच्या विचारांचा, आचारांचा आणि संपादिताचा इतिहास होय. वाङ्मय आणि कला, हीं आपल्याला राष्ट्राचे विचार निवेदित करतात. इतिहास आणि समाजरचना यांच्यावरून राष्ट्राच्या कृत्यांची व त्यानें संपादित केलेल्या गोष्टींची आपल्याला जाणीव होते. यांपैकीं कोणत्याहि बाबतींत मनुष्याला एकलकोंडें रहातां येत नाहीं. अंदमानच्या आदिम वन्य जातीच्या लहान ओबडधोबड पोखरलेल्या लांकडी नावेंत बसून—तिला डुंगी म्हणतात-तिचेंहि अमेरिकेच्या अगदीं आजकालच्या ड्रेडनॉट जहाजांच्या घडण्यामध्येंहि कांहींतरी अनुकरण आहेच आहे. पारीसमधील तरुणीच्या पोषाखामधील अगदीं अलीकडची नवी टूम ही सुद्धां वास्तविक ' पातुआ ' तरुणी आपल्या नग्न कंबरपट्यामध्यें जो एकमात्र पानांचा झुबका खोंवतात, त्याच्याचपासून जन्म पावली आहे.

आणि इतकें असूनहि डुंगी ती डुंगीच राहिली आहे. आणि ड्रेडनॉट तें ड्रेडनॉटच आहे. या दोन्हींमध्यें सारखेपणापेक्षां वैसादृश्यच अधिक आहे आणि त्यामुळें त्यांच्यातलें एकत्त्व उमगून पडत नाहीं. याचप्रमाणें हिंदूंनीं इतर लोकांप्रमाणेंच जरी पुष्कळ गोष्टी लोकांना दिल्या आहेत व लोकांजवळून घेतल्या आहेत, तरी त्यांची संस्कृति दुसऱ्या कोणत्याहि संस्कृतीहून फार भिन्न आहे. त्याचप्रमाणें, त्यांचे आपापसांत कितीहि जरी मतभेद असले तरी त्यांचें एकमेकांशीं असलेलें साधर्म्य, हें वैधर्म्यापेक्षां अधिक आहे, म्हणून एक इतिहास, एक वाङ्मय व एक संस्कृति यांच्या योगानें जगामध्यें इतर ज्या संस्कृति आहेत त्यांपैकींच हीहि एक आद्य संस्कृति आहे व तिचा हा हक्क कोणालाहि नाकबूल करतां येण्यासारखा नाहीं.

' हिंदु लोकांना इतिहास नाहीं. ' अशा तऱ्हेची जी स्वार्थमूलक किंवा अज्ञानजन्य समजूत आधुनिक जगामध्यें प्रचलित आहे, त्या समजुतीनें ज्यांचे कान भारले आहेत, त्यांना हें म्हणणें मोठें विपरीत वाटेल कीं, जवळ जवळ हिंदु लोकांनींच आपला इतिहास जतन करून ठेवण्यांत यश संपादन केलें आहे—व हें इतिहाससंरक्षण अनेक धरणीकंपांच्या धक्क्यांमधूनहि व जलप्रलयांच्या आघातां-



-नंतरहि केलें आहे ! हा इतिहास त्यांच्या वेदांपासून सुरू होतो व हे वेद म्हणजे आपल्या जातीच्या इतिहासाचें विद्यमान असलेलें पहिलें प्रकरण होय. हिंदूंची प्रत्येक कन्या पाळण्यांत जें पहिलें गीत ऐकते तें सीतेचें होय. आपल्यांपैकीं कांहीं लोक रामाची अवतार म्हणून पूजा करतात. कांहीं लोक त्याला वीर आणि योद्धा म्हणून पूज्य मानतात व सर्व लोक त्याला आपल्या जातीचा अत्यंत विख्यात सार्वभौम राजा मानतात. प्रत्येक हिंदूतरुणाच्या, मारुति आणि भीमसेन, ह्या अखंड बलदायी व शारीरिक उन्नतीच्या आदर्श देवता आहेत. सावित्री आणि दमयंती ह्या प्रत्येक हिंदुस्त्रीच्या अखंड पातिव्रत्याचें व अव्यभिचारी प्रेमाचें ध्येय आहेत. गोकुळच्या त्या दिव्य गुराख्यावर राधेनें जें प्रेम केलें, त्याचा प्रतिध्वनि जेथें जेथें हिंदु तरुण, आपल्या प्रियकरणीचें चुंबन घेतो तेथें तेथें उठत असतो. कौरव पांडवांचें महायुद्ध, कर्णार्जुन, भीमदुःशासन, यांचीं तुमुल द्वंद्वें ही जरी हजारों वर्षांपूर्वी कुरुक्षेत्रावर घडून आलीं आहेत, तरी आजहि ती प्रत्येक झोंपडीझोंपडीपासून तों तहत राजवाड्याराजवाड्यापर्यंत त्यांतील हृदय हालवून सोडणाऱ्या रसांसह गाइलीं जात आहेत. अर्जुनाला जितका अभिमन्यु प्रिय नसेल तितका तो आज आपल्यापैकीं प्रत्येकाला आहे. सीलोनपासून काश्मीरपर्यंत, त्या कमलनेत्र तरुणाचें लढाईंतील पतन ऐकून जितक्या प्रेमानें व जितक्या विव्हलतेनें त्याच्या पित्यानें त्या वेळीं आक्रंदन केलें असेल, तितक्याच प्रेमानें व तितक्याच विव्हलतेनें आजहि सबंद हिंदुस्थान आक्रंदन करीत अश्रु ढाळित असतो. यापेक्षां आणखी अधिक काय पाहिजे ? एका मूठभर वाळूच्या कणांप्रमाणें आपणांस जरी दशदिशांस उधळून टाकलें तरी केवळ रामायण व महाभारत हे दोनच ग्रंथ आपणांस पुनरपि एकजाति म्हणून एकजीव करूं शकतील. मी एखाद्या मॅझिनीचें चरित्र वाचतों व उद्गारतों कीं, ' ते किती देशाभिमानी आहेत ! ' तसेंच मी एखाद्या माधवाचार्यांचें चरित्र वाचतों व उद्गारतों कीं, 'आम्ही किती देशाभिमानी आहोंत ! ' पृथ्वीराजाच्या पतनावर बंगालमध्यें अश्रुसेचन होते व गुरुगोविंदसिंग यांच्या देशासाठीं कत्तल झालेल्या पुत्रांबद्दल महाराष्ट्र शोकाकुल होतो.

उत्तर दिशेच्या टोंकाला रहाणाऱ्या आर्य-समाजिस्ट इतिहासकाराला, दक्षिण दिशेच्या टोंकाला जे हरिहर बुक्का, यावनी सत्तेशीं लढले तें आपल्याकरितांच लढले, असें वाटतें; त्याचप्रमाणें दक्षिणच्या टोंकाला असलेल्या सनातनी पंथाच्या इतिहासकाराला गुरु तेजबहादुर हा आपल्याकरितांच मेला असें वाटतें. आपले

राजे सारखे होते, आपली राज्येंहि सारखींच होती. आपली स्थिति सारखीच होती, आपली गति सारखी होती, आपले विजय सारखे होते, आपले पराजय सारखे होते. मोकाबसय्या आणि पिसाळ, एखादा जयचंद आणि काळापहाड, हे आपल्यांत जन्म पावले म्हणून आपली सर्वांचीच लज्जेनें मान खालीं होते. अशोक, भास्कराचार्य, पाणिनी आणि कपिल यांच्या स्मरणानें आपणां सर्वांसच चैतन्य मिळतें, स्वतःला एकप्रकारची धन्यता वाटते.

आतां कोणी विचारील कीं, हिंदूहिंदूंमध्यें ज्या लढाया झाल्या त्यांच्याबद्दल काय? आमचें उत्तर असें कीं, 'इंग्लिशांमध्यें ज्या 'गुलाबांच्या लढाया (Wars of Roses)' 'झाल्या त्यांचें काय?' इटली, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका येथें जे संस्थानासंस्थानांचे, पंथापंथांचे, वर्गावर्गांचें आपापसांत प्रसंगीं परक्यांचें सहाय्य घेऊनहि जे झगडे झाले त्यांचें काय? आणि तरीहि ते सर्वजण एकच लोक एकच राष्ट्र आहेत का? व त्यांचा सर्वांचा एकच इतिहास आहे ना? जर त्यांच्या बाबतींत 'हो' कारार्थी उत्तर, तर हिंदूंच्याहि बाबतींत 'हो' कारार्थींच उत्तर. आणि जर हिंदु लोकांचा एक इतिहास नसेल, तर मग जगावर दुसऱ्या कोणाचाहि एक इतिहास नाहीं.

ज्याप्रमाणें इतिहासावरून आपल्या जातीचा पराक्रम आपल्यास कळून येतो, त्याचप्रमाणें आपल्या वाङ्मयाचा सार्वत इतिहास आपल्या जातीच्या विचारांचा आदर्श आहे. असें म्हणतात कीं, विचार हा शब्दापासून अभिन्न आहे; आणि आपलें वाङ्मय हें सर्वसाधारण भाषा जी संस्कृत तिच्यापासून अभिन्न आहे आणि म्हणून निःसंशय रीतीनें ती आपली जन्मभाषा आहे. ह्याच भाषेमध्यें आपल्या माता बोलत होत्या, व ह्याच भाषेपासून आपल्या हल्लींच्या सर्व भाषा उत्पन्न झाल्या आहेत. आपले सर्व देव संस्कृतमध्यें बोलले, आपल्या ऋषींनी संस्कृतमध्यें विचार केले, आपल्या कवींनीं संस्कृतमध्येंच काव्यें केलीं, आपल्यामध्यें जें जें उत्तम आहे—उत्तम विचार, उत्तम कल्पना, उत्तम लेख—तें सर्व आपोआपच संस्कृतमध्यें प्रगट होतें. लाखों लोकांच्या मतें अजूनहि ही त्यांच्या देवांची भाषा आहे; इतरांच्या ती पूर्वजांची भाषा आहे; आणि सर्वांना ती सर्वोत्तम भाषा म्हणून मान्य आहे. ही आपली सर्वांची पिढीजाद मालमत्ता आहे, हें आपलें संचित आहे. याच्या योगानें गुजराती आणि गुरुमुखी, सिंधी आणि हिंदी, तामिळ आणि तेलगु, महाराष्ट्रीय आणि मल्यालम्, बंगाली आणि सिंघाली,



ह्या आपल्या सर्व सहोदरी भाषा संपन्न झाल्या आहेत. आपणां सर्वांच्या विकारांना आणि आकांक्षांना उत्स्फूर्त आणि उत्तेजित करून त्यांना समसंवेदक बनवणारी मर्मस्थ ज्ञानशलाका म्हणजे संस्कृत भाषा होय. ही कांहीं फक्त भाषाच आहे असें नाहीं. पुष्कळ हिंदूंना तो एक मंत्र आहे; सर्वांना तें एक संगीत आहे. सर्व जैन लोकांना वेद प्रमाणभूत नाहींत. तरीपण आपल्या जातीचा तो एक पुराण इतिहासकथनाचा ग्रंथ म्हणून सर्व जैनांना वेद हे आपल्याप्रमाणेंच मान्य आहेत. आदिपुराण हें कांहीं कोण्या सनातनीपंथानें लिहिलें नाहीं, आणि तरीहि तें सनातनी आणि जैन यांच्या सारख्याच हक्काचें आहे. बसव पुराण हा लिंगाइतांचा मुख्य धर्मग्रंथ आहे, आणि तरीहि तें कानडी भाषेंतील आज अस्तित्वांत असलेल्या सर्व ग्रंथांमध्यें उत्तम व ऐतिहासिक ग्रंथ म्हणून, लिंगाईतांप्रमाणेंच इतर हिंदूंनाहि अभिमानास्पद वाटत आहे. गुरुगोविंदांचें विचित्र नाटक हें बंगाल्यांतील हिंदूंला जितकें आपल्या मालकीचें वाटतें, तितकेंच चैतन्यचरित्रामृत हें शीखांना स्वतःचें वाटतें. कालिदास व भवभूति, चरक आणि सुश्रुत, आर्यभट्ट आणि वराहमिहिर, भास आणि अश्वघोष, जयदेव आणि जगन्नाथ, या सर्वांनीं आपणां सर्वांकरितां ग्रंथलेखन केलें, आपणां सर्वांना स्फूर्ति दिली; ते सर्व आपल्या सर्वांचाच अभिमानाचा ठेवा आहेत. तामील भाषेंतील कंबकवीचें एखादें काव्य व उदाहरणार्थ 'हाफीज'ची एखादी प्रत ही बंगालमधील एखाद्या हिंदूच्या पुढें ठेवा आणि त्याला विचारा कीं, 'यांपैकीं तुझें कोणतें?' तो अंतःस्फूर्तीनेंच उद्गारेल कीं, 'कंब माझा!' महाराष्ट्रांतल्या एखाद्या हिंदूपुढें, रवींद्रनाथांचें एक काव्य व शेक्सपीअरचें एक काव्य अशीं दोन पुस्तकें ठेवलीं असतां तो हक्कानें सांगेल कीं, 'रवींद्रच माझा!'

कलाकौशल्य आणि शिल्पशास्त्राचीं कामें, यांच्यावरचे ग्रंथ हे देखील वैदिक अथवा अवैदिक या दोघांचीहि सारखीच मालमत्ता आहे. कारण, हीं उभारण्यास ज्यांनीं मजुरी केली ते मजूर, त्या मजुरांना ज्यांनीं काम आंखून दिलें ते कारागीर, त्या कारागीरांना देण्यांत येणारा पैसा ज्यांनीं करांच्या रूपानें दिला ती प्रजा, व ज्यांनीं हीं सर्व कामें काढलीं व संघटित केलीं ते राजे, वैदिक किंवा अवैदिक, परंतु जो देश सिंधूपासून सिंधूपर्यंत पसरलेला आहे, त्या देशांत वसति करणाऱ्या हिंदु जातींतीलच हे सर्वजण होते. जे आज सनातनी आहेत त्यांनींच त्या वेळच्या बुद्धांच्या कलाकौशल्ययुक्त शिल्पानें उभारलेल्या स्तंभांना

पैशांनीं आणि अंगमेहनतीनें सहाय्य केलें. व त्या वेळीं जे बुद्ध होते त्यांनीं आजच्या सनातनी लोकांच्या कलाकौशल्ययुक्त शिल्पकामाला पैशानें व अंगमेहनतीनें सहाय्य केलें आहे.

लहानसहान गोष्टींमध्यें कांहीं फरक असले तरी, एकाच तऱ्हेच्या समाजसंस्था व त्या संस्थांना मान्यता देऊन शुद्ध करून घेणारा एकाच तऱ्हेचा कायदा, हीं दोन्हीहि आपल्या जातीची जी मूलभूत ऐक्यता आहे तिचें एकसमयावच्छेदेंकरून कारण व कार्य आहे. हिंदुव्यवहारशास्त्राच्या पायावर उभारलेलें हिंदूंचें कायदेशास्त्र, वरवरचे भेदाभेद कितीहि असले तरी व एखादी विशिष्ट गोष्ट इथें किंवा एखादें वचन तिथें परस्परविरुद्ध सांगितलें गेलें असलें तरी कालदेशपरिस्थितीनें ज्या अनेक घडोमोडी झाल्या त्यामुळें मूळस्वरूप बदलूं देण्याइतकें कांहीं लेचेंपेचें नाहीं. अमेरिका आणि ब्रिटिश कॉमनवेल्थ येथील कायदे करण्याचीं यंत्रें, हीं जरी भराभर कायदे निर्माण करण्यांत मग्न आहेत, तरीहि आम्ही अजून व्यवहारशास्त्राचीं मूलतत्त्वें व ज्या पद्धतीनें त्यांची वाढ होऊन सबंद एक शास्त्र निर्माण झालें ती पद्धति मान्य करीत आहोंत.

* * * *

खोजा किंवा बोहरी ह्या व इतर कांहीं मुसलमानी जाती ह्या जरीं व्यवहाराच्या कांहीं कांहीं बाबतींत—विशेषतः वारस हक्कांचे बाबतींत हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें चालत असल्या, तरी एकंदरींत महंमदी कायद्यानें आपलें व्यक्तिवैशिष्ट्य कायम ठेवलें आहे. महाराष्ट्रांतील किंवा पंजाबमधील हिंदुलोकांच्या कांहीं चाली बंगाल अथवा सिंध येथील कांहीं चालीरीतींपेक्षां भिन्न असतील. परंतु, इतर सर्व बाबतींत असलेलें ऐक्य इतकें मोठें आहे कीं, महाराष्ट्रांतील एकंदर सर्व चालीरीती ह्या जणूं काय, बंगाल वा सिंधमधील हिंदूंच्या कायदेशास्त्राचा प्रतिध्वनिच आहेत असें वाटतें; व उलटपक्षीं बंगाल किंवा सिंधबद्दलहि तसेंच म्हणतां येतें. कोणत्याहि एका पोटजातींतील नियम, चालीरीति व कायदे हीं सर्व एकसमयावच्छेदें करून घेतलीं तर आपणांस असें आढळून येईल कीं, तीं सर्व मिळून हिंदुधर्मशास्त्राचा एक संपूर्ण भाग होऊं शकतो. परंतु तेंच जर इंग्लिश, महंमदी किंवा जपानी कायदेग्रंथांशीं त्यांचा कितीहि कौशल्यानें किंवा अर्थाची ओढाताण करून मेळ घालण्याचा प्रयत्न केला तरी तो विफल होतो.



आपले सण आणि उत्सव हे सारखेच आहेत. आपले विधि आणि आपले संस्कार हे सारखेच आहेत. दसरा आणि दिवाळी, त्याचप्रमाणें राखीबंधन आणि होळी, हे सण जेथें जेथें हिंदु मनुष्य आहे, तेथें तेथें पाळले जातात. शीख आणि जैन, ब्राह्मण किंवा पंचम, हें सर्वच-सर्व हिंदुजगचेंजग, दिवाळीच्या सणाच्या वेळीं उत्सवमग्न होतें. आणि हें फक्त ह्या हिंदुस्थानमध्येंच नव्हे तर सर्व खंडांमध्यें जो एक मोठा हिंदुस्थान तयार होत आहे तेथेंहि आढळून येतें. सबंद तराईच्या जंगलामध्यें त्या रात्रीं अशी एकहि झोंपडी तुम्हाला सांपडणार नाहीं, कीं जेथें एकहि पणती पेटली नाहीं ! तसेंच राखीबंधनाचा दिवस पंजाबमधील हर्षोत्फुल्ल कन्यकांपासून, तों मद्रासच्या कर्मठ ब्राम्हणांपर्यंत प्रत्येक हृदय उचंबळून सोडतो व एकमेकांच्या हातांत रेशमी राखी बांधतां बांधतां ते सत्यतेनें म्हणतात कीं ‘ भाई भाई एकठायीं । भेद नाहीं, भेद नाहीं. ’ तरी आम्ही मुद्दाम हिंदूंमधील ज्या सर्वसामान्य धर्मसमजूती आहेत त्याबद्दल मुळींच उल्लेख केला नाहीं. किंवा कोणत्याहि संस्थेचा, गोष्टीचा अथवा चालीचा धार्मिक स्वरूपाच्या किंवा वैशिष्ट्याच्या दृष्टीनें विचार केला नाहीं. कारण आम्हाला हिंदुत्वाच्या मूलभूत तत्त्वांचा विचार कोणत्याहि धार्मिक दृष्टीनें नव्हे तर जातीय दृष्टीनें करावयाचा होता आणि तरीहि राष्ट्रीय अथवा जातीय दृष्टीनेंसुद्धां निरनिराळीं तीर्थस्थानें, हीं, आपल्या हिंदु जातींची सर्वसामान्य आनुवंशिक मालमत्ता आहे असें सिद्ध होतें. जगन्नाथाची रथयात्रा, अमृतसरची वैशाखी, कुंभ आणि अर्धकुंभमेळा हीं सर्व आपल्या लोकांच्या सत्य आणि जिवंत अशा महापरिषदाच होत व त्या योगानें आपल्या जीवनाचा व विचारांचा प्रवाह सतत आपल्या राष्ट्रशरीरामधून वहात ठेवला जात असे. त्यांमधील चमत्कारिक चालीरीति, विधि आणि शास्त्र हीं कांहीं धार्मिक कर्तव्यें म्हणून, कांहीं सामाजिक उत्सवाचे प्रसंग म्हणून पाळले जातात व प्रत्येक व्यक्तीच्या मनावर ठसा उमटवितात कीं, जर आपल्याला आपलें जीवन उत्तम रीतीनें स्थापित करावयाचें असेल तर तें केवळ सर्वसामान्य अशा एकत्र बद्ध झालेल्या हिंदु जातीच्या अस्तित्वांतूनच होय.

तेव्हां एकंदरींत थोडक्यांत ह्मणावयाचें म्हणजे—आणि हातीं घेतलेला प्रतिपादनाचा विषय ह्या मुद्यावर अधिक विवरण करूं देतच नाहीं—हीं वरील लक्षणें आमच्या संस्कृतीचें मुख्यांग होतात व आमच्या राष्ट्राला सुधारणेचा एक घटक म्हणून समजण्यांत येतात. आम्हीं हिंदु फक्त राष्ट्रच नाहीं, कांहीं

एक जातीच नाहीं, परंतु, आम्ही हे दोन्हीहि असल्यानें व आहों, म्हणून जी सर्व ' प्राकृत ' भाषांची जननी त्या संस्कृतमध्यें मुख्यतः आणि प्रथम निवेदित केलेली व संरक्षण करून ठेवलेली संस्कृति आज आमच्याजवळ आहे. जो जो म्हणून हिंदु आहे त्याची या संस्कृतीवर वारसदारी आहे. त्याचप्रमाणें तो जसा आपला देह ह्या भूमीपासून व आपल्या पूर्वजांच्या रक्तापासून धारण करतो, तसा तो आपला अध्यात्म, ह्या संस्कृतीपासून प्राप्त करून घेतो.

याप्रमाणें, हिंदु तो की, ज्याला सिंधूपासून सिंधूपर्यंत पसरलेल्या भूमीबद्दल, आपल्या पूर्वजांची ही जन्मदात्री म्हणून जन्मभूमीप्रमाणें प्रेम वाटतें, ज्याच्या अंगांत हिमालयाच्या अक्षांशारेखांशामधील वैदिक सप्तसिंधूमध्यें प्रथम वसाहत केलेल्या महान् मानवी वंशाचें रक्त खेळत आहे, व जो मानवी वंश ज्याच्या ज्याच्याशीं त्याचा संसर्ग आला त्यास आपणांत मिसळून घेऊन, व जें असें आत्मसात केलें त्यास उन्नत करून वृद्धिंगत झाला आणि ' हिंदुलोक ' या नांवानें जगांत ख्यात झाला, त्या वंशाचें रक्त ज्याच्या अंगांत खेळत आहे, तो हिंदु होय; आणि ह्या वरील कारणांवरून, समान इतिहास, समान दैवतें, समान वाङ्मय, एक शिल्पशास्त्र, एक कायदा आणि एक व्यवहारशास्त्र, समान यात्रा आणि उत्सव, समान व्रतवैकल्यें, आन्हिकें आणि शास्त्रार्थ यांनीं बनलेली जी हिंदु संस्कृति तिचा जो वारसदार आहे व म्हणून तिला आपली समजतो, तो हिंदु होय. याचा अर्थ असा नाहीं कीं, प्रत्येक हिंदु यांपैकीं सर्व गोष्टींचें अक्षरान् अक्षर दुसऱ्या हिंदुबरोबर मान्य करतो; परंतु, कोणत्याहि अरब किंवा इंग्लिश मनुष्यापेक्षां, या संस्कृतीपैकीं अधिकांश त्याचा दुसऱ्या हिंदूबरोबर समान आहे असा याचा अर्थ आहे. याचा अर्थ असा नाहीं कीं, जो अहिंदु आहे, तो या गोष्टींपैकीं कोणत्या गोष्टींत हिंदुप्रमाणेंच विश्वास ठेवीत नाहीं, परंतु, हिंदूशीं जितक्या त्याच्या समान गोष्टी असतात, त्याच्यापेक्षां असमान गोष्टीच जास्त असतात. आणि ह्याच कारणाकरितां, जे थोड्याच दिवसांपूर्वी बहुतेक उदाहरणांमध्यें हिंदु होते व जे निदान पहिल्या पिढीमध्यें तरी, त्यांच्या नव्या गोटांत अनिच्छु अनुयायी होते असे ख्रिश्चन व मुसलमान लोक हे जरी ह्या भूमीला आपली जन्मभूमि म्हणूं शकतील, व जवळ जवळ शुद्ध हिंदु रक्ताचे म्हणतां येतील तरीहि त्यांना ' हिंदु ' गणतां यावयाचें नाहीं. कारण, ज्या वेळेपासून त्यांनीं नवीन धर्माचा स्वीकार केला त्याच वेळेपासून त्यांचा हिंदुसंस्कृतीवरचा हक्क उडाला. त्याच क्षणीं ते



हिंदुसंस्कृतीशीं भिन्न अशा अन्य संस्कृतीचे एक घटकावयव बनले किंवा आपण बनलों असें त्यांना वाटलें, त्यांचीं दैवतें आणि त्यांचें देवतापूजन, त्यांच्या यात्रा आणि उत्सव, त्यांचीं ध्येयें आणि आयुष्यांतील आकांक्षा हीं सर्व आपल्यापेक्षां भिन्न झालीं. याप्रमाणें स्वजातीय संस्कृतीवर अनन्यसामान्य प्रेम व अभिमान असणें, ह्या हिंदुत्वाच्या तिसऱ्या लक्षणानें, कोणत्याहि तऱ्हेच्या अति व्याप्तीच्या वा निषेधात्मक व्याख्येशिवाय हिंदुत्वाचें स्वरूप पूर्णपणानें ठरविणें शक्य झालें आहे.

आतां आपल्या एखाद्या बोहरी किंवा खोजा देशवासीयाची गोष्ट पाहूं. तो हिंदुस्थानावर जन्मभूमीप्रमाणें प्रेम करतो व ही त्याच्या पूर्वजांची भूमि निश्चयानें आहेहि. कित्येक वेळां त्याच्या अंगांत अस्सल हिंदु रक्तहि असतें. आणि जेव्हां असा मनुष्य त्याच्याच हयातींत मुसलमान झालेला असतो, तेव्हां तर हिंदु आई–बापांचें रक्त त्याच्या अंगांत असतेंच. तो एकदम समंजस व बुद्धिप्रधान मनुष्याप्रमाणें आपल्या इतिहासावर व दैवतांवर प्रेमहि करीत असेल. वास्तवीक बोहरी व खोजे लोकांची जमात दशावतारांची पूजा करतात व महंमद हा अकरावा अवतार मानतात इतकाच फरक. यांची सबंद जमात हिंदु कायद्याप्रमाणेंच शासित होत आहे. राष्ट्र, जाति व संस्कृति या तीनहि लक्षणांच्या दृष्टीनें ते हिंदु आहेत. त्यांच्या कांहीं उत्सवांत फरक असेल. त्यांच्या अवतारी पुरुषांच्या व दैवतांच्या मंडलांत कांहीं अधिक अवतारांची भर पडली असेल. परंतु, आम्ही वारंवार म्हटलें आहे कीं, दुय्यम प्रतीच्या गोष्टींत थोडासा फरक वा दुसऱ्या एखाद्या गोष्टीवर अधिक भर, एवढ्यामुळें कांहीं कोणी हिंदुसंस्कृति–बाह्य होत नाहीं. हिंदूंमधील उपजातीमध्यें अशा एकमेकांच्या विरुद्धच नव्हे तर एकमेकांशीं तत्वतः भिन्न असलेल्या अनेक चालीरीति आहेत. आणि तरीहि ते सर्व हिंदुच आहेत. त्याचप्रमाणें एखाद्या देशभक्त बोहरी, ख्रिश्चन किंवा खोजा गृहस्थाच्या बाबतींत हिंदुत्वाचीं वर निवेदन केलेलीं तीनहि लक्षणें इतकीं लागू पडत असल्यावर मग त्यास हिंदु कां म्हणूं नये ?

वास्तविक त्यास हिंदु म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं. परंतु, हिंदुत्वाच्या एका विवक्षित लक्षणाच्या कसोटीवरून त्यास हिंदु म्हणतां येत नाहीं. हें लक्षण जरी संस्कृति या सदरांत येण्यासारखें आहे तरी संस्कृतीच्या इतर अंगोपांगामध्यें तें लुप्त होण्याइतकें क्षुल्लक नाहीं, आणि म्हणून त्याच्याबद्दल विशेष विवेचन

करणें अगत्याचें आहे. हें विवेचन करीत असतांना, हिंदुत्वाच्या धार्मिक स्वरूपा-कडे लक्ष देणें अवश्य होणार आहे, आतांपर्यंत आम्हीं मुद्दाम ह्या स्वरूपाकडे काणाडोळा केला होता. याचें कारण, आम्हाला त्याचें विवेचन करण्याचा संकोच वाटत होता असें नाहीं, तर तें विवेचन अधिक सांगोपांग व परिणामकारक व्हावें म्हणून आम्हीं तो भाग अलाहिदा राखून ठेविला होता. आतां सर्व बाजूंनीं त्याचें विवेचन करण्याइतकी सामुग्री आमच्यापाशीं तयार झाली आहे व म्हणून त्याचें महत्व आणि 'हिंदुत्व' व 'हिंदुइझम' (हिंदुधर्म) या दोहोंमधील अंतर निश्चित करण्यास अधिक सुलभ होणार आहे.

## ६

'हिंदुत्व' व 'हिंदुइझम' हे दोन्हीहि शब्द 'हिंदु' या शब्दापासून उत्पन्न झाले असल्यामुळें त्यांचा अर्थ सर्व हिंदुजाति असाच घेतला पाहिजे. हिंदुइझमच्या ज्या व्याख्येच्या योगानें हिंदु जातीचा कोणताहि महत्वाचा भाग बाहेर राहील, किंवा त्याला आपल्या समजुती छपवून ठेवणें भाग पडेल, ती व्याख्या अर्थातच निरुपयोगी ठरेल. 'हिंदुइझम' याचा अर्थ म्हणजे हिंदु लोकांमध्यें सर्वसाधारण ज्या धार्मिक समजुती आढळतात त्यांना एकीकृत करणारी पद्धति. आणि हिंदूंच्या ह्या धार्मिक समजुती शोधून काढण्याचा म्हणजे 'हिंदुइझम' काय आहे हें जाणण्याचा एकच मार्ग म्हटला म्हणजे प्रथम आपल्याला 'हिंदु' ह्या शब्दाची व्याख्या केली पाहिजे. परंतु 'हिंदु' ह्या शब्दाची व्याख्या निर्णीत करण्याचें सोडून देऊन 'हिंदुइझम' ह्या शब्दाचा अर्थ ध्यानांत येणें शक्य नाहीं. परंतु ही गोष्ट विसरून जाऊन, पुष्कळ लोक 'हिंदुइझम' चीं लक्षणें निश्चित करण्याचा प्रयत्न करतात व जेव्हां त्यांना सर्व हिंदुजातींचा समावेश करणारी अशी समाधानकारक व्याख्या सांपडत नाहीं, तेव्हा शेवटीं अशा निकराच्या निर्णयावर येतात कीं, तर मग ह्या जाति हिंदु नाहींतच! परंतु, याहि निर्णयानें त्यांचें समाधान होत नाहीं. कारण, त्यांनी रचलेली ही व्याख्या सर्वव्यापी असते असें नाहीं. तर ह्या सद्‌गृहस्थांनीं हिंदु-इझमची जी व्याख्या केली असते त्या व्याख्येमध्यें दर्शित केलेलीं लक्षणें ना जाति मानीत नाहीं म्हणून! 'हिंदु' कोण? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याचा हा खरो-खरीच उलटा प्रकार आहे व त्यामुळें आपल्या अवैदिक, शीख, जैन, देवसमाजी



व देशाभिमानी आणि प्रगतिशील जे आर्यसमाजी त्यांच्यासुद्धां ह्या सर्व अवैदिक पंथांतील बंधूंना यांच्यापासून बराच रोष येतो.

'**हिंदु कोण?**'—तर तो, कीं जो हिंदुधर्माचीं तत्त्वें मानतो. तर मग ठीक आहे. आतां 'हिंदुधर्म' म्हणजे काय? तर ज्या तत्त्वांनीं हिंदुलोक बद्ध आहेत, त्या तत्त्वांचा समुच्चय तो हिंदुधर्म होय! अशा रीतीनें हा प्रश्न सोडविणें म्हणजे एखाद्या चक्रव्यूहांत सांपडण्यासारखेंच आहे व अशा पद्धतीनें कोणताहि समाधानकारक निर्णय लागणें शक्य नाहीं. आमच्या पुष्कळ मित्रांनीं ह्या चुक-लेल्या मार्गाचा अवलंब करून वरील प्रश्नाचा निर्णय करण्याचा प्रयत्न केला व अखेर आम्हाला येऊन सांगूं लागले कीं' 'छे! हिंदु' म्हणून कुणी लोकच ह्या जगामध्यें नाहींत!' ज्या इंग्लिश मनुष्यानें 'हिंदुइझम' हा शब्द निर्माण केला त्या मनुष्याइतकी बुद्धिमत्ता असलेला एखादा हिंदी गृहस्थ, जर 'हिंदुइझम्' प्रमाणें 'इंग्लिशिझम्' असा शब्दप्रयोग निर्माण करील व इंग्लिश लोकांच्या धर्मकल्पनामधील ऐक्य शोधण्याचा प्रयत्न करील व त्यांच्यांतील त्रिमूर्तीच्या तत्त्वापासून तों उपयुक्ततेच्या तत्त्वज्ञानापर्यंत व ज्यू लोकांपासून तों ज्याकोबिनपर्यंत आस्तित्वांत असलेले अनेक पंथ व अनेक समाज पाहून गोंधळून जाऊन व कंटाळून असें जाहीर करील कीं, 'छे! इंग्लिश' म्हणून कुणीहि लोक ह्या पृथ्वीच्या पाठीवर मुळीं नाहींतच!' तर हें म्हणणारा मनुष्य जितका हास्या-स्पद होईल, तितकाच अगदीं निराशेनें ''हिंदु' म्हणून कोणी मनुष्यसमाजच जगांत आस्तित्वांत नाहीं' हें म्हणणारा मनुष्यहि हास्यास्पद होईल. ज्या कोणाला ह्या मुद्यावर कसा घोंटाळा उडतो व तो घोंटाळा 'हिंदुत्व' व 'हिंदुइझम' ह्यांच्यामधील फरक लक्ष्यांत न आल्यामुळें, कसा अधिकच गोंधळून टाकतो हें पहाणें असेल, त्यांनीं 'नटेशन आणि कंपनी' या साहसी प्रकाशकांनीं प्रसिद्ध केलेलें 'हिंदुइझमचीं मूलतत्त्वें' हें लहानसें पुस्तक अवश्य वाचावें.

'हिंदुइझम' म्हणजे हिंदूंचा जो 'इझम' म्हणजे धर्म, तो. आणि ज्याप्रमाणें 'हिंदु' हा शब्द प्रथम ''सिंधु' [सिंधुनद] ह्या शब्दापासून उत्पन्न झाला व त्याचा प्रथम अर्थ सिंधु नदापासून तों सिंधु [समुद्रा] पर्यंतच्या भूमीवर जे लोक वसति करतात ते लोक असा झाला; त्याचप्रमाणें साहजिकरीत्या 'हिंदुइझम' याचा अर्थ ह्या भूमीमध्यें रहाणाऱ्या लोकांचा जो विवक्षित व नैसर्गिक धर्म अथवा जे धर्म ते असाच झाला पाहिजे. आणि जर त्यांतील निरनिराळीं

तत्त्वें व धर्मसमजुती यांचा तुम्हांला एकाच धर्मपद्धतींत मिलाफ करतां आला नाहीं तर तुम्हाला फक्त एकच मार्ग रहातो, व तो म्हणजे हा कीं, ' हिंदुइझम ' ही एक धर्मपद्धति आहे असा हक्क सांगण्याचें सोडून द्यावें, व असें म्हणावें कीं, हिंदुधर्म हा परस्परानुकूल–अथवा जर हवें असेल तर असेंहि म्हणा कीं, परस्पर-प्रतिकूल, इतकेंच काय परंतु, परस्परविरोधी अशा पद्धतींचा एक समूह आहे. परंतु, कोणत्याहि आधारावर तुम्हाला असें प्रतिपादन करतां यावयाचें नाहीं कीं, ' हिंदुइझम ' या शब्दाची व्याख्या करतां येत नाहीं म्हणून हिंदुराष्ट्राचेंच अस्तित्व संशयास्पद आहे; किंवा याहूनहि अधिक हानिकर म्हणजे आपल्या अवैदिक हिंदूंच्या किंवा वैदिक हिंदूंच्या–कोणाच्याहि–मनोवृत्तींना ' तुम्ही ' हिंदुइझमच्या आमच्या व्याख्येंत येत नाहीं म्हणून तुम्ही ' अहिंदु'च आहांत असें म्हणून दुखावितां येणार नाहीं.

या निबंधाच्या ज्या मर्यादा आहेत त्यामध्यें ' हिंदुइझम'चीं मूलतत्त्वें काय आहेत, याचें विवेचन किंवा त्याची सांगोपांग चर्चा आम्हाला फार विस्तारानें करतां येत नाहीं. आम्ही वर दाखविल्याप्रमाणें ' हिंदुइझम ' म्हणजे काय, याची चर्चा, हिंदुत्वाचीं मूलतत्त्वें ठरवून ' हिंदु कोण ? ' याचें निदान ठरविल्यावांचून योग्य रीतीनें होणेंच शक्य नाहीं. आणि ज्या अर्थी आमच्या या पुस्तकाचा सांप्रतचा हेतु, ' हिंदु कोण ? ' हें ठरविण्याकरितां ' हिंदुत्वाचीं मूलतत्त्वें 'काय' याचा निर्णय ठरविण्याचा आहे, त्याअर्थी ' हिंदुइझम ' बद्दलची चर्चा करणें हें अर्थातच या विवेचनाच्या कक्षेबाहेर पडतें. आमच्या सद्यःप्रतिपादनाच्या प्रांतांत जितक्या पुरता त्याचा संबंध येतो तितक्याचपुरता त्याबद्दलचा विचार कर्तव्य आहे. ' हिंदुइझम ' हा वास्तविक असा शब्द आहे कीं, तो हिंदूंमधील निरनिराळे समाज ज्या धर्मसमजुती धारण करतात त्या सर्वांना मिळून लावला पाहिजे. परंतु प्रांप्रत हा शब्द फक्त बहुसंख्य हिंदुलोक ज्या धर्मकल्पनांना मानतात त्यांनाच फक्त लाविला जातो. आतां हें अगदीं साहजिक आहे कीं, एखाद्या धर्माचें, एखाद्या देशाचें, किंवा एखाद्या समाजाचें नांव, हें तो धर्म, तो देश अथवा तो समाज, ज्या एका विशिष्ट स्वरूपाला त्यांतील बहुसंख्य लोक मानतात व ज्या एका विशिष्ट स्वरूपानेंच मुख्यत: तो बनविला अथवा रचला जातो, त्या विशिष्ट स्वरूपावरूनच ठेवलें जातें. व असें ठेवलेलें नांव हें नेहमीच्या बोलण्याचालण्यांत संबोधण्याला व संदर्भ दाखविण्याला सोईचें पडतें हेंहि खरें आहे.



परंतु, एखादें नामाभिधान हें असें सोईचें पडतें हेंहि खरें आहे. परंतु; एखादें नामाभिधान हें असें सोईचें असलें तरी जर तें केवळ विभ्रम उत्पन्न करणारेंच नव्हे तर निश्चिततेनें हानिकर व दिशाभूल करणारें असेल तर, त्यायोगानें इतःपर आपल्याला आपली न्यायान्यायबुद्धि अंध होऊं देतां उपयोगी नाहीं. हिंदूंमधील बहुसंख्य लोक ' श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्म ' अथवा ' सनातनधर्म ' म्हणून ज्याचा विशिष्ट रीतीनें यथायोग्य उल्लेख केला जातो त्याचेच अनुयायी आहेत. या धर्माला ' वैदिक धर्म ' असें जरी नांव दिलें तरी त्यांची कांहीं हरकत येईल असें नाहीं. परंतु, यांच्याशिवाय असे कांहीं हिंदु आहेत कीं, ते अंशतः अथवा सर्वतः कांहीं पुराणांना मानीत नाहींत, तर कांहीं स्मृतींना मानीत नाहींत तर कांहीं प्रत्यक्ष स्मृतींना देखील मानीत नाहींत. परंतु जर तुम्ही बहुसंख्य हिंदुलोक जो धर्म मानतात तोच मात्र केवळ पुराण हिंदुधर्म असें म्हणूं लागलां, म्हणजे मग निरनिराळ्या विजातीय पंथांच्या अनुयायांना ते स्वतः हिंदु असल्यामुळें, हिंदुत्वाचे सारे अष्टाधिकार आपणच बळकावूं पहाणाऱ्या, व त्यांना अन्याय्य रीतीनें बहिष्कृत करणाऱ्या बहुसंख्य हिंदूंचा साहजिकच सात्त्विक संताप येतो. अल्पसंख्याक लोकांच्या धर्माला देखील कांहींतरी एखादें नांव पाहिजे. परंतु, जर तुम्ही पुराणमातभिमानी लोकांच्या धर्मालाच हिंदुधर्म असें मानाल तर मग अल्पसंख्याक लोकांचे विजातीय धर्मपंथ हे कांहीं हिंदुधर्मांतले नव्हत हें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें व हीच विचारपरंपरा जर अशीच पुढें चालू ठेवली तर याच्या पुढची अत्यंत हानिकारक गोष्ट म्हणजे ' म्हणून मग ते पंथ हिंदुच नव्हत ', हें म्हणणें होय ! परंतु, हा निष्कर्ष, जें विधान एकदा मूलतः अनिच्छेनें कां होईना, परंतु हटातटानें उचलून धरल्यानें अनिर्वाह्य झाला, तोच निष्कर्ष, ज्यांनीं त्याला उचलून धरलें त्यांना सुद्धां इतका अपथ्यकर व असह्य वाटला कीं तो मान्य करणें जरी जिवावर आलें, तरी त्याची विल्हेवाट कशी लावावी याची मात्र त्यांना पंचाईत पडली. याप्रमाणें आपल्या लाखों शीख, जैन, लिंगायत, अनेकसमाजी, व इतर लोकांना, जरी त्यांचे दहा दहा पिढ्यापर्यंचे वाडवडील हे हिंदुच होते व त्यांच्या अंगांत जरी हिंदु रक्तच वहात होतें तरी, ' तुम्ही अतःपर हिंदु नाहीं ' असें सांगितलें म्हणजे साहजिकच त्यांना अपमान झाल्याप्रमाणें राग येईल. परंतु त्यांच्यामध्येंहि असा एक वर्ग आहे कीं, यांची गृहीत कृत्याप्रमाणें अशी ठाम समजूत आहे कीं, त्यांच्यापुढें फक्त दोनच मार्ग खुले आहेत. एक तर त्यांनीं सुधारणा करण्याच्या व धर्माला उत्क्रांत कर-

ण्याच्या भरांत ज्या धर्मसमजुती व रीतिरिवाज केवळ धर्मभोळेपणा म्हणून अव्हेरल्या, त्यांचाच पुनः स्वीकार करावा किंवा ज्या जातींत त्यांचे वाडवडील जन्मले आणि मेले, त्या जातीलाच रामराम ठोकावा.

वरीलप्रमाणें, मनें बिघडण्याचें कारण म्हणजे, बहुसंख्याक लोकांच्या धर्माचारालाच फक्त ' हिंदुइझम ' हा शब्द लावण्याची चुक झाली हें होय. याला उपाय म्हणजे एकतर आपण या शब्दाचा उपयोग हिंदु लोकांच्या सर्व धर्मपंथांना संबोधण्याकरितां करावा, अथवा तें जर आपणास करतां न आलें तर हा शब्दच मुळीं अजीबात गाळून टाकावा. बहुसंख्याक हिंदुलोकांच्या धर्मपंथाला पूर्वीपासून चालत आलेलें सार्थ नांव जें सनातन धर्म, अथवा श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्म, किंवा वैदिक धर्म यांपैकीं कोणतेंहि नांव लावावें; व बाकीच्या हिंदुलोकांना त्यांच्या त्यांच्या सर्वमान्य व प्रचलित नांवानें म्हणजे शीख धर्मी, आर्य—धर्मी, किंवा जैन आणि बुद्धधर्मी अशा नांवानींच संबोधावें. ज्या वेळीं या सर्व धर्मांना एकसमयावच्छेदेंकरुन संबोधण्याचे प्रसंग येतील त्याच वेळीं फक्त सर्वांना ' हिंदुधर्म ' अथवा ' हिंदुइझम ' असें म्हणावें. आणि असें केल्यानें कोणत्याहि प्रकारचा स्पष्टार्थाला किंवा सदसद्विवेकबुद्धीला धक्का न बसतां, उलट त्यायोगें कांटेकोरपणा व असंदिग्धता हींच अधिक होतील. त्यायोगानें अल्पसंख्याक लोकांच्या मनांतील संशय व बहुसंख्याक लोकांच्या मनांतील राग हीं दोन्हीहि नष्ट होऊन, आपणा अखिल हिंदुजातीला पुनः एकदां एकजीव व्हावयास सांपडून, एकजातीच्या व एक संस्कृतीच्या पुराणपवित्र वैभवशाली निशाणाखालीं आपण पुनरपि नांदं लागूं.

अखिल मानवजातीबद्दल न बोलतांना तूर्त फक्त हिंदु जातीबद्दलच बोलावयाचें म्हटलें तरी त्यांच्या धर्मविचारांचे प्रथमाविष्करण जें झालें तेंच ऋग्वेद होय. वेद कालीन सप्तसिंधूचें राष्ट्र हें अनेक जाति व अनेक वर्ग यांमध्यें विभागलें गेलें होतें. त्या वेळच्या बहुसंख्याक लोकांचा धर्म जरी, ज्याला आपण वैदिक धर्म असें म्हणतों तो होता, तरीहि ' सप्तसिंधु ' मधीलच, कांहीं प्रतिष्ठित व वजनदार अल्पसंख्याक लोक त्याचे अनुयायी नव्हते. उदाहरणार्थ पाणी, दास, व्रात्य आणि इतर अनेक लोक, हे अनेक वेळां या वैदिक धर्माचें अनुयायित्व झुगारून देत असत व कांहीं कांहीं तर मुळीं त्याचे कधीं प्रथमपासूनच अनुयायी नव्हते. तरीहि त्यांना पूर्ण जाणीव होती कीं, जातीयदृष्ट्या अथवा राष्ट्रीयदृष्ट्या आपण



सर्व एकच लोकसमूह आहों. वैदिक धर्म या नांवानें ओळखला जाणारा एक पंथ त्या वेळीं अस्तित्वांत होता. परंतु, तरी देखील तो ' सिंधुधर्मा ' च्या अंतर्गत असा समजला जात नव्हता. कारण, जर ' सिंधुधर्म ' हा शब्द मुद्दाम निर्माण केला असता तर त्याचा साहजिकच अर्थ सप्तसिंधूंमधील सर्व पुराण व नवे धर्मपंथ असाच झाला असता. शक्य तें तें पचविणें व अनिष्ट तें तें टाकून देणें या पद्धतीनें ' सिंधु ' ही जाति ' हिंदु ' या जातिस्वरूपांत परिणत झाली व सिंधूंची जी भूमि ' सिंधुस्थान ' हें ' हिंदुस्थान ' या नांवानें सर्वांना पुढें ज्ञात झालें. त्यांच्यामधील पुराणमताभिमानी व भिन्नभिन्न मतांच्या प्रवर्तकांनीं पुष्कळ गोष्टींचा अनुभव घेऊन, पुष्कळ गोष्टींचा शोध लावून आणि पुष्कळ गोष्टींचें ज्ञान संपादन करून अल्पांतल्या अल्पापासून तों भव्यांतल्या भव्यापर्यंत, अणुपासून तों आत्म्यापर्यंत, परमाणूपासून तों परब्रह्मापर्यंत, जें जें वस्तुजात आहे त्याच्या बद्दल, त्या वेळच्या परिस्थितींत जी जी शक्य ती ती सर्व सूक्ष्म चिकित्सा करून, विचारसृष्टींतील खोल लपलेल्या गुह्यांचा ठाव काढून आणि परम सुखाच्या उच्चतम वातावरणांत भरारी मारून हें सर्व करून त्यांनीं असें एक समीकरण शोधून काढलें कीं, ज्यामुळें सत्यान्वेषणार्थ झटणाऱ्या प्रत्येक भक्ताला, मग तो एकेश्वरवादी, द्वैती किंवा अनीश्वरवादी असो, समाधान प्राप्त झालें. तें समीकरण केवळ वैदिक नाहीं; केवळ अवैदिक नाहीं. तें दोन्ही मिळून आहे. तें प्रत्यक्ष धर्माचें अचुक शास्त्र आहे आणि हाच ' हिंदुधर्म ' होय. वैदिक, सनातनी, जैन, बौद्ध, शिख, किंवा देवसमाजी या सर्व प्रकारच्या धर्ममतांची एकवाक्यता करून जीं कांहीं निर्णायक सत्यतत्त्वें निघालीं त्या सत्यतत्त्वांचें सत्यतत्त्व म्हणजे हा ' हिंदुधर्म ' होय. जीं जीं धर्ममतें व धर्मपंथ, ' सप्तसिंधु ' म्हणून गाजलेल्या पुण्यभूमींत, आणि वैदिक काळामध्यें हिंदुस्थानच्या इतर भागांतील अज्ञात असलेल्या इतर जातींत उत्पन्न झालीं व जीं वैदिक, अथवा अवैदिक परंपरेपासून प्रत्यक्ष उत्पन्न होऊन फैलावत गेलीं, असलीं प्रत्येक धर्ममतें आणि असले सर्व धर्मपंथ हीं हिंदुधर्मांत समाविष्ट होतात व त्याचा प्राणभूत भाग बनतात.

एवढ्याकरितां, ' वैदिक ' अथवा ' सनातनी धर्म ' मग त्यांतील अनुयायांची संख्या कितीका मोठी असेना–हा फक्त ' हिंदुधर्मा ' तील केवळ एकपंथ बनतो. कै. लोकमान्य टिळकांची ' प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता। उपास्यानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम् ' ॥ ही जी प्रसिद्ध व्याख्या आहे ती या सनातन

हिंदुधर्माची होय. 'चित्रमयजगत्' मध्यें त्यांनीं जो एक विद्वताप्रचुर लेख लिहिला होता, आणि ज्याच्यामध्यें त्यांचें अगाध ज्ञान व चतुरता आविष्कृत झाली होती, त्या लेखामध्यें त्यांनीं त्यांची ही थोडी फार 'नास्ति' पक्षाची असलेली व्याख्या 'अस्ति' पक्षामध्यें रूपांतरित करण्याचा प्रयत्न केला होता. व त्यामध्यें त्यांनीं स्पष्टपणें सुचविलें होतें कीं, त्यांच्या विवेचनाचा मुख्य रोख लौकिकरीत्या ज्याला 'हिंदुधर्म' असें म्हणतात त्यावरच फक्त आहे–'हिंदुत्वा' वर नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांनीं यापुढें जाऊन असें कबूल केलें होतें कीं, या विवेचनामध्यें आर्यसमाजी लोकांचा–जरी ते जातीय दृष्ट्या व राष्ट्रीय दृष्ट्या हिंदूंतले हिंदु आहेत तरी, अंतर्भाव करतां येत नाहीं. लोकमान्यांची ही व्याख्या तात्पुरती जरी उत्कृष्ट आहे, तरी, ती कांहीं खरोखरी हिंदुधर्माची अशी नाहीं व हिंदुत्वाची तर अर्थातच नाहीं. ती व्याख्या फक्त 'श्रुतिस्मृति–पुराणोक्त' असा जो 'सनातन धर्म' त्याची आहे; व हा पंथ इतर सर्व पंथांपेक्षां अतिशय लोकप्रिय असल्यामुळें साहाजिकच प्रत्यक्ष 'हिंदुधर्म' म्हणूनच समजला जातो. परंतु हें तात्विक दृष्ट्या बरोबर नाहीं.

याप्रमाणें 'हिंदुधर्म' हा व्युत्पत्तीनें व प्रत्यक्ष व्यावहारिक दृष्टीनें, फक्त धार्मिक बाबतींतच हिंदूंचा धर्म असल्यानें व 'धर्म' म्हणजे कांहीं फक्त 'धर्ममत'च नसल्यानें, प्रत्येक हिंदूच्या अंगीं जे विशेष आहेत, त्या सर्व विशेषांचाहि त्यांमध्यें अंशतः अंतर्भाव होतो. आपण पूर्वींच्या विवेचनांत हें ठरविलें आहे कीं, 'हिंदु' असण्याचें महत्वाचें प्रथम लक्षण म्हणजे हें कीं, सिंधुनदापासून तो सिंधु ( समुद्रापर्यंत ) पसरलेली जी भूमि ती त्याची पितृभू, ती त्याची मातृभू, तीच त्याच्या ऋषींची व पूर्वजांची निवासभूमि, असली पाहिजे. ज्या धर्ममतांना व पंथांना आपण वैदिक अथवा अवैदिक 'हिंदुधर्म' म्हणतों तीं सर्व धर्ममतें व पंथ आणि त्यांना प्रणीत करणारे व त्यांच्या द्वारें 'सत्तत्वां' चें दर्शन घेणारे त्याचे सर्व अनुयायी हे ह्या भूमातेचींच लेंकरें आहेत. हिंदुधर्माच्या सर्व पंथांना व मतांना ही 'सिंधुस्थान' ची भूमि ही दिव्यभूमि आहे. याच भूमीवर त्यांना ईश्वराच्या ज्ञानाचें आविष्करण झालें, याच भूमींत ते सर्व पंथ व तीं सर्व मतें मानवी मनांत जन्म पावलीं. ज्याप्रमाणें पवित्र गंगा नदी ही जरी प्रत्यक्ष विष्णूच्या पदकमलांमधून उगम पावते, तरी अत्यंत दुर्धारक हिंदूला सुद्धां सामान्यतः विचार करीत असतां ती हिमालयाचीच कन्या



आहे असें वाटतें. त्याचप्रमाणें ही भूमि, धार्मिक स्वरूपांत ज्याला 'हिंदुधर्म' म्हणून संबोधिलें जातें त्या तत्त्वज्ञान भागीरथीची जन्मभूमि–पितृभू, मातृभू आहे. 'हिंदुत्वा' चें लक्षण म्हणजे प्रत्येक हिंदु मनुष्य हा हिंदु मातांपितरांचा वंशज असला पाहिजे. त्याच्या अंगामध्यें पुराणकालच्या सिंधूंचें आणि त्यांच्यापासून उत्पन्न झालेल्या जातीचें रक्त खेळत असलें पाहिजे. हें लक्षणसुद्धां हिंदु धर्मांतील निरनिराळ्या पंथांना व मतांना लागू पडतें. कारण, ते सर्व पंथ, हिंदु ऋषींनीं व द्रष्ट्यांनींच प्रस्थापित आणि आविष्कृत केले आहेत. आणि म्हणून ते सर्व पंथ म्हणजे सप्तसिंधूच्या गूढ विचारवृक्षाला लागलेलीं नीतितत्त्वांची व द्रव्य संस्कृतीचीं फुलें व फळेंच आहेत. आणि ही सर्व परिणति जें इष्ट तें पचवून व जें अनिष्ट त्याचा त्याग करूनच घडली आहे. 'हिंदुधर्म' हा कांहीं हिंदूंच्या नैसर्गिक परिस्थितीचा आणि विचारपरंपरेचा विकास होऊनच बनला आहे असें नाहीं, तर तो हिंदूंच्या संस्कृतीच्या विकासानेंहि बनला आहे. हिंदु धर्मामध्यें जी निरनिराळी वैदिक कालची किंवा बौद्ध, जैन, अथवा त्याहूनहि अगदीं आधुनिक म्हणजे चैतन्य, चक्रधर, बसव, नानक दयानंद किंवा राजा राममोहनराय यांच्या वेळीं झालेली विचारक्रांति, या प्रत्येक क्रांतीच्या वेळीं ज्ञात झालेली परमोच्च आनंदाची अनुभूति ज्या भाषेंत आणि ज्या लाक्षणिक शब्दांत आविष्कृत केली गेली, ती भाषा आणि ते शब्द, यांच्या कथा आणि त्यांचें तत्त्वज्ञान त्यांनीं विवादलेलीं ध्येयें आणि त्यांनीं अंगिकारलेल्या समजुती, या सर्व गोष्टींवर हिंदुसंस्कृतीचा वज्रप्राय ठसा कोरून निघालेला आहे. हिंदुधर्मांतील सर्व पंथ हे हिंदुसंस्कृतीच्याच वातावरणांत जन्म पावले आहेत आणि त्यांचें अस्तित्व व त्यांची वाढ याच वातावरणांत झाली आहे; त्याचप्रमाणें प्रत्येक हिंदूचा धर्म हा त्याच्या जन्मभूमीशीं–ह्या हिंदुस्थानशीं–इतका एकजीव झाला आहे कीं, ही भूमि प्रत्येक हिंदूला केवळ पितृभूच नव्हे तर पुण्यभूहि झाली आहे.

आणि कां नाहीं होणार ? ही भारतभूमि, हें सिंधुस्थान, जी भूमि सिंधूपासून सिंधुपर्यंत पसरली आहे ती आमची पुण्यभूमीच आहे. कारण, याच भूमींत आमचे धर्मप्रणेते निर्माण झाले. याच भूमींत ज्या ऋषींना वेदांतील ज्ञान ज्ञात झालें ते ऋषि जन्म पावले. वेदकालीन द्रष्ट्यांपासून तों दयानंदांपर्यंत, जिनवरांपासून तों महावीरापर्यंत, बोधिसत्त्वापासून तों नागसेनापर्यंत, नानकापासून तों गुरु गोविंदसिंहापर्यंत, वीर बंदापासून तों बसवश्वरापर्यंत, चक्रधरापासून तों चैतन्यापर्यंत, रामदासापासून राममोहनापर्यंत सर्व द्रष्टे आणि तत्त्ववेत्ते, आचार्य आणि

देवतुल्य ऋषि हे सर्व याच भूमींत जन्मास आले. हिच्यामधल्या प्रत्येक धूलिकणाला त्यांच्या पदस्पर्शाचा वास येत आहे. तिच्यामधील सर्व नद्या पवित्र आहेत, व तिच्यामधील अखिल वृक्षराजि पावन झालेली आहे. कारण मानवी आयुष्य, आत्मा व परमात्मा, त्याप्रमाणें ब्रह्म आणि माया, यांच्या गूढतम गुह्यांचा परमविचार, एखाद्या बुद्धानें वा एखाद्या शंकराचार्यानें ह्या नद्यांच्या शीतलचंद्रप्रकाशानें रम्य झालेल्या तीरांवर किंवा वृक्षराजींच्या निबिड छायेंत केला आहे. इच्यांतील प्रत्येक टेंकडी आणि प्रत्येक गुहा पाहून एखाद्या कपिलाची, एखाद्या व्यासाची, एखाद्या शंकराची किंवा एखाद्या रामदासाची स्मृति येतें. कुठें भगीरथानें राज्य केलें आहे, कुठें कुरुक्षेत्र विस्तारलें आहे. येथे प्रभुरामचंद्रानें त्यांच्या वनवासप्रस्थानांतील पहिला मुक्काम केला तर तेथें जानकीनें सुवर्णमृग अवलोकन केला व आपल्या प्राणेश्वराजवळ तें मारून आणण्याचा हट्ट धरला. ह्या यमुनातीरावर त्या स्वर्गीय गुराख्यानें आपली चेटकी बांसरी वाजविली आणि त्या मोहिनीनें मोह्रित होऊन, गोकुलांतील प्रत्येक गोपगोपीचें हृदय तरल होऊन त्या बांसरीच्या आवाजावर तरंगत राहिलें. हा इथें ' बोधिवृक्ष ' उभा आहे तर तिथें तें घनदाट तपोवन आपलें अस्तित्व भासवीत आहे; आणि इथूनच महावीर निर्वाणपदाप्रत गेला आहे. गुरुनानक इथेंच त्या भक्तमंडळांत मिसळून गेले व त्यांनीं ती ' गगनथाल रविचंद्र दीपक बने ! ' ही आपली प्रसिद्ध आरति गाइली. त्या राजा गोपीचंदानें राज्यावर लाथ मारून इथेंच जोगीपणाची दीक्षा घेतली व हातामध्यें एक भिक्षापात्र घेऊन आपल्या बहिणीच्या दारीं जाऊन मूठभर जोगवा मागितला ! हें इथेंच त्या बंदा बहादुराच्या पुत्राला तुकडे तुकडे करून त्याच्या बापादेखत ठार मारलें व त्या मरणप्राय बापाच्या तोंडांत, त्या कत्तल झालेल्या शूर पुत्राचें रक्तबंबाळ झालेलें हृदय मरणापर्यंत तो हिंदुच राहिला याच एका अपराधाकरितां निर्घृणतेनें कोंबून देण्यांत आलें. येथल्या प्रत्येक दगडादगडामध्यें हुत झालेल्या कोणत्या तरी आत्म्याची पुण्यकथा सांठविली आहे. हे मातृभूमि, तुझ्यामधील प्रत्येक इंचाइंचाची जागा ही यज्ञभूमि झालेली आहे ! फक्त जेथें कृष्णसार सांपडतें तीच जागा नव्हे तर काश्मीरपासून सिंहलपर्यंतची सारी भूमि ही एखाद्या ज्ञानयज्ञानें किंवा आत्मयज्ञानें पवित्र झाली आहे. आणि म्हणून एखाद्या संतापासून तों साधूपर्यंत ही भरतभूमि, हें ' सिंधुस्थान, ' म्हणजे एकसमयावच्छेदेंकरून ' पितृभू ' व ' पुण्यभू ' झाली आहे.



जे प्रथम बलात्कारानें हिंदूंचे मुसलमान अथवा ख्रिश्चन केले गेले, आणि म्हणूनच ज्यांचा हा देश म्हणजे ' पितृभू ' झालेला आहे व भाषा, कायदा, रीतिभाति, लौकिक समजुती, आणि इतिहास ह्या सर्व संस्कृतीचे कांहीं अंशांनीं जे भागीदार झाले आहेत तरी वर प्रतिपादित केलेल्या ' पुण्यभू ' च्या लक्षणमीमांसेनें ते ' हिंदु ' मात्र होऊं शकत नाहींत. कारण, ' हिंदुस्थान ' ही जरी त्यांना इतर हिंदूंप्रमाणेंच ' पितृभू ' असली तरी ती त्यांची ' पुण्यभू ' होऊं शकत नाहीं. त्यांची ' पुण्यभू ' फार लांब असलेल्या अरबस्थानांत अथवा प्यालेस्टाइनमध्यें आहे. त्यांचीं पुराणें आणि त्यांचे अवतार, त्यांच्या कथा आणि त्यांचे धर्मवीर हे ह्या भूमीचें संतान नाहीं. आणि म्हणून त्यांच्या नांवांना आणि त्यांच्या आकांक्षांना परकीयत्वाचा वास येतो. इतकेंच नव्हे तर त्यांच्यापैकीं कांहींजण ज्याप्रमाणें बोलून दाखवतात तशीच जर त्यांची निष्ठा असली तर त्यांना दुसरें गत्यंतरच नाहीं- त्यांच्यामधील प्रत्येक मनुष्यानें ' पितृभू ' पेक्षां ' पुण्यभू ' च अधिक मानली पाहिजे आणि तिच्याकडेस त्यांचें प्रेम व निष्ठा अधिक वळली पाहिजे, हें अगदीं साहजिक आहे. आम्ही त्याबद्दल त्यांचा निषेधहि करीत नाहीं किंवा त्याबद्दल अश्रुहि गाळीत बसत नाहीं. आम्हीं फक्त ज्या गोष्टी जशा आहेत त्या तशा सांगत आहोंत. आम्हीं आतांपर्यंत ' हिंदुत्वा ' च्या लक्षणांची मीमांसा केली व तिच्यावरून असें निष्पन्न झालें कीं, बोहरी लोक व तसेच मुसलमान किंवा ख्रिश्चन लोक यांच्याजवळ ' हिंदुत्वा ' चीं इतर सर्व लक्षणें आहेत, परंतु एक लक्षण मात्र नाहीं व तें लक्षण म्हणजे हें कीं, ते ' हिंदुस्थान ' ला ' पुण्यभू ' म्हणून मानीत नाहींत.

हा प्रश्न कांहीं एखाद्या विवक्षित मतांचे अनुयायी होण्याचा किंवा मनुष्य, आत्मा आणि परमात्मा यांच्याबद्दल एखादी नवी मीमांसा काढण्याबद्दलचा नाहीं. कारण, आम्हांला अगदीं प्रामाणिकपणानें असें वाटतें कीं, हिंदु विचारपरंपरा–इथें आम्ही कोणत्याहि धर्माबद्दल बोलत नाहीं. कारण तो हटवाद होईल–ही इतकी परिपूर्णपदाला पोंचली आहे कीं, मनुष्याच्या कल्पनाशक्तींत, आतां असें कांहीं उरलें नाहीं कीं, ज्यामुळें–अज्ञेयाबद्दल जरी नसलें तरी–अज्ञाताबद्दल एखादी नवी कल्पना पुढें येऊं शकेल किंवा ' तत् ' आणि ' त्वम् ' यांच्यामधील संबंधाबद्दल कांहीं नवी मीमांसा निघूं शकेल. आपण कोण आहांत ? अद्वैती, एकेश्वरवादी, जगदीश्वरवादी, निरीश्वरवादी, नास्तिक्यवादी ? तुम्ही कोणीहि असा इथें तुम्हाला

प्रत्येकाला जागा आहे. हे आत्म्या, तूं कोणत्याहि मतावर विश्वास ठेंव, तुझ्या विश्वासाप्रमाणें प्रेम करण्यास आणि तुझी पूर्ण उन्नति करून चिरंतर आनंद प्राप्त करून घेण्यास, जें कोणत्याहि वैय्यक्तिक श्रेष्ठत्त्वावर नव्हे तर समर्थ, शाश्वत व गूढ सत्याच्या पायावर उभारलें आहे अशा या, सर्व देवालयांच्या देवालयांत तूं ये. प्रत्यक्ष भगवति जान्हवीच्या हिमधवल लाटांनीं धुतल्या जाणाऱ्या तीरावर उभें राहून, हे प्राण्या, तूं लांबलांबच्या विहिरींवर कशाला तृषा भागवण्याकरितां याचना करण्याची हांव धरतोस? नागव्या तरवारींच्या फटकाऱ्यांनीं जीं बंधनें जुलमानें तोडली गेलीं, त्यांच्या पूर्वगत प्रेमळ स्मृतींनीं सद्गदित होऊन, तुझ्या धमन्याधमन्यांमधून जें आपल्या एकाच पूर्वजांपासून आलेलें रक्त वहात आहे तें हे प्रियबंधो, विरहानें आक्रोश करीत नाहीं काय? तर मग, तुझ्या पूर्वीच्या बंधु-भगिनींच्या मेळ्यामध्यें तूं चल परत ये. चिरकालापासून चुकलेल्या तुला, बाहु उभारून मुक्तद्वाराशीं, वाहत उभे आहेत. ज्या भूमीमध्यें प्रत्यक्ष चार्वाक, महा-कालाच्या देवळाच्या पायऱ्यांवर उभा राहून निरीश्वरवाद शिकवूं शकला त्या भूमीपेक्षां इतरत्र कुठें तुला परमेश्वरभक्तीची अधिक स्वतंत्रता अनुभवावयास सांपडेल! ओरिसा प्रांतातल्या पटणापासून तों काशीच्या पंडितांपर्यंत, संताळ लोकांपासून साधूंपर्यंत सर्वांना ज्या भूमीमध्यें आपापली विशिष्ट जातिरचना वर्धमान करतां आली किंवा नवीन निर्माण करतां आली अशा भूमीपेक्षां इतरत्र दुसरें कोठें तुला अधिक समाजस्वातंत्र्य मिळणार आहे? खरोखर या भूमीबद्दल हेंच सत्य आहे कीं, 'यदिहास्ति न तदन्यत्र, यन्नेहास्ति न कुत्रचित्.' जें जें जगांत सांपडतें तें तें सर्व या भूमीमध्यें सांपडेल. परंतु येथें जर एखादी वस्तु तुम्हाला न मिळाली तर मात्र ती तुम्हाला इतर कुठेंहि सांपडणार नाहीं. पहा, एक जाति, एक रक्त, एक संस्कृति, एक राष्ट्रीयता, वगैरे सर्व गोष्टींच्या समवायानें हिंदुत्वाचीं बहुतेक सर्व लक्षणें ज्यांच्याजवळ आहेत, परंतु, जे केवळ अत्याचारानें व जबरदस्तीनें आमच्या पूर्वजांच्या संसारांतून हिसडून नेले गेले, अशा सर्व बंधूनों! तुम्ही फक्त अनन्यतेनें आपल्या भूमातेवर प्रेम करा व ती केवळ 'पितृभू' आहे इतकेंच न मानतां, ती 'पुण्यभू' हि आहे, असें माना, म्हणजे 'हिंदु संस्कृतीं'च्या कक्षेंत तुमचें अत्यंत प्रेमानें स्वागत होईल

आमचे जे देशबंधु व पुराणकालचे भाईबंद असे बोहरी, खोजे, मेमन व इतर मुसलमान आणि ख्रिस्ती लोक यांना वरील एक मात्र मार्ग मोकळा आहे. परंतु



हा मार्ग त्यांनीं स्वखुशीनें व प्रेमानें अंगिकारला पाहिजे. परंतु जोंपर्यंत त्यांचें मन या मार्गाकडे वेधलें नाहीं तोंपर्यंत मात्र त्यांना हिंदु म्हणतां येत नाहीं. या विवेचनाच्या वेळीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, आपण या ठिकाणीं 'हिंदुत्वाचीं लक्षणें' काय काय आहेत हें निश्चित करीत आहोंत, आणि म्हणून कोणत्याहि पक्षाला अथवा पूर्वग्रहांना अनुकूल होईल असा अर्थ ओढून ताणून काढणारें विवेचन करणें हें सर्वथा अन्याय्य होईल.

तेव्हां, आतापर्यंतच्या विवेचनाचा निष्कर्ष असा निघतो कीं, तो मनुष्य हिंदु होय, कीं, जो सिंधुनदापासून तों समुद्रापर्यंत पसरलेल्या देशाला आपली 'पितृभू' मानतो; जी जाति सारखें आक्रमण करीत करीत व विस्तार पावत पावत, जें जें अंतर्भूत झालें तें तें पचवीत आणि जें जें पचविलें, त्याला महनीय स्वरूप देत, अखेर 'हिंदुजाति' म्हणून जगांत प्रसिद्ध झाली व ज्या जातीच्या उत्पत्तीचा धागा थेट वेदकालीन सप्तसिंधूशीं जाऊन पोंचतो त्या जातीचें रक्त ज्यांच्या अंगांत खेळत आहे; मुख्यतः संस्कृत भाषेंत जीं आविष्कृत केली गेली व जी एक इतिहास, एक वाङ्मय, एक कला, एक शिल्पशास्त्र, एक कायदा, एक धर्मशास्त्र, एक आचार आणि संस्कार, एक क्रियाकर्में आणि विधिनियम, समान उत्सव आणि समान यात्रा, यांच्या समुच्चयानें जी बनली गेली आहे, अशी या 'हिंदुजाति' ची संस्कृति जो स्वतःची मानतो; आणि जो या सर्वांवर या भूमीला– या 'सिंधुस्थाना' ला–आपली 'पुण्यभू' समजतो, इच्यांतच आपले तत्त्ववेत्ते आणि ऋषि, अवतार आणि धर्मगुरु उत्पन्न झाले असें मानतो व हीच माझी कारुण्यभूमि व तीर्थभूमि आहे अशी निष्ठा ठेवतो–तो तो 'हिंदु' होतो. समान राष्ट्र, समान जाति, आणि समान संस्कृति हीं हिंदुत्वाचीं लक्षणें आहेत. आणि हीं सर्व लक्षणें मोजक्या शब्दांत सांगावयाचीं म्हणजे अशीं कीं, ज्याला 'सिंधुस्थान' हें केवळ 'पितृभू'च वाटते असें नव्हे तर 'पुण्यभू'हि वाटते तो हिंदु. हिंदुत्वाचीं पहिलीं दोन लक्षणें जीं 'राष्ट्र' व 'जाति,' हीं 'पितृभू' या शब्दानें व्यक्त होतात, व तिसरें अवश्य लक्षण जें 'संस्कृति' हें 'पुण्यभू' या शब्दानें विशेषेंकरून व्यक्त होतें. कारण, संस्कारांनीं युक्त असलेली जी संस्कृति तिच्याच योगानें आपली 'पुण्यभू' बनत असते. ही व्याख्या याहिपेक्षां अधिक सुटसुटीत जर करावयाची असेल तर खालीलप्रमाणें एका अनुष्टुपांत ती बसवितां येईलः—

आसिंधु सिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥

## ७

आतांपर्यंत स्थूलमानानें ' हिंदुत्वा ' चें जें विवेचन केलें गेलें त्यावरून आपल्या ' हिंदुत्वा ' च्या मुख्य लक्षणांचा बोध करून देणारी एक कामचलाऊ व्याख्या तयार करतां आली. आतां ही सर्वसाधारण व्याख्या सर्वत्र कशी लागू पडते हें पहाणें राहिलें. व हें काम, थोडीं विवक्षित उदाहरणें घेऊन व ज्यामुळें अशी एखादी व्याख्या करण्याची अत्यंत आवश्यकता उत्पन्न झाली अशा कांहीं निरनिराळ्या गोष्टींचें विवेचन करून, आपण करूं. ही व्याख्या ठरवितांना आम्ही जागोजागीं, शक्य तितक्या रीतीनें, ह्या विषयासारख्या सर्वव्यापी व दिशाभूल करणाऱ्या विषयांत, अतिव्याप्तीचा दोष टाळण्याचा प्रयत्न केला आहे. आतां कांहीं विशिष्ट उदाहरणें घेऊन जर आपण त्यांना ही व्याख्या यथार्थतेनें लाऊं शकलों तर आपली खात्री पटेल कीं, जशी ही व्याख्या अतिव्याप्तीच्या दोषापासून अलिप्त आहे, तशीच ती अव्याप्तीच्या दोषापासूनहि अलिप्तच आहे.

हिंदु लोकांमध्यें भौगोलिक दृष्ट्या जे विभाग पडलेले आहेत ते आमच्या व्याख्येच्या अर्थाशीं सुसंगतच आहेत हें सकृद्दर्शनींसुद्धां कोणाच्याहि लक्ष्यांत येईल. आमच्या व्याख्येचें मूलतत्त्व म्हणजे ' आसिंधु सिंधुपर्यंता ' असलेली भूमि. आतां हें खरें आहे कीं, आमच्यापैकीं बरेच लोक सिंधुनदाच्या पलिकडच्या तीरीं वसत आहेत. तरी पण ज्या वेळीं एखाद्या नदीतीराचा उल्लेख केला जातो त्या वेळीं तिच्या दोन्ही तीरांचा समावेश साहजिकच केला जातो आणि म्हणून ' सिंधु ' नदाच्या पश्चिमतीरावरील सर्व भाग निसर्गतःच ' सिंधुस्थान ' चाच भाग होय व म्हणून तो आमच्या व्याख्येंत अंतर्भूत होतो. वास्तविक, सिंधुनदाच्या या पश्चिम तीरावर पुरातन सिंधूंचे जे निःसंशय वंशज आहेत व ज्यांनीं आजपर्यंत आपल्या भूमीचें किंवा आपल्या जातीचें पुराणकालचें नांव बदललें नाहीं, आणि आजहि, हजारों वर्षांपूर्वीप्रमाणेंच ज्यांना ' सिंधुदेशा ' चें संतान म्हणून ' सिंधी ' असें म्हणतात तेच लोक मुख्यतः वसत आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे मुख्य देशाला पुरवणीवजा जी भूमि लागलेली असते, तिला मुख्य देशाचेंच नांव प्राप्त होतें. आणि तिसरें म्हणजे त्या बाजूला रहाणारे आपले सर्व हिंदुलोक, त्यांचा सर्व इतिहास पाहिला तर, ह्या ' भारतमाते ' लाच आपली ' पितृभू ' व आपली ' पुण्यभू ' मानीत आले आहेत. त्यांनीं कांहीं, आपण ज्या



इवल्याशा प्रदेशांत रहातों तेवढीच आपली ' पितृभू ' व ' पुण्यभू ' आहे अशा तऱ्हेची मातृघातक कल्पना करून घेण्याचें पाप कधींहि केलें नाहीं. उलट आमची जी काशी, जें कैलास व जी गंगोत्री तीच त्यांचीहि काशी, कैलास, गंगोत्री आहे. वेदकालापासून ते भारतवर्षाचा एक प्रमुख भाग म्हणून गणले जातात. ' सिंधु शिबिसौवीर ' हे रामायण व महाभारतामध्यें हिंदुसंघाचे व हिंदुदौलतीचे एक यथार्थ घटक म्हणून समजले जात होते. ते आपल्याच राष्ट्राचे, आपल्याच जातीचे व आपल्याच संस्कृतीचे आहेत. या सर्व कारणांसाठीं ते हिंदुच आहेत व आमची व्याख्या त्यांना पूर्णपणें लागू पडते.

परंतु, जरी कोणी असें म्हटलें कीं, प्रत्यक्ष तसें सांगितल्याशिवाय नुस्ती एखादी नदी आपल्या हद्दींत असणें म्हणजे कांहीं तिचे दोन्हीहि तीर आपल्या हद्दींत असणें असें नव्हे, तरीहि आमच्या व्याख्येला त्यानें बाध येत नाहीं व दुसऱ्या अनेक कारणांनीं सिंधी लोकांना ती पूर्णपणें लागू पडते. कारण, सिंधुनदाच्या पैलतीरावर राहणाऱ्या सिंधी बांधवांबद्दलचा प्रश्न जरी तूर्त बाजूला सारला, तरी जगाच्या पाठीवर इतर ठिकाणीं शेंकडों व हजारों हिंदु लोक वसति करून राहिले आहेत. कदाचित् एक वेळ अशीहि येईल कीं, हे आमचे हिंदु वसाहतवाले, जे आजच व्यापारामध्यें, संख्येमध्यें, वाकबगारीमध्यें, आणि बुद्धिवैभवामध्यें त्या त्या देशांत प्रमुखस्थानीं गणले जात आहेत, ते कांहीं कालानें त्यापैकीं एखाद्या सबंद देशाचेच मालक होतील व स्वतःचें राज्य स्थापितील. परंतु, केवळ हिंदुस्थानाव्यतिरिक्त दुसऱ्या एखाद्या देशांत निवास केला एवढ्याच एका गोष्टीकरितां कोणी ' अ-हिंदु ' ठरेल का ? त्रिवार नाहीं. कारण, हिंदुत्वाचें प्रथम लक्षण म्हणजे कांहीं त्यांनीं दुसऱ्या देशांत राहूं नये असें नाहीं, तर तो व त्याची संतति कुठेंहि जरी पृथ्वीच्या पाठीवर असली, तरी त्यांनीं ' सिंधुस्थान ' हीच त्यांची ' पितृभू ' मानली पाहिजे. आणि म्हणून ही आपली हिंदुत्वाची व्याख्या, हिंदूंचा प्रसार कितीहि जरी दूरवर झाला तरी, लागू पडणारी आहे. आमच्यांतले जे दूर दूर वसाहती करणारे आहेत त्यांनीं खुशाल दुप्पट उत्साहानें एखादें गुरुत्तर हिंदुस्थान, एखादें ' महाभारत ' वसविण्याचा प्रयत्न करावा व आपल्या संस्कृतींत जें जें उत्तम, उदात्त आणि उन्नत आहे, त्याचा त्याचा लाभ मानवी जातीच्या उन्नतीकरितां अवश्य करावा. त्यांनीं जगाच्या एका टोंकापासून तों दुसऱ्या टोंकापर्यंत जे जे लोक जगाच्या पाठीवर रहतात

त्यांना त्यांना स्वतःच्या अंगांतील सात्विक गुण शिकवून संपन्न करावें व उलट जगामध्यें इतरत्र जें जें उत्तम असेल तें तें स्वतःच्या जातीला व देशाला अर्पून त्यांना अधिक संपन्नता द्यावी. ' हिंदुत्व ' हें कांहीं हिमालयाच्या गरुडांच्या पंखांचा विच्छेद करीत नाहीं, तर उलट ह्या गरुडांच्या पंखांचा फडत्कार अधिक आवेशानें व्हावा, अशीच याची योजना आहे. हे हिंदु बांधवांनों, तुम्ही जोंपर्यंत हिंदुस्थानला तुमची ' पितृभू ' आणि ' पुण्यभू ' मानीत आहांत आणि तिनें निर्मिलेल्या संस्कृतीबद्दल व तुमच्या अंगांत संचारत असणाऱ्या तिच्या रक्ताबद्दल जोंपर्यंत तुम्ही अभिमान ठेवीत आहांत, तोंपर्यंत तुम्ही खुशाल आपल्या वसाहती वाढवा. हिंदुत्वाच्या भौगोलिक सीमा म्हणजे प्रत्यक्ष पृथ्वीच्याच सीमा होत !

आतां, आमच्या व्याख्येच्या जातिविषयक स्वरूपाबद्दल कोणी कांहीं महत्वाचा आक्षेप काढील असें आम्हाला वाटत नाहीं. ज्याप्रमाणें इंग्लंडमध्यें इबेरियन, केल्ट, आंग्ल, सॅक्सन, डेन, वगैरे निरनिराळे लोक आतां एकमेकांमध्यें विवाह वगैरे करून, जातिदृष्ट्या त्यांच्यात भिन्नत्व असूनसुद्धां मिसळून गेले आहेत, तसेंच येथेंहि आर्य, कोलेरियन, द्राविडियन आणि इतर जातीचे लोक हें, त्यांच्यामध्यें एका कालीं तीव्र भिन्नता असली तरी आज ती भिन्नता मुळीं कोणी मानीत नाहीं. आम्ही पूर्वी अवश्य तितक्या रीतीनें व पुराव्यानें हें सिद्ध केलेंच आहे कीं, ' अनुलोम ' व ' प्रतिलोम ' विवाहपद्धती ही आमच्या शास्त्रांत मान्य केली आहे व तीवरून निःसंशय रीतीनें असें सिद्ध होत आहे कीं, त्या वेळींच हे निरनिराळे वंश एकमेकांत मिसळून गेले होते व त्यामुळें अखिल हिंदु जातींची प्रगति अप्रतिहत चालली होती. तरीहि जेथें जेथें रूढीनें परवानगी दिली नाहीं तेथें तेथें प्रत्यक्ष निसर्गानेंच त्या मर्यादा उघडून दिल्या. भीमसेन हा कांहीं एकटाच आर्य नाहीं, कीं जो हिडिंबेशीं प्रेमबद्ध झाला किंवा पूर्वीच उल्लेखित केलेली व्याधकर्म्याची आई हीहि कांहीं एकटीच ब्राह्मण स्त्री नाहीं, की जिचें प्रेम एका व्याध तरुणावर जडलें. भिल्ल, कोळी अथवा संताळ लोकांमधल्या देखील दहावीस मुलींमधली एखादी मुलगी जर उचलली व एखाद्या शहरांतील मुलींच्या शाळेंत सोडली तरी ती शरीराच्या ढबीवरून किंवा नैतिक संस्कारावरून अमक्या जातीची अशी कांहीं निवडून काढतां येणार नाहीं. आर्यन, कोलेरियन, द्राविडियन वगैरे वंशांच्या संमिश्रणानें जी जाति आज उत्पन्न झाली आहे ती एकंदरींत समर्थ आहे. कारण, हें संमिश्रण हलके हलके होत गेलें. आणि



म्हणून या सर्वांच्या संमिश्रणांनीं उत्पन्न झालेल्या आपल्या पूर्वजांना, आर्यन्, कोलेरियन, किंवा द्राविडियन असें विशिष्ट जातीचें नांव न देतां एकाच ' हिंदु जाती ' चें नांव सार्थतेनें देण्यांत आलें–आणि त्याचा अर्थ म्हणजे हा झाला कीं, जे लोक एकाच मातृभूची लेंकरें म्हणून रहातात, एकाच ' पुण्यभूमी ' ची पूजा करतात व ज्यांचा हा देश सिंधुनद व समुद्र यांच्यामध्यें वसत आहे ते लोक ' हिंदु ' लोक होत. म्हणून संताळ, कोळी, भिल्ल, पंचम, नामशूद्र, आणि इतर अशाच जाति ह्या हिंदु आहेत. हें ' सिंधुस्थान ' आर्य म्हणविल्या जाणाऱ्या लोकांना जितक्या सत्तेनें आपलें म्हणतां येईल, तितक्याच सत्तेनें तरी निदान तें त्यांचेंहि आहे. ते हिंदुसंस्कृतीचे वारसदार आहेत व हिंदुरक्त त्यांच्या अंगांत खेळत आहे. त्यांच्यापैकीं जे कांहीं थोडे लोक अजूनहि पुराणमतवादी हिंदूंच्या कक्षेंत आले नाहींत ते देखील अशा देवांची पूजा करतात व असा धर्म पाळतात कीं, जो केवळ ह्या भूमीचाच आहे. आणि म्हणून हीच भूमि त्यांना केवळ ' पितृभू ' च नव्हे तर ' पुण्यभू 'हि झाली आहे.

'हिंदुत्व' व 'हिंदुइझम' या दोन शब्दांमध्यें जें भ्रामक साम्य भासतें त्यामुळें उत्पन्न झालेला गैरसमज जर उत्पन्न झाला नसता, तर मग ' हिंदुत्वा'च्या संस्कृतिविषयक स्वरूपाबद्दल देखील कोणत्याहि प्रकारचा महत्वाचा आक्षेप उरला नसता. आम्ही ' हिंदुत्व ' व 'हिंदुइझम' या दोन शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या दोन कल्पनांमधला फरक स्पष्टपणें दाखविण्याचा प्रयत्न केलाच आहे; आणि हिंदुधर्म ' म्हणजे केवळ ' सनातन धर्म ' असा विपरीत अर्थ करणाऱ्यांविरुद्ध, आम्ही आपला निषेधहि नमूद करून ठेवला आहे. ' हिंदुत्व 'हें कांहीं ' हिंदुधर्म ' याच्याशीं समानार्थक नव्हे. किंवा ' हिंदुधर्म ' हाहि शब्द ' हिंदुइझम ' शद्बाशीं समानार्थक नाहीं. ' हिंदुत्व ' म्हणजे ' हिंदुधर्म ' व हे दोन्ही म्हणजे ' सनातनी पंथ ' असें समजण्याच्या दुहेरी चुकीनें आपल्या सनातनी नसलेल्या बंधूंना साहजिकच राग येतो व त्यामुळें त्यांच्यामधील कांहीं अल्प लोकांच्या हातून उलट दुसरी एक आत्मघातकी चूक करण्यांत येते. ती चूक म्हणजे ही वरील समजूत भ्रामक कशी आहे हें जगाच्या निदर्शनास आणून ती नष्ट करण्याचें सोडून देऊन हे दुसऱ्या टोकाचे लोक बरोबर त्यांच्या उलट जाऊन, प्रत्यक्ष ' हिंदुत्वा ' चाच नकार करतात. आम्हाला अशी आशा आहे कीं, आमची व्याख्या दोन्ही पक्षाच्या लोकांच्या मनामध्यें कांहीं किंतु ठेवणार नाहीं. त्याचप्रमाणें ही व्याख्या सत्य-

स्थितीच्या भक्कम पायावर रचली गेल्यामुळें, अखिल हिंदु समाजांमधील समंजस लोक ती मान्य करतील. या विषयाच्या सामान्य विवेचनांत आपणांस आतांपर्यंत कोणत्याहि विवक्षित गोष्टींचें उदाहरण घेतां आलें नाहीं. परंतु, आतां आपण तसें करूं. प्रथमतः 'शीखमंडळा'चेंच उदाहरण आपण घेऊं. सिंधुस्थान–म्हणजे 'आसिंधु सिंधुपर्यंता भारत भूमिका' हीच त्यांची 'पितृभू' आहे, आणि थेट वेदकालापासून त्यांचे अनंत पूर्वज याच भूमींत राहिले, याच भूमीवर त्यांनीं प्रेम केलें, येथेंच त्यांची पूजाअर्चा झाली आणि येथूनच त्यांनीं ईश्वराला भक्तिभावानें आळविलें. त्याचप्रमाणें, मद्रासमध्यें किंवा बंगालमध्यें जितक्या निःसंशयानें एखाद्या हिंदूच्या अंगांत हिंदूचें रक्त आहे, तितक्याच निश्चयानें शीख लोकांच्या अंगामध्यें 'हिंदुरक्त' वाहत आहे. महाराष्ट्र किंवा बंगालमधल्या आपणा हिंदु लोकांच्या अंगांत आर्य लोकांचें व त्याचप्रमाणें येथें प्राचीनकाळीं ज्या इतर जाती वसत होत्या त्यांचें संमिश्र रक्त खेळत आहे. परंतु शिख लोक तर अभिमानानें असें म्हणूं शकतील कीं, ते केवळ प्रत्यक्ष त्या पुराणकाळच्या सिंधूंचेच वंशज आहेत; व हिंदुजीवनाची ही जीवनगंगा 'धो धो' करीत खालीं उतरण्याच्या आधींच तिच्या मुख्य झऱ्यांतूनच त्यांनीं जीवनपान केलें आहे. तिसरी गोष्ट अशी कीं, त्यांनीं आपल्या राष्ट्रीय वाङ्मयांत महत्वाची भर टाकली आहे, व म्हणून हिंदुसंस्कृतीमध्यें ते हक्कानें भागीदार आहेत. कारण, 'सरस्वती' ही एक पंजाबमधील नदी होती व मग ती विद्या आणि कला यांची मुख्य देवता गणली गेली. आणि हे शीख बंधूंनों! अगदीं आजच्या घटकेपर्यंत, अखिल हिंदुस्थानमधील हजारों आणि लाखों हिंदूंच्या कंठांतून, तुमच्या पूर्वजांनीं, त्या सिंधूंनीं, कृतज्ञ हृदयानें जी तिची प्रार्थना केली, जें तिचें यश गाईलें, जिच्या पुण्यमय तीरांवर संस्कृतीचीं आणि वाङ्मयाचीं बीजें प्रथम पेरलीं गेलीं, त्या सरस्वतीसरितेचें तेंच स्तोत्र ऋग्वेदिक घोषणेमध्यें त्याच सुरांत गाइलें जात आहे कीं, 'अंबितमे नदीतमे देवितमे सरस्वति!' वेद हे जसे आमचे तसेच त्यांचेहि आहेत. आतां आम्ही जसे त्यांना प्रमाणग्रंथ मानतों, तसे ते त्यांना कदाचित् मानीत नसतील; परंतु, मानवी बुद्धीनें निसर्गाचा छडा लावण्याकरितां केलेला पहिला अचाट झगडा अज्ञानाच्या अंधःकारानें हें स्वर्गीय जल गुप्त होऊन बंदींत पडलें होतें आणि ज्याच्या योगानें मानवी मनाला जाणीवेचा स्पर्शहि न होऊं देतां त्याचा आत्मा एकसारखा सुप्त अवस्थेंत ठेवला होता, अशा अज्ञानांधःकाराशीं प्रकाशाची पहिली उडालेली तुमुल चकमक या दृष्टीनें तरी 'वेद' हे शीख लोकांना आदरणीय होऊन बसले



आहेत. आपणां सर्वांप्रमाणेंच शीख लोकांचा इतिहाससुद्धां वेदांपासूनच सुरू झाला आहे, अयोध्येच्या राजवाड्यांतून तो वाढत गेला आहे, लंकेचें रणक्षेत्र त्यानें पाहिलें आहे, 'लहू' ला लाहोरचा पाया घालण्यांत त्यांनीं सहाय्य केलें आहे, आणि राजपुत्र सिद्धार्थ कपिलवस्तूच्या सीमा ओलांडून मानवी दुःखाचा भार हलका कसा करतां येईल याचा एखादा मार्ग शोधून काढण्याकरितां ज्या वेळीं गुहेमध्यें निविष्ट झाला त्यावेळीं कारुणिक दृष्टीनें त्यानें तो पाहिला आहे. पृथ्वीराजाच्या पराभवाबद्दल आपल्याप्रमाणेंच ते शोक करतात, पराभूत लोकांच्या साऱ्या हालअपेष्टा आपल्याबरोबरच ते सहन करतात आणि 'हिंदु' म्हणूनच आपल्याबरोबर ते आत्माहुतीला तयार होतात, उदासी, निर्मल गहनगंभीर आणि सिंधी शीख यांच्यांतले लाखों लोक संस्कृताला ती आपल्या पूर्वजांची भाषा म्हणूनच केवळ नव्हे तर, ती आपल्या जन्मभूमीची पवित्र भाषा म्हणून पूज्य मानतात आणि बाकीचे सर्व शिख लोक ती आपल्या पूर्वजांची भाषा म्हणून, आणि अजूनहि ज्या भाषा केवळ बाल्यांत असल्यानें आपल्या मातृस्थानापासूनच पोषकरस चाखीत आहेत त्या गुरुमुखी आणि पंजाबी भाषेची संस्कृत भाषा ही आदि माता म्हणून मान्य करीत आहेत. आणि शेवटीं म्हणजे ही 'आसिंधु सिंधुपर्यंता' भूमि ही कांहीं त्यांना केवळ 'पितृभू'च नव्हे तर 'पुण्यभूमि' हि झाली आहे. गुरु नानक आणि गुरु गोविंदसिंह, श्रीबंदा व रामदास हे हिंदुस्थानांत जन्मले व तेथेंच वाढले; हिंदुस्थानांतली सरोवरें त्यांना अमृताचीं आणि मुक्तीचीं सरोवरें–अमृतसर आणि मुक्तसर झालीं आहेत. ही हिंदुस्थानची भूमि हीच त्यांची गुरूंची भूमि (गुरुद्वार) आणि प्रार्थनेचें मंदिर (गुरुघर) बनली आहे; खरोखर कोणती एखादी जाति जर निःसंशय रीतीनें हिंदु असेल तर ती पंजाबमधील आपली शीख लोकांची जमात होय, कारण ते सप्तसिंधूच्या तीरावरील अगदीं मूळचे रहिवासी आहेत आणि 'सिंधु' अथवा 'हिंदू' चे प्रत्यक्ष वंशज आहेत. आज जो 'शिख' आहे तो कालचा हिंदु होता; व आजचा जो हिंदु आहे तो कदाचित् उद्यांचा 'शिख' होईल. फक्त पोषाखांत, रीतिभातींत किंवा रोजच्या रहाणींत फरक पडला म्हणजे तेवढ्यानें कांहीं रक्त बदलत नाहीं, किंवा बीज नाहींसें होत नाहीं; आणि इतिहासहि पुसून नष्ट केला जात नाहीं.

आमच्या लाखों 'शीख' बांधवांना 'हिंदुत्व' हें स्वयंसिद्धच आहे. सहजधारी, उदासी, निर्मल, गहनगंभीर, आणि सिंधी हे शिखांचे पंथ जातीनें

व राष्ट्रीयत्त्वानें ' हिंदु ' असल्याबद्दल अभिमान बाळगतात. त्यांचे गुरु सर्व हिंदुसंतान असल्यानें, त्यांना ' अहिंदु ' म्हणण्याचा–जरी कदाचित् राग न आला तरी–त्याचा अर्थ मात्र त्यांना मुळींच कळणार नाहीं. त्यांचा ' गुरुग्रंथ ' हा सनातनी व शीख हे दोघेहि पवित्र ग्रंथ म्हणून वाचतात. दोघांच्याहि यात्रा आणि उत्सव हे एकच असतात. ' तत्खालसा ' पंथाचे शिखसुद्धां त्यांचें लोकसंख्येचें प्रमाण लक्ष्यांत घेतां, बहुतांशीं ' हिंदुजाति ' कडेच प्रेमानें ओढले जातात, व हिंदुप्रमाणेंच हिंदूंमध्यें रहातात. अशा सर्व शिख लोकांना ' तुम्ही हिंदु नाहीं,' असें सांगणें म्हणजे त्यांच्या वृत्तींना मोठा धक्का देण्यासारखेंच आहे. आमची दोघांची जातीय एकी इतकी असंदिग्ध व पूर्ण आहे कीं, शीख आणि सनातनी लोकांमध्यें राजरोस लग्नेंहि घडून येतात.

आतां शीख लोकांमधील कांहीं पुढारी कांहीं वेळेला ' आम्ही हिंदु नाहीं ' असें जें प्रतिपादितात त्याचें मुख्य कारण असें कीं, ' हिंदुइझम् ' याचा अर्थ ' सनातनी हिंदु ' असा चुकीनें केला गेला. जर ह्या शब्दार्थाचा असा घोंटाळा झाला नसता तर ही शीख लोकांची ओरडहि कोणाला ऐकूं आली नसती. ' हिंदुइझम् ' बद्दलच्या कल्पनांचा संदिग्धपणा व त्यामुळें पसरणारे गैरसमज यांच्याच योगानें आपणा हिंदूंच्या पोटजातीमधील प्रेमसंबंध विसरून जाऊन एकमेकांपासून भिन्न होण्याच्या आत्म–घातकी प्रवृत्तीला वाव मिळतो. आम्ही आतांपर्यंत हें स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे कीं, ' हिंदुत्वा'ची व्याख्या कांहीं केवळ धार्मिक लक्षणांमध्येंच समाविष्ट झाली नाहीं. तरीहि आम्ही पुनः एकदां हें स्पष्टपणें सांगतों कीं, शीख लोकांनीं पाहिजे तर सनातनी धर्मांतील कोणत्याहि अथवा सर्वच गोष्टींवर अविश्वास करावा, इतकेंच काय परंतु वेद हे अपौरुषेय आहेत असें न मानतां त्यांचें बंधनहि त्यांनीं वाटलें तर नाकारावें. एवढ्यानें फार तर ते सनातनी नाहींत हें सिद्ध होईल, परंतु, ते ' हिंदु ' नाहींत असें मात्र सिद्ध होऊं शकणार नाहीं. आम्ही ' हिंदुत्वा'ची व्याख्या केली आहे तिच्याप्रमाणें शीख लोक हे ' हिंदु ' आहेत–धार्मिक पंथाच्या दृष्टीनें ते 'हिंदुत्वा'च्या एक निराळ्या धर्मपंथाचे अनुयायी असतील. धार्मिक दृष्टीनें ते शीख आहेत; जसे जैन जैन आहेत; लिंगायत लिंगायत आहेत, वैष्णव वैष्णव आहेत —परंतु आपण सर्व, जातीय आणि राष्ट्रीय दृष्टीनें व संस्कृतीनें एकाच राजशासनाचे व लोकसमूहाचे घटक आहोंत. आपणाला एकमेकांपासून भिन्न करतां



येणार नाहीं. अनंत कालापासून आपणाला यथार्थ रीतीनें ' हिंदु ' या नांवानें संबोधिलें जात आहे. दुसऱ्या कोणत्याहि नांवानें आपल्या जातीचें एकत्त्व दर्शविलें जाणार नाहीं, ' भारतीय ' या नांवानें देखील तें कां दर्शविलें जाणार नाहीं हें आम्ही मागील प्रकरणांत विशद करून सांगितलेंच आहे. ' भारतीय ' हें नांव ' हिंदी मनुष्या 'चा बोध करतें व त्यामुळें अधिक व्यापकत्त्वानें सर्वसाधारण हिंदुस्थानचा रहिवाशी असा अर्थबोध होतो. परंतु आपणा हिंदूंचें जातीय ऐक्य त्या शब्दानें दृग्गोचर होत नाहीं. आपण शीख आहोंत, आपण हिंदु आहोंत, आपण भारतीय आहोंत, हीं तिन्हीं नांवें एकत्र करून जो अर्थबोध त्यांच्या समवायानें होतो ते आपण आहोंत. त्यांतील फक्त एकएकटे आपण नाहीं.

आपणाला ' हिंदु ' म्हणवून घेतल्याबरोबर सनातनी हिंदूंच्या पंथाचे आपण आहोंत असें मानण्यांत येईल या भीतीनें आमचे कांहीं उत्साही शीख बंधु 'अहिंदु' म्हणून घ्यावयास तयार झाले आहेत हें तर एक खरेंच; परंतु याला दुसरेंहि एक कारण आहे व तें म्हणजे राजकीय स्वरूपाचें आहे. जातिविषयक प्रतिनिधित्व असावें किंवा नाहीं ? या प्रश्नाची चर्चा करण्याचें व त्याचे गुणावगुण पहाण्याचें हें स्थल नव्हे. शीख लोक साहजिकच त्यांच्या समाजाचें विवक्षित हितरक्षण करण्यास तत्पर होते; आणि मुसलमान लोक जर आपलें स्वतःच्या जातीचें विशिष्ट प्रतिनिधित्व मिळवून त्याचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतात, तर मग हिंदुस्थानमधील प्रत्येक समर्थ अल्पसंख्याक पंथांनीं असाच हक्क कां मागूं नये ? याचें कारण आम्हाला मुळींच उमगून येत नाहीं. परंतु, आम्हाला असें वाटतें कीं, शीखबंधूंनीं तेवढ्याकरितां आम्ही हिंदुच नाहीं असें म्हणण्याची आत्मघातकी आणि असमर्थनीय पद्धति स्वीकारली नसती तर फार चांगलें झालें असतें. ' अहिंदु ' न म्हणवून घेतांसुद्धां त्यांना जातिविषयक प्रतिनिधित्वाकरितां झडगतां आलें असतें व तें त्यांना मिळवितांहि आलें असतें. आणि याचें प्रत्यंतर पहावयाचें असेल तर आपल्या अब्राम्हण आणि इतर जातींनीं आपल्या जन्मसिद्ध ' हिंदुत्वा'ची फारकत न करतां हें विशिष्ट प्रतिनिधित्व मिळविलें. शीख लोकांची जमात ही मुसलमानांपेक्षां कांहीं कमी महत्वाची जमात नाहीं. आणि खरोखरीच हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि ' अहिंदु ' जातीपेक्षां शीखलोक हे आपल्यास कितीतरी अधिक महत्त्वाचे आहेत. विशिष्ट प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानें जे अपाय होणारे आहेत ते जातिविषयक दूरान्वयांनीं ओढवणाऱ्या

आपत्तीपेक्षां केव्हांहि अधिक भयंकर नसतात. जर खरोखरीच शीख, जैन, लिंगायत, अब्राह्मण, इतकेंच काय, परंतु ब्राह्मणांनासुद्धां जर असें प्रामाणिकपणानें वाटत असेल कीं, जातिविषयक प्रतिनिधित्वाशिवाय त्यांच्या जातीची उन्नति होणार नाहीं, तर खुशाल त्यांनीं त्याकरितां झगडा करावा व तें मिळवावें. कारण, त्यांची जी निरनिराळी विवक्षित उन्नति आहे ती एकंदरींत हिंदुसमाजाचीच उन्नति आहे. प्राचीन काळीं देखील आपल्यांतल्या मुख्य चार जातींना कांहींसे जातिविशिष्टत्वाच्या तत्त्वावरच राजसभेमध्यें व ग्रामसंस्थेमध्यें प्रतिनिधी निवडून देतां येत होते व हें करितांना त्यांना समष्टींतून फुटून जाण्याची किंवा ' हिंदुत्वाच्या सर्वसामान्य कक्षेंतून बाहेर पडण्याची आवश्यकता मुळींच कधीं वाटली नाहीं. धर्मपंथ या दृष्टीनें शीख लोकांनीं खुशाल आपणांस शिख म्हणवावें; परंतु, जातीयत्वानें, राष्ट्रीयत्वानें, व संस्कृतीच्या बंधनानें त्यांना हिंदुच गणले पाहिजेत. ज्या लोकांनीं आपल्या धर्मगुरूंचें स्वामित्त्व नाकारण्यापेक्षां शेंकडों माना वधस्तंभाच्या कुऱ्हाडींना बळी दिल्या— धर्महेत शाका जिन किया । शिर दिया पर शिरह न दिया !—असे शूर लोक काय आपलें बीज सोडतील, पूर्वजांचा धिःकार करतील, आणि आपला जन्मसिद्ध हक्क केवळ एका चतकोर तुकड्याकरितां विकावयास तयार होतील ? परमेश्वर करो आणि हें अनिष्ट कधींहि न घडो ! आमच्यांतील अल्पसंख्याकांनीं हें अखंड ध्यानांत ठेवावें कीं, जर सामर्थ्यांत एकीचें बीज आहे, तर आपल्या लोकांची खरोखरची, चिरंतर टिकणारी, आणि अतुल बलशाली बनवणारी एकी ही हिंदुत्वाच्या दृढत्तम आणि प्रियतम बंधनांनींच साध्य होणारी आहे. कदाचित् कांहीं अल्पकालपर्यंत तुम्हाला हें असें विभिन्न होणें हें फायदेशीर वाटत असेल, परंतु, हें ध्यानांत ठेवा कीं, या घातकी वर्तनानें, अंतीं या आपल्या पुराणजातीला आणखी संस्कृतीला तर अगणित हानि पोंचेलच पोंचेल, परंतु, त्यांचा स्वतःचा सुद्धां त्यापासून अत्यंत नाश होईल. तुमचे हितसंबंध तुमच्या इतर हिंदु बंधूंशीं कायमचे निगडित झाले आहेत. भूतकालाप्रमाणेंच भविष्यकाळीं जर कोणी एखादा परका आला व त्याची तलवार हिंदुसंस्कृतीवर आघात करण्याकरितां जर उचलली गेली तर ध्यानांत ठेवा कीं, तिचा वार इतर हिंदूंप्रमाणें तुमच्याहि छातींत खोल गेल्यावांचून रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें जसें भूतकाळीं तसेंच भविष्यकाळीं, अखिल हिंदुमात्र हा ज्या वेळीं पूर्ण स्वतंत्र होईल व एखाद्या शिवाजीच्या किंवा रणजितसिंगाच्या, एखाद्या रामचंद्राच्या अथवा एखाद्या युधि-



ष्ठिराच्या, एखाद्या अशोकाच्या किंवा एखाद्या अमोघवर्षाच्या आधिपत्याखालीं नवजीवनाचा विद्युत् संचार होऊन ज्या वेळीं तो महनीय वैभवाच्या शिखरावर चढेल, त्या दिवशीं जशी हिंदुजातींतील प्रत्येकाच्या मुखावर दिव्य कांति विलसेल, त्याचप्रमाणें, हे शिखबंधूंनों, तुमच्याहि मुखावर ती विलसल्यावांचून रहाणार नाहीं. म्हणून बंधूंनों, तात्कालिक लहान वा मोठ्या फायद्याच्या आमीषानें किंवा इतिहासाच्या अन्यथाकथनानें अथवा विपर्यास केल्यानें फशीं पडूं नका. एकदां असें झालें कीं, एक स्वतःला मोठा ग्रंथी म्हणविणारा परंतु, त्याचा सावकार असलेल्या एका ब्राह्मणाच्या घरीं चोरी करून त्याचा अंतीं खून करणारा एक गृहस्थ आम्हाला भेटला व सांगूं लागला कीं, शिख लोक कांहीं हिंदु नाहींत आणि गुरु गोविंदसिंहाच्या मुलाचा विश्वासघात एका ब्राह्मण स्वयंपाक्यानें केला म्हणून ब्राह्मणाला मारण्यामध्यें त्यांना मुळींच पाप वाटत नाहीं ! सुदैवानें याच वेळीं दुसरे एक शिख गृहस्थ तेथें होते व ते खरोखरीच ग्रंथी होते, व त्यांनां सर्व विद्वान् शिख लोकहि तसें मानीत होते; त्या गृहस्थांनीं हें त्या नामधारी शिख ग्रंथीचें म्हणणें तेव्हांच खोडून टाकलें; व इतर कित्येक प्रसंगीं मतिदास वगैरे ब्राह्मणांनीं श्रीगुरु गोविंदसिंहांना आश्रय दिल्याचें व प्रसंगीं शिखांचें सहाय्य करतां करतां प्राण समर्पणहि केलेल्या ब्राह्मणांचे दाखले देऊन त्या ग्रंथी महाशयांना निरुत्तर केलें. शिवाजी महाराजांना काय त्यांच्याच हाडामासांच्या लोकांनीं फसविलें नाहीं ? किंवा पुनरपि त्यांचा नातु, शाहुमहाराज, यांना यवनांच्या हवालीं करण्याचें नीच कृत्य पिसाळानें केलें नाहीं ? व हा पिसाळ कोण होता ? हिंदुच होता ना ? परंतु, एवढ्याकरितां शिवाजीनें किंवा त्याच्या राष्ट्रानें स्वतःची जातीच सोडली का ? आणि त्यानें हिंदुपण टाकलें का ? वीरबंदाच्या वेळीं अनेक लोकांनीं त्याच्याशीं विश्वासघाताचें वर्तन केलें. त्याचप्रमाणें इंग्रजांशीं झालेल्या खालसा सैन्याच्या शेवटच्या युद्धामध्येंहि असेंच झालें. प्रत्यक्ष गुरु गोविंदसिंहाला कित्येक शिख युद्धाच्या ऐन गर्दींत सोडून गेले. आणि विश्वासघातकी शिख लोकांच्या ह्या नादान वर्तनानें तो नरकेसरी गुरुगोविंदसिंह युद्धाच्या धाऊगर्दींत मिसळला व त्यामुळें अनायासें त्या पातकी ब्राह्मणाधमाला गुरूंच्या मुलांचा विश्वासघात करण्याची दुष्ट वेळ साधतां आली. म्हणून जर ह्या ब्राह्मणाच्या पातकामुळें आपण हिंदुपणच सोडून देऊं, तर त्या शिखलोकांच्या पातकामुळें आपणांस शिखपणाहि सोडून द्यावा लागेल !

हिंदूंमधील अल्पसंख्याक अथवा बहुसंख्याक जाती कांहीं आकाशांतून जशाच्या तशाच पडल्या नाहींत. ह्या सर्व जाती म्हणजे, एकाच संस्कृतीमध्यें व एकाच भूमीमध्यें ज्याचीं मुळें खोल गेलीं आहेत अशा एका वृक्षाच्या नैसर्गिक वाढींचीं दृश्य फळें आहेत. एखाद्या बोकडाला तुम्ही उचललेंत व त्याला कच्छ आणि कृपाळ हें बांधून दिले तर कांहीं त्याचा तुम्हाला सिंह बनवतां येणार नाहीं. जर गुरु गोविंदांना हुतात्म्यांचें व वीरवरांचें एक पथक बनवितां आलें तर तें कांहीं उगीच नाहीं बनवितां आलें. ज्या जातीनें गुरु गोविंदांना व त्यांच्या त्या शूर पथकाला जन्म दिला त्या जातीमध्येंच हें तेज अंतर्हित होतें. सिंहाचें वीर्यच सिंह पैदा करूं शकतो. एखाद्या सुवासमय पुष्पाला असें म्हणतां येणार नाहीं कीं, 'पहा! मी कसें प्रफुल्लित होतें, स्मित करतें व सुगंधानें दशदिशा दरवळून टाकतें. छे, छे, माझा त्या मुळ्यांशीं कांहीं एक संबंध नाहीं, मी फक्त देंठामधूनच जन्माला आलें!' म्हणून यापुढें आपल्याला आपलें बिज अथवा आपलें रक्त नाकारून चालावयाचें नाहीं. ज्या क्षणीं तुम्ही एखादा शिख गुरूशीं इमानी होता म्हणून निवडून काढाल, त्या वेळीं आपोआपच तुम्ही एखाद्या हिंदुकडेच बोट दाखवाल; कारण तो शिख होण्यापूर्वी हिंदुच होता व शिख झाल्यावरहि हिंदुच राहिला. जोंपर्यंत आमचे शिखबंधु हे शिखधर्मोशीं इमानी राहातील तोंपर्यंत त्यांना अपरिहार्यतेनें हिंदु रहाणें भाग आहे. कारण, तोंपर्यंत ही भरतभूमिका, आसिंधु सिंधुपर्यंत त्यांची पितृभू, आणि पुण्यभूच रहाणार आहे. शिखधर्मापासून च्युत होण्यानेंच कदाचित् हिंदुतत्वापासूनहि च्युत होतील.

शिखलोकांबद्दचा विचार आम्हीं जरा विस्तारपूर्वक केला. कारण, त्यामध्यें आलेलीं सर्व विधानें व त्यांचीं उत्तरें हीं आपोआपच आमच्या इतर अवैदिक पंथ आणि धर्म यांना आमच्या व्याख्येच्या दृष्टीनें लागू पडतात. उदाहरणार्थ 'देवसमाजी' हे निरीश्वरवादी आहेत. परंतु, हिंदुत्वाला तुमच्या निरीश्वरवादाशीं किंवा नास्तिकवादाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. देवसमाजी ह्या भूमिला त्यांच्या पूर्वजांची भूमि–पितृभू–मानतात. त्याचप्रमाणें 'पुण्यभू'हि मानतात. आणि म्हणून ते हिंदु आहेत, आणि एवढें सर्व प्रतिपादन केल्यावर आपले आर्यसमाजी बंधु हें हिंदु आहेत हें सांगण्याची कांहीं अवश्यकताच उरली नाहीं. कारण, हिंदुत्वाचीं सर्व लक्षणें त्याच्यामध्यें इतक्या प्रामुख्यानें वसत आहेत कीं, ते हिंदूंतले हिंदु आहेत.



खरोखरी आम्हाला तर असें एकहि उदाहरण सांपडत नाहीं कीं, ज्यामुळें आमच्या व्याख्येला अव्याप्तीचा दोष येईल.

एका गोष्टीमध्यें मात्र एक खरोखर अडचण उपस्थित होते. उदाहरणार्थ, भगिनी निवेदिता ह्या 'हिंदु' आहेत काय? अपवादानें जर नियम सिद्ध होतो हें म्हणणें खरें असेल, तर तें म्हणणें येथें लागू पडतें. आमच्या ह्या देशभक्त आणि उदारहृदयी भगिनीनें ही आसिंधु सिंधुपर्यंता भूमि आपली 'पितृभू' मानली होती. त्यांचें ह्या भूमीवर खरोखर तसेंच निःसीम प्रेम होतें, आणि आमचें राष्ट्र जर स्वतंत्र असतें, तर आम्ही असल्या शुद्ध प्रेमाच्या माणसांना अगदीं प्रथम आमच्या नागरिकत्वाचा हक्क अर्पण केला असता. तेव्हां आमच्या व्याख्येंतील पहिलें लक्षण कांहीं अंशानें त्यांना लागू पडतें. परंतु दुसरें लक्षण जें हिंदुपूर्वजांचें रक्त अंगांत असणें ही गोष्ट अशा तऱ्हेच्या उदाहरणांत सांपडणें शक्य नाहीं. तरी पण हिंदूशीं विवाह करणें हा एक मार्ग अशा ठिकाणीं उपलब्ध असतो. कारण ही गोष्ट सर्वमान्यच आहे कीं, विवाहासंबंधानें दोन व्यक्ति एकत्व पावतात. परंतु, भगिनी निवेदिताबाईच्या संबंधांत जरी हें घडलें नाहीं, तरी हिंदुत्वाचें तिसरें लक्षण मात्र त्यांच्या ठिकाणीं पूर्णपणें वसत होतें व त्या योगें त्यांचें हिंदुत्व कबूल करणें हें न्याय्य होतें. कारण, त्यांनीं आमची संस्कृति अंगीकृत केली होती व ह्या देशाला त्या 'पुण्यभू' म्हणून समजत होत्या. त्यांना त्या हिंदु बनल्याची जाणीव झाली होती व ही एकच गोष्ट, इतर सर्व गोष्टी वगळल्या तरी अत्यंत मुख्य व महत्त्वाची आहे. परंतु, आपल्याला हें विसरून चालावयाचें नाहीं कीं, आपल्यांतील बहुसंख्याक लोक ज्या अर्थानें 'हिंदुत्व' हा शब्द वापरतात त्या अर्थाच्या अनुरोधानेंच आपल्यास त्याची लक्षणनिश्चिति करावयाची आहे. व म्हणून 'अहिंदु' मातापितरांपासून जन्म पावलेल्या एखाद्या मनुष्यास जर 'हिंदुत्व' संपादन करावयाचें असेल तर त्याला 'हिंदु' होऊन तसें करतां येईल. मात्र अशा नूतन हिंदूनें खऱ्या अंतःकरणानें व संशयातीत रीतीनें आमच्या देशावर प्रेम केलें पाहिजे, व हिंदूशीं विवाहबद्ध होऊन खरोखर आमच्या देशाला 'पितृभू' मानलें पाहिजे. त्याचप्रमाणें आमची संस्कृति अंगीकृत करून ह्या देशाला 'पुण्यभू' म्हणून पूज्य मानला पाहिजे. अशा जोड्यापासून उत्पन्न झालेली संतति ही इतर गोष्टी समान असल्या म्हणजे अगदीं निःसंशय 'हिंदु' संतति होय. यापलीकडे जाण्याचा आम्हाला अधिकार नाहीं.

परंतु, हिंदूंच्या कोणत्याहि विवक्षित पंथावर विश्वास बसल्यामुळें, एखादा परकीय मनुष्य सनातनी, शिख, किंवा जैन म्हणून गणला जाऊं शकेल; आणि ज्या अर्थी हे सर्व पंथ हिंदुलोकांनाच स्फूर्त झाले किंवा त्यांनींच ते स्थापन केले त्या अर्थी ते 'हिंदुधर्म' या नांवानेंच ओळखले जातात. व म्हणून या पंथांत आलेला मनुष्य धार्मिक दृष्ट्या 'हिंदु' गणला जावयास कोणतीहि हरकत नाहीं. परंतु हें मात्र ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, असा हा धार्मिक वृत्तीनें किंवा संस्कृतीनें हिंदु बनलेला परकी मनुष्य हिंदुत्वाच्या मुख्य तीन लक्षणांपैकीं फक्त एकाच लक्षणानें युक्त आहे. आणि याच कारणामुळें फक्त आमच्या धार्मिक तत्त्वांवर विश्वास ठेवणाऱ्या कोणा वाटेल त्याला लोक सामान्यतः 'हिंदु' म्हणून मानीत नाहींत. आमच्या मातृभूमीची आणि आमच्या संस्कृतीची जी अमूल्य सेवा एखाद्या भगिनी निवेदिता किंवा आनी बेझंटबाईनीं केली, तीबद्दल आमच्या हृदयांत त्यांच्याबद्दल इतकी नितांत कृतज्ञता भरली आहे कीं, जाति या नात्यानें आमची हिंदुजाति कोणाच्याहि प्रेमस्पर्शनानें इतकी हलकी आणि मृदुलहृदयी बनून जाते व भगिनी निवेदिता किंवा त्यांच्याप्रमाणेंच इतर कोण्या पुण्यात्म्यानें जर आमच्या जीवनगंगेशीं त्यांचें जीवनप्रवाह समरस करून टाकले तर अशांचा समावेश हिंदुजातीमध्यें न कळतांच केला जातो. परंतु, अशा गोष्टी म्हणजे सामान्य नियमांना अपवाद म्हणूनच गणल्या पाहिजेत; व सामान्य नियम अगदींच संकुचित किंवा अगदींच विस्कळीत असतां उपयोगी नाहीं. आतांपर्यंत आम्हीं आमची ही व्याख्या ज्या कित्येक निकषग्राव्यांवर लावून पाहिली, त्यांवरून हें सिद्ध झालें आहे असें आम्हाला वाटते कीं, आमची व्याख्या वर म्हटल्याप्रमाणें अगदीं संकुचितहि नाहीं व अगदीं विस्कळीतहि नाहीं. आणि म्हणून 'अव्याप्ति' व 'अतिव्याप्ति' या दोनहि दोषांपासून ती मुक्त आहे.

## ८

आतांपर्यंत उपयुक्ततेच्या दृष्टीनें आम्हीं कोणतेंहि विवेचन केलें नाहीं. कारण, न जाणों कदाचित् कांहीं पूर्वग्रहांनीं आमच्या या विषयाच्या उद्घाटनांत बेरंग होण्याचा संभव होता. परंतु आतां, हें विवेचन यथा[illegible] पूर्ण झाल्यावर, हिंदुत्वाचीं आवश्यक म्हणून सिद्ध झालेलीं मूलतत्त्वें, आपल्या जातीचें बल, संघटन, व संवर्धन करण्यास किती उपयुक्त आहेत हें पाहणें [illegible]



अस्थानीं होणार नाहीं. हिंदुत्वाचीं हीं जीं मुख्य लक्षणें आपण शोधून काढलीं तीं इतकीं उदात्त, इतकीं स्थिर इतकीं बलिष्ठ आहेत कीं, ज्यावर हिंदुजातीला आपला भविष्यकालाच्या वैभवाचा मनोरा हिमालयाप्रमाणें उत्तुंग आणि स्थिर असा उभारतां येईल व त्या योगानें ज्या ज्या दिशेनें प्रतिकूल झंजावात झडप घालील त्या त्या दिशेनें तो थोपवून निरस्त करण्याचें सामर्थ्य तिला प्राप्त होईल. किंवा ही हिंदुजाति केवळ वाळूच्याच पायावर उभी आहे ?

पुराण कालच्या कांहीं राष्ट्रांनीं सबंद देशचादेशच किल्ल्याप्रमाणें सुरक्षित करण्याकरितां उत्तुंग भिंती उभारल्या. आजला त्या भिंती कोठें आहेत ? त्या भिंती आज उध्वस्त झाल्या आहेत, किंवा इतस्ततः पसरलेल्या लहान लहान अवशेषानेंच केवळ अवशिष्ट राहिल्या आहेत; आणि ज्या लोकांचें रक्षण करण्याकरितां त्या उभारल्या गेल्या, त्या लोकांचें तर अस्तित्वहि आज अगम्य झालें आहे. आपल्या शेजारच्या चिनी लोकांच्या राष्ट्रानें पिढीमागून पिढी अशा रीतीनें सर्व चिनी साम्राज्याभोंवतीं एक प्रचंड तट उभारण्याचें अद्भुत कर्म करून ठेविलें. तो तट इतका विस्तृत, इतका उंच, इतका मजबूत होता कीं, तो जगांतील मानवी प्रयत्नाचें एक आश्चर्य म्हणून प्रसिद्ध झाला. परंतु तो प्रचंड तटसुद्धां, सर्व मानवी सृष्टीच नश्वर असल्यानें, स्वतःच्या वजनानेंच खचून गेला. परंतु, निसर्गानें जे किल्ले, कोट उभारले आहेत, त्यांच्याकडे पहा ! सर्व इच्छा परितृप्त झालेल्या एखाद्या स्थिरबुद्ध साधूप्रमाणें हा हिमालय अचल रीतीनें उभा राहिला आहे, तो असाच वैदिक कालींहि उभा होता व आजहि तो तसाच उभा आहे. आमच्या ह्या विस्तीर्ण द्वीपकल्पाला एका अभेद्य किल्ल्याचें स्वरूप देणारा हा हिमालय, हाच आमचा कोट आहे.

तुम्हीं घागरींनीं लहान लहान चरांमध्यें पाणी भरतां व त्यांना खंदक असें संबोधितां. परंतु पहा, प्रत्यक्ष वरुण देवच एका हातानें खंडेंचीं खंडें मागें रेटून देत दुसऱ्या हातानें ही दुभंगलेली जागा समुद्रचे समुद्र ओतून भरून काढीत आहे ! हा हिंदी महासागर, त्याच्या सागरांसह आणि उपसागरांसह आमचा आहे व हाच आमचा अनुल्लंघनीय खंदक आहे !

आमची सरहद्द ही अशी आहे, व त्यामुळें आम्हाला जमीनीचा व द्वीपकल्पा-च्या किनाऱ्याचा असे दोन्हीहि फायदे मिळत आहेत. आपली मातृभूमि ही पर-श्वराची मोठी लाडकी मुलगी आहे व म्हणून हिला त्यानें विपुल वैभवानें नट-ली आहे. तिच्यामधील नद्या सखोल आहेत व त्यांचा प्रवाह अखंड वहात

आहे. तिची जमीन नांगरांनीं खणली जाण्याइतकी मृदु आहे. व तिच्या शेतामध्यें अमुप पिकें पिकत आहेत. तिच्या रोजच्या गरजा फार थोड्या आहेत आणि सदय निसर्गदेवी, मागतांच त्या पुरविण्याला सिद्ध आहे. विपुल पल्लव आणि प्रत्यक्ष भगवान् सूर्यनारायणच तिला प्रकाश व उष्णता देत आहे. हिमानें आच्छादित असलेल्या देशांची तिला लालसा नाहीं,–ती बर्फानें भिजून गेलेली भूमि त्यांची त्यांना लखलाभ असो. येथें जर कांहीं वेळेला उष्णता जीव घाबरा करीत असेल तर तेथेंहि थंडीनें हातपाय गारठले जातात. त्या देशांत थंडीच्या योगानें जर शारीरिक काम अधिक होत असेल, तर आमच्या ह्या देशांत, उष्णतेच्या योगानें तेवढ्या कामाची जरूरीच रहात नाहीं. घसा थंडीनें शुष्क करून न टाकतां तिला तृषार्तांची तहान भागविणेंच अधिक प्रिय असतें. टेम्स नदी बर्फमय झाली असतांना खुशाल तिच्यामधून प्रवासाची धडपड चालू राहो. परंतु, आमच्या आर्यमातेला शुभ्र चंद्रप्रकाशानें प्रकाशित केलेल्या गंगाजलावर लीलेनें विहार करणाऱ्या नौकांची शोभा पहात घाटाघाटांवरून हिंडणेंच अधिक आवडतें. आपला कणखर नांगर, सुंदर मयूर, मोहक कमळ, भव्य हत्ती, व उदात्त गीता या सर्वांनीं मंडित असल्यावर, शीत कटिबंधांतले जे कांहीं फायदे असतील ते सर्व सोडून देण्यास आमची आर्यमाता तयार आहे. तिला हें माहित आहे कीं, सर्वच कांहीं आपल्या मताप्रमाणें होणार नाहीं. तिच्यांतील उपवनें सदा हिरवीगार व विपुल छायेनें युक्त असतात, तिचीं धान्यागारें सदैव भरलेलीं असतात, तिचें जल हिमधवल असतें, तिचीं फुलें सुवासमत्त असतात, तिचीं फळें सरस आणि तिच्या वनस्पति गुणकारी असतात, तिची चित्रकला उषेच्या रंगांतून आपली कुंचली रंगवून घेते, आणि तिचा पांवा गोकुळींच्या गायनाचे आलाप घेत असतो. निःसंशय हिंदमाता ही परमेश्वराची सकलैश्वर्यमंडित अशी कन्या आहे.

इंग्लंड काय किंवा फ्रान्स काय, फक्त एका चीन देशावांचून व कदाचित अमेरिका वगळून इतर कोणत्याहि देशाला नैसर्गिक संरक्षण व वैभव यांच्या बाबतींत सिंधुस्थानशीं बरोबरी करतां येणार नाहीं. स्थिर आणि समर्थ अशा राष्ट्रीयत्वाला प्रथम एक देश, सर्व सामान्य वसतिस्थान असण्याची आवश्यकता असते; आणि आपला देश, राष्ट्रविकासाला जसें क्षेत्र लागतें तशा विपुल क्षेत्रानें मंडित आहे. फारच थोड्या देशांना असें क्षेत्र लाधलें आहे. आपल्या पितृभूवर प्रेम करणें हें ज्यांच्या धर्मांतील प्रथम कर्तव्य आहे अशा आपणां हिंदूंना अधिक बद्ध करण्यास, आपल्या राष्ट्राचें राष्ट्रीयत्व स्थिर राखण्यास, आणि भूतकाला-



पेक्षांहि अधिक महनीय गोष्टी पुढें करण्याची स्फूर्ति देण्यास, हें पितृभूवरचें प्रेमच समर्थ आहे.

हिंदुत्वाचें दुसरें लक्षण आपल्या राष्ट्रीय ऐक्याच्या व महनीयतेच्या सुप्तशक्तींना उत्थित करण्यास अधिकच समर्थ आहे. केवळ एक चीनशिवाय इतर कोणत्याहि देशामध्यें, आपल्या जातीइतकी एकजातीय, आपल्या जातीइतकी पुराणकालची, व तरीहि अजून संख्याबलानें व नवजीवनानें इतकी संपन्न अशी दुसरी जाति अस्तित्वांत नाहीं. राष्ट्रीयत्त्वाला अत्यंत आवश्यक असणारी अशी निसर्गरम्य देशभूमि असण्याचें भाग्य आपल्याप्रमाणेंच ज्यांना लाभलें आहे, त्या अमेरिकन लोकांचें भाग्यसुद्धां या दुसऱ्या बाबतींत आपल्या पासंगालाहि पुरणार नाहीं. मुसलमान किंवा ख्रिश्चन लोक हे कांहीं एकजाति नाहींत. ते फक्त धार्मिक दृष्ट्या एक आहेत. परंतु जातिदृष्ट्या वा राष्ट्रदृष्ट्या ते एक नाहींत. परंतु, आपण हिंदु लोक मात्र या तीनहि दृष्टीनें एक आहोंत; आणि आपण या पुराणकालच्या आपल्या घरामध्येंच रहात आहोंत. आपलें संख्याबल, हें एक आपलें कल्पनातीत असें बल आहे.

आणि संस्कृति? इंग्लिश व अमेरिकन यांना आपण एकाच हाडामांसाचे आहोंत असें वाटतें, कारण, शेक्सपियरवर त्यांचा दोघांचाहि हक्क आहे. परंतु, हिंदूंनों! केवळ कवि कालिदास व भास हेच तुमचे आहेत, असें नाहीं तर, तें थोर रामायण व महाभारत हेंहि तुमचेंच आहे–आणि ते दिव्य वेद! अमेरिकेमध्यें तेथील लहान मुलांना जें एक राष्ट्रगीत शिकविलें जातें, त्यामध्यें त्या मुलांच्या मनावर असें बिंबविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, त्यांच्या राष्ट्रामागें चारशें वर्षांचा इतिहास उभा आहे व म्हणून त्यांनीं सदैव स्वतःबद्दल स्वाभिमानी असलें पाहिजे. आमचा हिंदूंचा इतिहास हा भिकारड्या शतकांच्या मापानें मोजला जात नाहीं तर तेथें युगांचीं आणि कल्पांचीं मापें वापरावीं लागतात–आणि साश्चर्य होऊन विचारावें लागतें कीं, 'रघुपतेः क्व गतोत्तरकोशला! यदुपतेः क्व गता मथुरापुरी!!' हिंदुमनुष्य स्वतःच्या अभिमानाला जागृत करण्यापेक्षां समदर्शीपणालाच अधिक उत्तेजित करतो व हा समदर्शीपणा म्हणजेच सत्य होय. आणि त्याचमुळें बहुशः तो, रामसेस व नेबुचादनेझार यांच्याहिपेक्षां अधिक जगला. ज्या राष्ट्राला भूतकाळ नाहीं त्या राष्ट्राला भविष्यकाळहि नाहीं हें म्हणणें जर खरें असेल, तर मग ह्या राष्ट्रानें अनंत वीरपरंपरा भूतकालीं निर्माण केली, वीरांचे अनेक

पुंजक निर्माण केले, आणि ह्या राष्ट्राला, सार्थ अभिमानानें असें ऐतिहासिक सत्य नमूद करुन ठेवतां येतें कीं, ज्या शक्तीनें ग्रीस आणि रोमला आहत केलें, फारोहा आणि इनकस यांना नष्ट केलें, त्या उन्नत शक्तीशीं सामना करून अखेर याच राष्ट्रानें तिला पददलित केली. हें भूतकाळचें वीर्यशाली भागधेय ज्यांना वर्तमानकालीं अभिमानानें सांगतां येतें त्या लोकांना, उज्वल व महनीय भविष्यकाल येणारच येणार असें, पृथ्वीच्या पाठीवरील इतर कोणत्याहि लोकांपेक्षां अधिक निश्चिततेनें या राष्ट्राला सांगतां येणार आहे.

परंतु, संस्कृतीशिवाय, ' पुण्यभू 'चीं बंधनें, पुष्कळ वेळां मातृभूच्या बंधनांपेक्षां अधिक प्रबल अशीं ठरलीं आहेत. उदाहरणार्थ, मुसलमानांकडे पहा. दिल्ली किंवा आग्र्यापेक्षां त्यांचें लक्ष मक्केकडे अधिक जातें. मुसलमानांपैकीं कांहींजण उघडपणें सांगतात कीं, तसाच जर प्रसंग आला तर, इस्लामच्या वैभवाकरितां आणि त्यांच्या धर्मप्रणेत्यांच्या नगररक्षणाकरितां प्रत्येक हिंदी गोष्टीचा बळी देण्यास आम्हीं बांधलेले आहोंत. ज्यू लोकांचें पहा. अनेक शतकें वैभव उपभोगिल्यानें, किंवा त्यांना ज्या ज्या देशांनीं आश्रय दिला, त्याबद्दलच्या कृतज्ञताबुद्धीनेंसुद्धां, त्यांनीं ज्या ज्या देशांत वसाहती केल्या आहेत, त्या त्या देशांवर, अधिक तर काय, परंतु निदान समानतेनेंहि प्रेम करण्यास ते तयार नाहींत. त्यांच्या हृदयाचें प्रेम हें साहाजिकरीत्याच त्यांच्या जन्मभूमीमध्यें आणि पुण्यभूमीमध्यें विभागलें गेलें आहे. जर त्यांचीं सुखस्वप्नें खरीं झालीं व पालेस्टाईन हें ज्यू लोकांचें राष्ट्र म्हणून निर्माण झालें तर आम्हांला प्रत्यक्ष ज्यू लोकांइतकाच आनंद होईल. मुसलमान लोकांप्रमाणेंच, अमेरिकेमधील व यूरोपमधील ज्यू लोक हे त्यांच्या मातृभूमीपेक्षां ' पुण्यभू ' वरच अधिक प्रेम करतील, आणि जर त्यांच्या सांप्रतच्या वसतीच्या देशामध्यें व त्यांच्या ज्यू लोकांच्या राष्ट्रामध्यें एखादी लढाई उत्पन्न झाली तर, जरी प्रत्यक्ष ते ज्यू राष्ट्राकडे न गेले तरी त्यांची सहानुभूति मात्र सदैव त्यांच्याकडेच जाणार. अशा प्रकारचीं उदाहरणें इतिहासामध्यें अनेक ठिकाणीं भरलेलीं आहेत. यूरोपमध्यें मागें ज्या क्रुसेडच्या लढाया झाल्या त्यांमध्यें अत्यंत भिन्न भिन्न जातींचे, राष्ट्रांचे व भाषेचे लोक सामील झाले यावरूनहि वरील गोष्टच सिद्ध होत आहे.

यावरून, कोणत्याहि राष्ट्राला पूर्ण स्थैर्य व ऐक्यता यावयास इतर गोष्टींबरोबर मुख्यतः तेथील रहाणाऱ्या लोकांची त्या राष्ट्रावर भक्ति असली पाहिजे, त्यांच्या



वाडवडिलांची जी पितृभू, तीच त्यांची ' पुण्यभू ' असली पाहिजे, त्यांच्या देवांचा, देवदूतांचा, द्रष्ट्यांचा व धर्मप्रणेत्यांचा निवास त्याच भूमींत असला पाहिजे. त्यांच्या इतिहासाच्या घटनांचें जें क्षेत्र तेंच त्यांच्या पुराणांच्या घटनांचेंहि क्षेत्र असलें पाहिजे.

ह्या सर्व गोष्टी दैवबशात् ज्यांना अनुकूल आहेत असे बहुतेक एकच हिंदुलोक आहेत; व या गोष्टींच्या योगानेंच राष्ट्रीय स्थैर्य, संघटना, आणि मोठेपणा यांना प्रोत्साहन मिळत असतें. प्रत्यक्ष चिनी लोकांना देखील हें भाग्य प्राप्त झालें नाहीं. ज्यू लोकांना जर पुढें मागें पालेस्टाईनमध्यें स्वतःचें घर स्थापन करण्यांत यश आलें तर त्यांना व अरेबियांतील लोकांनांच फक्त हें असामान्य भाग्य प्राप्त झालें असें म्हणतां येईल. परंतु, अरेबिया हा नैसर्गिक वैभवानें, संस्कृतीच्या दृष्टीनें, ऐतिहासिक महत्त्वानें व लोकसंख्याबलानें, मोठें राष्ट्र होण्याला अगदींच निर्बल आहे; आणि ज्यू लोकांची पुनः पालेस्टाईनमध्यें घर करून रहाण्याचीं सुखस्वप्नें जरी फलद्रूप झालीं तरी त्यांनांहि या गोष्टींची सारखीच वाण भासणार आहे.

इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, तुर्कस्थान, इराण, जपान, अफगाणिस्थान, आजचा इजिप्त, कारण, 'पंटों'चीं पुराण संतति आणि त्यांचा इजिप्त हे फार पूर्वींच नष्ट झाले आहेत–आणि आफ्रिकेचीं इतर संस्थानें, मेक्सिको, पेरू, चिली ( याच्यापेक्षां लहान लहान देशांचा नामनिर्देशहि नको ) हे सर्व देश कमी अधिक प्रमाणानें जातीयदृष्ट्या एक असले तरी भौगोलिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, आणि संख्याबलत्व या सर्व दृष्टींनीं, आमच्यापेक्षां पुष्कळ पटीनें कमी संपन्न आहेत. आणि त्यांतहि जी पितृभू तीच पुण्यभूहि असण्याचें महनीय भाग्य तर त्यांना लाभलेंच नाहीं. आतां राहतांपैकीं राहिलेले देश म्हणजे यूरोपांतला रशिया, आणि अमेरिकेचीं संयुक्त संस्थानें हीं भौगोलिक दृष्टया जरी आमच्या देशाच्या तोडीचीं असलीं तरी राष्ट्रीयत्त्वाच्या इतर लक्षणांमध्यें आमच्यापेक्षां कितीतरी हीन दर्जाचीं ठरतात. हल्लीं अस्तित्वांत असणाऱ्या सर्व राष्ट्रांमध्यें फक्त चिनी राष्ट्र काय तें आम्हा हिंदूंच्या भौगोलिक, जातीय, सांस्कृतिक व संख्याबल या दृष्टींनीं, बहुतेक समान भाग्याचें ठरतें. राष्ट्रीयत्त्वाच्या दृढीकरणाला अवश्य असणाऱ्या गोष्टींपैकीं फक्त दोन गोष्टींत मात्र आम्ही चिनी लोकांपेक्षांहि अधिक भाग्यवान् आहोंत व त्या दोन गोष्टी म्हणजे पूर्ण विकसित झालेली संस्कृत भाषा व पवित्र झालेली जन्मभूमि–[ पितृभूमि व पुण्यभू ].

यांप्रमाणें हिंदुत्वाचीं सारभूत तत्त्वें, व आतां आपण विहंगमदृष्टया जें विवेचन केलें त्याप्रमाणें राष्ट्रीयत्वाचीं जीं तत्त्वें तीं, हीं दोन्हीहि एकच ठरतात. आपण जर मनांत आणूं तर 'हिंदुत्वा' च्या पायावर, जगामधील इतर कोणत्याहि लोकांच्या स्वप्नांतहि आला नसेल असा उज्वलतर भविष्यकाल निर्माण करूं शकूं. इतकेंच काय परंतु आपला स्वतःचा जो वैभवशाली भूतकाल आहे त्याच्याहिपेक्षां अधिक वैभवशाली असा भविष्यकाल निर्माण करूं शकूं. पण तो फक्त तेव्हांच कीं, जेव्हां आम्ही आम्हाला लाधलेल्या संधींचा योग्य फायदा करून घेऊं तेव्हां. कारण, आपल्या लोकांनीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, मोठमोठे संघ निर्माण करणें हा हल्लींचा राजमार्ग होऊन बसला आहे. राष्ट्रसंघ, निरनिराळ्या देशांचीं मित्रमंडळें (दोस्तसंघ), पानइस्लामिझम, पानस्लाविझम, पानइथिओपिझम्, हें सर्व काय खेळ आहेत ? जगामध्यें खळबळलेल्या प्रचंड जीवनकलहांत सामर्थ्यसंपन्नांचाच टिकाव लागणार हें जाणून ह्या लहान लहान जीवितांची संघटनानें मोठें होण्याची धडपड आहे. जे लोक निसर्गतः आणि ऐतिहासिक दृष्टीनें, संख्येनें किंवा भौगोलिक स्थितीनें किंवा जातीयत्वाच्या बंधनानें समर्थ असण्याइतके भाग्यवान् नाहींत, ते लोक इतरांशीं संधि करून समर्थ होऊं पहात आहेत. ज्या भाग्यहीनांना, या सर्व गोष्टी जन्मसिद्ध हक्क म्हणून लाधल्या असूनहि, त्यांची जाणीव नाहीं, त्यांना धिःक्कार असो! अथवा त्यांची कींवच केली पाहिजे! जगामधील प्रत्येक राष्ट्र आजकाल, या नाहीं त्या संघामध्यें शिरकाव व्हावा म्हणून प्रयत्न करीत आहे. परंतु, हे हिंदूंनों! मग आपण जैन असा, समाजी असा, सनातनी असा, शिख असा, अथवा इतर कोणत्याहि उपपंथामधले असा, आपणांपैकीं कोणालाहि, या आधींच सिद्ध असलेल्या महासंघांतून फुटून जाऊन, तो संघ नष्ट करणें हें हितकारक होईल काय? आणि हा आपला संघ म्हणजे काय एखाद्या कागदाच्या चिठोऱ्यानें, अथवा एखाद्या ओढवणाऱ्या सामान्य संकटाच्या भयानें का झाला आहे? नाहीं, हा आपला संघ एकरक्ताच्या, जन्मजन्मांच्या व संस्कृतीच्या पवित्र बंधनांनीं घडून आलेला आहे. जर करवत असेल तर त्याला दृढतर करा. जाति आणि उपजाति, पंथ आणि मतमतांतरें यांचीं आतां निरुपयोगी झालेलीं कृत्रिम बंधनें ताड्ताड तोडून टाका. सहभोजनाचें काय घेऊन बसलां आहांत? परंतु, प्रांतांप्रांतांमधील, व जातींजातींमधील संमिश्र लग्नें जिथें होत नसतील, तिथें घडवून आणा. परंतु, शिख व सनातनी, जैन व वैष्णव, लिंगाईत व लिंगाइतेतर त्यांच्यामध्यें आधीं



होत असलेलीं लग्नें जर कोणी मोडण्याचा प्रयत्न करील तर हें वैवाहिक बंधन नष्ट करणारा मनुष्य आत्मघातकी ठरेल. जे अल्पसंख्याक लोक आहेत, त्यांनीं ध्यानांत धरावें कीं, ज्या फांदीवर ते बसले आहेत ती फांदीच स्वतः कापण्यासारखें होणार आहे. आपल्या जातीच्या मूळच्या केंद्रस्थानाला बांधणारा प्रत्येक बंध-मग तो एक रक्ताचा असो, भाषेचा असो, किंवा सर्वसाधारण उत्सव व सण यांचा असो, अथवा तो संस्कृतीचा असो, मातृभूमीवर असलेल्या तुमच्या प्रेमानें तो बंध, जेणेंकरून दृढतर होईल अशा रीतीनें बांधा. हिंदूंच्या रक्ताचा हा पुराण व महनीय प्रवाह सकल राष्ट्राच्या धमधमनीमधून अखंड वाहो, तो अटकेपासून कटकपर्यंत अप्रतिहततेनें वाहत राहो आणि तो असा सतत वहात राहिला म्हणजे सर्व हिंदु लोक हे एकमेकांत अखंड मिसळून जातील आणि आपली ही जाति दृढबद्ध, समर्थ आणि सतेज पोलादासारखी अभेद्य होईल.

क्षणभर भूतकालाकडे नजर फेंका व मग वर्तमानकालाकडे पहा. तुम्हाला काय दिसेल? एशियामध्यें मुसलमानसंघ (पानइस्लामिझम्), यूरोपमध्यें निरनिराळ्या राष्ट्रांचें राजकीय संघ, आफ्रिका आणि अमेरिका येथें नीग्रोंचें एकीकरण असले देखावे तुम्हाला दृष्टीस पडतील. आणि हें पाहिल्यावर, हे हिंदूंनों! विचार करा कीं, तुमचा भविष्यकाल या हिंदुदेशाशींच निगडित झाला आहे कीं नाहीं, आणि हिंददेशाचा भविष्यकाळ, हा हिंदूंच्या सामर्थ्यावरच अवलंबून आहे. आमचें हें कर्तव्यच आहे व तें आम्ही शक्य तोंवर करीत आहोंत कीं, ज्यायोगें प्रत्येक हिंदी मनुष्याच्या मनांत, मूळ समष्टीवरचें प्रेम अधिक उत्पन्न होईल व तिच्या आस्तित्वाची जाणीव तीव्रतर भासूं लागेल. असें जर झालें तर मग साहजिकच हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, आणि ज्यू ह्यांनां असें वाटेल कीं, आपण प्रथम हिंदी व मग इतर सर्व. राष्ट्रीयत्त्वाची ही भावना प्रसृत करण्याच्या खटपटीमध्यें किती यश आलें असेल तें असो, परंतु, एक गोष्ट मात्र खरी आहे कीं, राष्ट्राची घटना व्हावयास त्याला कांहीं तरी एक पाया असावा लागतो. ही वस्तुस्थिति हिंदुस्थानांतच नव्हे तर इतरहि सर्व देशांमध्यें आपल्या प्रत्ययाला येते. ज्याप्रमाणें राष्ट्राच्या घटनेस कसला तरी पाया असावा लागतो त्याचप्रमाणें राष्ट्राचें खरें जीवन हें, त्यांतील जे रहिवासी हितसंबंधांनीं व इतिहासांनीं त्या राष्ट्राशीं बद्ध झालेले असतात त्यांच्याच जीवनावर अवलंबून असतें आणि यांच्याच योगानें राष्ट्रीयसंस्थेच्या उभारणीला खरा पाया प्राप्त होतो. उदाहरणार्थ तुर्कस्थानची स्थिति पहा. तुर्क-

स्थानमध्यें राजक्रांति झाल्यानंतर तरुण तुर्कांना त्यांच्या राष्ट्रीय सभेंत ( पार्ले-मेंटांत ) आरमेनिअन व ख्रिस्ती लोकांना प्रवेशद्वारें, धर्म अगर जाति लक्ष्यांत न घेतां, मोकळीं ठेवावीं लागलीं. परंतु, जेव्हां सर्वियाशीं युद्ध पुकारलें गेलें, तेव्हां, ख्रिस्ती आणि आरमेनिअन लोकांचीं मनें प्रथम चंचल झालीं आणि मग त्यांच्या कित्येक पलटणी प्रत्यक्ष सर्वियाच्या बाजूला जाऊन मिळाल्या; व याचें कारण म्हणजे त्या राजकीय, जातीय व धार्मिक दृष्टीनें सर्वियाशींच अधिक सदृश होत्या. अमेरिकेचेंहि उदाहरण घ्या. जेव्हां जर्मन महायुद्ध सुरू झालें, तेव्हां जर्मन वंशाचे रहिवासी अमेरिकेला सोडून जाऊं लागले व ही एक मोठी आपत्ति अमेरिकेपुढें उभी राहिली. तेथील नीग्रो लोकांचेंसुद्धां आफ्रिकेमधील नीग्रोलोकांवर त्यांच्या यूरोपियन देशबांधवांपेक्षां अधिक प्रेम आहे. म्हणून अमेरिकेचें नशीब, अखेर तेथील आंग्लोसॅक्सन लोकांच्या नशीबाशींच निगडित झालें आहे. हीच गोष्ट हिंदूंची आहे. त्यांचा भूतकाल, वर्तमान, भविष्यकाल, हा हिंदुस्थानाशींच दृढबद्ध असल्यानें त्यांची ' पितृभू ' व ' पुण्यभू ' हेंच ' सिंधुस्थान ' झालें आहे. आणि म्हणून हिंदीराष्ट्राचा मूळ पाया, आधारस्तंभ, निर्वाणीचे त्राते असे 'हिंदु' लोकच आहेत. एवढ्याकरितां हिंदी राष्ट्रीयत्त्वाच्या दृष्टीनें देखील, हे हिंदूंनो ! तुम्ही हिंदुराष्ट्रीयत्त्वाला दृढमूल व समर्थ बनवा. हिंदुस्थानांतील आपल्या कोणाहि अहिंदुबंधूला वास्तविक म्हटलें म्हणजे जगांतील कोणालाहि-उगाच अपमान करून दुखवूं नका. परंतु, न्याय्य आणि निकडीच्या, आपल्या जातीच्या आणि देशाच्या संरक्षणाकरितां केव्हांहि सज्ज असा, कीं ज्यामुळें खंडांखंडांमधून, जे विशिष्ट संघ धिंगाणा घालीत आहेत त्यांच्याकडून विनाकारण हल्ले होणें बंद होईल व कोणालाहि बेइमानपणानें तिला ठकवितां येणार नाहीं. हिंदुस्थानमधील इतर जाति जोंपर्यंत ' हिंदुस्थान आधीं ' असें म्हणत नाहींत, किंवा जगामधले इतर लोक ' मनुष्यजाति आधीं ' असें तत्त्वज्ञान आचरीत नाहींत, परंतु, जोंपर्यंत हे लोक चढावाची व स्वसंरक्षणाचीच तयारी करण्याकरितां, केवळ जातीच्या अथवा धर्माच्या संकुचित दृष्टीनें संघटना आणि जूट करण्याचा विश्वप्रयत्न करीत आहेत, तोंपर्यंत-हिंदूंनो ! तोंपर्यंत तरी तुम्ही, शक्य तर तुमच्या जातीच्या सामाजिक जीवनाला, ज्ञानतंतूंच्या जाळ्या-प्रमाणें एकजीव करणारीं सर्व बंधनें दृढीभूत करा. तुमच्यापैकीं जे कोणी, या अत्यंत जिव्हाळ्याच्या बंधनांना तोडून टाकण्याचा आत्मघातकी प्रयत्न करतील, किंवा ' हिंदु ' हें नांव नाकारतील, त्यांना पुढें असा विषमय अनुभव येईल कीं,



आपल्या जातीच्या जीवनाच्या व सामर्थ्याच्या झऱ्यापासूनच त्यांनीं स्वतःला तोडून घेतलें आहे.

'हिंदुत्वा'चीं जीं लक्षणें आम्ही दिग्दर्शित केलीं त्यांपैकीं कांहीं थोडीं लक्षणेंच जरी स्पेन व पोर्च्युगाल यांच्यामध्यें वसत होतीं, तरी तेवढ्या लक्षणांच्या जोरा-वरच त्यांनीं जगामध्यें सिंहपराक्रम केले. मग तीं सर्व लक्षणें समुत्पन्न असल्या-वर जगांत असें काय आहे कीं, जें हिंदुलोकांना साध्य करून घेतां येणार नाहीं ?

बावीस कोटी लोक, ज्यांची हिंदुस्थान ही कर्मभूमि आहे, पितृभूमि आहे आणि पुण्यभूमि आहे, असला दिव्य इतिहास ज्यांच्यामागें उभा आहे, एक रक्त आणि एक संस्कृति यांच्या सर्वसामान्य बंधनांनीं जे बद्ध आहेत, असले हे बावीस कोटी हिंदु लोक, सर्व जगाला आपलें म्हणणें ऐकावयाला लावतील. असा एक दिवस उगवणार आहे कीं, ज्या वेळीं हें सामर्थ्य, जगाच्या प्रत्ययास येणार आहे.

आणि हेंहि तितकेंच निश्चित आहे कीं, जेव्हां केव्हां ही अशी वेळ येईल, तेव्हां हिंदुलोक सर्व जगाला दुसरें तिसरें कांहीं सांगणार नाहींत. तर तेंच जगाला करावयास सांगतील कीं, जें गीतेनें सांगितलें, जें बुद्धानें उपदेशिलें. ज्या वेळीं ' हिंदु ' मनुष्य, हा हिंदुत्वातीत होतो त्यावेळेला तो श्रीशंकराचार्यां-प्रमाणें ' वाराणसी मेदिनी ' म्हणून गावयाला लागतो व श्री तुकाराममहाराजां-प्रमाणें ' आमुचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास । ' असें गर्जून उठतो. ' काय म्हणतां ? माझा स्वदेश ? ऐका तर, बंधूंनो ! माझ्या देशाच्या मर्यादा म्हणजे त्रैलोक्याच्या मर्यादा, तचि माझ्या देशाची सरहद्द ! '

—× समाप्त. ×—

# परिशिष्ट

# हिंदुत्वासंबंधानें कांहीं हिंदु अग्रणींचीं मतें

## श्रीमत्‌जगद्‌गुरु श्रीशंकराचार्य

### ( डॉ. कुर्तकोटी )

" देवल स्मृतिसारख्या ग्रंथांत आपल्या ह्या हिंदुस्थानांत बळानें वगैरे म्लेंच्छ केल्या गेलेल्या इसमांना शुद्ध करून पुनः वैदिक धर्मांत परत घेण्यास जें सांगितलें आहे, त्यावरून हिंदूंना बाटवून म्लेंच्छ करण्याचा प्रयत्न हिंदुस्थानांत बऱ्याच वर्षांपासून होत असल्याचें व आपल्या पूर्वजांनीं त्याबद्दल योग्य उपाय योजल्याचें स्पष्टपणें दिसून येतें.

सुमारें ७००।८०० वर्षांपूर्वी मुसलमानी अमल हिंदुस्थानांत सुरू झांल्यापासून हिंदूनां बाटविण्याच्या कामास जोराचें स्वरूप आल्याची गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे......मुसलमानांनीं तरवारीच्या जोरावर हिंदूंना बाटवून मुसलमान करण्यास प्रारंभ केला. [ ज्या हिंदुस्थानांत तेथील धनी जे हिंदू त्यांच्याशिवाय दुसरें कोणीहि येथें दिसत नसत त्याच ठिकाणीं मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारांमुळें व बलात्कारानें आज त्याच हिंदूंची संख्या कमी होऊन हिंदूचेंच रक्त अंगांत असणारे लोक कित्येक कोटी संख्येपर्यंत मुसलमान झालेले आहेत. ] याचप्रमाणें... ख्रिश्चन लोकांनीं ह्या कार्याचा उपक्रम केला [ व हिंदूमध्येंच हिंदूचे ख्रिश्चन झालेल्यांची संख्या वाढवून ठेवली आहे. अनुकूल संधीचा लाभ घेऊन जर हिंदु जातींनीं या बलात्कारानें परधर्मांत सडत व कुजत पडलेल्या या आपल्या पोटच्या गोळ्यांना भलत्याच खोट्या अभिमानाला व भ्रमाला बळी न पडतां प्रेमानें व खऱ्या धर्मभक्तीनें परत स्वधर्मांत येण्याचें द्वार खुलें ठेऊन आंत घेतलें असतें, तर हिंदुस्थानची आजच्या परिस्थितींत इतकी दुरवस्था झाली नसती. स्वधर्मांत घेण्याचे प्रयत्न झाले नाहींत असें नाहीं. परंतु जितक्या जोराचा ओघ परधर्मांत खेंचून नेले जाण्याचा होता तितकाच व्यापक व सार्वत्रिक असा प्रयत्न झाला नाहीं. तोच खुलेपणा जर आपण कायम ठेवूं तर भविष्यकालाच्या पोटांत



हिंदु जातीला अस्तित्व खास राहणार नाहीं. ].........धर्मांतर केलेल्या लोकांस पुनः आपल्या धर्मांत परत घेतां येतें ह्या गोष्टीची जाणीव नसल्यामुळें हिंदूंचें धर्मांतर करण्याचा [ मुसल्मान व ] पाद्री लोकांचा उद्योग अबाधित सुरू राहिला.

हल्लीं हिंदुस्थानांतील तीस बत्तीस कोटी प्रजेंत हिंदु अवघे वीस बावीस कोटी राहिले आहेत. व अद्याप इंग्लिश व मुसलमानी संस्थानिकांच्या हद्दींत भिन्न भिन्न तऱ्हेनें हिंदूंना बाटविण्याचा सपाटा सारखा सुरू आहे.

अलीकडे मुसलमानांना तर त्यांच्या कार्यांस चांगली संधि मिळत चालली आहे. कारण इंग्रजी राज्य सुरू झाल्यापासून मुत्सद्दी नोकरशाहीनें हिंदुमुसलमानांत भेद पाडून व मुसलमानांस हातीं धरून राज्यशकट चालविण्यास सुरवात केली आणि तोडीस प्रतितोड म्हणून हिंदुस्थानांतील सनदशीर राजकारणाच्या पुढाऱ्यांना हिंदीपक्ष स्थापन करून त्याकडे सरकारच्या बाजूस असलेल्या मुसलमानांस वळविण्याचा प्रयत्न करावा लागला. एके बाजूस नोकरशाही व दुसरे बाजूस लोकपक्षीय पुढारी या दोघांच्या चढाओढींत मुसलमानांचें चांगलें फावलें; आणि लखनौ येथील एकीच्या करारनाम्याप्रमाणें ( Lucknow Pact ) स्वतंत्र जातवार प्रतिनिधित्वाचे हक्क ( Communal representation ) मिळालें. त्याचा परिणाम हा झाला कीं, एकीच्या ऐवजीं दुफळी झाली; इतकेंच नव्हे तर हिंदूंतील पोटजातींच्या लोकांस देखील मुसलमानांचें उदाहरण पाहून जातवार प्रतिनिधित्वाचे हक्क मिळविण्याचा मोह पडून त्यामुळें हिंदुसमाजांत जास्त फूट पडली व मुसलमानांस त्यावर जास्त जोरानें आघात करण्यास आयतीच संधि मिळाली.

वरील लखनौ येथील ठरावानंतर लागलीच तुर्कस्थानांतील खलिफावर आलेल्या संकटाच्या निवारणार्थ हिंदुस्थानांत सुरू झालेल्या व विशेषतः हिंदूंनीं मुसलमानांस खूष करण्याकरितां केलेल्या खिलाफतीच्या चळवळीमुळें मुसलमान समाजांत बरीच संघटना झाली. आणि त्याच्या उलट वर लिहिल्याप्रमाणें हिंदुसमाजांत जास्त विस्कळितपणा झाल्यामुळें त्यावर मुसलमानांस ठिकठिकाणीं अत्याचार करण्यास फावलें आहे.

हिंदुस्थानाच्या दक्षिण भागांत मलबारांतील मोपले मुसलमानांचा अत्याचार, निझाम हद्दींतील गुलबुर्गा येथील मुसलमानांचा अत्याचार, वायव्य भागांतील कोहट येथील मुसलमानांचा अत्याचार हीं तिन्हीं महत्वाचीं उदाहरणें आहेत.

शिवाय ठिकठिकाणीं देशभर आणि महाराष्ट्रांत मालेगांव, नंदुरबार, ( दिल्ली, सहारणपूर ) इत्यादि अनेक ठिकाणीं मुसलमानांचे लहान मोठे अत्याचार व जाळ-पोळी अलीकडे कितीतरी झालेल्या आहेत व होत आहेत. वाटेल त्या तऱ्हेनें व युक्तीनें हिंदूंना बाटवून मुसलमान करण्याच्या चळवळीचा प्रसार करण्याचें व्रतच कांहीं मुसलमानांनीं पत्करलेलें आहे. निजामच्या राज्यांत व भोपाळच्या राज्यांत हिंदूंची स्थिति फारच बिकट झाल्याचें ऐकूं येतें. जागजागीं तुरुंगांतून, मुसलमानी उत्सवांतून व इतर निरनिराळ्या प्रसंगांत हिंदूंना मुसलमान करण्याचा उपाय सुरू आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार हिंदूसमाजानें न केला तर कांहीं शतकांनीं हिंदु हें नांव सुद्धां ऐकण्यास मिळेल कीं नाहीं याची वानवा आहे. हिंदुस्थान हें त्या शब्दांच्या अर्थाप्रमाणें हिंदूचें स्थान असून त्याच देशांत ते नामशेष होत चाललेले आहेत याचा विचार हिंदूंनीं करावयास नको काय ? इकडे परधर्मी लोक आपल्या धर्माच्या प्रसारार्थ हिंदुस्थानांत बऱ्या वाईट मार्गानें झटत आहेत आणि दुसरीकडे हिंदु म्हणविणारे त्याचा प्रतिकार न करतां आपसांत दुही पाडून एकमेकांस नामशेष करण्यास उद्युक्त झालेले आहेत.........हिंदुमुसलमानांचें ऐक्य करण्याकरितां जे प्रयत्न होत आहेत, त्यांत कांहीं मंडळीकडून पदोपदीं मुसलमानांपुढें हिंदूंस माघार घेण्यास लावून अप्रत्यक्ष रीतीनें हिंदुसमाजाच्या नाशालाच साह्य होत आहे. अशा रीतीनें सर्व बाजूंनीं मुसलमानी समाजाच्या धर्मवेडेपणालाच प्रोत्साहन मिळून सर्व बाजूंनीं हिंदु समाजाचा ऱ्हास होत आहे.

अशा रीतीनें सर्व हिंदुस्थानभर हिंदुसमाज शिथिल होत चालल्यामुळें पुढें होणारा हिंदूंचा ऱ्हास थांबविण्यासाठीं हिंदूंच्या संघटनाची आवश्यकता आणि आजपावेतों जे हिंदुलोक बाटून मुसलमान किंवा ख्रिस्ती झाले त्यांस आपल्या धर्मांत परत घेण्याकरितां शुद्धिकार्याची आवश्यकता आहे हें दिसून येण्यासारखें आहे. परंतु महाराष्ट्रांत हिंदूंपेक्षां मुसलमानांची संख्या कमी असून शिवाय श्रीशिवछत्रपतींनीं महाराष्ट्रांत जें चैतन्य उत्पन्न केलें, त्यामुळें हिंदुसमाजाची बळकटी दिसून यावयास पाहिजे होती, पण ती तशी न दिसतां महाराष्ट्रियांचे तेज आपसांत ब्राह्मणब्राह्मणेत्तर वादासारख्या आत्मघात करण्याच्या कामीं खर्ची पडत असल्यामुळें हिंदुसंघटन व शुद्धिकार्य ह्या दोहोंची तीव्र आवश्यकता या महाराष्ट्रांत देखील भासूं लागली आहे. श्रीशिवछत्रपतींनीं ज्या वेळीं नामशेष होत चाललेला हिंदुधर्म, परधर्मीयांच्या हल्ल्यांतून वांचविण्यासाठीं हिंदुसं



नेचा व पतितपरावर्तनाचा जो प्रयत्न केला, तो महाराष्ट्रानें पुढें चालू ठेवला असता तर खरोखर आज मितीस तें महा-राष्ट्रच झालें असतें व महाराष्ट्रांतील वसईसारखीं ठिकाणें ख्रिस्तिमय आढळलीं नसतीं. असो. आतांपर्यंत झालें तें होऊन गेलें, पण अद्याप महाराष्ट्र जागा होऊल तर कितीतरी कार्य होईल. आपल्या दुर्लक्ष्यामुळें मुसलमान आणि ख्रिस्ती लोकांच्या जुलमास व फसवणुकीस बळी पडलेल्या समाजापैकीं कांहीं मोठमोठाले समाज असे आहेत कीं त्यांचे विवाह व अंत्यविधि मात्र मुसलमान व ख्रिस्ती पद्धतीनें होत असून त्यांचे इतर सर्व आचार व प्रसंगविशेषीं उपास्यदेवतेंहि हिंदूंचींच आहेत. आणि त्यांनीं आपल्या समाजांतच शरीरसंबंध ठेवल्यामुळें रक्तशुद्धि राखली आहे. अशांना आपण त्यांची इच्छा असल्यास व आहे हे अनुभवानें दिसून येत असतां, परत हिंदुसमाजांत–परत हिंदुधर्मांत घेण्यास अजून तरी कां विलंब लावावा ? पतित-परावर्तनाच्या कामांत परधर्मीयांकडून हरकत होण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण आम्ही पतित झालेल्या आमच्याच धर्माच्या लोकांस व आपखुशीनें शुद्ध होऊन आमच्या समाजांत येऊं इच्छिणारांना शुद्ध करून घेतों; तेव्हां त्याकरितां परधर्मीयांस रागावण्याचें कांहीं कारण नाहीं. इतक्यावर ते निष्कारण रागावतील तर आम्हांस त्याची परवा करण्याची जरूर नाहीं. आम्हांस कोणाचाहि द्वेष करावयाचा नाहीं व आपला नाशहि पण होऊं द्यावयाचा नाहीं. यास्तव आळस न करतां जारीनें प्रयत्न सुरू केले पाहिजेत.

ख्रिस्ती धर्माच्या मुत्सद्दीपणानें वाढविल्या जाणाऱ्या ख्रिस्ती धर्माच्या आणि जुलमानें वाढविल्या जाणाऱ्या मुसलमानी धर्माच्या तडाख्यांतून आपल्या हिंदुधर्माचा बचाव करावयाचा, तर त्यासाठीं जागजागीं आपलीं अनाथगृहें स्थापन झालीं पाहिजेत व व्यायामशाळा सुरू झाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं प्रचारक नेमले पाहिजेत; आणि सर्व हिंदूंची दृष्टि हिंदुसमाजाच्या कल्याणाकडे वेधिली पाहिजे. हें कार्य जरी मोठें असलें. तरी श्रीशिवरायाच्या महाराष्ट्रानें हातीं घेण्यास फार कठीण नाहीं. शिवरायाचे वंशज व शिवरायाचे आप्तगोत व प्रजाजनांचे वंशज यापुढें जुटीनें स्वधर्माचा विजय करणार कीं आतांप्रमाणें फुटीनें मागें हटून स्वधर्माचा विलय करणार ? हा प्रश्न सोडविण्याची निकराची वेळ हीच आहे. तरी सर्व प्रकारचा आत्मघातकी प्रयत्न सोडून महाराष्ट्रानें स्वधर्माच्या संरक्षणार्थ हिंदुसंघटन व शुद्धिकार्य यांकडे पूर्ण लक्ष पुरविलें पाहिजे.

## पंडित मदनमोहन मालवीय

१

### [ बेळगांव येथील अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून केलेलें ]

" हिंदुमुसलमानांचे दंगे व अस्पृश्यांचें धर्मांतर इत्यादींनीं हिंदुसमाजाचा दिसून आलेला कमकुवतपणा घालविण्यासाठींच महासभा स्थापन झाली आहे.........हिंदुमुसलमानांत ठिकठिकाणीं दंगे झाले. हिंदूंच्या अंगीं ( संघटनेच्या व सामुदायिक भावनाबलाच्या अभावामुळें ) दिसून आलेला भ्याडपणा व दुर्बलता नसती तर त्यांतले कांहीं दंगे तरी ( जसे नागपुरांत टळले तसे ) खास टळले असते अशी माझी खात्री झाली आहे. या दंग्यामुळें राष्ट्रहिताला घातुक अशी परिस्थिति उत्पन्न झाली आहे तिला बऱ्याच अंशीं कारण झालेली हिंदूंची दुर्बलता घालविणें ओघानेंच प्राप्त झालें. हिंदु इतके दुर्बल कां झाले ? याचें पहिलें कारण हें कीं, त्यांना आपल्या खऱ्या धर्मतत्वांचा विसर पडला. लग्नसंस्थेला येथल्याइतकें पावित्र्य असलेलें जगांत कोठेंहि पहावयास मिळत नाहीं, पण त्याहि बाबतींत बालविवाहासारख्या दुष्ट चालींचा शिरकाव होऊन, शरीरसामर्थ्याचा ऱ्हास झाला. समाजांतल्या असल्या घातुक रूढि नाहींशा करण्यास हिंदुमहासभेशिवाय जास्त चांगलें दुसरें साधन कोणतें आहे ?......शतकानुशतकें हिंदूंना बाटविण्याचा उद्योग मुसलमानांनीं अव्याहत चालविलेला आहे. हिंदुस्थानांतल्या मुसलमानांत, बाटून मुसलमान झालेलेच जास्त आहेत. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी यांतच भर पडून हिंदूंची मोठी कठिण अवस्था झाली आहे. हिंदुसमाज बराच वेळ बेफिकीर राहिला, परंतु शेवटीं हिंदुमिशन स्थापणेंहि अपरिहार्य होऊन आर्यसमाजानें त्यांत पुढाकार घेतला......एकंदर राष्ट्राच्या सर्वसामान्य हिताच्या दृष्टीनें हिंदुसमाज श्रेष्ठ असूनहि दुर्बल व विस्कलित झालेला आहे. हिंदूंनी आपली संघटना, अस्पृश्यांचा उद्धार, व ( आपल्यामध्यें सामुदायिक स्वत्वभावनेनें प्रेरित होऊन ) सर्व प्रसंगीं खांद्याला खांदा लावून ( संघबलानें सामुदायिक ) कार्य करण्याची तयारी केल्याशिवाय हिंदुमुसलमानांची एकी होणें शक्य नाहीं. "......



२

### [ मुंबई मारवाडी विद्यालयांतील भाषण ]

" .........मुसलमान हिंदूंना बाटवितात, ख्रिश्चनहि हिंदूंनाच बाटवितात, याचा आपण सर्वांनीं विचार करून धर्माचें रक्षण करण्याची खटपट करावयास नको काय ? जो तो जागृतीची खटपट करीत आहे. चीन देश एवढा विस्तीर्ण, तेथेंहि जागृति होऊं लागली. जपाननें तर अवघ्या पन्नास वर्षांत इतर सुधारलेल्या राष्ट्रांची बरोबरी केली. भारतवर्षांत मात्र जागृति होत नाहीं ! मुसलमान देखील ( सामान्यतः ) परवांपर्यंत झोंपले होते. परंतु त्यांनीं जागृति जोरानें करण्यास आरंभ केला आहे......आजच सर्व-मुसलमानांना–शिया, सुनी, वहाबी इत्यादि त्यांच्या पंथांना–एकत्र करण्याकरितां काय करावें याचा विचार करण्याकरितां मुस्लीम लीगनें कमिटी नेमली आहे.सर्वजण उन्नतीच्या मागें लागले असतां आपणांस स्वस्थ बसून कसें चालेल ? आपण हिंदूंनीं गांवोगांव हिंदु सभा स्थापन केल्या पाहिजेत. आपण निश्चित असें धोरण ठरवावयास नको काय ? पन्नास मतभेद असतील तर काय उपयोग ? '**संघे शक्तिः कलौ युगे**' ही गोष्ट लक्ष्यांत ठेवा. प्रत्येक नगर, खेडें, तालुका इत्यादि ठिकाणीं हिंदुसभा स्थापन झालीच पाहिजे....परंतु आज आपण कांहीं तरी करतां काय ? निदान दर एकादशीला तरी धर्मग्रंथांचें परिशीलन करा, हरिकीर्तनाचा आनंद लुटा. प्राचीनकालीं प्रत्येक मनुष्य वयाचीं पहिलीं २५ वर्षें ब्रह्मचर्य पाळून विद्याभ्यास करी. अशा प्रकारची उत्कृष्ट पद्धति कोणत्याहि लोकांत नव्हती. ( व नाहींहि. ) आपणांमध्यें अर्जुन व भीष्म, द्रोण व अश्वत्थामा, राम व लक्ष्मण यांसारखे थोर पुरुष होऊन गेले, परंतु ही स्थिति पालटली. बालविवाहाच्या घातकी चालीचा आपणांमध्यें प्रादुर्भाव झाला. बालविवाहाचें संतान राहिलेंच तर रोडकें राहतें. गांवांतील मुलांकडे सभेनें लक्ष दिलें पाहिजे. स्वाध्याय झाल्यावर त्यांच्याकडून थोडासा व्यायाम करून घेतलाच पाहिजे. ......मुलींकडूनहि व्यायाम करविण्यांत आला पाहिजे. पूर्वीं इकडे अशी चाल होती, त्या वेळीं मुलींना तीर मारणें, घोड्यावर बसणें या गोष्टी येत असत. द्वारका नगरींतील स्त्रियादेखील युद्धाला सज्ज असत असें त्या नगराचें वर्णन करतांना सांगण्यांत येत असे. .........बालकांचें शिक्षण, रक्षण, व पोषण आपण केलेंच पाहिजे. नाहीं तर त्यांना मुसलमान व ख्रिस्ती मिशनरी बाटवतात. तोच मुलगा मोठा झाला म्हणजे त्याला असें वाटतें कीं, माझ्या मातापित्यांच्या जातींत, धर्मांत

एकालाहि माझें रक्षण करतां आलें नाहीं ! (व तोच मुलगा असल्या विचारांनीं भावी शत्रू होऊन बसतो.) किती शोचनीय ही स्थिति !.........अस्पृश्यांचा विचार आपण करावयास नको काय ? आपल्या धर्मबांधवांपैकीं ५॥ कोटी लोक अस्पृश्य आहेत. आपण त्यांना अत्यंत वाईट रीतीनें वागवितों, ख्रिश्चन व मुसलमान हे त्या गोष्टीचा लाभ घेतात व त्यांना बाटवितात.......हा आपला भयंकर दोष !......नगरांत, खेडेगांवांत हिंदुसभेच्या शाखा स्थापा, तिचे सभासद व्हा. चांगले आचार अमलांत आणा, अनुचित टाकून द्या, मोहल्यांतून सुद्धां हिंदूंचें संघटन करा, हिंदी भाषेचा प्रसार करा, स्वदेशीचा प्रसार करा, ब्रह्मचर्य-व्यायाम-हरिकीर्तन यांच्याकडे डोळेझांक करूं नका. या गोष्टी अमलांत आणल्यास सूर्यचंद्र आहेत तोंपर्यंत आपल्या धर्माचें व राष्ट्राचें तेजस्वी स्वरूप कायम राहील. "

३

## [ पुणें-शिवाजी मंदिरांतील भाषण ]

" ......लोकांच्या कानांवर रामदासांचा उपदेश पडूं द्या. भारत, भागवत, वेद, स्मृति यांची माहिती लोकांना करून दिली पाहिजे. रोज एक घंटा तरी लोकांना हा आनंद लुटूं द्या. यापासून धर्माचें रक्षण होईल, देशकार्याची आवड उत्पन्न होईल व सर्वांचेंच कल्याण होईल. सर्व धर्मांत हिंदुधर्म श्रेष्ठ आहे......भागवताचें आपण जर अध्ययन व मनन केलें तर आपली अशी खात्री होईल कीं, सर्व धर्मांत हिंदुधर्म श्रेष्ठ आहे आपल्या धर्मांत ज्या रीतीचा उपदेश आहे तसा इतर कोणत्याहि धर्मांत नाहीं. ज्या धर्मांत राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न जन्मले, ज्या धर्मांत वसिष्ठादि ऋषि चमकले, ज्या धर्मांत श्रीशिवरायासारखे वीरशिरोमणी निर्माण झाले, धर्मरक्षणाकरितां ज्या धर्मांतील लाखों लोकांनीं आपल्या प्राणांचें बलिदान दिलें त्या सर्वश्रेष्ठ हिंदुधर्माचें वर्णन मी किती करणार ? हिंदुधर्माकरितां आपण काय केलें ? मिशनरी लोक आपल्या ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकरितां क्रोडों रुपये खर्च करीत आहेत, मुसलमानांचे हजारों मौलवी, ते आपला धर्म सच्चा समजत असल्यामुळें, न्यायानें अगर अन्यायानें, जुलूमजबरदस्तीनें हिंदूंना बाटवून आपल्या धर्मांत ओढीत आहेत. आपला हिंदुधर्म श्रेष्ठ व उत्तम असून आपण धर्मरक्षणाकरितां काय केलें ? हल्लीं जे मुसलमान दिसतात ते सर्व कांहीं



अरबस्थानांतून आलेले नाहींत. त्यांच्यांतील बहुतेक हिंदूंतील बाटविलेलेच मुसलमान आहेत. एका बाजूनें मिशनरी व दुसऱ्या बाजूनें इस्लामी धर्माचे लोक न्याय-अन्यायानें आपल्यांतील लोक बाटवितात. त्यांना परत आपल्या धर्मांत शुद्ध करून घेतलें पाहिजे. आणि आपल्या धर्माचें व जातीचें या हल्ल्यांपासून रक्षण केलें पाहिजे. या वेळेस आपलें कर्तव्य काय आहे ? तर आपण आळस टाकला पाहिजे. रोज कितीतरी लोक बाटविले जात असून आपण अजून झोंप घेत आहोंत ! दुसरे लोक आपल्या धर्मावर हल्ले करीत असून आपण अजून निजलों आहोंत, आपण या वेळेस जर कार्याला लागलों नाहीं तर शेवटीं आपणांस पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. व एकदां आतांची संधि घालविली म्हणजे मग त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. ठिकठिकाणीं हिंदुसभा स्थापन केल्या पाहिजेत, आणि त्यांच्याद्वारा सर्वांना एकत्र जमतां येईल अशा ठिकाणीं निदान पंधरा दिवसांनीं तरी एकदां एकादशीच्या दिवशीं सर्वांनीं एकत्र मिळून हरिकथा श्रवण करून परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे. शारीरिक व्यायामाची व ब्रह्मचर्याची परीक्षा घेऊन तरुणांमध्यें व्यायामाची आवड व ब्रह्मचर्याची निष्ठा उत्पन्न केली पाहिजे. तेजस्वी ब्रह्मचर्याचा महिमा त्यांना ऐकविला पाहिजे. त्यांना रामायण, महाभारत शिकविलें पाहिजे. ( आणि अशा रीतीनें हिंदुसमाजाच्या सर्वांगीण शक्तींची वाढ करून ) आपण हिंदुसंघटन केलें पाहिजे. शुद्धिकार्य केलें पाहिजे ( तरच आपला तरणोपाय आहे. ) "

---

## स्वामी श्रद्धानंद

### [ पुणें-शिवाजी मंदिरांतील भाषण ]

" शुद्धिकार्य जोरानें सुरू केलें पाहिजे. ( राजपुतान्याकडे ) तिकडे एक कोट मुसलमान असे आहेत, कीं ते केवळ नांवानें मुसलमान आहेत. त्यांना नबी कोण म्हणून विचारलें तर माहिती नाहीं. त्यांना पांडव, श्रीकृष्ण कोण हें माहित आहे. रत्नागिरीच्या माझ्या एका मित्रानें मला असें कळवलें कीं, रत्नागिरी भागांत दोन लाख मराठे असे आहेत कीं, त्यांच्यावर मुसलमान नांवाचा केवळ आरोप आला आहे. गोव्याकडे पावणेतीन लाख ख्रिश्चन झालेले आहेत. ते कृष्ण-

जन्माष्टमी, रामनवमी इत्यादि हिंदूंचेच उत्सव करतात, वर्षाच्या तीनपासेंष्टश दिवसांपैकीं केवळ एक दिवस ख्रिश्चनांचा उपदेश होतो. त्यांच्यांतसुद्धां ब्राह्मण ख्रिश्चन, अब्राह्मण ख्रिश्चन, अस्पृश्य ख्रिश्चन असे भेद आहेत. गोंव्यांतील ख्रिश्चन सर्व व्यवहार हिंदूंप्रमाणें करतात. अशा रीतीचे आणखी कितीतरी ठिकाणीं लोक आहेत. त्या सर्वांना शुद्ध करून घेण्यास सिद्ध व्हा, हेंच हिंदुसभेचें सांगणें आहे. कांहीं मुसलमान अशी धमकी देतात कीं, हिंदुसंघटन करा पण शुद्धिकार्य सोडा; नाहीं तर आपणांस मार देऊं-शीर तोडूं. पण या धमकीला कोणताहि हिंदु भीक घालणार नाहीं. शुद्धीशिवाय हिंदुसंघटन होणार कसें ? ते शुद्धि कां नको म्हणतात ? तर, त्यांच्यांत गेलेले लोक आपल्या धर्मांत परत येतील म्हणून. इतके दिवस आपल्यांतील अज्ञानी लोकांना बाहेर जाण्याचें द्वार खुलें असून आंत येण्याचें द्वार मात्र बंद होतें. पण या शुद्धिकार्यामुळें त्यांना परत हिंदुधर्मांत येण्याचें द्वार खुलें झालें आहे. म्हणून मुसलमान लोक संतापतात व धमक्या देतात......ब्राह्मणांचा गायत्री मंत्र इतका तेजस्वी आहे कीं, त्यानें वाटेल त्या अशुद्धाला शुद्ध करून घेतां येतें. आपण आपला धर्म अजून जाणत नाहीं. कलियुगांत संघ ही शक्ति आहे. या संघशक्तीची आपण आराधना केली पाहिजे. संघटनेचा अर्थच हा कीं, ( गेलेले परत मिळवून नवीन नवीन हानि होऊं न देतां आपण आपल्या जातीय ध्येयाच्या प्राप्तीचा मार्ग चालवयाचा आणि म्हणूनच ) आपल्यांतील साडेपांच कोटी लोक परधर्मांत गेलेले आहेत त्यांस शुद्ध करून घ्यावयास पाहिजे. मग शुद्धि सोडून संघटना कशी होणार ?... गोरक्षण करणें हें प्रत्येक हिंदूचें पवित्र कर्तव्य आहे.......परधर्मांत जे लोक जातात त्यांच्या हातून निदान एक तरी गाय दरसाल मारली जाते. तेव्हां परधर्मांत लोक जाण्याचें बंद केलें व गेलेल्यांना परत हिंदुधर्मांत घेतलें म्हणजे आपण एक प्रकारें तितक्या गाईंचेच प्राण वाचविले असें होतें. यालाच हिंदुसभा गोरक्षणच म्हणते. शुद्धीला सोडलें तर संघटन होईल कसें ? हिंदूच राहिले नाहींत तर हिंदी स्वराज्य होणार कसें ? शुद्धीनें हिंदुमुसलमानांची एकी बिघडते असें म्हणतात. मग सगळ्या हिंदूंनीं मुसलमानच झालें पाहिजे. म्हणजे हिंदुमुसलमानांची एकी कायमचीच झाली. अशा रीतीची एकी कोणता स्वाभिमानी व धर्मभक्त हिंदु स्वीकारील?... ...मला रामकृष्णांचें आर्यत्व [ श्रेष्ठत्व ] पाहिजे आहे. त्याकरितां कोणीहि जरी धमकी दिली तरी आपण आपलें कार्य सोडतां कामा नये. आम्ही एकच निशाण-झेंडा मानतो. तो म्हणजे रामदासस्वामींचा, शिवाजी महाराजांचा हिंदु धर्माचें



रक्षण करणारा पवित्र भगवा झेंडा. महाराष्ट्रीय बांधवांना माझें हेंच सांगणें आहे कीं, स्वधर्माचें रक्षण करणाऱ्या भगव्या झेंड्याची प्रार्थना करा. महाराष्ट्रांत शुद्धीकरणाची व संघटनेची विशेष आवश्यकता नाहीं असें म्हणतात. पण तुमच्याकरितां नसलें तरी पंजाब, संयुक्तप्रांत यांतील हिंदुबांधवांकरितां तरी आपण हिंदुसंघटन करा. आपण सर्वांनीं एक होऊन विराट् स्वरूपाची प्रार्थना केली पाहिजे. प्राण गेला तरी धर्म सोडणार नाहीं अशी वृत्ति निर्माण करा. ”

---

## डॉ. मुंजे

### [ पुणें येथील भाषण ]

‘ .........गेल्या चार वर्षांत प्रेम व अहिंसा या तत्वावर हिंदुमुसलमानांची एकी करण्याचा कसून प्रयत्न करण्यांत आला. प्रयत्नांची शिकस्त झाली. शेवटीं मुसलमानांचा अजूनहि स्वभाव कसा आहे याची पहिली ओळख दिल्लीच्या परिषदेमध्यें झाली. तेथें **मुसलमानांच्याकडून असें सांगण्यांत आलें कीं, एकदा मुसलमान झालेला मनुष्य परत आपल्या धर्मांत गेला तर त्याला शिक्षा कोणती ? तर त्याची कत्तल करावयाची.** ही शिक्षा मोठ्या आढ्यतेनें, व मनाच्या निश्चयानें मुसलमानांच्या उदार पुढाऱ्यांनीं सांगितली......कांग्रेसमध्यें इतके दिवस आम्ही ‘ हिंदी ’ या दृष्टीनें जात होतों; पण मुसलमान ही दृष्टि ठेवीत नाहींत. राजकीय, धार्मिक, सामाजिक, कोणताहि प्रश्न असो, ते लोक पहिल्यानें मुसलमानांच्या दृष्टीनें त्याच्याकडे पहातात; आपणहि त्यांनीं घालून दिलेला धडा गिरवून प्रत्येक प्रश्नाकडे हिंदूंच्या हिताच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. सहा महिन्यांत स्वराज्य व अस्पृश्यतानिवारण यांची सांगड घालण्यांत आली......सहा महिन्यांत स्वराज्य व अस्पृश्यतानिवारण या हुलीपासून वाईट परिणाम निघेल असें सकृद्दर्शनीं कोणासहि वाटलें नाहीं, पण हिंदुसभेच्या दृष्टीनें याचा विचार केला म्हणजे आपल्या ध्यानांत येईल कीं, यामुळें आपलें नुकसान झालें. सहा महिन्यांत स्वराज्याची कल्पना निघाल्याबरोबर मुसलमानांचे असे जोराचे प्रयत्न सुरू झाले कीं, इतक्या अवधींत सात कोटींचे चवदा कोटी मुसलमान होतील कसे ?.........जगांतील ख्रिश्चन व मुसलमान स्पर्धेनें आपल्या समाजावर हल्ले करीत आहेत, तेव्हां आतां आपण अस्पृश्यतानिवारणाचा

प्रश्न जितका लवकर सोडवाल तितकें चांगलें. आपल्या मनांत असो वा नसो, आपण या बाबतींत दुर्लक्ष्य केलें तर सात कोटीचे चवदा कोटी मुसलमान होतील याचा विचार करा......**मिशा वर करून मर्दुमकीनें हिंदुसमाज जिवंत रहावा असें वाटत असेल तर हिंदुसंघटन करा.** गोमेला हजार पाय असतात. वेळेला तिचा एकेक पाय तुटला गेला तरी तिला कांहीं वाटत नाही. परंतु दररोज किंवा दर महिन्याला त्या गोमेचा जर एकेक पाय तुटूं लागला, तर सर्व पाय तुटल्यावर ती गोम जिवंत राहणें शक्य आहे का? तशी आपल्या हिंदुसमाजाची स्थिति होईल. तेव्हां या दृष्टीनें विचार करून **आपण शुद्धी व हिंदुसंघटन करा.**"

---

## लाला लजपतराय

### [ मद्रास येथील भाषण ]

".........हिंदूंनीं संघटना केली पाहिजे. स्वतंत्र तरी व्हावयाचें, नाहीं तर मरावयाचें, असाच आम्हीं निश्चय केला पाहिजे. निरनिराळ्या तऱ्हेच्या संस्कृती आल्या व गेल्या. कित्येक राष्ट्रें उदयास आलीं व नाश पावलीं व युगेंच्या युगेंहि मागें पडलीं आहेत. परंतु हिंदुत्व जसेंच्या तसेंच शाबूत राहिलें आहे आणि राहिलेंहि पाहिजे. महाराणा प्रतापसिंह, गुरु गोविंदसिंह, श्रीशिवाजीमहाराज यांसारखे महान् वीर पुरुष जिच्या रक्षणार्थ तिच्या कुसव्यांत जन्म घेत आहेत, श्रीसमर्थ रामदासासारखे कर्णधार जिला लाभत आहेत, जिनें हजारों पराक्रमी योद्धयांना, शेंकडों महात्म्यांना, सहास्रावधि हुतात्म्यांना ज्या राष्ट्रांनीं–ज्या जातींनीं जन्म दिला त्या राष्ट्रानें भविष्यकालीन उत्कर्षाविषयीं निराशा बाळगण्याचें कारण नाहीं. केवळ जागृत होऊन प्रयत्नशील राहून आपण आपणाला सुसंघटित केलेंच पाहिजे. तद्भावीं मात्र महान् संकट पुढें ओढवेल म्हणून हिंदुसंघटना करा व आपल्या जातीला–राष्ट्राला संकटमुक्त करून वैभवोन्मुख करा."

---

## बाबू अरविंद घोष

देशभक्त लाला लजपतराय हे पांदेचरीला बाबू अरविंदांच्या भेटीला गेले होते. तेथें लालाजीशीं झालेल्या त्यांच्या भाषणाची माहिती वर्तमानपत्रकारांच्या



बातमीदाराला देतेवेळीं लालाजींनीं अरविंदबाबूंचें हिंदुसंघटनासंबंधीं बाबूजींच्याच शब्दांत सांगितलेलें मत येणेंप्रमाणें आहे.

बाबू अरविंद म्हणतात:—"हिंदुसमाज सुसंघटित व जोमदार तुम्हाला केलाच पाहिजे, हिंदुमुसलमान या दोघांनाहि हिंदुस्थानातच रहावयाचें असल्यामुळें दोघांत वैरभाव उत्पन्न न होईल इतकी मात्र शक्यतोंवर खबरदारी घ्या." राजकीय बाबतींत सरकारची जेथें जेथें शक्ति सांठवली असेल तीं तीं सर्व स्थलें हस्तगत करून त्याचा राष्ट्रहिताला उपयोग करून घ्यावा असें त्यांचें मत दिसलें.

अरण्यांत लहान लहान दगड गोटे पडलेले असतात. त्यांना अस्तित्व आहे हें खरें, परंतु त्यांना महत्व नाहीं. जाणारे येणारे प्रवासी येतां जातांना त्यावर पाय देऊन येतात जातात; कदाचित् एखादा धोंडा रस्त्यांत चालतांना थोडा मोठा असल्यामुळें त्रास देणारा भासतांच त्यांच्याकडून ठोकरला जातो. थंडी, वारा, ऊन यांच्या परिणामांचा त्यांच्यावर मारा होत असतो आणि तो ते निमूटपणें सहन करीत आपलें दीनवाणें अस्तित्व कंठीत असतात. प्रकाशित दिवसांत अथवा अंधकारमय रात्रींत ते एकाच निस्सहाय, सामर्थ्यहीन व परस्पराजवळ असतांनासुद्धां परस्पर मेलनाविरहीत व म्हणूनच दुर्बल स्थितींत परिस्थितीचा अत्याचार सहन करीत सर्वजनतिरस्कृतावस्थेंत पडलेले असतात.

परंतु हेच विखुरलेले व विसंघटित दगड जेव्हां एका विशेष क्रमानें व प्रकारानें एकत्र केले जाऊन संघटित व विशिष्ट रचनायुक्त बनतात त्या वेळीं त्या त्या रचनाविशेषानें त्यांच्या भिंती, तट, किल्ले, गांव, नगरें, महाल, वाडे, राजवाडे इत्यादि विविधरूपानें ते नटतात. त्यांच्या त्या पूर्वींच्या, मूल्यहीन स्थितीशीं यांच्या या रचनाप्रकारानुरूप कमी जास्त सामर्थ्याच्या, मोलाच्या व सौंदर्याच्या स्वरूपाशीं तुलना केली तर केवढें महदंतर दिसून येतें. त्या क्षुद्र स्थितींतल्या दगडांना ती ठोकरून पुढें जाणारी मनुष्यजाति त्याच निर्जीव दगडांच्या विविध रचनांच्या प्रकारांना पाहून कांहीं ठिकाणीं साश्चर्यता प्रकट करते, कोठें त्यांच्या सौंदर्यावर लुब्ध होऊन जाते, कोठें त्यांच्या मूल्याचें मोजमाप करतां करतां कुंठित होते, तर कोठें त्यांच्याच–जे एकवार ठोकरण्याइतके क्षुद्र वाटले त्यांच्याच–संघटित सामर्थ्याच्या आश्रयाला जाऊन स्वतःचें संरक्षण करून घेण्याकरितां आतुर होते. आणि हें अकल्पनीय सामर्थ्य त्याच निर्जीव व तुच्छ दगडाधोंड्यांत कशानें आलें असेल तर तें एका संघटनानेंच. निर्जीव, तुच्छ दगडगोट्यांचें जर संघटनाच्या

जीवनदायी मात्रेनें इतकें माहात्म्य वाढलें, तर सजीव, बुद्धिबलयुक्त करणी केल्यास नारायणत्व प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य ज्याच्यांत आहे असा मनुष्य संघटनाच्या त्रैलोक्यचिंतामणीचा जर आश्रय करील तर आपलें किती तरी कल्याण करून घेण्यास समर्थ होईल.

जगांतील आज समर्थ व कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्‌शक्ति असलेल्या प्रबल राष्ट्रांकडे पाहिलें तरी हेंच संघटनासामर्थ्य त्यांच्या सांप्रतच्या महत्तमतेची गुरुकिल्ली आहे असें दिसून येईल. यूरोपांतील थोड्याशा शतकांपूर्वी अंगाला रंग लावून नागवे उघडे फिरणारे इंग्लिश लोक आपल्या संघटनासामर्थ्याच्या–सामाजिक, बौद्धिक, व्यापारी, राजकीय इत्यादि संघटनासामर्थ्याच्या–बलावर आज जगामध्यें अग्रगण्य होऊन राहिले आहेत. पददलित जातीनें आपला पुनरुद्धार याच संघटनेच्या जोरावर करून घेतला, परतंत्र राष्ट्रांनीं याच संघटनादेवतेच्या प्रसादानें आपली स्वातंत्र्यश्री परत मिळविली, ज्या ज्या जातींना, समाजांना, धर्मांना जगामध्यें धोक्यांत आलेलें आपापलें अस्तित्व पुनः निर्भय व उत्कर्षयुक्त करावयाचें होतें त्यांनीं त्यांनीं या संघटनाशक्तीची उपासना करून आपला उद्धार करून घेतला असेंच इतिहासांत आढळून येईल. भूतकाल हाच धडा देतो, वर्तमानकाल हाच सिद्धांत पटवून देत आहे, व भविष्यकाल हाच अनुभव आणून देईल. या नियमाला अपवाद नाहीं. विसंघटित, अलग अलग, स्वार्थमग्न व सजातीय स्वत्वद्रोहाच्या शेणांतच बुजबुजणाऱ्या कीटकमय आयुष्याचा अवलंब करणाऱ्याच्या जातीला वा समाजाला मृत्यूची प्राप्ति व संघटित, सबद्ध, अखिल जातिस्वार्थप्रेमी व स्वजातीय भक्तीनें भूषित अशा देवसमान आयुष्याचा स्वीकार करणाऱ्या धन्यपुरुषांनीं युक्त जाति वा समाज यांना अमरत्व–लाभ हा अबाधित सिद्धांत भूतकाल शिकवितो आहे, वर्तमानकाल प्रत्ययाला आणून देत आहे व भविष्यकाल सिद्ध करणार आहे.

ज्यांना पूर्व इतिहास नाहीं, ज्यांचें वय कांहीं शेंकड्यांनींच मोजतां येणें शक्य आहे, जे रंग लावतांना, नागवे उघडे फिरतांना, कळपांकळपांनीं आयुष्य कंठितांना पाहिलेलें जगाला अगदीं ताजेपणानें आठवत आहेत असे मनुष्यसमाज थोड्याशा कालावधींत आपलें सामुदायिक शरीरबल व बुद्धिबल सुसंघटित करून जर जगावर अग्रगण्य होऊं शकतात, तर ज्या जातीच्या इतिहासाचें पहिलें पान जगाला सांपडत नाहीं, जिच्या संस्कृतीच्या, सामर्थ्याच्या, वैभवाच्या व महत्तमतेच्या



कालाचा आरंभ इतिहासाला माहित नाहीं, जिचें आयुष्य मोजण्यासाठीं शतकांचे मानदंड मोडून जातात व हजारांचे मानदंड तोकडे पडतात, ज्या जातीनें जगांतील सर्व धर्मांना जीवन दिलें, तिचें तत्वज्ञान जगांतील सर्व तत्त्वज्ञान्याच्या तत्वज्ञानाला खाकोटीस मारूनहि 'अत्यतिष्ठत् दशांगुलं' ( सर्वांनीं जे जें सांगितलें तें सर्व सांगूनहि जें कोणी सांगितलें नाहीं वा जें कोणालाहि सांगतां आलें नाहीं तेंहि सांगून टाकून इतरांना सांगावयाला अधिक कांहींच ठेवलें नसून तें अतिसीमाव्यापी वा अनंतस्वरूपी ) असें चकाकत आहे, जगांतील सर्व उच्च संस्कृतींची जी जन्मदात्री आहे; जिनें अनेक राष्ट्रांचे जन्ममृत्यु पाहिले; जी अतिप्राचीन; जिचे पाय पातालाच्याहि अधःस्तलावर रोवलेले आहेत व जिचें डोंके सात स्वर्गाच्याहि वर ब्रह्मप्रदेशीं पोंचलेलें आहे; रामकृष्णादि दिव्यपुरुष आणि व्यासवाल्मीकादि महान् ऋषि जिच्या मुकुटाला दीप्तिमंत करीत आहेत; कर्णभीमार्जुनादिकांसारखे नरमणि जिच्या कंठांतील कंठमणि झालेले आहेत; धर्म–नल इत्यादि प्राचीनकालीन, अशोक–चंद्रगुप्त–समुद्रगुप्त इत्यादि मध्यकालीन सम्राटरत्नें जिच्या गळ्यांत रत्नहाराप्रमाणें शोभतात; पृथ्वीराज–राणा संग्रामसिंह–महाराणा प्रताप–छत्रपति शिवाजी, राजा छत्रसाल यांच्यासारखे महान् प्रतापी पुरुष जेथें त्या जातीचें सिंहासन अढळ व अचल ठेवण्यासाठीं सिद्ध होतात; वीर वैरागी–गुरु गोविंदसिंह–छत्रपति संभाजी असल्या असल्या ज्ञात व अज्ञात अशा अशा दिव्य हुतात्म्यांनीं जिच्या मानरक्षणार्थ आपल्या प्राणांचे बळी देऊन जिच्या नांवाचा शत्रूंनांसुद्धां धाक बसविला; ज्यांच्या दिव्य व महान् तत्वग्राही बुद्धिमत्तेच्या तेजस्वितेकडे पाहतांच जगांतील तत्वज्ञांच्या बुद्धिमत्तेची दृष्टि दिपून जावी असे अद्वितीय श्रीशंकराचार्यांसारखे जिचे तत्त्ववेत्ते अनादिकालापासून सर्व जगाला तत्त्वज्ञनाचा प्रकाश देत आहेत, अलौकिक प्रेमानें आर्द्र व दैवी दयामयतेनें मूर्तिमंत दयेलाहि लाजविणाऱ्या ज्यांच्या हृदयानें आत्मवत् सर्व भूतें जाणून जगांतील अखिल मानवजातीलाच नव्हे तर यच्चयावत् प्राणिमात्राला आलिंगन देण्याकरितां आपले बाहू उभारावे असे अतुल प्रेममय व अलौकिक दयाशील महात्मा गौतमबुद्ध–जैनाचार्य महावीर इत्यादि महात्मे जिच्या कुसव्यांत उत्पन्न होऊन हिंदु जातीचें हृदय विश्वव्यापी प्रेमरसानें कसें ओथंबलेलें व म्हणून सत्त्वगुणोत्कर्षानें कसें विभूषित झालेलें आहे हें सिद्ध केलें; आणि जी स्वतः असल्या दिव्य विभूति, महान् ऋषि, पराक्रमी वीर, तेजस्वी हुतात्मे दैदीप्यमान् तत्ववेत्ते व

प्रेममय महात्मे प्रसवते व जी सर्व शास्त्रांची जननी, कलाकौशल्यांची खाण अशी ही सनातन दिव्य वीरप्रसवा हिंदु जाति वर्तमानकालीं आपत्तिग्रस्त व संकटत्रस्त होण्याला संघटनाशक्तीचा तिच्या संततीला पडलेला विसरच कारणीभूत झालेला आहे, त्या ह्या विमल हिंदु जातीच्या कुसव्यांत जन्म घेतलेल्या भाग्यवान् हिंदूंनों ! सर्वजातिसंजीविनी

## संघटनाशक्तीची

उपासना करून केवल संघटित व्हा ! संघटित होण्याचा अवकाश, कीं त्या शक्तीच्या प्रसादानें तुम्हीं आपली माता **हिंदुजाति** पूर्वकालापेक्षांहि अधिक वैभवानें युक्त, प्रभावशाली व सर्वसमर्थतेच्या प्रचंड दीप्तीनें दैदीप्यमान् करूं शकाल. वंदेमातरम् !

**एक हुतात्मा.**